तुफान,

अर्थात्

धि टेम्पेस्ट.

LIST OF PATRONS

TO

THE SHAKESPEARE TRANSLATIONS

SERIES IN MARATHI.

The Rev. Dr. D. Mackichan, *Principal, Wilson College; Vice-Chancellor of the Bombay University.*

Mr. A.M.T. Jackson, *M. A.; Bar-at-Law; I.C. S.; sometime Secretary to Govt.*

Mr. R. A. Lamb, *ag. Chief Secretary to Govt.*

Mr. W.D.Sheppard, *Collector and Poll. Agent, Poona.*

Mr. A. Lucas, *Dist Judge and Agent for Sardars, Poona.*

The Hon'ble Sir Bhalchandra K. Bhatavadekar.

The Hon'ble Justice Narayan *Rao* G. Chandavarkar.

The Hon'ble Shrimant Sir Balasaheb Mirajkar.

The Hon'ble Shrimant Ganpatrao Madhavrao, *Vinchur.*

The Hon'ble Vithaldas Damodar Thakarsi Moolji.

The Hon'ble Daji A. Khare.

The Hon'ble Gokuldas Kahandas Parakh.

The Hon'ble Achyutrao B. Desai, *Administrator, Sangli.*

The Hon'ble Hari Sitaram Dikshit, *Solicitor.*

Mr. G. C. Whitworth, *Distt. Judge, Sattara.*

Col. W. B. Ferris, *Political Agent, Kolhapur.*

Rao S. Wasudeo Jagannath Kirtikar, *Govt. Pleader, H.C.*

Divan Bahadur Ramchandra V.Dhamanaskar, *late Divan of Baroda.*

Shrimant Ravji V. Shankarsheth, *J.P.; Hon. Magistrate.*

Shrimant Harishchandra Pandurang Pitale.

Shrimant Manajirao Kuvarjee Raje Shirke.

Shrimant Laxmanrao Mane, *Mankari, Baroda.*

Shrimant Shankarrao Gangadhar Shastri Patwardhan.

Rao Saheb Raghunanth V. Sabnis, *Divan, Kolhapur.*

Rao.S. Ramchandra G. Pradhan, *Karbhari, Janjira.*

Shrimant RamchandraBhaoosaheb Gayakawad, *Mankari, Faraskhana kamgar.*

Shrimant Udajirao Abbasaheb *Himmat Bahadur.*

Shrimant Rachojirao *alias* Appasaheb Desai *Inamdar.*

Dr. Ramkrishna Gopal Bhandarkar.

Rao S. Sitaram V. Patwardhan, *late Director of Public Instruction, Berars.*

Rao S. Balvant R. Sahasrabudhye, *Edl. Inspector, S.D.*

Proff. Shridhar Ramkrishna Bhandarkar.

Proff J.N.Frazer. *Dec.College.*

Proff. Abaji V. Kathawate.

Dr. Popat Prabhuram

Dr. Gangadhar Bapurao Patavardhan, *Thakurdwar, Bombay.*

Dr. Vinayak S. Tengashe, *L.M.&S.;M.D.; Ast.Darbar Surgeon, Kolhapur.*

Dr. Raghunath V. Khedkar, *Surgeon, Al. Ed. Hospital.*

Mr. Balkrishna V.N.Kirtikar

Mr. Khanderao Moroji.

Mr. Gangaram B.Rele *Vakil.*

Mr. Shamrao Vithal *Vakil.*

Mr. Nanu Narayan Kothare.

RaoSaheb Ghanassham N. Nadkarni, *H. C. Vakil.*

Mr. Ganpatrao S Rao. *H.C.V.*

Mr. Shrikrishna Goonaji Velinkar, *H Court Vakil.*

*Mr.*Kashinath R.Korgaokar, *H. Court. Vakil,*

Mr. Ramkrishna N. Thosar *Vakil, Kallyan & Thana.*

Mr. Keshav Abba Padhye, *Vakil, Thana.*

*Mr.*Bhaskar V.Jadhav, *M.A.; LL.B.Mun.Officer, Kolhapur.*

Rao B. Dhakji Kashinathjee.

RaoSaheb Balaji Pandurang.

Mr. Sokar Bapuji Trilokekar.

Rao B. Narayan T. Vaidya.

Rao S. Ramji Rukare *J.P.*

RaoSaheb Kaluram Bhau Mansaram.

Mr. Sadanand T. Bhandare.

Mr. Pandharinath K.Telang.

Seth Dharamsi Morarji.

„ Damodardas Rattansi.

„ Y. B. Kshirsagar, *Ink-Manufacturer.*

Mr. Ramkrishna R. Dhotre.

„ Dadabhai N. Dhume.

„ Bhimrao Atmaram.

„ Narayan Raghunath *J.P.*

„ Wamanrao D.Pitale *J.P.*

„ Vinayakrao Shamrao K.

„ Moreshvar Chandraman.

„ Harichand J. Goregaokar.

RaoS. Anandrao B.Pradhan.

Mr. Khanderao Ramchandra

Mr. Narayan V. Palekar.

„ Wamanrao Shamrao.

„ Keshav R. Gavalankar.

Mr. Anant B. Dastane.

Rao S. Hari R. Takle.

Rao S. Harichand K. Joshi.

Mr. Krishnarao B. Wagale.

Mr. B. N. Athavale *Pleader.*

Rev. D. S. Joshi, C. M. S.

Rev. J. B. Bawa, *of the American Mission.*

Secry. State Laibrary, *Baroda.*

Secry. State Laibrary *Sangli.*

Mr. Janardan Bajirao Nimkar *Manager Swadesh Hitchintak Dramatic Company.*

Shrimati Dhaklibai Sitaram Sukthankar.

Shrimati Mathurabai Dinkar Nanamoroji.

Miss. Dyson, *Guardian & Tutor to BaiSaheb Malekar.*

Shrimati Rakhumabai Kelavkar *LadySupt. Girls Schools, Kolhapur.*

☞ ही यादी प्रेसावर गेल्यावर आश्रयदातेझालेल्या गृहस्थांचीं नांवें येथें घालतां आलीं नाहीं.

सूचना.

शेक्स्पियर कवीवर इंग्रज लोकांचें किती प्रेम आहे, याची पुष्कळांस चांगलीशी कल्पनाहि नसेल. ती व्हावी अशी इच्छा असेल, तर आपले गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन, यांनीं नुकत्याच एका भाषणांत जे उद्गार काढले, ते वाचून पहावे अशी त्यांस शिफारस आहे. ते उद्गार हेः—

"Carlyle once posed a curious question—namely, whether the British people would sooner lose their Shakespeare or their Indian Empire ; and he decided in favour of the latter. Because, he said,—'your Indian Empire in any case must go sooner or later ; but Shakespeare cannot go. He lasts for ever with us. We cannot give up our Shakespeare.' Well, …….. there is no reason why we should lose either. Let us keep both. Let India remain *our India* just as much as Shakespeare is our Shakespeare,—that is to say, as *a part of the inalienable heritage of Englishmen, and the lasting glory of the British race!*"
—LORD CURZON at the *London Union Club, 1st Augvst, 1904.*

ह्या वरून उघड होतें, कीं ह्या अवाढव्य भरतखंडाचें सार्वभौमत्व एकीकडे व शेक्स्पियर कवि एकीकडे—एवढा मान लॉर्ड साहेब व त्यांचे देशबंधु त्याला देतात. अशा ह्या त्यांच्या आवडत्या कवीचे सर्व ग्रंथ आह्मी भाषांतररूपानें मराठींत आणून, आमच्या देशबंधूंस त्याचा परिचय करून देत आहों. हा आमचा उद्योग सर्वांस पसंत पडेल अशी आह्मास आशा आहे.

प्रकाशक.

शेक्स्पियर-कविकृत नाट्यमाला,
खंड १ ला.

—:o:—

तुफान,

अर्थात्

धि टेम्पेस्ट.

प्रस्तावना, गुणदोषविवेचनात्मक उपोद्घात व कथानक

यांसहित

भाषांतरकार

खंडेराव भिकाजी बेलसरे.

कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं नवरसांचे वोघ लोटले ।
नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥

दासबोध.

के. सी. कुळकरणी, प्रकाशक;
शेक्स्पियर-क्लब, गिरगांव पोष्टाचा रस्ता, मुंबई.

किंमत रु. २
शिवाय टपालखर्च रु -।-

[इंदुप्रकाश, कर्नाटक व शारदाक्रीडन ह्या छापखान्यांत छापिलें.]

समर्पण.

श्रीमन्महाराजशाहुछत्रपति,
करवीर सरकार, कोल्हापुर,
यांच्या सेवेशीं.

महाराज,

दूरदेशच्या एका सर्वमान्य पाहुण्याचा परिचय आपल्या महाराष्ट्रदेशबंधूंस करून देण्याचा यत्न मी करीत आहें. हा पाहुणा कोणी राजकीय पुरुष नाहीं, कोणी धर्माचार्य नाहीं, कोणी समाजसुधारक नाहीं; केवळ कवि आहे. ह्याचें नांव शेक्स्पियर. आपल्या इकडील कालिदास, भवभूति या कविरत्नांप्रमाणेंच हा आपणास प्रिय असावा अशी याची योग्यता आहे. ह्याच्या देशचा हा 'कविराजराजितिलक' (Prince of poets) आहे. तेव्हां, एवढ्या 'कविराजा'-चा सत्कार करावयाचा, तर त्याला बिऱ्हाड कोठें द्यावें ह्या विवंचनेंत मी होतों. कारण, ह्याला ह्याच्या तोला-चे असेच कोणी महाराज असावे हें योग्य. छत्रपतींचें घराणें महाराष्ट्रांत फार थोर, पुरातन, परमपूज्य व विद्वज्जनांची बूज ठेवणारें, असें जाणून सहजच माझी दृष्टि महाराजांकडे वळली; व महाराजांनींहि, थोर मनानें व गुणज्ञपणें, माझ्या विनंतीचा आदर केला. तेणेंकरून मनाला मोठा संतोष झाला आहे. हे महाराजांचे उपकार स्मरून, व समक्ष भेटी-अंतीं 'वारंवार भेट देत जावी' ह्मणून महाराजांनीं आज्ञा केली, तीही शिरसा वंद्य करून, हा 'नाट्यमाले'चा पहिला खंड 'भेट' ह्मणून सेवेला हजर केला आहे. स्वीकार व्हावा, हे विज्ञापना.

नम्र सेवक

खंडेराव भिकाजी बेलसरे,
ग्रंथकर्ता.

मुंबई, शेक्स्पियर क्लबरूम.
ता. १ आक्टोबर १९०४

अनुक्रमणिका.

प्रसिद्धिपत्रक.

शेक्स्पियरकृत-नाट्यमाला.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ।
(मालविकाग्निमित्रे कालिदासः ।)

निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळुणकर म्हणतातः—"आमची विद्वान मंडळी कालिदासादि संस्कृत कवि आणि शेक्स्पियरप्रभृति पाश्चिमात्य कवि यांच्या कृतींचा, साक्षात् किंवा भाषांतरद्वारा, लोकांस जितका अधिक परिचय करून देईल तितके ते सर्वांच्या धन्यवादास अधिकाधिक पात्र होतील."-किरकोळ लेखांचा संग्रह, भाग २रा, पृष्ठ १४०.

आंग्ल नाट्याचार्य शेक्स्पियर याचें नांव सुशिक्षित जनमंडळांत कोणास ठाऊक नाहीं असें नाहीं. या अद्वितीय कवीचीं—एक नाहीं, दोन नाहींत—सदतीस नाटकें प्रसिद्ध असून, त्यांत मानवस्वभावाचीं वेगवेगळीं स्वरूपें त्यानें अशा चातुर्यानें दाखविलीं आहेत कीं, तेणेंकरून विचारी मनुष्याचें मन केवळ थक्क होऊन जातें. सत्कवींच्या अशा कृति कोणत्याही भाषेंत असोत व कोणत्याही देशाच्या असोत, त्या सर्व जगास वंद्य होत. हाच भाव मनांत आणून विष्णुशास्त्री यांनीं वरील उद्गार प्रगट केले हें उघड आहे; आणि हाच भाव मनांत वागवून आम्ही प्रस्तुत उद्योगास प्रवृत्त झालों आहों.

आमचा उद्देश

हा उद्योग आरंभिण्यांत असा आहे कीं, शेक्स्पियर कवीच्या सर्व कृति भाषांतररूपानें मराठींत उतरून, त्या मराठीवाचकांस अर्पण कराव्या, व त्या कविश्रेष्ठाच्या रसाळ व प्रौढ वाणीचा रसास्वाद यथेच्छ घेतां येईल असें साधन त्यांस प्राप्त करून द्यावें. या उद्देशानें आम्हीं "**शेक्स्पियरकृत–नाट्यमाला**" या नांवाची एक पुस्तकमालिका काढण्याचा बेत केला आहे. तिची बहिर्गत आणि अंतर्गत व्यवस्था कशी ठेवावयाची ठरलें आहे तें येथें सांगतों.

बाह्यव्यवस्था.

ह्या कवीचीं एकंदर नाटकें सदतीस आहेत हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां, एकेक नाटकाचा एकेक संपूर्ण खंड, याप्रमाणें सदतीस नाटकांचे सदतीस खंड तर होतीलच; शिवाय, त्यानें रचलेलीं काव्यें व इतर कविताही प्रसिद्ध आहेत, त्यांचा एक खंड होईल; आणि त्याचें सविस्तर चरित्र, त्याच्या संबंधाच्या अनेक आख्यायिका, त्या वेळच्या व सांप्रतच्या रंगभूमीची स्थिति व तदनुषंगानें इकडील नाट्यकलेच्या स्थितीसंबंधीं सुचणारे विचार इत्यादि उपयुक्त विषयांचे दोन खंड; मिळून चाळीस खंडांचा ह्या दीर्घ मालिकेंत समावेश होणार आहे; त्यांचा तपशील येणेंप्रमाणें:—

LOVE PLAYS:—

1 The Tempest.
2 Romeo and Juliet.
3 The Merchant of Venice.
4 The two Gentlemen of Verona.
5 Loves' Labour lost.
6 All's well that ends well.
7 Midsummar Night's Dream.

COMEDIES:—

8 The Merry Wives of Windsor.
9 As you like it.
10 Much ado about nothing.
11 Twelfth Night; *or* What you will.
12 The Winter's Tale.
13 The Comedy of Errors.
14 The Taming of the Shrew.

TRAGEDIES :—
15 Othello.
16 Hamlet.
17 Macbeth.
18 King Lear.
19 Cymbeline.
20 Troilus and Cressida.
21 Timon of Athens.
22 Julius Caesar.
23 Antony and Cleopatra.
24 Coriolanus.

HISTORICAL PLAYS :—
25 Henry VI. (Part I.)
26 " " (Part II.)
27 " " (Part III.)
28 Richard III.
29 Richard II.
30 Henry IV. (Part I.)
31 " " (Part II.)
32 Henry V.
33 King John.
34 Henry VIII.

MISCELLANEOUS PLAYS :—
35 Titus Andronicus.
36 Pericles of Tyre.
37 Measure for Measure.

GENERAL :—
38 Sonnets and other Poems.
39 Life and Annecdotes.
40 General Introduction comprising a sketch of the status of Sh. as dramatist, poet, character-painter and philosophor in the English Literature; the stage in England and India compared, with reflections.

आतां, हीं एवढीं चाळीस पुस्तकें एकदम तयार करून, प्रगट करूं म्हटलें, तर तें केवढ्या मेहनतीचें, खर्चानें व जोखिमाचें काम आहे हें कोणासही सांगावयास नको. या अडचणीला आम्ही अशी तोड काढली आहे कीं, हप्त्या हप्त्यानें काम करीत जावें व झालेलें काम ग्राहकांच्या पदरांत टाकून हप्त्या हप्त्यानेंच त्यांच्यापाशीं द्रव्यसाहाय्य मागावें; म्हणजे उभयपक्षीं जड न वाटतां, इष्ट हेतु सुलभतेनें तडीस जाईल. यास्तव आम्हीं असें ठरविलें आहे कीं, दोन दोन महिन्यांला एकेक संपूर्ण खंड काढून, वर्षाचे साहा खंड ग्राहकांच्या हातीं द्यावे. याप्रमाणें निर्विघ्नपणें काम चाललें असतां, सात वर्षांच्या अखेरीस ही दीर्घ मालिका समाप्त होऊन, शेक्स्पियरसारख्या एका जगन्मान्य कवीच्या सर्व कृतींचा संग्रह मराठी भाषेंत झाला असें होईल. ही या मालिकेची बाहेरची व्यवस्था झाली. आतां तिचें

अंतःस्वरूप

कसें आहे त्या संबंधानेंही सामान्येंकरून कांहीं माहिती कळविली पाहिजे. प्रथमतः हें सांगणें अवश्य आहे कीं, शेक्स्पियर कवीचीं जीं नाटकें आम्ही मराठींत आणून, "नाट्य-मालें"त गुंफणार आहों, तीं सारीं **मूळ नाटकांचीं शुद्ध भाषांतरें** होत. मूळ पात्रांचीं व स्थलादिकांचीं नांवें बदलून, आपल्या इकडील रीतिरिवाजास, कशींवशीं तरी, साजतील अशा प्रकारचीं रूपांतरें (adaptations) करून वाचकांच्या हातीं देण्याचें आमचें मानस नाहीं. याचें मुख्य कारण असें आहे कीं, रूपांतरांत मूळ कवीचें हृदय विशदपणें दिसून येत नाहीं व त्याच्या प्रगल्भ वाणीचें स्वारस्यही नीटपणें भासत नाहीं. याशिवाय, यागो, ऑथेल्लो, हॅम्लेट, शाय्लॉक वगैरे नांवांमध्येंच जी एक प्रकारची जादू भरली आहे, ती बदललेल्या तत्समान-गुणदर्शक नांवांमध्यें कोठून भासणार? आमचें तर असें मत आहे कीं, शेक्स्पियर कवीशीं मराठी वाचकांचा परिचय करून द्यावा म्हणून जर आमचा मुख्य संकल्प आहे, तर तो रूपांत-रांनीं, जावा तसा, तडीस जाण्यासारखा नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करून, आम्हीं प्रस्तुतचा भाषांतराचा मार्ग स्वीकारला आहे. हीं भाषांतरें मात्र, मूळ अर्थास धरून, सहसा मर्म न जाऊं देतां, साध्या, सरळ व शुद्ध मराठी भाषेंत केलीं जातील. इंग्रजी ग्रंथांचीं मराठी भाषांतरें वाचायाला गोड लागत नाहींत,— बहुधा दुर्बोध व नीरस वाटतात, असा जो साधारणतः साधार बोभाटा आहे, त्यास ह्या आमच्या भाषांतरांमध्यें सहसा अव-काश मिळूं नये अशाविषयीं योग्य सावधगिरी ठेवली जाईल. अशा प्रकारें एकेका समग्र नाटकाचें भाषांतर एकेका स्वतंत्र खंडांत देऊन, आणखी आरंभीं एकेक विस्तृत उपोद्घात

जोडला जाईल. ह्या उपोद्घातांत प्रथम नाटकाचें संक्षिप्त कथानक येईल; पुढें कवीनें त्या त्या नाटकांत काय काय खुबी केली आहे, पात्रांची योजना कसकशी केली आहे, त्यांचें स्वभाववर्णन कसकसें वठविलें आहे वगैरे गोष्टींचें मार्मिक विवेचन येईल; व आणखीही पुष्कळ अवांतर उपयुक्त माहिती दिली जाईल. सारांश, **शेक्स्पियर कवीसंबंधाची भरपूर माहिती या पुस्तकांमध्यें येणार असून, सांगण्यासारखी अमुक गोष्ट वगळली आहे अशी कुरकुर करण्यास जागा उरणार नाहीं**, अशी एकंदर योजना ठेवली जाणार आहे.

परंतु येथें कोणी असा प्रश्न करतील कीं, शेक्स्पियर कवीचीं बरींचशीं नाटकें मराठीमध्यें होऊन गेलीं आहेत, मग रिकामका हा खटाटोप कशाला? याला उत्तर एवढेंच कीं, त्यांचा हा प्रश्न शोधपूर्वक केलेला नाहीं. ह्या महाकवीच्या कित्येक मुख्य मुख्य नाटकांचीं भाषांतरें किंवा रूपांतरें जरी मराठींत झालीं आहेत, तरी सर्वांचीं झालेलीं नाहींत. सरासरी वीस नाटकें तर कोणत्याही रूपानें मराठींत मुळीं आलींच नाहींत; म्हणजे एकंदर नाटकांपैकीं निम्मेशिम्मे संख्या अशी आहे कीं, तिला मराठी भाषांतरकाराचा किंवा रूपांतरकाराचा हात देखील लागलेला नाहीं! आणि ज्यांचीं भाषांतरें किंवा रूपांतरें मराठींत झालीं आहेत, त्यांतही हातांत धरण्यासारखीं पाहिलीं तर पांच-साहाहून जास्त निघतील असें वाटत नाहीं! हें संख्येच्या संबंधानें एक झालें. आतां, त्यांवरून कवीचें रहस्य कितपत कळण्यासारखें आहे, या दृष्टीनें त्यांचा विचार केला, तर तींही आपल्या फारशीं उपयोगीं पडण्यासारखीं नाहींत. पहा कीं, दोन तीन खेरीज करून बाकीचीं सारीं मुळांचीं रूपांतरें असून, तींही वेगवेगळ्या मनुष्यांनीं वेगवेगळ्या हेतूंनीं प्रेरित होऊन,

मराठींत आणलीं आहेत. अर्थात्. कांहीं गद्यात्मक, कांहीं संस्कृताच्या धाटणीवर गद्यपद्यात्मक, आणि कांहींतर संगीताच्या नव्या पद्धतीवर तयार केलेलीं अशीं आहेत. यासंबंधानें पुष्कळच लिहिण्यासारखें आहे, व तें प्रस्तुत होऊं घातलेल्या या मालेच्या एका स्वतंत्र खंडांत सविस्तर येणारच आहे. म्हणून सध्यां एवढेंच सांगतों म्हणजे पुरे आहे कीं, शेक्स्पियरकवीचीं जीं नाटकें मराठींत आलीं आहेत तीं सारीं एका मनुष्याच्या हातून निघालेलीं नसून, अमुक एका विवक्षित पद्धतीवर तयार केलीं आहेत असेंही नाहीं, व म्हणूनच त्यांवरून त्या कविश्रेष्ठाच्या बुद्धीच्या विशालत्वाची यथार्थ कल्पना होण्याजोगी नाहीं. शेक्स्पियरकवीची बुद्धि म्हणजे एक प्रचंड राजवाडाच होय. राजवाड्याच्या भव्यपणाची कल्पना आपणास व्हावी अशी जर कोणाची इच्छा असेल, तर त्या समग्र वाड्याचें एकाच मनुष्यानें केलेलें वर्णन जसें उपयोगीं पडेल, तशीं त्याच्या वेगवेगळ्या सोप्यांचीं वेगवेगळ्या प्रवाशांनीं, आपल्या पदरचें तिखटमीठ लावून, सजविलेलीं वर्णनें उपयोगीं पडतील काय? —कधीं पडणार नाहींत. मग, हीच गोष्ट शेक्स्पियरकवीच्या अगाध बुद्धिशक्तीसही लागू असल्यामुळें, तिचा ठाव, दहापांच नाटकांच्या वरच्यासारख्या रूपांतरांनीं तरी कसा लागावा बरें! आमची समजूत तर अशी आहे, कीं वेगवेगळ्या नाटकांत प्रसंगानुरोधानें त्या कविरत्नानें आपल्या अप्रतिम बुद्धीचें जें दिव्यतेज प्रगट केलें, त्याचें सौंदर्य पूर्णपणें मराठी वाचकांच्या मनांत भरावें व त्या तेजाच्या आनंदजनक प्रकाशाचें अवर्णनीय सौख्य त्यांनीं अनुभवावें, अशी इच्छा असेल, तर तीं सर्वच नाटकें, मर्म न जाऊं देतां, एका विवक्षित पद्धतीनें, मराठींत उतरून, रसज्ञजनांपुढें ठेवलीं पाहिजेत. आमचा हा यत्न अशाच प्रकारचा आहे हें येथें वेगळें सांगणें नलगे.

या नाट्यमालेचा उपयोग,

एकंदरीनें मराठी वाचकांस कसकसा होण्यासारखा आहे, याची अटकळ वरील माहितीवरून कोणासही होण्यासारखी आहे. सामान्य वाचकास, ह्या पुस्तकांपासून, मनोरंजनाबरोबरच आणखी अनेक मार्मिक विचार व बोधपर वचनें यांचा लाभ होऊन, बहुश्रुतपणा अंगीं येण्यास ज्या साधनाची अपेक्षा असते तें त्यांच्या हातीं आलेंसें होणार आहे. विद्यार्थ्यांसतर या पुस्तकांचा मोठाच उपयोग होण्याजोगा आहे. शेक्स्पियर कवीचीं मूळ नाटकें इकडील विद्यापीठाच्या परीक्षांसाठीं मॅट्रिकपासून एम. ए. पर्यंत प्रत्येकवर्षीं नेमिलीं असतात व त्यांचा आमची विद्यार्थी मंडळी कडाक्यानें अभ्यास करीत असते, तेव्हां, या मालिकेंतील पुस्ताकांच्या आरंभीं घालण्यांत येणारे गुणदोषविवेचनात्मक उपोद्घात व इतरही वेंचक माहिती यांची उपयुक्तता त्यांस भासून, एकदातरी हीं भाषांतराचीं पुस्तकें नजरेखालीं घालून ठेवावीं असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. नाटकी (नाटकें पाहणारे व करणारे) मंडळीस पण आमच्या नाटकी (नाटकें पाहणारे व करणारे) मंडळीस या मालेचा जो उपयोग होणार आहे, तो या दोहोंहूनही विशेष आहे असें वाटतें. कदाचित्, या भाषांतरांचेच प्रयोग इकडील रंगभूमीवर झाले असतां, इतक्यांतच लोकदृष्टीला गोड न लागले, तरी नाटकांचे हे उत्कृष्ट नमुने त्यांच्या दृष्टीस पडले असतां, यांच्या आधारें (कै० महादेव शास्त्री कोल्हटकरांच्या आथेल्लोवरून रा. देवलांनीं केलेल्या झुंजाररावासारख्या) नवीन रंगावृत्त्या तयार करण्याची कोणा बुद्धिमानाला स्फूर्ति प्राप्त होईल; मग सहजच, " सत्यविजय " " विक्रमशशिकला " यासारखीं नाट्यकलेस कलंकभूत अशीं बाष्कळ व घाणेरडीं नाटकें मागें

पडतील, व लोकाभिरुचीस नवें चांगलें वळण लागेल. आजपर्यंत शेक्स्पियर कवीचीं जीं थोडीं थोडकीं नाटकें मराठींत झालीं आहेत व त्यांपैकीं कित्येकांचे जे प्रयोगही अलीकडे होऊं लागले आहेत, त्यांवरून पाहतां, या महाकवीच्या कृतीची चव लोकांस लागत चालली आहे असें म्हणावयास चिंता नाहीं, व त्याच्या बाकीच्या नाटकांविषयीं देखील त्यांच्या ठिकाणीं जिज्ञासा उत्पन्न झाली आहे असें अनुमान केल्यास चूक होणार नाहीं. परंतु ही जिज्ञासा तृप्त करून घेण्याला सध्यां कांहीं मार्ग नाहीं. हा मार्ग आमच्या नाट्यमालेनें त्यांस खुला होईल हें उघड आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, आमचा हा यत्न मराठी वाचकांस बराच मानवेल व त्यांच्या आदरास पात्र होईल असा आम्हास भरंवसा आहे.

किंमतीविषयीं व वर्गणीविषयीं.

अशा प्रकारचा यत्न आजपर्यंत आपल्या इकडे कोणीं केला नाहीं. तथापि तो करणें इष्ट आहे हें लक्षांत आणून व मराठी भाषेची यथाशक्ति सेवा करावी अशा बुद्धीनें प्रेरित होऊन, आम्हीं ह्या कार्यास कंबर बांधली आहे. त्यांत मराठी भाषेच्या हितचिंतकांनीं आम्हास मदत करावी एवढीच त्यांस प्रांजलपणें आमची विनंति आहे. आम्ही जाणतों कीं, हें कार्य जसें अवाढव्य तसेंच मोठ्या प्रयासाचें आहे. तें यथास्थित रेटण्यास मेहनत व द्रव्य यांचें भरपूर पाठबळ असणें अवश्य आहे. पैकीं मेहनतीचा वांटा आम्ही उचलला आहे. **भाषांतराचें काम रा. खंडेराव भिकाजी बेलसरे यांच्या हातीं सोपविलें आहे** व त्यांत त्यांच्या विद्वान व अभिज्ञ अशा चार मित्रमंडळीचें चांगलें

साहाय्य मिळालें आहे. त्यापक्षीं एवढेंच सांगतों कीं, आमच्या बाजूनें मेहनतींत कसूर होण्याची काळजी नाहीं. याहून अधिक बोलणें सध्यां प्रशस्त नाहीं. आतां प्रश्न राहिला द्रव्यसाहाय्याचा! हें काम अर्थात् लोकांचें—मराठी भाषेच्या हितेच्छूंचें होय. तें करण्याचें मनांत आणल्यास कोणासही जड जाऊं नये अशीच तोड आम्हीं काढली आहे. ती अशी कीं, वर म्हटल्याप्रमाणें आमचें मेहनतीचें काम जसें आम्ही सवडीसवडीनें सात वर्षांत तडीस नेणार, त्याचप्रमाणें लोकांपाशीं जें द्रव्यसाहाय्य आम्ही मागतों तेंही सवडीसवडीनेंच मागणार; म्हणजे सर्व चाळीस पुस्तकांच्या किमतीची भली मोठी रक्कम एकदम वसूल करण्याच्या भरीस न पडतां, कायमचे वर्गणीदार करून ठेवून, एकेक खंड जसजसा बाहेर पडत जाईल तसतशी तेवढ्या पुरती वर्गणी वसूल करण्याची योजना केली आहे. प्रत्येक खंडाची **किंमत सरसकट दीड रुपया** ठेविली असून, सोईसाठीं वर्गणीदारांचे तीन वर्ग केले आहेत. हे तीन वर्ग व वर्गणी भरण्याचे नियम खालीं सांगतों.

वर्ग १ ला. (**आश्रयदाते**)—यांस प्रत्येक खंड निम्मे किमतीला म्ह० ८।२ ला तयार होतांच, बिनखर्चानें घरपोंचता होईल. मात्र प्रत्येक खंडाची निम्मे किंमत ८।२ या हिशोबानें चाळीस खंडांची किंमत रु. ३० होते, तिच्यापैकीं रु. १० त्यांत आरंभीं अगाऊ भरावे लागतील; बाकी रकमेपैकीं आणखी दहा रुपये साहा महिन्यांनीं तीन खंड निघाल्यावर, व आणखी दहारुपये पुढील साहा महिन्यांनीं अगाऊ भरावे लागतील. एकंदर आश्रयदात्यांची संख्या शंभराहून अधिक ठेविली नाहीं. पैकीं ५० आश्रयदात्यांची संख्या सध्यांच भरली असून, **आणखी पन्नासांची मात्र अपेक्षा** आहे. यास्तव ज्यांस या

योजनेचा लाभ घेणें असेल त्यांनीं त्वरा करावी. [अगाऊ भरावयाची रक्कम वरीलप्रमाणें न भरल्यास पूर्वीं भरलेली रक्कम परत न मिळतां पुढील खंड पाठविण्याचें बंद होईल. **आश्रयदात्यांचीं नांवें प्रत्येक खंडांत आरंभीं छापलीं जातील.**]

वर्ग २ रा. (**हितचिंतक**)—यांनीं आरंभीं अगाऊ रु. १ भरून वर्गणीच्या पटांत नांव नोंदवावें. यांस प्रत्येक खंड पाऊण पट किमतीला म्ह० रु० १८२ ला दिला जाईल, व तयार होतांच, तो त्यांस बिनखर्चानें रु १८२ व्ही. पी. नें रवाना होईल. [खंड न स्वीकारल्यास रु. १ परत न मिळतां पटांतून नांव काढलें जाईल.]

वर्ग ३ रा. (**वर्गणीदार**)—यांणीं फक्त ८४ आणे भरून पटांत नांव नोदवावें. प्रत्येक खंड पूर्ण रु. १॥ किमतीला बिन-खर्चानें रु. १॥ च्या व्ही. पी. नें त्यांजकडे पाठविला जाईल. [खंड न स्वीकारल्यास ८४ परत न मिळतां नांव पटांतून काढलें जाईल.]

विशेष खुलासा.

छापणी व बांधणी.–कागद जाड व तुळतुळीत; निर्मळ बारीक टाईप; डेमी द्वादशपत्री आकाराची कापडी पक्क्या पुठ्याची बांधणी. सारांश, हे चाळीस खंड, सारख्या आकाराचे व बांधणीचे, कपाटास शोभा व डोळ्यांस आनंद देणारे असे सर्वांगसुंदर केले जातील.

बिनवर्गणीदार ग्राहकांस सूचना.–जेवढे वर्गणीदार वरील नियमानुसार मिळतील तेवढ्याच प्रति छापविण्याचा विचार आहे. अधिक प्रति काढून, एवढ्या मोठ्या कार्यांत, रिकाम्या खर्चा-खालीं येतां येणार नाहीं. यास्तव, ग्राहकांनीं आपलीं नांवें

नोंदवून घेऊन अगाऊ वर्गणीदार व्हावें हें बरें. विनवर्गणीदारांस व मागाहून वर्गणीदार होणारास मागाहून पुस्तकें मिळण्याचा संभव नाहीं; व कांहीं थोड्या प्रति शिलकेस राहिल्यास, त्यांची किंमतही दीड रुपयाहून अधिकच पडेल.

आरंभ.—आरंभाला The Tempest, Romeo & Juliet, आणि The Merchant of Venice हीं नाटकें अनुक्रमें हातीं घेतलीं आहेत. सन १९०३ च्या **जानेवारी महिन्यांत, महाराजाधिराज एडवर्ड साहेब यांच्या** हिंदुस्थानांतील **राज्यारोहणसमारंभाच्या शुभमुहूर्तावर,** या कामास सुरवात केली असून, या इंग्लिश (Prince of Poets) "**कविराजराजितिलका**"स महाराष्ट्र वाङ्मयामध्यें **त्याच्या योग्य अशा उच्च पदावर आरूढ करण्याचा आमचा संकल्प आहे.**

शेवटली प्रार्थना.

आम्हीं उचललेल्या ह्या उद्योगाचें वास्तविक महत्व कळावें व मराठी भाषेची आस्था बाळगणारे गृहस्थांची आम्हास मदत करण्याकडे प्रवृत्ति व्हावी अशा हेतूनें हें सूचनापत्रक मुद्दामच अंमळ सविस्तर काढलें आहे. तरी, तें लक्षपूर्वक समग्र वाचून पहावें व यथाशक्ति आम्हांस मदत देऊन हा जगड्व्याळ उद्योग सिद्धीस नेल्याच्या श्रेयास वांटेकरी व्हावें एवढीच सर्वांस आमची शेवटची विनंती आहे.

के. सी. कुळकरणी आणि मंडळी,

पुस्तक-प्रकाशक व व्यवस्थापक.

काळकादेवीरोड, मुंबई.

प्रस्तावना.

आंग्ल कविश्रेष्ठ शेक्स्पियर याचीं सर्व नाटकें कांहीं विवक्षित पद्धतीनें, व साध्या, शुद्ध, सरळ भाषेनें लिहून, मराठींत आणावीं, असा हेतु कित्येक वर्षांपासून आमच्या मनांत घोळत होता, व त्याविषयीं अनेक बेत चालले होते. सांप्रत, त्या हेतूस अनुसरून, प्रत्यक्ष उद्योगास आरंभ झाला आहे; आणि प्रकृत खंड हें त्याचें पहिलें फळ होय. हें रसिक महाराष्ट्र जनांस अर्पण करतांना, आह्मास पराकाष्ठेचा आनंद होत आहे.

आतां, हा आंनद सामान्यांपैकीं नव्हे, हेंहि ह्या ठिकाणीं सांगणें अवश्य आहे. त्याची योग्यता सध्यां आह्मास कांहीं विशेष प्रकारचीच भासते. आणि याला तशींच कित्येक कारणें आहेत. वर ह्मटल्याप्रमाणें चिरकांक्षित हेतु सुफलित झाला, हें एक कारण तर आहेच. ह्याशिवाय दुसरें आणखी असें, कीं ह्या उद्योगानें आह्मास एका परमप्रिय मित्राच्या सततसमागमाचा लाभ झाला. हा प्रिय मित्र ह्मणजे शेक्स्पियर कवि होय. त्याशीं प्रथम परिचय झाला, तो इंग्रजी भाषेचा अभ्यास चालला असतांनाच झाला; आणि ह्या विद्यार्थिदशेंतच त्याच्या दोन तीन नाटकांचीं मराठी भाषांतरेंहि पाहण्यांत आलीं. त्यांवरून, त्यानें रचलेलीं इतर नाटकें वाचायाकडे सहजच आमच्या मनाची प्रवृत्ति होऊन, त्याच्या अप्रतिम कृतींची आह्मास इतकी गोडी लागली कीं दिवसेदिवस ती वाढतच गेली. मग, ह्या

सर्व नाटकांचीं भाषांतरें करून, तीं मराठींत आणलीं असतां मोठा उपयोग होईल, असाहि विचार यथाकालीं आमचे मनांत उद्भवला. परंतु उद्योग अवाढव्य, खर्चाचें मान मनस्वी, आणि आंगीं सामर्थ्य बेताचेंच, यांमुळें त्या वेळीं हा बेत बाजूस ठेवणें भाग पडलें. असें झालें तरी मूळ हेतु मनांतून गेला नाहीं. मग, कालांतरानें तरी हा हेतु तडीस नेऊं असा संकल्प केला; आणि धीर धरून, सवडीसवडीनें, शेक्स्पियर कवीच्या नाटकांचा व तद्विषयक टीकाग्रंथांचा अभ्यास चालविला. सांप्रत, हा अभ्यास, हातीं घेतलेल्या ह्या उद्योगांत अतिशय उपयोगीं पडणारा आहे, हें खरें; तरी आजपर्यंतही आह्मास त्याचा थोडाथोडका उपयोग झाला असें नाहीं. विद्यार्थिदशा संपून, संसारास आरंभ झाल्या वेळेपासून जे अनेक सुखदुःखाचे प्रसंग आह्मावर आले —आणि त्यांत दुःखाचेच प्रसंग विशेष आले—त्या प्रसंगीं जीव व्याकुळ होऊन गेला असतां व चित्त व्यग्र झालें असतां, आमचें हृदय, एखाद्या मित्राकडे वळावें तसें, अनेक वेळां, शेक्स्पियर कवीकडे वळे, आणि त्या त्या वेळीं त्याच्या अनुपम कृतींपासून अवर्णनीय आनंद व अमर्याद समाधान हीं आह्मास प्राप्त होत. एवढें ज्याच्या समागमाचें माहात्म्य,* त्या ह्या जिवलग मित्राची

* हें जग सोडून गेल्यावर देखील, कवीचा ग्रंथरूप आत्मा लोकांस उपदेश करण्याचें व्रत कसें अव्याहत चालवीत असतो याचें वर्णन एका इंग्लिश कवीनें येणेंप्रमाणें केलें आहेः—

Bards of passion and of mirth,
Ye have left your souls on earth !
Ye have souls in heaven too,
Double-lived in regions new !
Here your earth-born souls still speak
To mortals, of their little week;
Of their sorrows and delights;
Of their passions and their spites;
Of their glory and their shame;
What doth strengthen and what main;
Thus ye teach us, every day,
Wisdon, though fled far away !

John Keats.

गांठ, आजपर्यंतच्या क्रमाप्रमाणें, प्रसंगविशेषीं मात्र पडावयाची, ती, सांप्रत, ह्या भाषांतरांच्या उद्योगानें, नेहमींच पडावयाची तजवीज झाली आहे, हें पाहून कोणाच्या मनाला आनंद होणार नाहीं? तशांत, त्याची कृति मराठींत आणून, तिचा इकडे फैलाव करावयाचाच हा उद्योग असल्या कारणानें, वर सांगितलेल्या त्याच्या उपकारांबद्दल अल्पांशानें तरी उतराई व्हावयाचा हा एक मार्ग आहे, हें लक्षांत आणलें असतां, ह्या आनंदांत विशेष भर पडते हें सांगणें नकोच. ह्याप्रमाणें, अनेक संकटें काढून, जगाच्या अनुभवाच्या ठेंचा खात खात, आणि एका धनिक सावकाराच्या व्यावहारिक ऋणांत लोटून घेऊनहि, आद्य महाराष्ट्र लोकनायकाच्या वाचाबद्ध ऋणांतून मुक्त झालों असतां,* सांप्रत शेक्स्पियर कवीच्या उपकारांची फेड

* "आद्य महाराष्ट्र लोकनायक" ही पदवी प्रसिद्ध निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांस देण्याचा परिपाठ असल्या कारणानें वरील उल्लेखाचा बोध पुष्कळांस होईल; पण "वाचाबद्ध ऋणा"ची हकीगत व "एका धनिक सावकारा"ची माहिती सांगितल्यावांचून कळण्यासारखी नाहीं. यास्तव तत्संबंधानें थोडें फोडून सांगणें अवश्य आहे. निबंधमालेनें महाराष्ट्रांतील शेकडों लोकांप्रमाणें आम्हासही वाचनाची व देशाभिमानाची गोडी लाविली; हे उपकार स्मरून 'माले'चे कर्ते विष्णुशास्त्री यांचें एक अल्पसें चरित्र यथामति लिहून प्रसिद्ध केलें; व त्याच वेळीं त्यांचे किरकोळ लेख, पत्रें वगैरे जमवून प्रसिद्ध करूं म्हणून संकल्प जाहिर केला. पुढें बरींच वर्षें गेलीं तरी लेख मिळवून ठेवण्या व्यतिरिक्त हातून कांहीं झालें नाहीं. शेवटीं सर्व अडचणी बाजूस सारून, विष्णुशास्त्र्यांचे शिष्य म्हणविणारे एक गृहस्थ रा काशीनाथ नारायण आठवले पुणेकर, यांची मदत घेऊन, सदहू संकल्प तडीस नेला. ही हकीगत 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह भाग २ रा' याच्या प्रस्तावनेंत आठवले यांचे उपकार मानतांना, लिहिलीच आहे विष्णुशास्त्र्यांचे हे सच्छिष्य सध्यां आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कुलांत कारकुनीच्या दर्ज्यावर असून, व्याजबट्टाहि करीत असतात. सरस्वतीच्या ह्या मंदिराला त्यानें अतिशय शोभा आली आहे. असो; ह्यांच्याच तावडींत "विष्णुशास्त्री यांचा किरकोळ लेखसंग्रह भाग १-२ हीं पुस्तकें सांपडलीं होतीं; तीं कोणत्याहि उपायानें आम्हास मिळत नव्हतीं. सांप्रत तीं आमचे प्रकाशक के. सी. कुळकरणी यांजकडे विक्रीस तयार आहेत. ह्यासंबंधाची जाहिरात ह्या खंडाच्या आरंभीं घातली आहे ती पहा.

करावयाच्या तयारीकडे कौतुकानें पहात पहात, आह्मी ह्या आपल्या जुन्या मित्राच्या समाधानकारक सहवासाला अव्याहतपणें पात्र झालों आहों! तेव्हां, एवढ्या दुःखपरंपरेमागून प्राप्त झालेला हा आनंदाचा योग काय सामान्य ह्मणावा? आह्मास तर, हा योग ह्मणजे तुफान येऊन गेल्यावर मेघमालामुक्त चंद्राच्या प्रकाशासारखाच केवळ आल्हादजनक होय, असें वाटतें.

आह्मास या वेळीं आनंद होत आहे असें वर आह्मीं ह्मटलें खरें; तरी त्याच वेळीं हेंहि प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे, कीं हातीं घेतलेल्या कार्याचें स्वरूप लक्षांत येतांच, आमची छाती दडपून जाते व मन संकोच पावतें. मराठी भाषेच्यासंबंधानें हें कार्य बरेंच महत्वाचें असल्या कारणानें, जो कोणी हें हातीं घेईल, त्याजवर कांहीं एक जबाबदारी येऊन पडेलच; ती अंगावर घ्यावयाला आतां आपण तयार असलें पाहिजे, हा विचार सहजच आमच्या डोळ्यांपुढें उभा राहतो, व अशा आनंदमुद्रेवर निश्चयाची गंभीर छटा उत्पन्न करतो. बरें, प्रत्यक्ष कार्याकडे पाहिलें तर तेंहि अवजड तसेंच अवघड असें आहे; आणि त्यांत भाषांतराच्या वगैरे अडचणीहि बऱ्याच आहेत. ह्या गोष्टी आह्मास ठाऊक नाहींत असें नाहीं, व ह्या मनांत बाळगूनच आह्मी या कार्यास प्रवृत्त झालों आहों. 'नाट्यमाले'च्या प्रसिद्धिपत्रकांत ह्यांपैकीं कांहींचें विवेचन आह्मीं संक्षेपानें केलेंच आहे. तरी अझूनहि पुष्कळांच्या मनांत ह्यासंबंधानें बहुत शंका घोळत आहेत असें आह्मास कळलें आहे, व आमच्या हितचिंतकांनीं आणि मित्रांनींहि स्वतः आह्मास ह्यासंबंधानें अनेक वेळां अनेक प्रश्न केले आहेत. तेव्हां, ह्या शंकांचें व प्रश्नांचें निरसन होऊन, एकंदर कार्याचें स्वरूप अधिक स्पष्ट होईल असा कांहीं मजकूर या ठिकाणीं कळविणें इष्ट आहे.

"नाट्यमाले" चें जें प्रसिद्धिपत्रक आह्मीं काढलें आहे, तें वाचून पाहतांच, जी एक मुख्य व ठळक गोष्ट वाचकांच्या मनांत उभी राहते, तिचाच विचार प्रथम करूं. ती गोष्ट ह्मणजे मालेचा अवाढव्यपणा. या अवाढव्यपणाला भांबावून जाऊन, ते ह्मणतात: — ' हा पर्वत-

प्राय उद्योग तुह्मीं काढला आहे; पण सध्यांच्या कालमानाकडे लक्ष देतां, हा कसा निभेल कोण जाणे!" ह्याच शंकेनें प्रेरित होऊन, कित्येकांनीं आह्मास मोठ्या कळकळीनें अशी सुद्धां सल्ला दिली कीं— "शाहणे असाल तर हा प्रचंड उद्योग तुह्मी हातीं घेऊं नका; यांत तुह्माला यश येणार नाही." हा कळकळीचा बुद्धिवाद करणारांचे आह्मी मनापासून आभार मानतों. तरी हा त्यांचा बुद्धिवाद खालील विचारास्तव आह्मास ग्राह्य वाटत नाहीं, हें त्यांस नम्रपणें कळविल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

प्रथमतः, सध्यांचें कालमान आह्मांस कितपत प्रतिकूल आहे हें पाहूं. ह्या कार्यांत आह्मास यश येईल कीं अपयश येईल हा प्रश्न वेगळा आहे, तो सध्यां बाजूस ठेवूं. त्याजविषयीं आजच कोरड्या घाटाघाटी करून, उलट सुलट कोणत्याहि प्रकारच्या अटकळी बांधण्यांत तोंडाची वाफ दवडणें प्रशस्त नाहीं असें आह्मी समजतों. तथापि अलीकडे अशा प्रकारचे जगड्व्याळ उद्योग—विशेषतः मोठमोठ्या ग्रंथांच्या भाषांतरांचे उद्योग—आपल्या इकडे निघत नाहींतसे झाले आहेत, अशी कित्येकांची समजूत आहे; व हें अलीकडील पिढीच्या पदवीधरांच्या बुद्धिदौर्बल्याचें एक लक्षण होय असेंहि त्यांचें ह्मणणें आहे; ह्यांत जर कांहीं तथ्यांश असेल तर आह्मीं काढलेल्या उद्योगाविषयीं शंका घेण्यास थोडी जागा आहे असें ह्मणतां येईल. आह्मास तर वरील ह्मणण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. अशा प्रकारचे, भाषांतरांचे प्रचंड उद्योग मागें कांहीं निघाले होते हें पुष्कळांच्या लक्षांत असेल. त्यांचे पुरस्कर्ते महाविद्वान, पराकाष्ठेचे उद्योगी, व चोहोंकडे नांवाजलेले असे पुरुष होते; आणि अशा कामास जो विपुळ पैसा लागतो, त्याचेंहि बळ त्यांना चांगलें होतें. असें असून त्यांचे ते उद्योग शेवटपर्यंत टिकले नाहींत. मग तेथें आह्मासारख्यांचा काय पाड! आह्मास तर बहुतेक गोष्टींची अनुकूलता–कांहीं असल्यास–त्यांच्या मानानें फारच थोडी आहे, हें केवळ विनयास्तवच कबूल करावयाचें असें नाहीं. कारण वस्तुस्थिति खरीच अशी आहे. मग हा आमचा

उद्योग शेवटपर्यंत निभण्याचा कितपत संभव आहे, असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. परंतु त्यास उत्तर देण्यापूर्वी, सदर्हू उद्योग कां निभले नाहींत याच्या कारणांचा विचार केला पाहिजे. तो केला तर ह्या प्रश्नास फारशी वांव मिळेल असें वाटत नाहीं. आमची अशी समजूत आहे कीं सदर्हु उद्योग शेवटास न जाण्याचें बीज, ते ज्यांनीं उपस्थित केले होते, त्यांच्याच ठिकाणीं वसत होतें. पहा, कीं त्या सर्वांचे पुरस्कर्ते सरकारी नोकर होते, व सरकारी मोठमोठीं जबाबदारीचीं कामें संभाळून, फावल्या वेळेस ते त्यांना चालवावयाचे होते. नोकरीच्या वेतनापर त्यांचा चरितार्थ यथास्थित चालण्यासारखा असल्यामुळें, पैशासाठीं ते उद्योग त्यांनीं काढले नव्हते; इतकेंच नाहीं, तर त्यांत पैशाची तोशीस आल्यास ती सोसण्यास देखील त्यांची तयारी होती. मग सदर्हु उद्योग त्यांनीं कोणत्या हेतूनें काढले होते? अर्थात् ते त्यांनीं कीर्तीच्या लोभानें, लोकोपकारबुद्धीनें व हौसेखातर काढले होते हें उघड आहे. हें निदान जर बरोबर असेल तर ह्यांत त्यांचे हेतु फार श्रेष्ठ होते यांत शंका नाहीं. पण हे श्रेष्ठ हेतुच, त्यांनीं हातीं घेतलेल्या उद्योगाच्या मरगळीस कारण झाले असें ह्मटलें पाहिजे. कारण, हौसेची क्षणिक उकळी शांत होतांच, लोकोपयोगबुद्धीची ओढ ढिली पडतांच, आणि घडावा तेवढा कीर्तीचा लाभ घडतांच, त्यांचे उद्योग सहजच क्षीण होत होत, शेवटीं अकालीं विराम पावले! ह्याहून आमच्या उद्योगाची स्थिति फार वेगळी आहे. आमच्या स्वतांचे मागें सरकारी नोकरीचा वगैरे लकडा मुळींच नाहीं, हें ज्यांस ठाऊक नसेल त्यांस तें सांगणें अवश्य आहे. इतकेंच केवळ नाहीं, पण अवश्य वाटल्यास सारा वेळ याच उद्योगाकडे लावावयासहि आह्मास कांहींच प्रत्यवाय नाहीं. याशिवाय, लेखनव्यवसाय हें आमच्या निर्वाहाचें एक साधनच आहे. आज पंधरावीस वर्षें हा व्यवसाय आह्मी करीत आलों असून, पुढील काळहि कदाचित् यांतच जाईल अशीं चिन्हें दिसत आहेत. तेव्हां हें उघड झालें कीं कीर्ति, लोकोपयोग व हौस ह्यांची लालसा जशी इतरांस आहे तशी आह्मास नाहीं असें जरी नाहीं, तरी मुख्यत्वें निर्वाहासाठींच

ह्या उद्योग चालू ठेवून तो तडीस नेणें आह्मास जरूर आहे. आवश्यकता ही उद्योगक्रियेची जननी ह्मणून प्रख्यातिच आहे. कोणता तरी करावयाचाच, मग हा आवडीचाच उद्योग कां करूं नये? अशा स्थितींत, हा "नाट्यमाला" गुंफण्याचा उद्योग, इच्छेप्रमाणें, शेवटास जाण्याचा कितपत संभव आहे, हें सांगण्याच्या भरीस आह्मी पडत नाहीं. याचा निकाल आतां वाचकांनींच आपल्याशीं लावावा असें आह्मी इच्छितों. आमचा तर, हातीं घेतलेला उद्योग यथाशक्ति व यथामति तडीस पोंचविण्याचा कृतसंकल्पच आहे.

आतां, ह्या एवढ्या दीर्घ उद्योगांत आह्मास अनेक अडचणी आडव्या येतील, अतिशय त्रास काढावा लागेल, आणि कष्टहि जीवापाड करावे लागतील हें खरें आहे. तथापि ह्या उद्योगाचा बेतबात आंखून ठेवून तो आह्मी आपल्या प्रसिद्धिपत्रकांत प्रगट केला आहे, त्याप्रमाणें हळुहळू घडी बसत गेली ह्मणजे सर्व कामकाज सुलभतेनें चालूं लागेल असा आह्मास भरंवसा आहे. मग, सहजच, अडचणींचे पेच एकामागून एक उलगडत जातील, पाठीमागचा त्रास कमी कमी होत जाईल, आणि कष्टांचा भारहि हलकावत जाईल, हें उघड आहे. आणि असेंहि कदाचित् न झालें ह्मणून काय चिंता आहे? हें कार्य ज्यापक्षीं आह्मीं एकदा उचललें, त्यापक्षीं सर्व अडचणींस, त्रासांस आणि कष्टांस पाठ देणें हें आमचें कर्तव्य होय असें आह्मी समजतों. किंबहुना, ह्यांत अडचणी, त्रास व कष्ट आहेत, ह्मणूनच हें उपस्थित करून सिद्धीस नेण्यांत एका प्रकारचा पुरुषार्थ आहे हें उघड आहे. यास्तव "हें कार्य हातीं घेऊं नका" असा उपदेश जे कोणीं आह्मास करतात त्यांजकडे लक्ष देण्याचें कारण आह्मास दिसत नाहीं, व त्यांस उत्तर देण्याचाही यत्न आह्मी करीत नाहीं. अशांस जें उत्तर द्यावयाचें, तें, रशिया देशाचा विख्यात् बादशहा पीटर धी ग्रेट यानें मागेंच देऊन ठेविलें आहे; त्याचें आह्मी त्यांस येथें स्मरण देतों ह्मणजे झालें. त्या प्रतापवान् बादशहाची अशी गोष्ट सांगतात कीं त्याला एकदा आपल्या शत्रूस लढाई द्यावयाची होती. तेव्हां निवडक सैन्य बरोबर घेऊन स्वारी निघाली,

ती, शत्रूची छावणी पडली होती तेथून थोडे अंतरावर येऊन पोंचली. मग तेथेंच मुक्काम करून, त्यानें आपल्या प्रधानास सांगितलें—"तुह्मी गुप्तपणें जाऊन शत्रूची काय स्थिति आहे ती पाहून या, आणि मला कळवा." त्याप्रमाणें प्रधान गेला, आणि पाहतो तों शत्रूचें सैन्य आपल्या दसपट आहे; तें पाहून तो मनांत दचकला. मग ही हकीकत त्यानें तशीच बादशाहास कळविली, आणि हात जोडून ह्मणाला:— "महाराज, विलंब न करतां मागें फिरा; लढाईच्या भरीस पडूं नका; यश येणार नाहीं; शत्रु आपल्या दसपट आहेत." पीटर बादशहा आवेशानें बोलला: — "काय चिंता आहे? आतां आपणास शत्रूकडील दसपट लोक मारावयास व कैद करावयास सांपडतील!" हेंच श्रेय, आमच्या ह्या अवाढव्य व कष्टसाध्य उद्योगांत, आह्मास प्राप्त होणार आहे. तेव्हां, हा आवडीचा उद्योग आंगा निराळा टाकून, तें हातचें दवडावें हें आह्मांस अगदीं उचित दिसत नाहीं.

ह्या मालेच्या संबंधानें दुसरें कुरकुरीचें कलम ह्मटलें ह्मणजे तिचें दीर्घसूत्रत्व. प्रसिद्धिपत्रकांत दर्शविल्याप्रमाणें ह्या मालेंत पृथक् पृथक् असे एकंदर चाळीस खंड गुंफले जाणार असून, ते सवडीसवडीनें प्रसिद्ध होत होत सात आठ वर्षांनीं ही मालिका समाप्त व्हावयाची आहे हें वाचकांस कळून चुकलेंच आहे. हा सात आठ वर्षांचा काळ कांहीं अल्पस्वल्प नव्हे. ही एवढी लांबण कित्येकांस दुःसह वाटून, उत्कंठेनें ते आह्मास ह्मणतात—"सात आठ वर्षें तुह्मी ग्राहकांस तिष्ठत ठेवणार, हें कांहीं बरें नाहीं; हे सारे खंड तुह्मी चारदोन वर्षांत काढून टाकाना? यांत उद्योग करणारांचें व ग्राहकांचे असें उभयतांचेंही हितच आहे."

आतां कोणाचाहि उत्साह भंग करणें हें मोठें क्लेशजनक काम आहे. परंतु ह्या उतावळ्या गिऱ्हाइकांच्या मनांत थोडेंच येत असेल, कीं हें ह्मणणें बोलायाला जेवढें सोपें आहे तेवढें प्रत्यक्ष करायाला नाहीं. अगोदर, चाळीस खंड लिहून तयार करणें, नंतर ते छापविणें, ही केवढी कडाकूट आहे बरें! आपल्याकडील छापखान्यांची कशी कुचंबणुकीची स्थिति आहे व ह्या एकंदर कामाला पैसा किती लागणार आहे याची त्यांस कदाचित् कल्पनाहि नसेल! पण समजा, कीं एवढी

मेहनत आह्मीं केली, व पैसाही खर्चला; तरी एवढ्या तयार झालेल्या मालाला एकदम गिऱ्हाइक कोठून आणावें? आज पन्नास साठ रुपये मराठी पुस्तकांकरतां एकदम खिशांतून काढणारी मंडळी कोण आहे? हें एक ग्राहकांच्या संबंधानें झालें. स्वतः आमच्या संबंधानेंहि आह्मास कांहींच पहावयास नको काय? ह्या कार्याला लागणारी सामुग्री आह्मीं अगोदर कितीहि सिद्ध ठेवली असली, तरी खंडावर खंड करून देणें ही कांहीं हलकी सलकी गोष्ट नाहीं. अगोदर शेक्स्पियर कवीसारख्या कल्पक कवीच्या कृतींतलें रहस्य समजणें कठिण; त्याला मननपूर्वक अभ्यासच पाहिजे. तसेंच, त्याच्या नाटकांवर विवरणात्मक अनेक पंडितांचे ग्रंथ झाले आहेत, त्यांचेंहि परिशीलन पाहिजे. आणि इतकेंहि करून, इंग्रजीहून सर्व प्रकारें अत्यंत भिन्न अशा मराठी भाषेंत त्यांचें भाषांतर उतरावयाचें ह्मणजे केवढ्या दीर्घ प्रयासाचें काम आहे बरें! इंग्रजी वाक्यरचनेला मराठी वळणावर नेतां नेतां कशी तारांबळ उडते, दुर्बोध स्थळांचा अर्थपरिस्फोट करण्यासाठीं एकेका वाक्यावर व पदावर कसें झुंजावें लागतें, नवे नवे अपरिचित विचार मराठींत व्यक्त करितांना हात टेकायाची कशी पाळी येते वगैरे गोष्टी,* ज्यांना अशा भाषांतरांचा प्रसंग असेल, त्यांना सांगणें नकोतच; आणि ज्यांना नसेल त्यांनीं, इंग्रजी येत असल्यास, अंमळ यत्न करून पहावा ह्मणजे त्यांविषयीं त्यांचीहि खात्री होईल. यास्तव अशा कष्टसाध्य कामाला जेवढा वेळ मोडायाला पाहिजे तेवढा तो मोडलाच पाहिजे. त्यांत शीघ्रकर्तृत्वाच्या घमेंडीवर जाऊन, घाई करणें योग्य नाहीं असें आमचें मत आहे.

यावर कोणी ह्मणतील, कीं कार्याला आरंभ करण्यापूर्वीच वाटेल तेवढा वेळ खर्चून सारीं पुस्तकें तयार करून ठेवावयास काय चिंता

* 'अथेल्लो' नाटकाचें जें उत्कृष्ट भाषांतर रा. महादेव शास्त्री कोल्हटकर यांनीं केलें आहे, त्याची हस्तलिखित प्रत, शास्त्रीबुवा वारले तेव्हां त्यांच्या दप्तरांत सांपडली. ह्या प्रतींत कित्येक वाक्यांचीं, दोन दोन, तीन तीन प्रकारांनीं, भाषांतरें केलेलीं हातीं असें सदर नाटकाच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे. यावरून वरील आमच्या ह्मणण्यांत अतिशयोक्ति नाहीं असें दिसून येईल.

आहे? परंतु हें ह्मणणें जेवढें सयुक्तिक दिसतें तेवढें अनुभवाला पटत नाहीं तसें केल्यानें. एका नवशिक्या वर्तमानपत्रकाराची जशी फसगत झाली तसाच प्रसंग बहुधा यावयाचा, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्मणजे एकदा एका तरुण मनुष्यानें एक नवींनच पत्र काढण्याचा बेत करून, एकाद्या धोरणी मनुष्याप्रमाणें वर्ष दोन वर्षें पुरतील इतके लेख अगोदरपासून लिहून ठेवावयाचा तडाखा चालविला. पण, पुढें पत्र चालू केल्यावर पाहतो तों त्याचे ते लेख त्यालाच आवडतनासे झाले! कित्येक लेख भिकार व बाकीचे अप्रासंगिक दिसून आल्यावरून, ते पत्रांत घालण्यासारखे नाहींत असें त्यानेंच ठरवलें! वर्तमानपत्राची ही गोष्ट; मग चिरकाळ टिकावे अशा इच्छेनें रचलेल्या ग्रंथाची काय गोष्ट सांगावी! आमच्या मतें, अशा मोठ्या कार्यांत अनुभव घेत घेत काम करीत जावें हेंच उत्तम. आणि हाच मार्ग सांप्रत आह्मीं स्वीकारला आहे. या योगानें, आमच्या भाषांतरांचे खंड निघून जसजसे लोकांपुढें येत जातील तसतसे ते त्यांस कसे काय आवडतात ह्याचा अजमास आह्मास कळेल; आणि पंडितांसहि त्यांतील गुणदोषांची परीक्षा करावयास सवड मिळून, पुढील कामांत कांहीं सुधारणा करणें अगत्याचें वाटल्यास, त्या करतां येतील, हें उघड आहे.

आणखी हाहि एक विचार आहे, कीं स्वतां शेक्स्पियर कवीनें तरी हीं सारीं नाटकें चारदोन वर्षांत लिहिलीं काय?—नाहीं! तीं त्यानें कमींत कमी पंचवीस तीस वर्षांच्या अवधींत, प्रसंगा प्रसंगानें, तयार केलीं, असें त्याच्या चरित्रावरून समजतें. मूळ नाटकें ज्यानें लिहिलीं, व बुद्धिमत्तेविषयीं ज्याची ख्याति असून, ज्याचा सारा जन्म नाटकें रचण्यांत व तीं रंगभूमीवर आणण्यांत गेला, त्याची ही हकीगत; मग हेंच त्याच्या जन्मभर केलेल्या परिश्रमाचें कृत्य दोन चार वर्षांत उरकूं ह्मटलें तर शोभेल काय? एक तर तें व्हावें तसें होणार नाहीं; आणि दुसरें, पुष्कळ वस्तु लहान बासनांत गुंडाळूं पाहण्यासारखें तें उपहासास मात्र पात्र होईल!

तेव्हां, वरील गोष्टींकडे लक्ष दिलें असतां, सात आठ वर्षांचा जो अवधि आह्मी धरला आहे, तो ह्या कार्याच्या मानानें अगदीं बेताचा आहे; इतकेंच नाहीं, पण ग्राहकांची सोय आणि आमची स्वतांची सवड यांचाहि मेळ त्यानें पडेल अशी आमची समजूत आहे.

ह्या व्यवस्थेनें आमच्या बऱ्याच ग्राहकांच्या उत्कंठेचा भंग होईल हें खरें; पण त्याला काय करणार? त्यांच्या उत्कंठेचें चीज करायाला आमचेपाशीं तुफान नाटकांतली प्रास्पेरोची वाँड (जादूची काठी) पाहिजे होती; किंवा रामायण काळच्या वानरांची तरी शक्ति आह्मास हवी होती. ही शक्ति फारच विलक्षण होती. सेतुबंधनाचा बेत ठरतांच त्या रामभक्तांस पराकाष्ठेचें स्फुरण चढून, एकेकानें असे पराक्रम केले कीं, कवींच्या अतिशयोक्तीच्या वर्णनास ते विषय होऊन बसले. अशा वानरांपैकीं एकाचें वर्णन आनंदतनयानें केलें आहे तें असें:—

बोटानें उकरी, समूळ शिखरी काढी क्षणाभीतरीं,

* * * * * *

ऐसा वानर केसरी प्रतिदिनीं पन्नास खेपा करी ॥

अशा अद्भुत शक्तीनें मात्र आह्मी आमच्या ह्या पर्वतप्राय उद्योगाचीं चाळीस शिखरें चाळीस खेपांतच हाणून पाडलीं असतीं, व सांजावण्या-आधींच, सुंदर बांधणीचे, चौरस, चिरेबंदी चाळीस खंड वाचकांपुढें ठेवले असते! पण अशा कल्पनांत काय जीव आहे? ज्यापेक्षां मनुष्य हे वानर नाहींत, इतकेंच नाहीं, पण वानर ह्मणवून घेण्यांत त्यांना भूषणहि नाहीं; आणि शेक्स्पियर कवीच्या एका देशबंधूनें (डार्वीन पंडितानें) वानरापासून मनुष्यांची उत्पत्ति सिद्ध केल्यामुळें वरील केसरी वानराकडे मनुष्यांचें पूर्वजत्व येत असतांहि, ज्यापेक्षां वारशानें त्यांची शक्ति मनुष्यास प्राप्त झालेली नाहीं, त्यापेक्षां हें अद्भुत कृत्य मनुष्यांस सध्यां शक्य नाहीं असें समजूनच आपण चाललें पाहिजे, हें उघड आहे. यास्तव, आपल्यापाशीं जी साधनसंपात्ति आहे ती घेऊन व आपल्या बुद्धीचा आवाका पाहून, स्थूल मानानें वर ह्मटलेला, सात आठ वर्षांचा अवधि आह्मी धरला आहे. तेवढ्यांत हें कार्य यथास्थित

तडीस जाईल असा आमचा अजमास आहे.एकंदरींनें, कार्य चांगलें व्हावें ही मुख्य गोष्ट. त्यासाठीं ह्या अवधींतहि अधिक-उणेपणा झाला तरी आह्मी त्याची पर्वा करणार नाहीं, व वाचकांनींहि करूं नये, असें आमचें त्यांस विनयपूर्वक सांगणें आहे.

तिसरी गोष्ट स्वतः आमच्याच योग्यतेसंबंधाची. ही माहिती वाचकांस व विशेषतः आमच्या आश्रयदात्यांस असलेली बरी; व ती करून घेण्याचा हक्कहि त्यांस आहेच. यास्तव, ज्यांना आपल्या पिशवीला हात घालण्यापूर्वीं तीन वेळ विचारपूस करण्याची सवय पडली आहे अशा पृच्छकांचें काय ह्मणणें येतें तेंच पाहूं ह्मणजे झालें. ते ह्मणतातः—"शेक्स्पियर कवीच्या नाटकग्रंथांचीं भाषांतरें करायाला हे गृहस्थ निघाले आहेत. पण या कामाला यांचा अधिकार कितपत आहे? त्याच्या ग्रंथांचा अभ्यास ह्यांनीं कितीसा केला आहे? शेक्स्पियर ह्मणजे केवढा जाडा कवी! त्याचीं नाटकें लावून घेणें सुद्धां कठिण; आणि त्यांतलें रहस्य समजण्याला तर जन्मचा जन्म घालविला पाहिजे. असा अभ्यास यांनीं केला आहे काय? नसल्यास अगोदर करावा; मग ह्या जोखिमाच्या भानगडींत यांनीं पडावें."

वरील कोटिक्रम ऐकतांच आमचें तोंड बंद होतें; उत्तर देण्याचें धैर्य आह्मास होत नाहीं! फार काय सांगावें? कसेंबसें धैर्य केलेंच तरी मन मुरडतें व लेखणी अडखळते. एक तर, अशा कोटिबाजांचें समाधान होणें कठिण. आणि कांहीं यत्न करावा तर आत्मश्लाघेचा प्रसंग येणार; बरें न करावा तर अशा लोकांच्या मनांतील शंका कायम राहणार, त्या नाहींतशा व्हाव्या कशा? अशा रीतीनें, आमची स्थिति, एकीकडे आड व एकीकडे विहीर अशीच सरांसरी होते. तेव्हां अविनय आणि शंकनीयत्व यांच्या ह्या कचाटींतून सुटण्याला मार्ग काय, हा मोठ्या विचाराचा प्रश्न आहे. असा मार्ग आह्मास तर एकच दिसतो; तो हाच कीं विनयास विमुख न होतां, जेवढा खुलासा करवेल तेवढा करावा. यास्तव आह्मी येथें येवढेंच कळवितों, कीं हा एवढा उद्योग काढून, ज्या अर्थीं नांचावयास आह्मी निघालों आहों

त्या अर्थीं अभ्यासावांचून निघालों नाहीं हें उघड आहे. आतां, तो किती ह्मणून कोणी विचारील तर तें सांगणें अंमळ कठिणच. तसें निश्चितपणें सांगतां येण्याला आह्मापाशीं एखादें अंशांकित माप हवें होतें. तें नसल्यामुळें, आमच्या ईश्वरदत्त बुद्धिसामर्थ्याच्या मानानें जेवढा झाला तेवढा केला आहे, इतकेंच मोघम सांगणें भाग आहे. याहून अधिक काय सांगावें?

कदाचित् हें सांगणें कोणाला रुचणार नाहीं; आणि 'जन्मभर अभ्यास करा' असें प्रतिपादणारांना तर हा आमचा अभ्यास अपुराच वाटेल यांत शंका नाहीं. तरी, त्यांस उलट आह्मी असें विचारतों, कीं आमची, अथवा शेक्स्पियर कवीच्या नाटकांचा व्यासंग ज्यांनीं केला आहे अशा या देशाच्या इतर शेकडों गृहस्थांची गोष्ट एक वेळ राहो; पण ज्या इंग्रज व जर्मन पंडितांनीं शेक्स्पियर कवीच्या कृतींवर विवरणात्मक सर्वमान्य ग्रंथ आजपर्यंत केले आहेत, त्या सर्वांचा तरी एतद्विषयक अभ्यास पुरा झाला होता काय? 'नाहीं' असेंच उत्तर देणें येईल. पुरा झालेला असता, तर त्यांच्या ग्रंथांत ज्या अनेक चुका व न्यूनें आज पाहण्यांत येतात, तीं कां येतीं? आणि त्या महाकवीच्या कृतींत ज्या नव्या नव्या खुब्या, नव्या नव्या कल्पना, नवे नवे विचार, नवे नवे भाषणचमत्कार, नवें नवें रचनाचातुर्य, अशा शेकडों नव्या नव्या गोष्टी नित्य उघडकीस येत आहेत व तद्विषयक नवे नवे ग्रंथहि वर्षास प्रसिद्ध होत आहेत, त्यांस तरी कोठून अवकाश मिळता? तात्पर्य, ह्या विषयाचा—आणि सामान्यें करून कोणत्याहि विषयाचा—कोणाचाही अभ्यास कधीं पुरा झाला आहे? जसें ईश्वरी लीलेचें, तसेंच तदंशभूत जे महाकवि त्यांच्या कृतीचें, पुरतें आकलन करायाला मनुष्याची बुद्धि फार पंगु, हीच गोष्ट खरी. ह्मणूनच वारंवार असें ह्मणावयाची पाळी येते, कीं हे महाकवे!

स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती?।

मोरोपंत.

कालिदास काय, भवभूति काय, शेक्स्पियर काय, यांच्या गूढ कृतींचा अंत पहावयास प्रतिकालिदास, प्रतिभवभूति, आणि प्रतिशेक्स्पियरच

जन्मास आले पाहिजेत, यांत शंका नाहीं. ते केव्हां जन्मास येतील ते येवोत; तोंवर ज्यानें त्यानें आपापल्यापरी अभ्यास करावा व त्याचा उपयोग इतरांस होण्यासारखा वाटल्यास यत्न करावा इतकीच गोष्ट; या पलीकडे काय आहे? ह्मटलें आहे:—

> आकाश-अंत न कळोनिहि अंतरीक्षीं,
> आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ।
>
> वामन.

हाच न्याय येथेंहि लागू आहे. अशी गोष्ट असतां, मी अमुक विषयाचा पुरा अभ्यास करीन तेव्हांच कोणत्याहि कार्यास लागेन असें अडून बसणें, आणि मी करीन त्यांत लेशभरहि न्यून राहूं देणार नाहीं असा बाणा बाळगणें, कोणास शोभत असेल तें असो. आह्मास तर खास वाटतें कीं, अशांची स्थिति, आंवळ तोंडाच्या भांड्यांतून सगळीं बोरें एकदम मुठींत घेऊं पाहणाऱ्या मुलाप्रमाणें, केवळ हास्यास्पद होईल; इतकेंच नाहीं, तर वाहतां वाहतां, ओढा कोरडा ठणठणीत पडल्यावर पलीकडे जावयाचें असा हट्ट धरून, कांठावर तिष्ठत बसणाऱ्या तरुणाची गोष्ट सांगतात, तींतल्याप्रमाणें, यांच्या हातून कांहीं एक न होतां, कदाचित् यांचा सारा जन्म असाच निघून जाईल! वस्तुतः, शेक्स्पियर कवीसारख्यांच्या कृतीचा संपूर्ण अभ्यास करण्याला, एक जन्म तर काय, पण सात जन्म घेतले तरी थोडे आहेत. पण सात जन्म घेणें एकाच वेळीं एकाच व्यक्तीस शक्य नसल्यामुळें, एका जन्मांतच जेवढें होईल तेवढें आपण करावें हें योग्य. आणि याच दृष्टीनें आह्मीं हा यत्न मांडला आहे. याच्यायोगानें, मराठी भाषेच्या ग्रंथसंग्रहामध्यें भर पडून, मराठी वाचकांस शेक्स्पियर कवीच्या सर्व ग्रंथांचा लाभ व्हावा अशी आमची इच्छा आहे. ही इच्छा जरी चांगली आहे, तरी कोणी अधिक तीक्ष्ण बुद्धीच्या दीर्घव्यासंगी मनुष्यानें हें कृत्य हातीं घेतलें असतें तर ह्याहून फार चांगलें झालें असतें, असें कोणी ह्मणतील; तर त्यांस आह्मी एवढेंच सांगतों, कीं त्यांचें हें ह्मणणें कांहीं खोटें नाहीं. तथापि एवढ्यावरून आह्मी आपला हा यत्न करूं नये किंवा सोडून द्यावा असें मात्र होत नाहीं. आमचा एक तर काय, पण असे दहा जणांनीं दहा

यत्न जरी केले तरी हवेच आहेत, असें आह्मी समजतों. यास्तव, हाच उद्योग हातीं घेऊन जर कोणी महापंडित पुढें आले तर त्यांनीं खुशाल यावें; त्यांचे हात धरायाला आह्मी येऊं अशी गोष्ट नाहीं; इतकेंच केवळ नाहीं, पण त्यांचा यत्न आमच्याहून चांगला साधतो असें दिसून आल्यास, आणि आमचा निरुपयोगी ठरल्यास, आमचें काम आह्मी आपखुशीनें बंद ठेवूं, व अशा पंडिताचें लक्ष ह्या विषयाकडे वळण्यास आमचा यत्न कारण झाला येवढ्यानेंच संतोष मानूं. तथापि हें बोलणें सध्यां पाहिजे कशाला? असे कोण गृहस्थ पुढें येतात ते आल्यावर पुढच्या ह्या गोष्टी. तोंवर या प्रकरणीं अधिक वाद न घालतां, आमचा यत्न आह्मास यथाशक्ति चालविणें भाग आहे. सुज्ञ जन ही आमची मराठी भाषेची सेवा थोर मनानें गोड करून घेतील अशी आशा आहे.

येथवर नाट्यमालेच्या संबंधानें तीन आक्षेपांचा विचार केला. एकंदरीनें पाहतां, वरील आक्षेप पुष्कळ अंशीं बरे, असेंच ह्मटलें पाहिजे. कारण, यापुढें जो एक आक्षेप आह्मी सांगणार आहों तो एवढा विलक्षण आहे, कीं त्याच्या पुढें बाकीचे आक्षेप कांहींच नव्हत. तो आक्षेप संक्षेपरूपानें असा आहे:—"शेक्स्पियर कवीच्या नाटकांच्या भाषांतरांची एवढी काय गरज आहे? व तन्निमित्त एवढा खटाटोप पाहिजे कशाला? त्यांजवांचून कोणाचें कांहीं अडलें आहे अशी गोष्ट नाहीं. त्यांतून त्या कवीच्या बऱ्याचशा नाटकांचीं भाषांतरें मराठींत होऊन गेलीं आहेत. ज्यांचीं झालीं नाहींत, तीं कमी योग्यतेचीं असतील, ह्मणून त्यांजकडे कोणाचें लक्ष गेलें नसेल. अशीं नाटकें मराठींत न आलीं ह्मणून त्यांत मोठेंसें नुकसान आहे असें नाहीं. असें जर आहे तर सर्व नाटकांच्या भाषांतरांची एक थोरली माला काढून ही रिकामी उठाठेव कां, आणि आह्मास मदत करा ह्मणून लोकांवर भार कां?" हें ह्मणणें ह्या मालेला 'मूले कुठार' असल्या कारणानें, त्याकडे अगदींच काणा डोळा करणें बरोबर नाहीं. यास्तव यावर आमचें ह्मणणें काय आहे तें सांगून, नाट्यमालेच्या बाह्योपाधीचें हें प्रकरण पुरें करूं.

वरील कोटिक्रमाचा विचार करण्यापूर्वी एक गोष्ट ध्यानांत ठेवणें जरूर आहे; ती ही, कीं बहुश: असा कोटिक्रम करणारी मंडळी ह्मटली ह्मणजे, एकाच विषयाचा सतत व्यासंग केल्यामुळें ज्यांच्या मनांत दुसरा कोणताहि विषय शिरणें दुर्घट झालें आहे, किंवा रसिकतेचा लोप झाल्यामुळें ज्यांचें मन रांठ झालें आहे, अशीच होय. यांस नाटक नको, कांहीं नको. यांपैकीं एकाचें आराध्य दैवत इष्ट विषय, आणि दुसऱ्याचें पैसा. त्यावांचून यांस दुसरें कांहींच प्रिय नसल्यामुळें, नाटकांविषयींचशी काय, पण इतर कोणत्याही गोष्टीविषयीं या मंडळींची पूर्ण अनास्था दिसून येते, यांत नवल काय? कोणास असें वाटेल कीं या मंडळींत केवळ पैशाला हपापलेले असे पोटभरू निर्धन मनुष्यच असतील, सधन कोणी नसतील; अथवा सरस्वतीचा शाप असलेले अविद्वान मात्र असतील, विद्वान कोणी नसतील; तर ही समजूत अगदीं चुकीची आहे. श्रीमंत व गरीब, विद्वान व अविद्वान, अशा सर्व प्रतीच्या व स्थितीच्या लोकांमध्यें नाटकांचा द्वेष करणारे बहुत जण पाहण्यांत येतात. नाटकांच्या उपयुक्ततेविषयीं अशांची खात्री करूं जाणें ह्मणजे 'अरसिकेषु कवित्वनिवेदना' इतकेंच निरर्थक व कंटाळवाणें होय. यास्तव त्या भानगडींत न पडतां, ज्या कोणाला नाटकांच्या उपयुक्ततेविषयीं शंका असेल व वास्तविक गोष्ट समजून घेण्या इतकें ज्यांचें मन मोकळें असेल, अशांस मात्र आमची शिफारस आहे, कीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा "नाटकें करावीं कीं करूं नयेत"* हा निबंध त्यांनीं एकवार अगत्य वाचून पहावा. नाटकाचें नांव घेतांच, ज्यांच्या कपाळास तिडीक उठते, अशांच्या मनांतील विलक्षण कल्पनांचें ह्यांत युक्तिवादानें उत्तम निवारण केलेलें त्यांस आढळेल. वस्तुतः, एकंदर लेखाचा रोख नाटकप्रयोगांवरच मुख्यत्वेंकरून आहे; तथापि तेच विचार नाटकग्रंथांसहि सर्वांशीं लागू आहेत यांत शंका नाहीं. आमची खात्री आहे, कीं चांगलीं

* बेलसरे-कृत "विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह" भाग २ रा, पृष्ट १३७ पहा.

नाटकें हें राष्ट्रीय करमणुकीचें एक उत्कृष्ट साधन असून, राष्ट्राच्या सुधारणुकीला त्यांचा किती उपयोग आहे याविषयीं, हा लेख घाचल्यानें, वाचकांची यथार्थ कल्पना होईल. आणि हीं यथार्थ कल्पना झाली, ह्मणजे शेक्स्पियर कवीचीं नाटकें नाट्यकलेच्या दृष्टीनें नांवाजलेलीं असल्या कारणानें, त्यांचीं भाषांतरें मराठींत होणें किती इष्ट आहे हें मग वेगळें सांगणें नलगे.

शेक्स्पियर कवीच्यां बऱ्याचशा नाटकांचीं भाषांतरें मराठींत होऊन गेलीं आहेत असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. पण हा निव्वळ भ्रम आहे. वास्तविक गोष्ट काय आहे तिचें दिग्दर्शन आमच्या प्रसिद्धिपत्रकांत आह्मी केलेंच आहे.* आणि त्याच ठिकाणीं असेंहि सुचविलें आहे, कीं शेक्स्पियर कवीच्या बुद्धिवैभवाची यथार्थ कल्पना आपणास व्हावी अशी इच्छा असल्यास, त्याच्या कृतींचें सामग्र्येंकरून अवलोकन करणें अवश्य आहे; व यासाठींच त्याच्या सर्व नाटकांचीं शिस्तवार भाषांतरें होऊन मराठी वाचकांसमोर आलीं पाहिजेत हें उघड आहे.

येथें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं ह्या कवीच्या कांहीं मुख्य मुख्य नाटकांचीं भाषांतरें मराठींत झालीं असलीं तरी बाकीचीं मराठीस नको आहेत असें नाहीं. कोणास वाटेल, कीं हीं बाकीचीं नाटकें नीरस व कमी योग्यतेचीं असतील; पण ही शंका व्यर्थ आहे. अगोदर मराठींत चांगलीशीं नाटकें आहेत कोठें? आणि शेक्स्पियर कवीचीं बाकीचीं नाटकें नीरस व कमी योग्यतेचीं आहेत ह्मणजे काय?—त्याच्या नांवाजलेल्या नाटकांच्या मानानें हीं कमी योग्यतेचीं इतकेंच काय तें. एरवीं हीं अगदीं टाऊक आहेत, असा अर्थ नाहीं. फार काय सांगावें? कालिदास, भवभूति, शूद्रक, गेथ, मालियर वगैरे महाकवि सोडून दिले तर इतर कोणत्याहि कवीच्या उत्कृष्ट ह्मटलेल्या नाटकांहून हीं सरस नसलीं, तरी त्यांच्या तोलाचीं आहेत हें खचित आहे. आणि अलीकडे जीं कित्येक नाटकें आपल्याइकडे निघालीं

---

* मागें पृष्ठ १९ पहा.

आहेत व ज्यांच्या प्रयोगांचा धूम धडाका सध्यां चालला आहे, त्यांहून तर हीं कितीतरी पटीनें चांगलीं आहेत!* तेव्हां हीं नाटकें मराठीस अग्राह्य नाहींत, हें तर काय?—पण अशा नाटकांस मराठी भाषा जर अंतरेल तर त्यांत तिचें नुकसानच आहे असें समजलें पाहिजे.

कोणी ह्मणतील—मराठी भाषेची अभिवृद्धि व्हावी हाच जर ह्या खटपटीचा मूळ हेतु, तर तत्सिध्यर्थ शेक्स्पियर कवीचीं मुख्य मुख्य नाटकें मराठींत आणावीं ह्मणजे झालें; त्याच्या दुय्यम प्रतीच्या नाटकांचें काय प्रयोजन आहे? पण हें ह्मणणें बरोबर दिसत नाहीं. आमच्या मतें, हें ह्मणणें एखाद्या लुटारूला मात्र शोभण्यासारखें आहे; ज्ञानार्जनाचा हव्यास धरणाऱ्या विचारी मनुष्याला शोभणारें नाहीं. लुटीनें जसा कधीं कोणी सधन झाला नाहीं, त्याचप्रमाणें मोजक्या, वरवर, अर्धवट ज्ञानानेंहि कोणाला सज्ञानावस्था प्राप्त होणें नाहीं. जेथें जेवढें मिळेल तेथून तेवढें ज्ञान मिळवणें हा सदुद्योग होय, आणि हाच ज्ञानसंपन्नतेला मुख्यत्वें कारण आहे. पहा, पिकानें भरलेलें शेत पाहतांच, लुटारू मनुष्य काय करील?—त्याजवर तुटून पडेल व त्यांतलीं मधलीं मधलीं चार घोसदार कणसें तोडून घेऊन तो चालता होईल. पण भला शेतकरी जो आहे, तो कोनाकोपऱ्यासकट सर्व शेताची सारखी कापणी करून, करतां येईल तेवढें सगळें पीक गोळा करील व तें कोठारांत भरून ठेवील; एक दाणाहि सहसा वायां जाऊं देणार नाहीं. हीच बुद्धि ज्ञानेच्छूची असावी; व हीच बुद्धि, शेक्स्पियर कवीचें बुद्धिवैभव आपलेंसें करतांनाहि, आपण धरावी हें योग्य आहे. शेक्स्पियर कवीचें बुद्धिवैभव त्याच्या उत्कृष्ट नाटकांत ओतप्रोत भरलें आहे हें जरी खरें आहे, तरी त्याच्या बाकीच्या नाटकांतून तें

---

* हीं नाटकें कोणतीं तीं चतुरस्त्र वाचकांच्या लक्षांत येतीलच. कवित्वदृष्टीनें इतकीं रसहीन व नाट्यदृष्टीनें इतकीं कौशल्यशून्य नाटकें किर्लोसकर व शाहुनगरवासी नाटक मंडळ्यासारख्यांनीं आदरून नाटकगृहांत धुडकूस घालावा हें केवळ दुर्भाग्य होय. एकीला विद्वत्तेच्या डौलाखालीं व एकीला साधुसंतांच्या नांवाखालीं हीं हिडिस नाटकें चार पैसे जास्त देत असतील; तरी यांत लौकिक व लोकहित यांकडे लक्ष ठेवणें अवश्य, इतकेंच काय तें म्हणणें आहे.

मुळींच नाहीं असें नाहीं; त्याचे रज:कण ह्यांतहि ठिकठिकाणीं झळकत आहेत. तेव्हां या रज:कणांकरतां देखील, त्यांस आश्रयभूत जीं नाटकें त्यांचा संग्रह मराठींत करणें अवश्य. अर्थात् उत्कृष्ट व दुय्यम अशा सर्वच प्रतीच्या नाटकांचा लाभ मराठी भाषेस व्हावा हें इष्ट आहे.

ह्याशिवाय, जिज्ञासा ह्मणून जी प्रवळ मनोवृत्ति मनुष्याच्या ठिकाणीं आढळते, तीहि मराठी वाचकांस शेक्सपियर कवीचीं बाकीचीं नाटकें वाचावयास लावील, असें आह्मास वाटतें; इतकेंच नाहीं, पण त्याच्या संबंधाची अवांतर माहिती देखील करून घेण्यास त्यांस प्रवृत्त करील.ह्या मनोवृत्तीचा प्रभावच असा आहे, कीं कांहींएक गोष्ट थोडीबहुत समजली ह्मणजे तिजविषयीं वरवर विचार करूनच मनुष्य थांबणार नाहीं; तर तिच्या पाळांमुळांशीं जाऊन पोचण्यापर्यंत त्याची मजल येईल. ही हितकर वृत्ति सर्व महाराष्ट्रांतून आज नष्ट झाली आहे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. आणि ही वृत्ति जर याप्रमाणें नष्ट झाली नसेल तर शेक्सपियर कवीच्या सदतीस अडतीस नाटकांतून पांच सात, मुख्य मुख्य नाटकांनीं त्यांची तहान शांत होईल असें आह्मास वाटत नाहीं. वस्तुतः हीं पांच सात नाटकेंच ज्यांच्या वाचण्यांत एकदा आलीं व त्यांची रुचि ज्यांना लागली, त्यांच्या तोंडून, 'एवढीं पुरे झालीं, आणखी कशाला?' असे उद्गार न येतां, त्यांच्या मनांत 'बाकीचीं नाटकें कोणकोणतीं आहेत व तीं कोण्या उपायानें प्राप्त होतील' हेच प्रश्न उत्कंठापूर्वक उत्पन्न होतील. अर्थात्, हीं बाकीचीं नाटकें नीरस असतील, कदाचित् तीं इकडील रीतरिवाजाला साजेशीं नसतील, कदाचित् महाराष्ट्र रंगभूमीवर आणतां येण्यासारखीं नसतील वगैरे शंका तर एवढ्या शुष्क व निराधार आहेत कीं त्या त्यांच्या उत्सुक मनाला शिवणार देखील नाहींत.

नाट्यमालेवर येणाऱ्या आक्षेपांचें व तद्विषयक शंकांचें वर निरूपण केलें; तें अंमळ विस्तृतच झालें खरें, तरी तेणेंकरून वाचकांच्या मनाचें समाधान होईल तर त्याचें सार्थक झालें असें मानतां येईल. हे आक्षेप व ह्या शंका निव्वळ मन:कल्पित आहेत असें कोणी समजूं नये. हा

मालेचा उद्योग उचलल्या वेळेपासून आह्मास पुष्कळांशीं संभाषणाचा योग आला, तेव्हां यावर अनेकांच्या ज्या अनेक शंका निघाल्या व जे आक्षेप केलेले ऐकूं आले, त्या सर्वांचें वर्गीकरण करून, त्यांचा निर्देश थोडक्यांत येथें केला आहे. वस्तुतः यांस आधार तोंडचा; तथापि एक लेखी आधारहि आढळला आहे तो प्रत्यंतरार्थ दाखवतों. काळकर्ते ह्यांनीं ह्या मालेच्या संबंधानें अभिप्राय दिला आहे; तो देतांना ते ह्मणतातः—

"मुंबईची के. सी. कुळकरणी आणि मंडळी यांनीं एक नवीन उद्योग हातीं घेतला आहे. शेक्स्पियर कवीच्या कित्येक नाटकांचीं भाषांतरें मराठींत झालीं आहेत व कदाचित् आणखी कांहीं, थोडीं थोडकीं, करण्यासारखीं राहिलीं असतील. परंतु आजपर्यंत एवढींच नाटकें मराठींत कां आलीं आणि बाकीचीं कां आलीं नाहींत हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सध्यां झालेलीं बहुतेक नाटकें रंगभूमीवर प्रयोगासाठीं झालेलीं आहेत. आणि बाकीच्या नाटकांतील भाषा, विचार, रीतभात, रचना व विषय यांच्या दृष्टीनें पाहतां, तीं मराठीमध्यें फारशीं मोहक होण्याचा संभव नाहीं; यामुळें त्यांजकडे कोणी विशेषसें लक्ष दिलेलें नाहीं."—**काळ**. ता. २ आक्टोबर सन १९०३.

"अत एव, मुंबईची के. सी. कुळकरणी आणि मंडळी यांणीं शेक्स्पियर-कृत नाट्यमाला काढण्याचा जो एक नवीन उद्योग हातीं घेतला आहे,तो निरुपयोगी व अनवश्यक आहे "असा याच्याच पुढें या लेखाचा निष्कर्ष लिहिला, तर तो चुकीचा ठरेल असें नाहीं. हा निष्कर्ष कसा निघतो पहाः-"कित्येक नाटकांचीं भाषांतरें झालीं आहेत व आणखी **कदाचित् कांहीं थोडींशीं** राहिलीं असतील"—अर्थात्, **बऱ्याच नाटकांचीं भाषांतरें होऊन गेलीं आहेत**. वरें, येथें "एक **विचार करण्यासारखा** प्रश्न आहे"—अर्थात् तो मोठा गूढ आहे व त्यांत कांहींतरी गोम आहे; ती ही कीं बाकीचीं नाटकें **भाषांतरें करण्यासारखीं** नाहींत. "बाकीच्या नाटकांतील भाषा, विचार, रीतभात वगैरे गुणांच्या दृष्टीनें **तीं मराठींत फारशीं मोहक होण्याचा संभव नाहीं**"— अर्थात्, तीं **कमी योग्यतेचीं** व **नीरस** आहेत. "त्यांजकडे **कोणीं विशेषसें लक्ष दिलेलें नाहीं**"—अर्थात् तीं

गाळसाळ असून **टाकाऊ आहेत**. झालें एवढें पृथक्करण पुरे. काळ-पत्राच्या वरील परिच्छेदांतील वाक्यांत तळ देऊन बसलेल्या ह्या शंका जरी गर्भित आहेत,तरी त्या असाव्या तेवढ्या स्फुट असून,आह्मीं सांगितलेल्या शंका काल्पनिक नाहींत याविषयीं खात्री पटविण्यास सर्वांशीं समर्थ आहेत असें आह्मास वाटतें.

पण ह्या गर्भित शंका काळकर्त्यांच्या नव्हत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्या इतरांच्या आहेत असा आमचा तर्क आहे, व तो खराच असावा. कारण काळकर्ते स्वतः रसिक आहेत, कवि आहेत, आणि नाटकार आहेत; इतकेंच नव्हे, पण त्यांनीं शेक्स्पियर कवीच्या एका चांगल्यापैकीं नाटकाचें (मॅक्बेथचें) भाषांतरहि केलें असून, तें चांगलें साधलें आहे अशी कीर्ति आहे. तेव्हां, एवढ्या रसिकवराच्या हातून निघालेल्या लेखाचा पूर्वार्ध जरी एवढा शंकाकुल आहे तरी पुढें उत्तरार्धाचें पर्यवसान पहावें तों तें नाट्यमालेला अगदीं अनुकूल असें झालें हें ठीकच आहे. उत्तरार्धांत ते काय ह्मणतात तें पहाः—

"बाकीच्या नाटकांतून शेक्स्पियर कवीचें जें कौशल्य आहे, तें मराठी वाचकांना आजपर्यंत अगम्य होऊन राहिलें होतें. पण सुदैवानें, ह्या कुळकरणी मंडळीच्या प्रयत्नानें, मराठी वाचकांना इंग्रजींतील सर्व शेक्स्पियर मराठींत वाचायाला सांपडेल अशी तजवीज त्यांनीं चालविली आहे. सदर मंडळीचा हा प्रयत्न फार स्तुत्य आहे, व त्याला लोकाश्रय मिळणें योग्य आहे. ....शेक्स्पियर कवीच्या सर्व नाटकांच्या भाषांतराचा ग्रंथ मराठींत झाल्यास, त्याचें आदरातिथ्य कोण सहृदय करणार नाहीं ?"—**कित्ता.**

पुष्कळ झालें. नाट्यमालेला याहून आणखी कसें आदरातिथ्य पाहिजे? आणि कळविण्यास आनंद वाटतो कीं, तिचें असेंच आदरातिथ्य व गौरव इतर बऱ्याच गृहस्थांकडून झालेलें आहे. नमुन्याकरतां कांहीं प्रमुख पत्रकर्त्यांचे अभिप्राय संक्षेपानें येथें देतों. प्रथमतः, महाराष्ट्रांत गाजलेल्या एका भरतपुत्रापासूनच सुरवात करावी हें बरें. हे भरतपुत्र ह्मणजे 'नाट्यकथार्णवा'चे कर्ते रावसाहेब शंकरराव रानडे हे होत. हे आपल्या पत्रांत येणेंप्रमाणें लिहितातः—

" 'शेक्स्पियरकृत नाट्यमाला' या नांवाची पुस्तकमाला काढण्याचा यत्न रा. बेलसरे करीत असून, त्या मालेचें प्रसिद्धिपत्रक व "तुफान" (मूळचें The Tempest) या नाटकाच्या पहिल्या तीन अंकांचें मराठी भाषांतर हीं मजकडे अभिप्रायाकरितां आलीं, व तीं मी समग्र वाचून पाहिलीं. शेक्स्पियर कवीच्या नाटकांचीं मराठी रीतीचीं प्रतिरूपकें आजपर्यंत बरींच झालीं आहेत, पण मूळ नाटकग्रंथांतील पात्रांचीं नावें कायम राखून, "अथेल्लो" व "टेंपेस्ट" या दोनच नाटकांचीं भाषांतरें आजपर्यंत झालेलीं माझ्या पाहण्यांत आहेत. पुण्यास राष्ट्रीय सभा भरली, त्या वर्षाचे सुमारास शेक्स्पियर कवीच्या नाटकांबद्दल मीं कांहीं मित्रमंडळीबरोबर चर्चा केली होती, व त्या वेळीं, हीं नाटकें मूळच्या अस्सल स्वरूपानिशीं मराठी भाषेंत आणावयाचें अगत्य वाटून, भाषांतरें स्वतःच करण्याचा माझा विचार ठरला होता. त्या विचारास अनुसरून कामास सुरुवातहि व्हावयाची होती. परंतु दुर्दैवानें भाषांतरें स्वतः करण्याचा योग दुरावला. असा प्रकार झाला असतां, वर लिहिलेलें हस्तपत्रक व तयार झालेल्या भाषांतराचा कांहीं भाग हीं माझ्यापुढें आलीं, त्यामुळें माझ्या अंतःकरणभूमींत उत्साह व आनंद यांचा एकच कल्लोळ उसळला, व अखेर, दीर्घकाळपर्यंत चिंतिलेली वांछा सफळ होणार, असें वाटून मनास शांति प्राप्त झाली; यांचें वर्णन करण्यास माझी लेखणी असमर्थ आहे !

"हल्लीं मजकडे "तुफान" नाटकाचे तीन अंक आले, त्यांजबरोबर कै. वा. रा. ब. निळकंठ जनार्दन कीर्तने यांच्या भाषांतराचें पुस्तकही आलें. त्यामुळें दोन्ही भाषांतरांची तुलना करण्यास व प्रस्तुतच्या यत्नाची वास्तविक परीक्षा करतां येण्यास आपोआप साधन झालें. दोन्ही भाषांतरांच्या गुणदोषांचें सविस्तर प्रतिपादन करीत बसण्याचें हें स्थळ नव्हे. तत्रापि थोडक्यांत लिहावयाचें तें इतकेंच, कीं रा. बेलसरे यांचें भाषांतर कै. रा. ब. कीर्तने यांच्या भाषांतराहून कमी योग्यतेचें नाहीं, व रा. बेलसरे यांच्या लेखनांत भाषेचा सरळपणा व स्पष्टपणा हे गुण विशेषतः वाखाणण्याजोगे आहेत.

"भाषांतरें करण्याचा प्रस्तुतचा उद्योग अत्यंत स्तुत्य आहे, व मजकडे आलेल्या छापील पुस्तकावरून अनुमान करूं जातां, तो बऱ्याच अंशीं सिद्धीस जाईल असेंहि मला वाटत आहे. यासाठीं भाषांतरकारांनीं आपला यत्न नेटानें व दृढनिश्चयानें चालवावा असें मी त्यांस मोठ्या कळकळीनें व आग्रहानें सुचवितों व या कामीं सत्यसंकल्पाचा दाता भगवान् भाषांतरकारांचा मनोरथ पूर्ण करील अशी उमेद बाळगितों. बडोदें, ता. २४ मे १९०३."

मोठ्या दुःखाची गोष्ट कीं, हे गृहस्थ नुकतेच वारले. ह्यांच्या मरणानें, महाराष्ट्रांतील एक मार्मिक व रसिक ग्रंथकार गेला आणि आ-

भच्या 'नाट्यमाले'-चा चाहता नाहींसा झाला. वरील पत्रांत नाट्य-मालेच्या प्रसिद्धिपत्रकाच्या दर्शनानेंच ह्या रसिकवरास कोण आनंद झाला ह्याचें प्रतिबिंब स्पष्ट उमटलेलें दिसत आहे. आतां दुसऱ्या कित्येक प्रमुख पत्रांतून जे विस्तृत अभिप्राय प्रगट झाले आहेत, त्यांतून हे पुढील वेंचे दिले आहेत, ते पहा:—

"साता समुद्रापलीकडचा कालिदास आपणामध्यें आणून बसविण्याचा प्रयत्न ही मंडळी करीत आहे, हा फार स्तुत्य आहे."—**इंदुप्रकाश**. ता. १६ एप्रिल सन १९०३.

"भाषांतराचा उपयोग मराठी वाचकांस जसा होईल तसा शेक्स्पियर कवीची इंग्रजी नाटकें शिकणारें विद्यार्थ्यांनाहि पुष्कळ होईल."—**मुंबईवैभव**. ता. १६ एप्रिल १९०३.

"अर्थसादृश्यांचे योगानें आमचे कवि कोणत्याहि रीतीनें कमी नाहींत असें वाटेल."—**नेटिव् ओपीनियन** ता. २० मे १९०३.

"उद्योग स्तुत्य आहे. लोकाश्रय मिळून तो शेवटास जावो."—**सयाजीविजय**. ता. २३ मे १९०३.

"हल्लीं ज्या काळजीनें काम झालें आहे, त्याच काळजीनें पुढील कामहि झाल्यास, मराठी वाङ्मयास चांगलीच भर पडेल."—**विविधज्ञानविस्तार**. ता. ... माहे एप्रिल १९०३.

"मोठ्या पायावर उभारलेला मराठींत हा पहिलाच प्रयत्न आहे. भाषांतर करण्याची शैली चांगली साधली आहे."—**सरस्वतीमंदिर**. अंक ६ वा.

"भाषांतर करण्याची जी धर्ती अवलंबिली आहे, ती, शेक्स्पियर काय होता हें मराठी वाचकांना समजावून देण्याचा जो हेतु आपल्यापुढें ठेवला आहे, त्या दृष्टीनें पाहतां, कांहीं वावगी नाहीं."—**काळ**. ता. २ आक्टोबर १९०३.

वरील अभिप्रायांवरून एक गोष्ट स्पष्ट होत आहे. ती ही, कीं शेक्स्पियर कवीचे सर्व ग्रंथ मराठींत आणण्याचें अगत्य पुष्कळांस वाटत आहे. आणि दुसरी गोष्ट अशी, कीं त्यांतल्या त्यांत, आमचा हा यत्न बऱ्याच मंडळीस पसंत पडला आहे. यद्यपि ही कल्पना आमच्या मनांत कोणाच्याहि सांगीवरून आलेली नाहीं, तथापि हिचा प्रादुर्भाव कित्येकांच्या मागेंच झाला होता असें समजतें. त्यापक्षीं ही नवीन नसून, आमचा यत्न निमित्त मात्र आहे. वस्तुतः, ही

महाराष्ट्रांतील प्रमुख लोकांचीच इच्छा आह्मी अमलांत आणीत आणीत आहों, व तेणेंकरून मराठी भाषेच्या अभिवृद्धीला मोठें साहाय्य होणार आहे. मराठी भाषा ही आमची एकट्याची, किंवा जे चार ग्रंथकार मराठींत लिहितात त्यांची आहे आणि इतरांची नाहीं असें नाहीं; तर ही महाराष्ट्रांत राहणाऱ्या आपणा सर्वांची आहे; व तिच्या अभिवृद्ध्यर्थ झटणें हें सर्वांचें कर्तव्य आहे. यास्तव, जे मराठी भाषा बोलतात, त्या सर्वांवर ह्या कार्याचा भार आहे व तत्सिद्ध्यर्थ त्यांजपाशीं सहाय्य मागणें भाग आहे. तें त्यांनीं दिलें असतां, हें कार्य इच्छेप्रमाणें तडीस पोंचविण्यास आह्मास विशेष उमेद येईल हें उघड आहे.

येथवर हातीं धरलेल्या उद्योगाच्या बाह्योपाधींचें उद्घाटन करून, उद्योगाचें स्वरूप करतां आलें तेवढें स्पष्ट केलें. आतां अंत र्गतउपाधींकडे वळूं. हा भाग विशेष महत्वाचा असून, उपयुक्तहि आहे. ह्यांत भाषांतराच्या वगैरे अडचणींचा व लेखनव्यवसायांतल्या कित्येक वादग्रस्त गोष्टींचा ऊहापोह करण्याचें आमचें मानस आहे.

प्रथमतः भाषांतराविषयीं. शेक्स्पियर कवीच्या नाटकांचीं भाषांतरें आह्मीं करणार असें ह्मटलें, पण तीं कशीं करणार ? हें सांगावयाचें, तर आधीं, भाषांतर ह्मणजे काय ? तें कसें असावें ? याचा स्पष्ट खुलासा येथें करणें अगत्याचें आहे. आजपर्यंत इंग्रजींतून मराठींत भाषांतरें झालीं नाहींत असें नाहीं; मग त्यांत विशेष तें काय ? असें कोणी ह्मणतील तर त्यांस एवढेंच सांगणें आहे कीं त्यांत विचार करण्यासारखें पुष्कळच आहे, विचार मात्र केला पाहिजे. आजपर्यंत कित्येक इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें मराठींत झालीं आहेत, कित्येकांचीं होत आहेत, आणि शेकडों पुढें होतील; पण तीं कशीं करावीं, त्यांत अडचणी कोणकोणत्या येतात, त्या टाळाव्या कशा वगैरे गोष्टींचा कोठें फारसा विचार केलेला आढळत नाहीं. धूमधडाका भाषांतरें होत आहेत, व गंभीर भाषासरणी आणि मौल्यवान ग्रंथ ह्मणून त्यांची तारीफ चालली आहे; पण अशा पुस्तकांचा उपयोग पाहिला तर कराटाला

शोभा आणण्या व्यतिरिक्त कांहीं कोणाला होत असेलसें वाटत नाहीं. 'मूळ वाचायाला बरें, पण हीं भाषान्तरें नकोत' असे उद्गार हरहंमेश ऐकूं येतात. यांतलें बीज हेंच कीं ह्या भाषांतररूप ग्रंथांची भाषा प्रायः इंग्रजी धर्तीवर गेल्यामुळें, एवढी दुर्बोध व नीरस असते कीं ग्रंथ हातीं धरावासा वाटत नाहीं. इंग्रजी शिकलेले लोकांस शुद्ध मराठी लिहितां येत नाहीं, हा बोभाटा कांहीं नवीन नाहीं. या संबंधानें लिहीत असतां एका मार्मिक टीकाकरानें ह्मटलें आहे: "कदाचित् इंग्रजी न समजल्यास, ती परकीय भाषा आहे ह्मणून ह्मटलें तर शोभेल; परंतु मराठी जी आपली जन्मभाषा, तिजविषयीं असें काठिण्य उत्पन्न झालें ह्मणजे समजणारापेक्षां लिहिणाराचीच शैली फार ह्मटली पाहिजे!" * हें ह्मणणें जरी खरें आहे, तरी त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं आहे असें आह्मास वाटत नाहीं. भाषांतरें कशीं करावीं याविषयीं जर कोठें चर्चाच झालेली नाहीं, व कांहीं नियमबद्ध पद्धतही ठरलेली नाहीं, तर चांगलीं सुबोध भाषांतरें व्हावीं कशीं? अशा चर्चेच्या व पद्धतीच्या अभावीं सध्यां आहेत याहूनहि दुर्बोध व नीरस भाषांन्तरें निपजलीं नाहींत, हेंच मराठी भाषेचें मोठें भाग्य! खरें ह्मटलें तर सध्यां आपणापैकीं शेकडो जणांस इंग्रजी भाषा शिकणें भाग झालें आहे, व ती शिकण्याला भाषांतर हा एक मार्ग आहे. याशिवाय व्यवहारांत व दरबारांतहि इंग्रजींतून मराठींत व मराठींतून इंग्रजींत भाषांतरें करण्याचे प्रसंग नेहमीं येतात. असें असून, इंग्रजी व मराठी भाषा धुंडून, त्यांच्या भाषणसरणींतले विशेष प्रकार कोणते, ते स्पष्ट करण्याची, व कोणते स्थळीं कसें भाषांतर करावें याविषयीं शोध करून मुक्रर नियम बांधण्याची खटपट, व्हावी तशी, आजपर्यंत कोणीतरी केली आहे काय? ज्या गोष्टीची आपणास नित्य नड तिची अशी रड! आपले लोकांची तऱ्हाच ही कीं नित्य जाण्यायेण्याच्या वाटेंतला दगड पायाला लागून शेकडों वेळां शेकडों जण ठेंचा-

---

* नीलकंठ जनार्दन कीर्तने-कृत "टेम्पेस्ट" नाटकाच्या भाषांतरावर टीका पहा. विविधज्ञानविस्तार पुस्तक ८, अंक ५, सन १८७५. ही टीका मराठीचे मर्मज्ञ कै० रामभाऊ गुंजीकर यांच्या हातची आहे.

ळून जातील, पण तो उचलून टाकण्याचें कांहीं कोणाच्या मनांत यावयाचें नाहीं. हेंच इंग्रज लोकांचें लक्षण पहा. येथें त्यांचें राज्य स्थापन झालें, व मराठी शिकण्याची गरज त्यांस पडूं लागली मात्र, तोंच त्यांनीं तिची तपासणी ज्यारीनें सुरू केली, व ज्या मराठी भाषेला कोश नव्हता, व्याकरण नव्हतें, कांहीं नव्हतें, तिला हीं तिच्या अभ्युदयांचीं साधनें त्यांनीं तयार करून दिलीं. अलीकडे इकडील शेंकडों लोक इंग्रजी शिकून तयार झाल्यामुळें मराठी शिकण्याची पूर्वींसारखी गरज त्यांस उरली नाहीं, ह्मणून त्यांचें लक्ष इकडे कमी झालें इतकेंच; नाहीं तर त्यांनीं आणखी काय काय केलें असतें, सांगवत नाहीं ! आणि आह्माला अल्प वयांतच बळें इंग्रजी शिकावें लागत असतां, व जन्मभाषा जी मराठी, तिच्या अभिवृद्धीचें ओझें शिरावर असतां,आह्मी इंग्रजी शिकण्यांत टाकभाज्याचें काम करून स्वस्थ बसतों ! आपणापैकीं कित्येकांनीं इंग्रजी भाषेंत चांगली गति करून घेतली आहे हें खरें; व कधीं मधीं त्यांतील कांहीं ग्रंथांचीं मराठींत भाषांतरेंहि कांहीं जणांनीं केलीं आहेत असेंहि पाहण्यांत येतें. परंतु शुद्ध मराठी लिहितां येण्याला इंग्रजीप्रमाणेंच मराठीचाहि चांगला अभ्यास केला पाहिजे, व असा अभ्यास करून, त्या दोनहि भाषांचे परस्परसंबंध कसे आहेत व त्याप्रमाणें एकींतून दुसरींत भाषांतर कसें करावें याविषयीं विचारपूर्वक चर्चा केली असतां मोठा उपयोग होईल ह्या गोष्टी कोणाच्या गांवींहि आहेतशा दिसत नाहींत. आमच्या अल्पमतीस तर असें वाटतें, कीं आमची जी विद्वान मंडळी कायदे-कौन्सिलांत शुष्क प्रश्नोत्तरें करण्यांत चातुर्य दाखविते, राष्ट्रीय सभेचा मंडप इंग्रजी वक्तृत्वानें गर्जून टाकते, इंग्रजींत रामायणादि संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें करून किंवा इतिहासादि प्रबंध लिहून 'दर्यांमे खसखस' टाकण्याचें शतकृत्य करते, तिनें जर ह्या गोष्टींमध्यें थोडें मन घातलें तर मराठी भाषेचें मोठें कार्य होईल व तरुण नवीन विद्यार्थ्यांवर त्यांचे अनंत उपकार होतील. तेव्हां, ही गोष्ट त्यांच्यासारख्या समर्थ विद्वानांच्या नजरेस आणून, भाषांतरसंबंधानें सामान्यें करून कांहीं विचार येथें प्रदर्शित करतों. त्यांवरून, इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें कशीं करावीं

व भाषांतरें कशीं झालीं असतां मराठीस तीं हितावह होतील याविषयीं खुलासा ओघानेंच होईल. प्रस्तुत उद्योगहि भाषांतररूपच असल्या कारणानें हें विवेचन येथें अप्रासंगिक होणार नाहीं असें आह्मास वाटतें.

भाषांतर हा शब्द मराठींत अलीकडे नवीन आलेला आहे, हें सर्वांस ठाउकच आहे. संस्कृतांतहि, सध्यांच्या अर्थानें, तो आढळत नाहींच. त्याचा पदशः अर्थ ह्मटला ह्मणजे दुसरी भाषा इतकाच. तथापि रूढार्थ थोडा वेगळा झाला आहे. कांहीं एक पदार्थ एके स्थळाहून दुसरे स्थळीं नेला ह्मणजे त्याचें स्थलांतर झालें असें आपण ह्मणतों; त्याच प्रमाणें, एके भाषेंतील वाक्याचा अर्थ दुसरींत नेला असतां, त्याचें भाषांतर झालें असें ह्मणावयाचें. यावरून उघड झालें, कीं भाषांतर करावयाचें ह्मटलें, कीं त्याला आधीं दोन भाषा लागतात. ह्मणजे दोन भिन्न भिन्न भाषा असल्यावांचून भाषांतर या शब्दाचा प्रयोग संभवत नाहीं. आह्मास असें वाटतें, कीं पूर्वी भाषांतर हा शब्द कां नव्हता व अलीकडे तो कसा आला, याचें बीज याच गोष्टींत आहे. हें स्पष्ट करण्याकरतां भाषांतराची पूर्वपीठिका कशी आहे ती अंमळ पाहूं.

प्राचीन काळीं संस्कृत ही एकच भाषा हिंदुस्थानांत चालत होती. येथील लोकांचा इतर भाषांशीं कधीं फारसा संबंध आला नाहीं; व त्यांना त्यांची माहितगारी होती असेंहि दिसत नाहीं. कांहीं प्राकृत भाषा होत्या; पण त्यांस स्वतंत्र व वेगळ्या न लेखतां, केवळ छायारूपच समजत असत. कोणाला ग्रंथ वगैरे लिहिणें झाला तर प्रायः संस्कृतांतच तो लिहीत. फार कशाला ?—या प्राकृत भाषांचें व्याकरण वररुचीनें लिहिलें, तें देखील त्यानें संस्कृतांत लिहिलें. याहून अलीकडील उदाहरण कानडी भाषेचें आहे. कानडीचें व्याकरण ह्मटलें ह्मणजे त्याच भाषेंत असावें; पण तें कोणी लिहिलें आहे सस्कृतांत ! सारांश, भाषा कायती संस्कृत, ही कल्पना लोकांच्या मनांत दृढ असल्यावर, भाषांतराला वाव कोठून मिळावी ? आतां केव्हां केव्हां सामान्य जनांशीं गांठ पडली असतां, प्राकृत भाषांचाहि आदर

करावा लागे, व त्या वेळीं सहजच भाषांतराची गरज पडे, हें खरें; तरी अशा वेळींहि भाषांतर हा शब्द न योजतां, 'मूळ व छाया' हेच शब्द योजण्याची चाल होती. संस्कृत नाटकादिकांच्या जुन्या पोथ्यांत प्राकृत भाषणांची, खालीं टिपेंत, 'छाया' दिलेली असे, हें पुष्कळांच्या लक्षांत असेलच. आणि प्राकृत व संस्कृत भाषांचा हा परस्परसंबंध लक्षांत आणला असतां, 'छाया' हाच शब्द अशा ठिकाणीं यथार्थ होय हें उघड आहे.

पुढें कालगतीनें, प्राकृत भाषांपासून मराठी वगैरे देशभाषा उत्पन्न झाल्या; व त्यांचा उदय होण्याची वेळ येतांच, त्यांच्यांत ग्रंथ होऊं लागले. या देशभाषा, तन्मातृस्थानापन्न जी संस्कृत भाषा, तिच्यापासून बऱ्याच वेगळ्या पडल्या कारणानें, संस्कृतांतून त्यांच्यांत ग्रंथांचीं भाषांतरें करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. फक्त मराठीकडेच पाहिलें, तर तिच्यांत आरंभीं जे ग्रंथ झाले ते प्रायः कवितावद्ध असून, संस्कृत पुराणांच्याच आधारानें रचलेले आहेत, असें दिसून येतें. कथाश्रवणाच्या द्वारानें सामान्य जनांचें मनोरंजन होऊन, त्यांस धर्मज्ञानहि व्हावें अशा हेतूनें हे ग्रंथ केले आहेत. श्रीधरानें ह्मटलें आहे.—

धीरगंभीर संस्कृत वाणी।
जैसें आडांतील गोड पाणी।
परि तें दोरपात्रांवांचुनी।
प्राकृतजनां कैंवि मिळे ?॥

रामविजय, १—२०

अशी कींव येऊनच महाराष्ट्र कवींनीं संस्कृत 'आडांतलें गोड पाणी' काढून मराठींत सांठविलें. आह्मास असें वाटतें, कीं त्यांनीं हें साक्षात् 'जीवन'च मराठी भाषेंत ओतून दिलें; एरवीं, तिला जी 'जीवनकळा' आली आहे कशी आली असती? वस्तुतः, मराठी कवींचे हे ग्रंथ भाषांतररूपच आहेत; आणि मराठी भाषेला सध्यां जी शोभा व प्रौढि आली आहे ती अशा भाषांतरांनींच तिला आली आहे हें निःसंशय आहे. तथापि, मराठी वगैरे देशभाषांस

संस्कृतापासून वेगळें अस्तित्व नाहीं हीच चालत आलेली समजूत मराठी कवींसहि मान्य असल्या कारणानें, त्यांनीं आपल्या ह्या भाषांतरांस 'भाषांतर' हें नांव दिलें नाहीं; त्यांस त्यांनीं 'टीका' असें ह्मटलें. ज्ञानेश्वरी हा महाराष्ट्र वाङ्मयांत आदिग्रंथ असून, त्यांत गीतेवर विस्तृत विवरण आहे; तेव्हां अशा ग्रंथास 'टीका' ह्मणून ह्मटलें हें ठीकच. सदरहु ग्रंथाच्या शेवटीं स्पष्ट ह्मटलें आहे:—

शकें बारारों बारोत्तरें ।
तैं 'टीका' केली ज्ञानेश्वरें ।

परंतु मुक्तेश्वर, मोरोपंत, वामन वगैरे कवींच्या कृतींपासून तों नैषध काव्याच्या धरतीवर रचलेल्या रघुनाथपंडित–कृत नलोपाख्यानापर्यंत सर्वांसहि 'टीका' हीच सर्वसाधारण संज्ञा देण्यांत येते, याचें बीज वरील समजूत हेंच होय; दुसरें कांहीं नाहीं. स्वतः रघुनाथ पंडितच ह्मणतो:—

लोकीं कोमलकाव्यनाटककलालंकारचूडामणि
वर्ते नैषध विद्वदौषध कृति प्रख्यात वाग्धोरणी ।
हे त्याचीच टिका टिकोनि घटिका ऐकेल जो सादर
बोले श्रीरघुनाथसद्रसिकता भेटे तया सत्वर ॥

नलदमयंतीस्वयंवर.

याप्रमाणें ज्ञानेश्वरी ही टीका, वामनाचीं भाषांतरें ह्याहि टीका, मुक्तेश्वराचें भारत व मोरोपंताचीं अष्टोत्तर रामायणें व भारतादि ग्रंथ हीं सर्व टीकारूपच, आणि नलोपाख्यानासारखीं प्रकरणें हीं सुद्धां टीकाच, अशी तऱ्हा झाली आहे. आतां, मराठी ही संस्कृताहून वेगळी व स्वतंत्र भाषा मानली, तर मराठी कवींचे हे ग्रंथ संस्कृताच्या आधारानें रचले असल्या कारणानें, एके परीनें त्यांचें भाषांतर झालें असें ह्मणतां येईल हें उघड आहे. आणि ह्या केवळ बाह्य वेशावरूनच, मराठी कविता बहुधा भाषांतररूपच असून, मराठी कवि ह्मणजे भाषांतरी कवि, अर्थात् त्यांस स्वतंत्र कवितेचें अंग नाहीं, असे शेरे कित्येक विद्वानांनीं दिले आहेत, हेंहि प्रसिद्धच आहे. तथापि मराठी कवींच्या ग्रंथांस भाषांतररूप ह्मणावयाचें असेल, तर केवळ

त्यांच्या वरील बाह्य वेशावरून ह्मणणें बरोबर नाहीं. त्यास तशींच वेगळीं कारणें असलीं पाहिजेत. तीं आहेत कीं काय आणि असल्यास कोणतीं याविषयीं ह्या कविताग्रंथांच्या स्वरूपाचा विचार करते वेळीं खुलासा करूं. त्याच वेळीं, मराठी कविता भाषांतररूप नसून, तिला स्वतंत्र कवितेची योग्यता आहे असा जो वाद अलीकडे निघाला आहे त्यांत कितपत तथ्यांश आहे त्याचाहि विचार होईल. सध्यां एवढेंच सांगावयाचें, कीं मराठी भाषा जी सांप्रत एवढ्या प्रौढ दशेला येऊन पोंचली आहे व तिला जी एवढी अपूर्व शोभा आली आहे, तें सारें श्रेय, संस्कृताच्या आधारानें रचलेल्या ह्या कविताग्रंथांनाच आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

ही हकीगत मराठी व संस्कृत ह्यांच्यामधील संबंधाची झाली. आतां, मुसलमानी अमलाबरोबर, अरबी व फारसी भाषांशीं जेव्हां मराठीचा संबंध आला, तेव्हां काय प्रकार झाला तो पाहूं. ह्या दोनही भाषा परकी असून, अत्यंत भिन्न असल्यामुळें, या वेळीं, खरें ह्मटलें असतां, भाषांतर किंवा अशाच अर्थाचा एखादा शब्द प्रचारांत येण्याचा बराच संभव होता; परंतु तसें कांहींच झालें नाहीं. फार काय सांगावें ? देशी व यावनी अशा दोनहि भाषा ज्यांना समजतात असे कित्येक लोक जरी निघाले, व त्यांस अनुलक्षून 'दुभाषा' व क्वचित् 'दुभाषी' हे शब्द जरी प्रचारांत आले, तरी अरबींतून किंवा फारसींतून एकाहि ग्रंथाचें मराठींत भाषांतर झाल्याचें उदाहरण पाहण्यांत किंवा ऐकण्यांत नाहीं. याचें कारण, कदाचित् संस्कृतासारख्या प्रगल्भ भाषेपुढें सदरहु भाषांची थोरवी तत्कालीन लोकांस फारशी भासली नसेल; अथवा यवनांविषयीं साधारणतः जी अनादरबुद्धि किंबहुना तिरस्कारबुद्धि लोकांच्या मनांत वसत होती, तिचेंहि हें फळ असेल. कसेंहि असलें तरी एकंदरीनें पाहतां, ह्या यावनी भाषा, निदान वाङ्मयात्मक विद्येच्या संबंधानें तरी, बऱ्याच अप्रौढ होत, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. हें सिद्ध करण्यास नाटकग्रंथांचा अभाव हें एकच प्रमाण पुरे आहे असें आह्मास वाटतें. असें सांग-

तात कीं, ह्या यावनी भाषांत कांहीं गाबाळ काव्यें, कांहीं चावट कादंबऱ्या, व कांहीं रक्तपाताच्या क्रूर कृत्यांच्या वर्णनानीं आणि अहंकाराच्या वाग्जल्पांनीं परिप्लुत बखरी यांशिवाय फारसें कांहीं नाहीं; आणि काव्याचा उत्कृष्ट प्रकार जो नाटकें, त्यांचा तर त्यांस गंधहि नाहीं ! अशा स्थितींत, भिन्न भाषांचा योग आला असतांहि, भाषांतर शब्दाला त्या वेळीं अवकाश मिळाला नाहीं, यांत काय नवल ? परंतु इंग्रजी भाषेचा इकडे रिघाव होतांच, ही स्थिति बदलली; आणि वेगळाच प्रकार सुरू होऊन, त्या भाषेंतील translation याशीं समानार्थक असा भाषांतर हा नवा शब्द प्रचारांत आणावा लागला. कारण, इंग्रजी ही परकी व सर्वस्वीं भिन्न भाषा पडल्या कारणानें, अशा भाषांतरांस पूर्वींचे 'छाया' व 'टीका' हे शब्द लागू पडण्यासारखे नव्हते. तेव्हां, इंग्रजींतून मराठींत व मराठींतून इंग्रजींत जीं भाषांतरें होऊं लागलीं, तींच वास्तविक भाषांतरें होत हें उघड आहे.

भाषांतर शब्दाची पूर्वपीठिका ही अशी आहे. हीवरून पाहतां, आजपर्यंत मराठींत जो ग्रंथसंग्रह झाला आहे, त्यांतून कांहीं थोडे स्वतंत्र ग्रंथ खेरीज करून, बाकी बहुतेक भाग 'भाषांतरा' खालीं मोडणारा आहे, असें ह्मणावयास चिंता नाहीं. हीं भाषांतरें, अर्थात्, संस्कृतावरून व इंग्रजीवरून झालेलीं आहेत. संस्कृतावरून जीं भाषांतरें झालीं आहेत, त्यांपैकीं इंग्रजी अमलापासूनचीं भाषांतरें, भाषांतर शब्दाचा जो अर्थ आपण सध्यां समजतों, त्यास अनुसरून झालीं असल्या कारणानें, त्यांजविषयीं विशेष लिहिणें नलगे. परंतु इंग्रजी अमलापूर्वीं होऊन गेलेल्या भाषांतरांचें स्वरूप वेगळें असल्यामुळें त्याविषयीं यथें दोन शब्द लिहिणें इष्ट आहे.

वर ह्मटल्याप्रमाणें, इंग्रजी अमलापूर्वींचे मराठी ग्रंथ प्रायः कवितारूप असून, व्यासादि कवींच्या पुराणांच्या आधारेंच रचलेले आहेत. ही गोष्ट कोणाहि महाराष्ट्र कवीनें लपविली नाहीं; हें तर काय ?—पण आपण आपले ग्रंथ स्वतंत्रपणें लिहिले असा आव

देखील कोणी घातला नाही. जुन्या महाराष्ट्र कविमंडळांत, सरसत्वास्तव ज्याचें नांव अग्रेसर आहे, तो हा—पंत ह्मणतात—

श्रीमुक्तेश्वर कविवर, ज्यातें कोण न शुभेछु वंदील ? ।
बंदी लक्ष जयाचे, ज्याचें यश भव्य जेंवि मंदील ॥

सन्मणिमाला.

आपल्या भारतांत आदिपर्वाच्या आरंभीं काय ह्मणतो, पहाः—

सुरस, सुंदर, पवित्र सृष्टि ।
पक्वान्नें निपजवूनि पार्टी ।
संस्कृत शब्द सुवर्ण-तार्टी ।
श्रेष्ठां श्रेष्ठां वोगरलीं; ॥
तेंचि रसायन दुर्बळपणीं ।
महाराष्ट्रभाषा-रंभापर्णीं ।
वाढिलें तरी भुकाळु जनीं ।
न सेविजे किमर्थ ? ॥

तसेंच पुढें आणखी,

तेविं अर्थीं घालितां दृष्टि ।
न म्हणे संस्कृत मऱ्हाटी ।
रत्नकुंभीं कीं मृत्तिकाघटीं ।
गंगोदक सारखें ॥

यावरून उघड दिसून येतें कीं मूळ संस्कृतांत जें होतें 'तेंच रसायन' कवीनें मराठींत उतरलें. यांत आपण कांहीं नवीन केलें असें मुळींच नाही, अशीच कवीची भावना असल्या कारणानें तो ह्मणतो—भाषेचा मात्र भेद, बाकी संस्कृतांतलाच अर्थ मी मराठींत आणला आहे–'दोहोंतहि गंगोदक सारखेंच.' अर्थात्, आपण केलें हें केवळ भाषांतर होय असा त्याचा भावार्थ स्पष्टच आहे. आणि हेंच ह्मणणें इतर कवींचेंहि आहे. तथापि हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे, कीं मराठी कवींचीं हीं भाषांतरें इतर सामान्य भाषांतरांसारखीं नाहींत. शब्दास शब्द ठेवून देऊन हीं भाषांतरें त्यांनीं केलीं नाहींत; इतकेंच नाहीं, पण मूळांतलीं स्थलादिकांचीं लांबच लांब वर्णनें त्यांनीं मराठींत घेतलीं नाहींत; ऋषींच्या सविस्तर कुळकथा, मन्वंतरांच्या

तपशीलवार हकीगती, कित्येक कंटाळवाणीं उपाख्यानें वगैरे, यांच्या भानगडींत ते पडले नाहींत; ज्या उपमा व जे दृष्टांत जुन्या ग्रंथांत आढळतात, पण कालांतरानें, वस्तुस्थितीचा लोप झाल्यामुळें, ज्यांस दुर्बोधत्व व नीरसत्व आलें असें त्यांना वाटलें, त्यांसहि त्यांनीं आपल्या ग्रंथांत स्थळ दिलें नाहीं. मग हीं भाषांतरें महाराष्ट्र कवींनीं कशीं केलीं असा सहजच प्रश्न उत्पन्न होईल. त्याचा खुलासा मुक्तेश्वराच्या पुढील उद्गारांवरून बराच होतो, असें आह्मास वाटतें. तो ह्मणतो:—

व्यासवचन इक्षुदंडू ।
गाळून सुरस सारांश गोडू ।
देशभाषा वळिले लाडू ।
नाबदेचे आवडी ॥

तसेंच फिरून आणखी,

व्यासग्रंथ-गिरींचें सोनें ।
संस्कृत खोटिये गाळून मनें ।
देशभाषां घडिलें लेणें ।
साहित्यरत्नीं सुजडित ॥
तें लेववितां कर्णभूषण ।
कां हो परते करावे कर्ण ।
श्रोतेहो तुम्ही विचक्षण ।
निर्मत्सर विचारा ॥

अर्थात्, प्राचीनत्वास्तव संस्कृत वाणीला 'इक्षुदण्डा' प्रमाणें जें दुर्बोधत्वाचें काठिण्य आलें, तें मोडून, मूळांतला 'गोड सारांश' महाराष्ट्र कवींनीं काढून घेतला; आणि सोनें जसें खाणींतून काढून मुशींतून गाळून घ्यावें, व रत्नें वगैरे जडून त्याचें लेणें घडवावें, तशाच रीतीनें त्यांनीं देशभाषेंत ग्रंथ रचिले, व त्यांत सध्यांच्या प्रचारांतल्या उपमादृष्टांतादिकांची जागचे जागीं योजना करून, त्यांस शोभा आणिली. अशा करामतीमुळेंच हे ग्रंथ मराठीस 'भूषण' भूत होऊन वाचकांच्या जिभेस व श्रोत्यांच्या कानांस एवढे 'सुरस व गोड' लागतील असे झाले; एरवीं कधीं होतेना. तात्पर्य, भाषांतर करतांना,

मूळांतला अर्थ मात्र घेऊन, तो मराठींत मराठी भाषेच्या सरणीनें त्यांनीं ठेवून दिला. यांत, वाचकांस गोड लागेल अशीच रचना करण्याकडे त्यांचें मुख्यत्वें लक्ष्य असल्या कारणानें, ग्राह्याग्राह्यतेचा बराच विचार त्यांस करावा लागला. तशींच, मूळ ग्रंथांतलीं लांबलचक वर्णनें पूर्वीच्या काळीं कितीहि महत्वाचीं वाटलीं असलीं, तरी तीं कंटाळवाणीं झाल्यामुळें सोडून देणें त्यांस प्राप्त झालें. चर्वितचर्वणानें बेचव झालेल्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टींसहि टाळा देणें त्यांस भाग पडलें. जुन्या उपमा व जुने दृष्टांत कालपरत्वें अर्थहीन होऊन गेल्यामुळें, त्यांच्या ऐवजीं मनांत बिंबतील अशा अगदीं प्रचारांतल्या उपमा व दृष्टांत निवडून त्यांस घ्यावे लागले, व त्यांच्या यथोचित योजनेनें कोठें कोठें विषयाचें विवेचनहि लांबवावें लागलें. अनेक वेळां, अभिप्रेत अर्थ यथास्थित व्यक्त करण्यासाठीं, मूळची संस्कृत भाषेची लांबलचक समासघटित सरणी मोडून टाकून, साध्या सरळ मराठी वळणावर तिला न्यावी लागली. असे अनेक फेरफार त्यांना करावे लागले; व ते सर्व त्यांनीं मोठ्या चातुर्यानेंच केले, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. अशा रीतीनें भाषांतरें करणें ह्मणजे हा लहानसान खटाटोप नव्हे. आह्मास तर, महाराष्ट्र कवींचा हा खटाटोप पाहून, अवगाहनार्थ जलाशयांत शिरलेल्या वनगजाच्या लीलेचीच आठवण होते. ती लीला अशी:—

संहार-विक्षेप-लघुक्रियेण
हस्तेन तीराभिमुखः सशब्दम् ।
बभौ स भिन्दन् बृहतस्तरंगान्
वार्यर्गलाभंग इव प्रवृत्तः ॥

रघुवंशम् ५—४५

ह्मणजे, आपला हस्त (सोंड) वारंवार मागें ओढून, लांब करून, व आंखडून, त्याच्या बळानें, पाण्यांत उसळणाऱ्या लाटा फोडावयाचा तडाखा जेव्हां वनगजानें चालविला, तेव्हां त्या लाटा हेच जणूं पायांतले सांखळदंड समजून, त्यांस तोडावयासच तो प्रवृत्त झाला आहे असें भासलें. महाराष्ट्र कवींनीं तरी आपले ग्रंथ लिहितांना, गीर्वाण-

वाणीतरंगिणींत यथेच्छ अवगाहन करून, भाषांतराच्या ज्या अनेक अडचणी लाटांप्रमाणें अडव्या आल्या, त्या, हस्तांतल्या लेखणीच्या फटकाऱ्यानें, फोडण्यासाठीं 'संहार-विक्षेप-लघुक्रिये'-चाच अवलंब केला यांत शंका नाहीं.

आतां, महाराष्ट्र कवींनीं भाषांतर करतांना मूळ ग्रंथांत जे हे फेरफार केले, त्यांच्या योगानें एक वाद अलीकडे उपस्थित झाला आहे; त्याचा थोडासा विचार येथें करणें अवश्य आहे. हा वाद असा आहे, कीं महाराष्ट्र कवींनीं आपले ग्रंथ संस्कृताच्या आधारानें लिहिले हें जरी खरें आहे, तरी त्यांत मूळाशीं सादृश्य फारच थोडें असल्यामुळें, ते ग्रंथ स्वतंत्र ग्रंथ होत; त्यांस भाषांतरें ह्मणणें बरोबर नाहीं. हा वाद प्रथम निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनीं काढला; व त्याचाच अनुवाद त्यानंतर कित्येकांनीं केला आहे. मोरोपंताच्या कवितेवरील निबंधांत याच मुद्याविषयीं लिहित असतां शास्त्रीबुवांनीं ह्मटलें आहे–"भारत, रामायण वगैरे ग्रंथांचा सरासरी आधार घेऊन, (मुक्तेश्वर व मोरोपंत) या दोघा कवींनीं स्वतंत्रपणेंच ग्रंथरचना केली." * ह्या त्यांच्या ह्मणण्यास त्यानीं प्रमाण दिलें आहे, तें एक हें– " आख्यानांची पद्यसंख्याच नुसती पाहिली तर तिचें प्रमाण सरासरी (मूळग्रंथाचें) १, (मुक्तेश्वराचें) $\frac{१}{२}$, व (मोरोपंताचें) $\frac{१}{४}$ इतकें पडेल." * तसेंच दुसरें हें–"आंतील अर्थ पाहिला, तरी मुक्तेश्वराच्या ओंव्यांत पुष्कळ फेरफार केलेला आढळेल, आणि मोरोपंताच्या आर्यांत तर मूळच्या कथासूत्राखेरीज थोडेंच सादृश्य सांपडेल." * हीं दोनही प्रमाणें, आमच्या मतें, एवढीं डळमळीत आहेत, कीं तीं महाराष्ट्र कवींचें ग्रंथरचनास्वातंत्र्य स्थापन करण्यास समर्थ आहेत असें वाटत नाहीं. मूळांतल्यापेक्षां मराठी कवींच्या ग्रंथांत पद्यसंख्या कमी आहे, तसेंच, मराठींत लिहितांना बराच फेर पडला आहे, हें सर्व जरी खरें आहे; तथापि हें सारें फळ, मराठी कवीनीं भाषांतर करतांना, ज्या 'संहार-विक्षेप-लघुक्रिये' च्या पद्धतीचा अंगीकार केला, त्या पद्धतीचेंच होय हें

---

* निबंधमाला, अंक ४६.

उघड आहे. भाषांतराची ही पद्धत त्यांनीं स्वीकारली हा मोठा शाहणपणा केला असें आह्मास वाटतें. आणि या पद्धतीमुळेंच, जे अनेक फेरफार त्यांनीं केले, ते त्यांस करावे लागले असें आह्मी समजतों. ते बरीक त्यांनीं अशा चातुर्यानें व कुशलतेनें केले, कीं तेणें करून, त्यांच्या वाणींत, न्यायमूर्ति रानडे यांनीं ह्मटल्याप्रमाणें, जिवंतपणाचा जोर उत्पन्न होऊन, त्यांच्या ग्रंथांस नवीनत्वाची टवटवी आली. तथापि एवढ्यावरून हे ग्रंथ भाषांतररूप नाहींत असें होत नाहीं. पहा कीं स्वतंत्र ग्रंथरचनेचा मुख्य गुण त्यांत दिसून येत नाहीं, आणि भाषांतराचें मुख्य लक्षण मात्र त्यांजवर चांगलें लागू पडतें. कवितेच्या संबंधानें हा गुण ह्मणजे कल्पकपणा, व त्याच्याच बळानें, कांहीं सामान्य गोष्टी आधारभूत घेऊन, नवीन सृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य. रघुकिरातादि संस्कृतांतील काव्यांस रामायणभारतादिकांचाच आधार आहे, तरी त्यांत, त्यांच्या कर्त्यांनीं, नवे नवे प्रसंग आणून, व भाषणाचे, वर्णनाचे वगैरे चमत्कार घालून, कशी करामत दाखविली आहे ती सर्वांस ठाऊकच आहे. महाराष्ट्र कवींच्या ह्या कृतींत तसें कांहींच दिसून येत नाहीं, हें सांगावयास नकोच. जुन्या झाडाच्या खोडावर नवे धुमारे फुटल्यानें नवीन झाड लावलें असें ह्मणतां येत नाहीं; जुन्या वाड्यांतच, कोठें दारें पाड, कोठें खिडक्या घाल, कोठें रंग लाव असें केल्यानें, तो नवा बांधला असें होत नाहीं; किंवा जुना दागिना मोडून नवा घडविल्यानें नवें सोनें घरांत आलें असें मानतां येत नाहीं हें उघड आहे. तर हीच गोष्ट मराठी काव्यग्रंथांची आहे. मराठी कवींनीं जें कांहीं केलें तें एवढेंच कीं संस्कृत ग्रंथांतलाच अर्थ, क्वचित् विस्तारानें, पण बहुश: अटपशीरपणें व ठाकीठिकीनें, मराठींत आणला; यापलीकडे काय आहे? आतां, जुन्या खोडाला फुटलेले जोरदार धुमारे पाहून डोळ्यांना मोठा आनंद होईल; वाड्याची दुरुस्ती झाल्यानें तो राहण्याला अधिक सुखावह होईल; व दागिनाहि नवा घडविल्यानें अंगावर घालण्या लायक होऊन मनाची हौस पुरेल; त्याचप्रमाणें मराठी कवींचे हे ग्रंथहि

वाचकांस आनंददायक, ग्रंथकर्त्यास हितावह, व भाषेला भूषणप्रद असे झाले आहेत हें निःसंशय आहे.

याशिवाय महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांत जो आणखी एक विशेष प्रकार आढळतो, त्याकडेहि या ठिकाणीं लक्ष्य देण्यासारखें आहे. कारण, या विशेष प्रकारावरूनच हे मराठी ग्रंथ भाषांतरें होत असें सिद्ध होतें. हा प्रकार असा, कीं महाराष्ट्र कवींनीं भाषांतरें करतांना मूळ ग्रंथांच्या भाषेंत जरी हवे तसे फेरफार केले, तरी त्या त्या ग्रंथांच्या कांठ्याला त्यांनीं हात लावला नाहीं. आणि हेंच भाषांतराचें उत्कृष्ठ लक्षण होय. ह्मणजे एकंदर ग्रंथाची रचनाच केवळ नव्हे, पण त्यांतील मुख्य कथानकें व उपकथानकें, त्यांतील स्थलें व पात्रें ह्मणजे बोलणारीं चालणारीं माणसें, त्यांचीं नांवें, त्यांचीं विशेषणें, त्यांचीं वर्णनें, कोण कोणाशीं बोलत आहे, केव्हां व कोठें बोलत आहे—हे सर्व विशेष प्रकार जसे मूळांत आहेत तसेच्या तसेच त्यांनीं मराठींतहि कायम ठेविले आहेत. भागवतांत किंवा महाभारतांत, जर जनमेजय राजा वैशंपायनाला, किंवा धृतराष्ट्र संजयादिकांला पुसत आहे, तर तेंच अखंड कडवें मराठींतही कायम ठेवून, पंत आपल्या भारताच्या आरंभीं ह्मणतात:—

जनमेजय नृपति पुसे वैशंपायन कथी सविस्तर तें।

व पंडितही 'भीष्मप्रतिज्ञे'त ह्मणतात:—

श्रोत्रयुग्म परिपूत कराया
सावधान, जनमेजय राया।

हाच प्रकार पुढेंहि सर्वत्र आढळतो. हें तर काय?—पण कथेचा ओघ चालला असतांहि, मध्येंच,

काचावला वीर पुढें धसेना
झाली, नृपा, सर्व भयांधसेना।

अशी अर्जुनाची रणस्थिति दर्शविण्यांत, केवळ पादपूरणार्थ, 'हे नृपा' असें पृच्छकाला संबोधून बोलण्याची ह्या कवींची रीत आहे. ही जी त्यांची रीत, तिचा आदर करण्यांत, एका दृष्टीनें त्यांजकडे

उणेपणा येतो असें वाटतें; व एका दृष्टीनें ते प्रशंसेस पात्र होत असेंहि ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. उणेपणा मिळून इतकाच, कीं भाषांतर करतांना, जसे दुसरे कित्येक फेरफार केले तसे याही प्रकरणांत करून, त्यांनीं आपल्या ग्रंथांस स्वतंत्र ग्रंथांची योग्यता आणिली नाहीं. परंतु त्याच वेळीं हाहि विचार मनांत येतो, कीं या नसत्या घमेंडीच्या भरीस ते पडले नाहींत हें त्यांनीं मोठें शहाणपण केलें ह्मणावयाचें. कारण, यामुळेंच मूळ ग्रंथांची छाया त्यांच्या भाषांतरांत पूर्णपणें प्रगट झाली; व तीं भाषांतरें, मूळाप्रमाणेंच, रसाचीं केवळ आगरें होऊन, सर्वांच्या अक्षय्य प्रीतीस पात्र होऊन बसलीं. असें न करितां, मूळच्या आधारानें स्वतंत्र ग्रंथ बनविण्याची हाव त्यांनीं धरली असती, तर अलीकडे जशी शेक्स्पियर कवीच्या कित्येक नाटकांच्या रूपांतरांची धेडगुजरी तऱ्हा झाली आहे—ह्मणजे पात्रांचीं व स्थळांचीं नांवें ऐकावीं तों इकडलीं, तसेच वेष पहावे तों इकडले, आणि संभाषणाची पद्धत, पात्रांची वागणूक, त्यांचीं वर्णनें वगैरे पहावीं तों ओळख पटूं नये—अशीच तऱ्हा त्यांच्याहि ग्रंथांची होऊन, ते उपहासास मात्र पात्र झाले असते. तसें झालें नाहीं अथवा त्यांनीं होऊं दिलें नाहीं, हें त्यांच्या रसिकतेचें व मार्मिकपणाचें दर्शक असून, ह्यासाठीं त्यांची जेवढी प्रशंसा करावी तेवढी थोडीच, असें वाटूं लागतें.

इंग्रजी अमलाच्या आधींच्या मराठी भाषांतरात्मक ग्रंथांचें स्वरूप ह्याप्रमाणें आहे. आतां, इंग्रजी झाल्यापासूनच्या ग्रंथांचें स्वरूप कसें आहे तें पहावयाचें. त्यांतहि इंग्रजींतून मराठींत झालेल्या भाषांतरांचाच विचार येथें मुख्यत्वें करावयाचा आहे. ह्या भाषांतरांचे साधारणतः तीन वर्ग करतां येतील. पहिला वर्ग शब्दास शब्द भाषांतराचा; यास 'हायकोर्टी भाषांतर' ह्मणून नांव दिल्यास चूक होणार नाहीं. या रीतीनें भाषांतर करावयाचें म्हणजे इंग्रजी शब्दाला मराठी शब्द व मूळ वाक्याला प्रतिवाक्य ठेवून दिलें ह्मणजे झालें. त्यांच्या मागें अर्थ व रस येतील तर येवोत बिचारे! भाषांतरकाराला कांहीं त्याची पर्वा नाहीं. याचे नमुने ह्मटले ह्मणजे सरकारी कायद्यांचीं व ठरावांचीं,

तशींच कित्येक शास्त्रीय इतिहास वगैरें पुस्तकांचीं भाषांतरें. दुसरा वर्ग याच्या उलट; ह्मणजे इंग्रजी ग्रंथांचा आधार घेऊन आपल्या इकडील रीतिभातीस व विचारसरणीस जुळतील असे ग्रंथ तयार करणें. यांना भाषांतरें ह्मणण्यापेक्षां 'रूपांतरें' ह्मणणेंच जास्त शोभेल. कोणा लाहि उत्कृष्ट रूपांतर साधलें, तर भाषेंत नवा ग्रंथ रचल्याचेंच सरासरी श्रेय त्यास प्राप्त झालें असें ह्मणतां येईल. परंतु इतकें उत्कृष्ट रूपांतर साधणें हेंच मोठें कठीण. आणि तें बरोबर न साधलें ह्मणजे रूपांतरात्मक ग्रंथाचा असा विचका होतो कीं कांहीं पुसूं नये! परभाषेंतले अपरिचित विचार, रीतीभाती वगैरे तऱ्हांच्या ऐवजीं आपल्या इकडील विचार व रीतीभाती घुसडून देण्याच्या खटपटींत, मूळांतल्या तऱ्हा, कांहीं निरुपायास्तव व कांहीं अनवधानास्तव, तशाच राहून जातात, व तेणेंकरून, धड भाषांतर नव्हे व धड स्वतंत्र ग्रंथ नव्हे, अशी त्या ग्रंथाची गत होते. रूपांतरात्मक ग्रंथांत मूळ ग्रंथाची ओळख बहुधा राहत नाहीं, व राहूं नये हेंच उत्तम. कारण मूळ ग्रंथाची खरी चर्या फिरून, त्याला विकृत रूप प्राप्त झालेलें असतें. ग्रीक कवि होमर याच्या प्रसिद्ध 'ईलियड' काव्याचें पोपकवीनें इंग्रजींत भाषांतर केलें आहे; तें फार चुकलें आहे असें दाखवित असतां, दोष काढण्यांत पटाईत ग्रंथकार जो मेकाले तो भाषांतरकाराचा उपहास करून ह्मणतो:-"बा होमर कवे! तुझ्या कृतीचें हें भाषांतर नव्हे, पण पतंगाप्रमाणें स्वतःतुझेंच हें रूपांतर होय!" सारांश कित्येकांच्या मतें ग्रंथांचें रूपांतर हें कांहीं भाषांतर नव्हे. ज्या इंग्रजी भाषेनें ग्रीक लोकांच्या पुराणांतल्या कथा आपल्याशा केल्या आहेत, त्या भाषेंत ग्रीक भाषेंतून झालेल्या भाषांतराची जर ही गोष्ट, तर मराठीपासून अत्यंत विसदृश अशा इंग्रजींतून रूपांतरपद्धतीनें मराठींत आलेल्या ग्रंथांत मूळाची छाया कितीशी दिसण्यासारखी आहे, याची कल्पना सहज करतां येईल. प्रत्यक्ष शेक्स्पियर कवीच्याच कित्येक नाटकांचीं रूपांतरें मराठींत झालेलीं आहेत, तीं त्यांच्या कर्त्यांनीं एवढी मेहनत खर्चून केलीं असतांनाहि, किती विसदृश झालीं आहेत, हें सर्वांस ठाऊकच आहे. यास्तव,

रूपांतरें न करतां, होईल तोंवर मूळास धरून भाषांतरेंच करावीं, असा कित्येकांचा फार आग्रह आहे; आणि तो गैर आहे असेंहि ह्मणवत नाहीं. आतां खरें पाहिलें असतां, परभाषेंतील ग्रंथ देशभाषेंत आणण्याच्या ज्या ह्या दोन पद्धति, ह्मणजे भाषांतराची व रूपांतराची, त्या दोहोंतहि कांहीं तोटे आहेत व कांहीं फायदे आहेत. शब्दास शब्द भाषांतर केलें ह्मणजे मूळाशीं जुळतें खरें, परंतु समजायाला फार कठिण जातें; मूळांतला अर्थ सर्व आणलेलेला असतो खरा, पण मर्म बरोबर न उतरल्यामुळें तो मनावर ठसत नाहीं; अलंकाराच्या व भाषणाच्या खुब्या साधल्या असतात खऱ्या, पण रसोत्पत्ति व्हावी तशी न होतां, भाषांतर वाचायाला गोड लागत नाहीं. रूपांतर सर्व गोष्टींनीं याच्या उलट आहे. ह्मणजे तें समजायाला सुलभ पडतें खरें, पण मूळाशीं त्याचा फारच थोडा संबंध राहतो; त्यांत मर्म आणलें असतें खरें, पण सर्व अर्थ बरोबर येत नाहीं; आणि रसोत्पत्ति साधारणपणें साधण्याचा यत्न असतो खरा; तरी मूळांतलें स्वारस्य बिलकूल रहात नाहीं; एवढेंच नाहीं, पण मूळांत फाजील व अविचाराच्या ढवळाढवळीनें, रसाच्या ऐवजीं बेंगरूळपणाला व असंबद्धसंयोगाला स्थळ मिळून, हास्यरसाचें मात्र उत्कृष्ट उद्भावन होतें! याप्रमाणें शद्बास शब्द भाषांतर घ्या किंवा रूपांतर घ्या—त्यावर कोणतें ना कोणतें तरी दूषण येण्याचा संभव आहेच आहे. यास्तव परभाषेंतील ग्रंथ देशभाषेंत आणावयाची आणखी एक पद्धत अस्तित्वांत आली आहे. हा भाषांतराचा तिसरा वर्ग. यांत शब्दास-शब्द भाषांतराचे व रूपांतराचे गुण साधून, त्यांतले दोष मात्र होईल तोंवर न येऊं देण्याची तजवीज केलेली आहे. ती अशी कीं मूळाचें भाषांतर तर करावयाचें, पण तें, शब्दांवर तादृश लक्ष न ठेवतां, अर्थावर धोरण ठेवून करावयाचें. असें करतांना, विस्तार करावा लागला तरी मर्म आणण्यासाठीं करावयाचा; आणि जो भाग गौण असून, मराठींत यथास्थित उतरण्यासारखा नसेल तो उतरण्याची व्यर्थ जिकीर न करतां, त्यास क्वचित् फाटा देणें योग्य वाटल्यास

फाटाहि द्यावयाचा. सारांश, अशा प्रकारचे कित्येक किरकोळ फेरफार करावे लागले ह्मणून मोठें बिघडलें असें नाहीं अशी बहुधा त्यांत समजूत असते. तथापि मुख्य गोष्ट हीं कीं मूळग्रंथाच्या घटनेंत बिलकुल ढवळा-ढवळ करावयाची नाहीं. अर्थात् स्थळांचीं व मनुष्यादिकांचीं नांवें, आंतलें कथानक, त्यांतील व्यक्तींचे परस्परसंबंध, त्यांचें स्वभाववर्णन, त्यांच्या भाषणादि व्यवहारांतल्या खुब्या वगैरे प्रकार जसे मूळांत असतील तसेंचे तसेच कायम ठेवून चालावयाचें. अशा प्रकारच्या भाषांतरास काय नांव द्यावें हा एक विचाराचा प्रश्न आहे. आजपर्यंत याला कोणी कोठें नांव दिलेलें आढळांत नाहीं. आह्मी यास ' **संहार-विक्षेप-लघुक्रिया** ' पद्धतीचें भाषांतर असें ह्मणतों. आणि मागें एके ठिकाणीं दर्शविल्याप्रमाणें वनगजाच्या लीलेशीं ह्या भाषांतर-पद्धतीचें बरेंच साम्य असल्यावरून, ह्या पद्धतीच्या भाषांतरास तीच संज्ञा दिली असतां वावगें होणार नाहीं असें वाटतें. ह्या वर्गांत मोडणाऱ्या भाषांतराचे नमुने मराठींत बरेच आहेत. जुन्या महाराष्ट्र कवींचे संस्कृत पुराणांच्या आधारानें रचलेले ग्रंथ याच वर्गांतले होत हें वर सांगितलेंच आहे. आणि अलीकडील ग्रंथकारांत कृष्णशास्त्री चिपळूणकर, रामभाऊ गुंजीकर व दुसरी कित्येक मंडळी यांचीं भाषांतरें याच वर्गाखालीं येणारीं असून सर्वमान्य आहेत, हेंहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

येथवर भाषांतरासंबंधानें जें कांहीं सांगणें होतें तें सांगितलें. त्यांत, भाषांतराची पूर्वपीठिका प्रथम सांगून, नंतर मराठींत जो थोडाथोडका ग्रंथसंग्रह आतांपर्यंत झाला आहे, त्यांतील भाषांतरात्मक ग्रंथांचें कसें काय स्वरूप आहे हें दाखविलें, व शेवटीं हा सगळा इतिहास चाळून पाहतां भाषांतराचे जे तीन वर्ग सामान्यतः पडतात, ते कसे व कोणते हेंहि सांगीतलें. या हकीगतीवरून पाहतां भाषांतर कसें असावें, उत्कृष्ट भाषांतर कोणतें, कोणतीं भाषांतरें मराठी भाषेस वंद्य होतील वगैरे प्रश्नांचा बराच उलगडा आपणास आतां करतां येईल. तो असा कीं, वर भाषांतराच्या ज्या तीन पद्धति सांगीतल्या,

त्यापैकीं पहिलीचा व दुसरीचा आदर करणें प्रसंगविशेषीं योग्य होईल— जसें, सरकारी कायदे, ठराव किंवा शास्त्रीय ग्रंथ वगैरे समजावून देतांना. पण सामान्यतः विचार करतां आणि विशेषतः काव्यें, नाटकें, कादंबऱ्या वगैरे रसात्मक ग्रंथांच्या संबधानें पाहतां तिसऱ्या पद्धतीचीं भाषांतरेंच सर्वांशीं प्रशस्त होत. हींत मूळ ग्रंथांतला विषयप्रतिपादनाचा ओघ विच्छिन्न होत नाहीं, हा मोठा लाभ आहे. अर्थात् ग्रंथकाराचा हेतु काय, त्यांतील विशेष गोष्टींचे संबंध काय वगैरे गोष्टी एकदा लक्षांत आल्यावर भाषांतर समजायाला सुलभ पडून रसोत्पत्तिहि यथास्थित होऊं शकते. शब्दास शब्द भाषांतरांत जी रूक्षता येते ती, आणि रूपांतरांतली तऱ्हा गंगाजमनी पडल्यामुळें कथौघाचा विच्छेद होऊन रसाविर्भाव व्हावा तसा होण्याला अडथळा येतो तो, ह्या दोहोंचाहि ह्या तिसऱ्या पद्धतीच्या भाषांतरांत अभाव असतो. याच गोष्टी लक्षांत घेऊन, जुन्या मराठी कवींनीं व्यासादिकांच्या कृति मराठींत आणावयाचें जेव्हां मनांत आणलें, तेव्हां त्यांनीं भाषांतराच्या तिसऱ्या पद्धतीचाच आदर केला. त्याचप्रमाणें, अलीकडील ग्रंथकारांत तरी साधें सरळ भाषांतर करण्याविषयीं ज्यांचा हात खंडा ह्मणून ख्याति, अशा कृष्णशास्त्री चिपळुणकरासारख्यांनीं ‘रासेलस’ ‘अरबी भाषेंतील गोष्टी’ वगैरे ग्रंथांचीं रूपांतरें करण्याच्या भानगडींत न पडतां, ते ग्रंथ भाषांतररूपानेंच त्यांनीं तयार केले. याच नमुन्यावर ‘राबिन्सन क्रूसो’ ‘गलिव्हराचा वृत्तांत’ वगैरे दुसरे कित्येक ग्रंथ मराठींत झाले आहेत. या ग्रंथकारांस रूपांतरें बनवितां आलीं नसतीं असें नाहीं. पण वरील अडचणींचाच विचार मनांत आल्यामुळें सध्यांचा भाषांतराचा बेत त्यांस प्रशस्त वाटला असें आह्मी समजतों. वरील ग्रंथ भाषांतररूपच आहेत, तरी त्यांची योग्यता मराठींत केवढी आहे, ते आबालवृद्धांस किती प्रिय झाले आहेत व त्यांनीं मराठी भाषेस केवढी शोभा आणली आहे, हें महाराष्ट्र भाषाभिज्ञांस विदितच आहे. तेव्हां अशीच शोभा, या भाषांतरपद्धतीनें झालेल्या ग्रंथांनीं यापुढेंहि येईल असें ह्मटल्यास चूक होणार नाहीं.

भाषांतरासंबंधानें आमचे विचार वर दर्शविले असे आहेत. त्यांवरून शेक्सपियर कवीच्या नाटकांच्या आमच्या ह्या भाषांतरांत वरील 'संहार-विक्षेप–लघु–क्रिये' चा ह्मणजे तिसऱ्या पद्धतीचाच आश्रय आह्मीं केला आहे हें सांगावयास नकोच. 'आपल्या इकडील रीतरिवाजास साजेल अशी फिरवाफिरव करून व नांवें वगैरे पालटून रूपांतरें तुह्मी कराल तर बरें ' अशी इच्छा आह्मास पुष्कळांनीं दर्शविली होती व आरंभीं आह्मसहि तसेंच वाटत होतें. परंतु विचारा–अंतीं तसें करणें योग्य वाटलें नाहीं. रूपांतराविषयीं लोकांचा विशेश कटाक्ष दिसत असतां, आह्मी भाषांतराचाच बेत कां कायम केला याचीं कांहीं कारणें प्रसिद्धिपत्रकांत दिलींच आहेत. तथापि त्यांशिवाय आणखी जीं कित्येक कारणें आहेत व जीं सविस्तर लिहिल्यावांचून एकाएकीं कळण्यासारखीं नसल्यामुळें प्रसिद्धिपत्रकांत घालतां आलीं नाहींत, त्यांचा विचार, वर भाषांतराविषयीं विवेचन केलें आहे, त्यांत आला आहे. या सर्व विचारांवरून आमचा ग्रह वरीलप्रमाणें झाला आहे; आणि भाषांतरापेक्षां रूपांतरेंच बरीं असें ज्यांच्या मनानें घेतलें असेल, त्यांचाहि ग्रह, वरील लेख वाचून, असाच होईल असा आह्मास भरंवसा आहे. निदान, आह्मास योग्य वाटले ते विचार आह्मी प्रांजलपणें सुज्ञ वाचकांपुढें ठेवले आहेत. त्यांत जर कोठें कांहीं चूक आहे असें दिसून येईल आणि ती कोणी आस्थेनें आह्मास कळविण्याची तसदी घेतील, तर आह्मी त्यांचे मोठे आभार मानूं, व त्यांच्या लेखाचा अवश्य विचार करूं. इतकें कळवून, संकल्पाप्रमाणें भाषांतर करतांना येणाऱ्या शंकास्थानांकडे व अडचणींकडे वळतों.

भाषांतराची जी पद्धत आह्मीं स्वीकारली आहे तीस अनुसरून, ह्या भाषांतरांत पात्रांचीं व स्थलादिकांचीं नांवें मूळ इंग्रजींत होतीं तींच ठेवलीं आहेत; इतकेंच केवळ नाहीं, तर त्यांचे संबंध, नाटकाची घटना व एकंदर परिस्थिति वगैरे सर्व प्रकारहि मूळांतलेच कायम आहेत. तथापि संभाषणाचे प्रकार व एकंदर भाषासरणी मराठीच्या वळणावर नेण्याचा यत्न यांत केला आहे. यासाठीं, ज्यांना

विशेष प्राधान्य नाहीं अशा कांहीं गोष्टी, कांहीं विशेष प्रचार, ग्रीक पुराणांतील कथादिकांचे उल्लेख वगैरे, यांस येथें फाटा मिळाला आहे, व कोठें कोठें भाषणौघपोषणार्थ एखादा शब्द किंवा कल्पना पदरचीही भरीस घातली आहे. मूळांत जेथें गाणीं आहेत तेथें यांतहि पदें वगैरे गाणींच घातलीं असून, त्यांतला अर्थ कथानकाच्या प्रवाहास धक्का न लागे अशा रीतीनें गोळाबेरजेनें आणलेला आहे. तेव्हां, अशा रीतीनें पदरची भर घालणें योग्य आहे किं नाहीं, अशी पहिलीच शंका येथें उत्पन्न होते. त्यास आह्मी असें ह्मणतों कीं योग्य आहे. कारण असें जर न केलें तर संभाषणांत रूक्षता येऊन, नाटकप्रयोगांत नवशिकीं पोरें जसें पाठ केलेलें बोलतात तसें तें संभाषण पोरकट व नीरस लागेल. यास्तव मराठी प्रचाराचे पोषक शब्द भाषांतरांत अवश्य घातले पाहिजेत, अशी आमची समजूत आहे. अशा प्रकारचें एक उदाहरण नमुन्याकरतां येथें देतों. फर्डिनांड मिरांडेला तिचें नांव विचारतो, तें तिनें सांगितल्यावर,

FERDINAND :—Admired Miranda! Indeed, the top of admiration, &c.

याचें भाषांतर आह्मीं केलें आहे तें —

फर्डिनान्ड—मिरांडे !—वा: किती गोड नांव ! यापुढें मरंद सुद्धां कमी गोड ! हे सुंदरि ! तुझी जेवढी स्तुति करावी तेवढी थोडीच.*

येथें मरंदाच्या कल्पनेस मूळांत कितीसा आधार आहे तें मर्मज्ञांस सांगणें नलगे. आतां अशा या फेरफारामुळें कित्येकांस शंका येऊन त्यांनीं आह्मास असें विचारलें व कित्येक पुढेंहि विचारतील कीं हें तुमचें काय भाषांतर आहे किं रूपांतर आहे. † याला उत्तर हेंच कीं

* तुफान, पृष्ठ ७४ पहा.

† ही शंका केवळ सांगोसांगीची नव्हे. इंदुप्रकाशांत आमच्या ह्या उद्योगा विषयीं अभिप्राय प्रगट झाला आहे, त्यांत लेखकानें खरोखरीच अशी शंका घेऊन येणें प्रमाणें उद्गार काढले आहेत:—"धी टेम्पेस्ट नाटकाचें भाषांतर ह्मणा किं रूपांतर ह्मणा, छापून तयार होत आलें आहे. इ०इ०"

इंदुप्रकाश, ता० १६ एप्रील १९०३.

हें रूपांत्तर नव्हे, भाषांतरच होय. कारण, यांत कित्येक किरकोळ फेरफार जरी केले आहेत, तरी एकंदर घटनेस व भाषणाच्या ओघास विसंगतपणा येत नाहीं. आणि हीच भाषांतराची मुख्य खूण होय, हें, भाषांतराविषयीं वर जें विवेचन केलें आहे, त्यावरून स्पष्टच आहे.

तिसरें शंकास्थान वरच्या दोहोंहून अंमळ वेगळें आहे; तें असें. प्रास्पेरो यानें फर्डिनांड याला धमकावून, 'थांब तुझी सर्व शक्ति हरण करून तुझ्या हातांतलें शस्त्र खालीं पाडतों' असें ह्मटलें असतां, गहिंवरून,

MIRANDA :—Beseech you, father.

याचें रूपांतर आह्मी करतों तें:—

मिरान्डा—नका हो बाबा, नका! मी पदर पसरतें!

आणि आह्मीहि याचें भाषांतर असेंच केलें होतें. पण तें नंतर फिरविलें आणि आतां फिरून पहिल्यासारखेंच करतों. तेव्हां, हा काय घोटाळा आहे, याचा उलगडा करण्यापूर्वी येथें कांहीं हकीगत सांगणें अवश्य आहे. वर जें भाषांतर दिलें आहे तें ओघाप्रमाणें आह्मी करून तर गेलों; पण पुढें लौकरच कित्येक मार्मिक मित्रांस तें वाचावयास दिलें असतां, त्यांच्यांत एकजण अंमळ विशेष चाणाक्ष होते, त्यांनीं यावर शंका काढली. ते ह्मणाले—"काय हो, तुमची मिरांडा इंग्रज स्त्री आहे व ती गाऊन घालते, नव्हेका? मग तिला तुह्मीं पदर पसरावयाला लाविलें आहे हें कसें? तिच्या गवनाला हिंदुलोकांचा पदर कधीं लागला?" हे शब्द ऐकतांच आह्मी एकदम चकित झालों, आणि कांहीं वेळ हो ना करून, अखेरीस आमचें भाषांतर चुकलें असें कबूल करून, पदर पसरल्याची चूक आह्मास पदरांत घ्यावी लागली. कारण, ज्याला अलंकारशास्त्राच्या परिभाषेनें असंबद्धसंयोग दोष ह्मणतात, तसा हा प्रकार झाला. लगेच आह्मीं आपलें भाषांतर बदललें आणि सध्यां आहे तसें केलें. झालें हें सर्व ठीकच झालें; पण चुटपुट लागून, गोष्ट मनांत घोळत

राहिली. एकदा वाटे 'पदर पसरतें' या पदांनीं जसें हें मिरांडेचें भाषण खुलतें तसें 'विनवितें' 'प्रार्थना करतें' इत्यादि शेकडों तऱ्हांपैकीं एकीनेंहि खुलत नाहीं. पण मात्क्यान् असाहि विचार मनांत येई कीं असा भलतीकडेच अर्थ नेण्याला आधार काय? अडचण तर खरी, पण ती दूर कशी करावी हा प्रश्न डोळ्यांसमोर उभा राहूं लागला. होतां होतां, त्याचें समाधान झालें, व मूळारंभीं भाषांतर आह्मीं केलें होतें तेंच बरोबर असें सिद्ध झालें! कसें, पहा:—जेव्हां कोणी पदर पसरतो तेव्हां त्यांत त्याचा हेतु काय असतो बरें?—अर्थात्, त्याला कांहीं मागायाचें असतें, व मागतांना स्वतांचें क्षुद्रत्व व दात्याचें श्रेष्ठत्व व्यक्त करावयाचें असतें. पदर पसरण्याच्या क्रियेकडे तादृश लक्ष नसतें हें उघड आहे. मग प्रार्थना करण्यांत तरी हाच अर्थ इष्ट नाहीं काय? जर आहे, तर वरिल स्थितींतच मिरान्डेनें 'पदर पसरतें' असें ह्मटल्यास काय चिंता आहे? तिनें केवळ पदरच पसरायाला पाहिजे असें नाहीं. तिला पदर असो किंवा नसो; यावर लक्ष नाहीं. हें सामान्य रीतीनें बोलणें झालें. हेंच आलंकारिकांच्या परिभाषेनें बोलावयाचें तर असें बोलतां येईल, कीं पदर पसरणें हा वाच्यार्थ बाधित झाल्यामुळें नम्रतापूर्वक प्रार्थना हा तत्संबद्ध लाक्षणिक अर्थ, लक्षणाव्यापारद्वारा, सिद्ध झाला. याच मासल्याचीं प्रचारांतलीं उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे 'गंगायां घोषः' 'मी तुझ्या घरावरून गेलों' इ॰. याच लक्षणाव्यापारानें, कित्येक भाषणप्रकार, ज्यांला इंग्रजींत idioms ह्मणतात, ते प्रचारांत आले आहेत. 'रोमियो आणि जूलियट' या नाटकाच्या आरंभींचें वाक्य अशाच प्रकारचें आहे. तें असें:- We will not carry coals, ह्मणजे, आह्मी कोळसेविक्ये होणार नाहीं, अर्थात् कोळसेवाले कलकलाट करून भांडतात तसे भांडणार नाहीं असा रूढार्थ इष्ट असतां, हें वाक्य उच्चारणाराला, तूं कोळसेवाला केव्हां झालास ह्मणून कोणी विचारील काय? याच नियमानें, 'पदर पसरतें' असें बोलणारीला सुद्धां, तुझा पदर

कोठें आहे ह्मणून प्रश्न करण्याचें प्रयोजन नाहीं. यास्तव, सध्यांच्या आवृत्तींत जरी 'मी पायां पडतें' असें वेगळेंच वाक्य घातलें आहे, तरी त्या ठिकाणीं 'मी पदर पसरतें' हेंच उत्कृष्ट वाक्य वाचावें अशी वाचकांस आमची शिफारस आहे.*

पुढील दोन स्थळेंहि वरील नमुन्याचींच आहेत. शेवटीं सर्व संकटांचें निवारण होऊन, सर्वांच्या गांठी पडल्यावर, परमेश्वरानें फर्डिनान्ड व मिरांडा या जोडप्यावर निरंतर कृपादृष्टि ठेवावी व त्यांच्या मस्तकांवर मंगलमुकुट आणून घालावे असें गान्झेलोनें ह्मटलें असतां,

ALONZO—I say, Amen!

अलान्झो—तुझ्या तोंडांत साखर पडो, इतकेंच यावर मी ह्मणतों.

'तथास्तु' ह्या शब्दांहून वरील वाक्य, भाषणाच्या ओघानेंच, कसें येतें † हें मर्मज्ञांस सांगणें नलगे.

आणखी अशींच कित्येक अडचणीचीं स्थळें सांगतां येतील; पण ही प्रस्तावना बरीच लांबली असल्यामुळें, तूर्त येथेंच पुरे करतों. वर जीं अडचणीचीं ह्मणून स्थळें दाखविलीं, त्यांतल्या अडचणी आमच्या मतीप्रमाणें आह्मीं कशा दूर केल्या व कसें भाषांतर केलें हें येथें दाखविलें आहे. याच अडचणी दुसरे कोणाला दुसरे रीतीनें दूर करून, यासारखें किंबहुना याहूनहि सुरेख भाषांतर करतां येणार नाहीं असें नाहीं. परंतु अशा चर्चेपासून भाषांतर करूं इच्छिणारांना कांहीं मार्ग दाखविलासें होऊन, मनोरंजनहि होईल, असें समजून, आमचा अनुभव आह्मीं येथें प्रांजलपणें दाखल केला आहे. हा क्रम वाचकांस कितपत आवडतो हें पाहून, पुढें नाटकपात्रांची भाषा कशी व कोणती घालावी याविषयीं, व इंग्रजी मूळ वाक्य निषेधपर किंवा विधिपर असतांना भाषांतरांत तेंच अनुक्रमें विधिपर किंवा निषेधपर कसें व केव्हां करावें लागतें याविषयीं, सवडीप्रमाणें, चर्चा करण्याचा आमचा मनोदय आहे, एवढें जातां जातां येथें कळवून ठेवतों.

---

* हें वाक्य पृष्ठ ३५ वर आहे.

† पृष्ठ १३४ पहा.

आतां, शब्दास-शब्द भाषांतर केलें तर कसें होतें व 'संहार-विक्षेप-लघुक्रिया' पद्धतीनें केलें तर कसें होतें, हें पाहण्यासारखें आहे; व हें पाहण्याची इच्छा कित्येकांस होईल. अनायासें दोनहि पद्धतीचीं भाषांतरें सध्यां वाचकांसमोर आहेत; तेव्हां दोहोंत काय अंतर आहे हें त्यांवरून कळेल. आमचें भाषांतर 'संहार-विक्षेप-लघुक्रिया' पद्धतीचें असून, 'टेम्पेस्ट' नाटकाचेंच रा. कीर्तने यांचें भाषांतर पहिल्या पद्धतीचें आहे. "हें सरासरी अर्थ जमेस धरून केलेलें नाहीं; परंतु मूळ अर्थ साधेल तितका शब्दशः मराठींत पद्धतशीर आणण्याचा प्रयत्न त्यांत केला आहे" असें तेच स्वतः प्रस्तावनेंत सांगतात. ह्या भाषांतरांतूनच हा पुढील उतारा आहे. प्रसंग स्पष्टच आहे, कीं तुफानांत सांपडलेल्या बुडत्या गलबताकडे पाहून एका निष्पाप, निर्मळ अंतःकरणाच्या मुलीच्या मनांत उत्पन्न झालेले विचार ती व्यक्त करीत आहे; ते असे :—

" **मिरांदा**—बाबा, जर हें तुफान तुह्मीं आपल्या मंत्रविद्येनें उपस्थित केलें असेल, तर या उचंबळलेल्या लाटांस शांत करा. आकाश असें धुंद होऊन गेलें आहे कीं आपल्या मुखांतून सुस्काऱ्याबरोबर वाईट धुराचे लोटचे लोट जसें काय तें टाकण्याचेच तयारींत आहे; परंतु या लाटा अशा उंच जाताहेत कीं त्या गगनाचे मुख मंडळावर चढून गालांपर्यंत पोंचून तेथून त्या धुराचें कारण जो अग्नि त्यास जशा कांहीं दूरच करिताहेत! बाबा, ज्यांस आज मीं दुःखांत पडून बुडतांनां पाहिलें, त्यांच्या त्या वेदना जशा मलाच सोसाव्या लागल्या असें दुःख झालें आहे. एक सुंदर जहाज—त्यामध्यें खरोखर कोणी ईश्वराचा लाल असावा—तें धाडकर आपटून नाश पावलें! हरहर! त्यावेळीं जो जहाजावर आक्रांत झाला त्याची धडकी माझ्या काळिजांत भरली आहे. गरीब बिच्यारे प्राणी, ते सर्व मेले! मजमध्यें जर कांहीं दैविक शक्ति असती तर या समुद्रांत असें सुंदर जहाज बुडून त्यामधील सर्व प्राण्यांनीं मरावें, त्यापेक्षां पूर्वींच या मेल्या समुद्रासच रसातळास नेऊन घातलें असतें!"

हेंच आमचें भाषांतर पुढें आलें असल्यामुळें येथें देण्याचें कारण नाहीं. तें वाचकांस पृष्ठ ६ येथें पहावयास मिळेल.

शेक्स्पियर कवीच्या टेम्पेस्ट नाटकासंबंधानें मराठींत आजमितीपर्यंत कोणी काय लिहिलें आहे, तें आतां सांगतों. आमचे पाहण्यांत असे लेख चार आले आहेत ; व आमचें प्रकृत भाषांतर हा पांचवा. वडिलमान, 'ग्रांट्डफ कृत मराठ्यांच्या बखरीवर टीका' या निबंधाचे कर्ते रा० रा० नीलकंठ जनार्दन कीर्तने यांचें 'टेम्पेस्ट नाटकाचें मराठी भाषांतर' या पुस्तकास आहे. हें पुस्तक सन १८७५ रांत एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यांत छापिलें आहे. त्याचा आकार द्वादशपत्री डेमी ११८ पृष्ठांचा असून, किंमत एक रुपया आहे. यांत मूळाचें शब्दशः भाषांतर दिलें आहे. दुसरें पुस्तक 'तुफान' या नांवाचें, कविताबद्ध असून, सन १८९२ वांत छापलें आहे. हें रा. रा. रामराव बाळकृष्ण कीर्तिकर यांनीं 'लँब्स् टेल्स' याच्या आधारें रचलें असून, सर्व कथानक २०० आर्यांत आणलें आहे. किंमत ८१ आहे. रा. रामराव हे होतकरू आधुनिक कवींपैकीं एक असून, यांचें नवीन धरतीवरचें 'संगीत शाकुंतल' हल्लीं रंगभूमीवर आलें आहे, हें निदान मुंबईकरांस तरी माहितच आहे. आणखी दुसरे दोन लेख 'निबंधमाला' व 'विविधज्ञानविस्तार' यांत आले असून, कीर्तने यांच्या वर ह्मटलेल्या 'टेम्पेस्ट' नाटकाच्या भाषांतरावर टीकारूप आहेत. या दोनही लेखांत सदर भाषांतराची प्रशंसा करून असें ह्मटलें आहे—"आथेल्लो नाटकाच्या (महादेवशास्त्री कोल्हटकर-कृत भाषांतराच्या) जोडीला यास बसविण्यास आह्माला कांहीं हरकत दिसत नाहीं. दोहोंचीहि योग्यता भाषांतर व एरवीं (मनोरंजनार्थ) वाचण्याचा ग्रंथ या दोहोंहि संबंधानें मोठी आहे. *" याचप्रमाणें—" शेक्स्पियर कवीनें केलेल्या नाटकासारख्या दुर्बोध ग्रंथाचें भाषांतर करणें फार कठिण असतां, कीर्तने यांनीं हें भाषांतर चांगलें ह्मणण्यासारखें केलें, यासाठीं ते

* 'टेम्पेस्ट नाटका'च्या भाषांतरावर अभिप्राय—निबंधमाला, अंक २२, आक्टोबर सन १८७५.

स्तुतीस पात्र आहेत.* " अशा ह्या नांवाजलेल्या भाषांतराच्या बरोबरीला तर राहोच, पण जवळच्या पंक्तीला बसण्याची आमच्या भाषांतराला योग्यता आहे एवढा मान ह्याला मिळून, लोकमनोरंजन करण्याला हें अंशतः समर्थ झालें, तरी आमच्या शक्तीच्या मानानें पुष्कळ झालें असें मानतां येईल. पण ह्या संबंधानें आह्मीं कांहींहि ह्मटलें तरी तें बरोबर होणार नाहीं. रा. कीर्तने यांचें व प्रस्तुत आमचें अशीं दोनहि भाषांतरें सुज्ञ वाचकांसमोर आतां आहेतच; तेव्हां ह्या बाबतींत निर्णय करण्याचें काम त्यांचें आहे, तें त्यांजकडेसच सोंपवावें हें उत्तम.

या पुस्तकांत अर्थसादृश्याचीं कांहीं स्थळें दर्शविलीं आहेत. तशींच, पुस्तक छापून झाल्यावर, जीं आणखी अवलोकनांत आलीं तीं येथें देतों. पृष्ठ १२ येथें टिपेंत शेक्स्पियर कवीच्या उद्गाराशीं समानार्थक असा वामनचरित्रांतला एक उतारा दिला आहे; तसाच हा दुसरा मोरोपंताच्या कवितेंतला:—

> प्राणा मुकेल इच्छुनि सिंहीचे गर्जहि सबहुमान मुके ।
> कां न मुके कोल्हा ? कां छी ह्मणतिल त्या जनाधमा न मुके ? ॥
>
> विराटपर्व.

ह्मणजे, "सिंहीचें प्रेम इच्छिल्यास हत्तीहि प्राणास मुकेल, तसा कीचक मुकला; सैरंध्रीची प्राप्ति इच्छिणाऱ्या अशा जनाधमाला, मुके सुद्धां, वाचा फुटून, छी ह्मणतील; न ह्मणतील असें कसें होईल ?" पंतांच्या वाग्वधूनें, ९९ वाव्या पृष्ठांतल्या उताऱ्यांतल्याप्रमाणेंच, येथेंहि कांहीं अचाट भरारी मारली आहे असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

पृष्ठ १२६ येथें एरिलाच्या भाषणाशीं समानार्थक असा महावीरचरितांतला एक उतारा दिला आहे; तसाच हा दुसरा पंतांच्या कवितेंतला:—

> अदहदजभवप्रहितोऽनन्तबलोऽरिपुरमाशुगः स हरिः ।
> अयमपि तथैव दूतः पश्यत पीतांबरश्रियाऽऽश्लिष्टः ॥
>
> आर्यामुक्तामाला. ८२.

---

* 'टेम्पेस्ट नाटका'च्या भाषांतरावर अभिप्राय—विविधज्ञानविस्तार वर्ष ८, अंक ५. मे, सन १८७६.

अथार्त्, भवानें ह्म० शंकरानें सोडलेल्या हरिरूप बाणानें जसें त्वरेनें जाऊन अरिपुर जाळलें, तसें या हरीनें ह्म० मारुतीनें त्वरेनें जाऊन लंका जाळली; अर्थात् मारुतीला या त्वरेस्तव पीतांबरत्व (विष्णुत्व पक्षें अंबर पिऊन टाकल्याचें श्रेय) प्राप्त झालें!

त्वरा वर्णन करावयाची ही एक तऱ्हा झाली. दुसरी एक मोरोपंत कवीची तऱ्हा आहे, तीहि अशीच विलक्षण आहे; तिची आठवण या ठिकाणीं, झाल्यावांचून राहणार नाहीं. ती अशी:—

> धर्मानुमतें स्मरतां, याया गुरुदास्यपुण्य, जनकानें।
> ऐकें घरीं घ-टोत्कच नमनीं तों मात्र पुण्यजन कानें॥

ही कोणाला केवळ अतिशयोक्ति वाटेल; पण आपला नेहमींचा भाषणप्रकार असाच आहे. पहा, 'मी ये ह्मटलें नाहीं तोंच हा हजर; किती नोकर चपळ आहे हो हा!' तसेंच 'तुमची आज्ञा झाली नाहीं तों सर्व तयारी आहे!' इ०

वर असंबद्धसंयोगदोषासंबंधानें लिहितांना, एक गोष्ट सांगावयाची राहून गेली, ती येथें सांगतों. "नंदनवनांतील ओकवृक्ष" असे शब्द कीर्तने यांणीं आपले भाषांतरांत योजले आहेत, व आह्मींहि योजले आहेत. परंतु रा. गुंजीकर या संबंधानें लिहितात--"येथें असंबद्धसंयोग झाला आहे. ....आजवर आह्मीं नंदनवनांत ओकवृक्ष असल्याचें कधीं ऐकलें नव्हतें.*" आणि खरेंच, नंदनवनांत कोणकोणते वृक्ष आहेत त्यांची एक यादी अमरादि कोशग्रंथांत दिलेली आहे, तींत ओकवृक्षाचें नांव नाहीं हें प्रसिद्धच आहे. तथापि यावर आह्मी इतकेंच विचारतों कीं, या यादींत जसे अमुक वृक्ष आहेत ह्मणून ह्मटलें आहे, तसे अमुक नाहींत असें तरी कोठें ह्मटलें आहे? असें जोंवर ह्मटलेलें नाहीं व अवस्तुकथनाचा दोष जोंवर घडत नाहीं, तोंवर असे प्रयोग दोषास्पद होत असें आह्मास

---

* 'टेम्पेस्ट' नाटकाच्या भाषांतरावर अभिप्राय—विविधज्ञानविस्तार वर्ष ८, अंक ५ पहा.

वाटत नाहीं. व क्वचित् असा कविसंकेत नसला तरी संभवनीय नवीन कविसंकेत केल्यास कांहीं नड नाहीं, अशी आमची समजूत आहे. यासंबंधानें पुढें वारंवार लिहिणें येणारच आहे; यास्तव तूर्त इतक्यावरच थांबतों. मात्र, 'ओकवृक्ष' आर्य-भूमींत आहेत व हा शब्दप्रयोगहि कर्णकटु नाहीं, याविषयीं खात्री पटावी ह्मणून एक लहानसाच उतारा येथें घेतों, तो उत्कृष्ट आधुनिक पण अप्रसिद्ध होऊं पहात असलेल्या काव्यांतला आहे. त्यांत हिमालयावरील सृष्टिशोभा वर्णीत असतां ह्मटलें आहे:—

> जे उत्पत्ती धरिति समशीतोष्ण वा उष्ण देशीं,
> ते एकत्र द्रुम सकलही वाढती या प्रदेशीं; ।
> कोठें माळावरि उगवती देवदारू विशाल,
> कोठें **ओकद्रुम** विलसती, उंच कोठें तमाल. ॥ **गंगावर्णना.**

आतां, ही प्रस्तावना समाप्त करण्यापूर्वीं, ज्या मित्रमंडळीची कायिक व मानसिक रीत्या मदत आह्मास झाली आहे, त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. त्यांतहि आमचे मित्र रा० **दामोदर रामचंद्र चिपळूणकर** यांची भाषांतराचे कामांत जी मदत झाली आहे, तिला तर मोलच नाहीं. यांत एवढें मन यांनीं घातलें, याचें कारण केवळ त्यांची विद्याव्यासंगप्रियता हेंच; यापलीकडे काय ह्मणावें? ही यांची मदत आह्मास निरंतर लाभो एवढेंच आह्मी इच्छितों. याच ठिकाणीं येथील नामांकित शंकरशेठ घराण्याचे विद्यमान पुरुष **श्रीमंत रा. रावजी विनायक शंकरशेठ**, जे. पी., आनररी म्याजिस्ट्रेट, यांसहि विसरतां येत नाहीं. या घराण्याचें मूळ ठिकाण घोडबंदर, येथील त्यांचा शोभिवंत बंगला त्यांनीं ऐन प्लेगसमयीं राहण्यास दिला व आमचा विद्याव्यासंग निर्वेध चालविण्यास आह्मास समर्थ केलें, या त्यांच्या गुणज्ञतेस भूषविणाऱ्या औदार्याची प्रशंसा केल्यावांचून राहवत नाहीं. ही प्रस्तावना, याच रमणीय बंगल्यांत असतांना, लिहिली गेली; आणि यांत जर कांहीं गुणांश असेल, तर तें सारें फळ, येथील पवित्र भूमि, अमृततुल्य पाणी, शुद्ध हवा, समुद्राचा भव्य देखावा, स्निग्धच्छाय वनश्रीची रमणीयता यांहीं करून प्राप्त झालेल्या शरीराच्या व मनाच्या प्रसन्नतेचें होय, हें कबूल केलें पाहिजे. शेवटीं, आमचे आश्रयदाते, ज्यांच्या स्नेहेंकरून आमचा हा मनोरथ चालू झाला, त्यांना तर या सगळ्याचेंच श्रेय आहे एवढें येथें ह्मटलें ह्मणजे पुरे; यांत सर्व आलें असें आह्मीं समजतों.

उपोद्घात.

तुफान नाटक ' टेम्पेस्ट ' नाटकाचें भाषांतर आहे. याचा शेवट गोड केला आहे, ह्मणजे ज्यास सुखपर्यवसायी नाटक ह्मणतात तसें हें आहे. शेक्स्पियर कवीनें जीं सर्व नाटकें रचलीं त्यांत हें शेवटल्यापैकींअसें असून, यालाच ह्या नाट्यमालेंत अग्रस्थान कां दिलें तें सांगतों. शेक्स्पियर कवि वारल्यावर लौकरच त्याच्या खेळगड्यांनीं, त्याचीं सर्व नाटकें जमवून, एक मंजूषावृत्ति* छापून प्रगट केली, तींत 'तुफान नाटक आरंभाला घातलें. यानंतर ज्या ज्या आवृत्ति आजपर्यंत निघाल्या, त्या सर्वांतही, कालानुक्रम धरला नसल्यास, याच नाटकाला अग्रस्थान मिळत आलें आहे. या मामुल वहिवाटीस अनुसरून, आह्मींहि हेंच नाटक प्रथम हातीं घेतलें. आतां, शेक्स्पियर कवीच्या सोबत्यांनीं तरी हें नाटक आरंभीं

---

* अभियुक्त मराठी वाचकांस हा शब्द नवाच वाटेल, यांत शंका नाहीं. Collected works—edition इ० इंग्रजी शब्दप्रयोगाला चांगलासा शब्द मराठींत आमच्या पाहण्यांत नव्हता. ' संकलित आवृत्ति ' किंवा ' ग्रंथसंग्रह ' वगैरे शब्दांहून या शब्दांत कल्पकपणा व यथार्थता विशेष आहे असें जाणून तो येथें योजला आहे. हा शब्द कसा सुचला हें जगन्नाथराय कवीच्या पुढील प्रसिद्ध उक्तीवरून कळेल.

दुर्वृत्ता जारजन्मानो हरिष्यन्तीति शंकया ।
ममैव पद्यरत्नानां मंजूषैषा मया कृता ॥

भामिनीविलासः ।

कां घातलें, याचें कारण पाहूं गेलें तर असें समजतें, कीं त्या वेळचा इंग्लंडचा राजा पहिला जेम्स, याच्या एलिझाबेथ नामें मुलीच्या विवाहसमारंभाकरितां कवीनें हें नाटक मूळ रचलें होतें, व खुद्द राजवाड्यांत पाहुण्या वऱ्हाडी मंडळीपुढें याचे अनेक प्रयोग झाले होते. पुढें, हें लोकांसमोर आलें, व सार्वजनिक नाटकगृहांत याचे खेळ होऊं लागले. तेव्हां तरी लोकांस हें एवढें प्रिय झालें, कीं याचे प्रयोगावर प्रयोग होऊं लागले तरी पुरेसे होतना. शेक्स्पियर कवीच्या नाटकांची मंजूषावृत्ति काढण्याचा बेत, वर झटल्याप्रमाणें, जेव्हां झाला, तेव्हां ती काढणारांचें लक्ष सहजच या नव्या लोकप्रिय झालेल्या नाटकाकडे पहिल्यानें गेलें, व तेंच त्यांनीं प्रथमारंभीं घातलें.

हेंच नाटक आरंभीं घालायाला आणखी कांहीं कारणें सांगण्यासारखीं आहेत. त्यांतलें एक हें, कीं शेक्स्पियर कवीच्या नाटकांना आरंभ करते वेळीं, हें नाटक मंगलाचरण ह्मणून शोभणारें आहे. याची साधी सरळ रचना, लहानसेंच पण ढुमदार कथानक, पृथ्वीवरील कोळ्यापासून तों इंद्रभुवनांतील इंद्राणीपर्यंत पात्रांची योजना, समुद्राच्या रौद्रस्वरूपाचा देखावा, वनश्रीच्या प्रशांत रम्यतेचा देखावा, अक्षतपूर्व अशा निर्मळ भूप्रदेशाचें वर्णन, अप्सरांचें स्वर्गावतरण, विवाहनिमित्त मंगलोत्सवप्रसंगीं त्यांचें नृत्यगायन, व सर्वांचा गोड शेवट वगैरे अनेक गोष्टींनीं या नाटकास अप्रतिम रंग चढला असून, कांहीं विलक्षण अशी मंगलकारक शोभा आलेली आहे. यांत द्वेष, क्रोध, शोक, संताप वगैरे विकारांस कवीनें सहसा स्थळ दिलें नाहीं; व जेथें तसें करणें भाग पडलें, तेथें देखील त्यावर सौम्यपणाचें पांघरूण घातलें आहे. अर्थात् त्यांचें उद्भावन प्रत्यक्ष गोष्टींनीं न करतां, वर्णनद्वारा अप्रत्यक्ष रीतीनें केलें आहे. फार काय सांगावें?—

रसपरिपाक बरोबर उतरेल किं नाहीं, याचीदेखील परवा केलेली दिसत नाहीं. या नाटकांत कोणताहि रस परिपक्वतेस पोंचलेला नसल्या कारणानें, हें नाटक तिसऱ्या चौथ्या वर्गांत मोडणारें आहे, असे शेरे मर्मज्ञ टीकाकारांनीं मारले आहेत,* याचें बीज ह्याच गोष्टींत आहे असें आह्मी समजतों. असें जरी आहे, तरी ह्या नाटकाचा असा एक गुण आहे—व ह्यांत जी जादु भरली आहे ती हीच, कीं ह्याच्या वाचनानें, श्रवणानें, व प्रेक्षणानें, जिभेला सुख, कानाला सुख, डोळ्यांना सुख, शरीराला सुख, मनाला सुख, असें चहोंकडे सुखच सुख होऊन जातें. तेव्हां, अशा प्रकारचें हें नाटक आरंभाला घातल्यानें, शेक्स्पियर कवीनें आपल्या तीस वर्षांच्या अमदानींत मंत्रमय वाणीनें जो वाङ्मयाचा नाट्यप्रदेश भारून टाकला, त्यांत वाचकांचा सुखानें रिघाव होईल अशी आह्मास आशा आहे.†

---

* विविधज्ञानविस्तार पुस्तक ८ अंक ५, येथें 'टेम्पेस्ट' नाटकाविषयीं जो अभिप्राय दिला आहे, त्यांत असें ह्मटलें आहे:—

"या नाटकांत कोणत्याहि एका रसाची परिक्वता नाहीं. एखाद्या रसाची झळूक कोठें कोठें दृष्टीस पडते. तथापि 'अथेल्लो,' 'किंगलियर' वगैरे नाटकांत अव्वलपासून अखेरपर्यंत जसा रस भरत जातो तसा प्रकार या नाटकांत कोठेंच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं."

† मॉंटेग्यू नांवाच्या एका जर्मन टीकाकार स्त्रीनें, शेक्स्पियर कवीच्या मंजूषावृत्तींत 'तुफान' नाटकास प्रथम स्थळ देण्याचें कारण थोडें वेगळें सांगितलें आहे. तेंहि मजेदार व मार्मिक असल्यावरून येथें सांगण्यासारखें आहे. ती ह्मणते, शेक्स्पियर कवीनें जी नाट्यसृष्टि निर्माण केली तिचें सार ह्या एका नाटकांत आलें आहे. जसा एका व्यक्तिविशेषावरून तज्जातीचा बोध होतो, तशीच ह्या नाटकाची गोष्ट आहे. ह्या ग्रंथकर्त्रीचा मूळ उल्लेख असा आहे:—

Although the last of Shakespeare's plays, it is in the *Folio* placed first; because, like the emblematic frontispieces of the antique books, it prepares the reader for the substance of all that follows. No other play will do this; none other

पण आमच्या मतें वास्तविक कारण वेगळें आहे. एवढे चाळीस खंड लिहिण्याच्या उद्योगास हात घालावयाचा, तर आधीं एक लहानसें नाटक घेऊन कसाकाय यत्न साधतो तो पहावा हें आह्मास बरें वाटलें. ह्मटलें आहे-"अल्पारंभाः क्षेमकराः". अनायासें, आह्मास हवें होतें तसें हें 'टेम्पेस्ट' नाटक आहे, असें दिसून आलें. ह्मणजे हें नाटक लहान आहे; व लहान आहे तरी यांत मौज कमी नाहीं. शेक्स्पियर कवीचीं कांहीं नाटकें फारच मोठीं आहेत; पण जीं लहान आहेत, त्यांच्यांतहि 'तुफान' व 'कॉमेडी ऑफ एरर्स' हीं फारच लहान आहेत. त्याच्या एकेका नाटकांत किती किती ओळी आहेत, याची मोजदाद कित्येक उद्योगी मंडळींनीं केली आहे,* तीवरून पाहतां, सर्वांत विस्तृत नाटक ह्मटलें ह्मणजे 'हॅम्लेट,' त्यांत ३९३१ ओळी भरतात; आणि 'तुफान' व 'कॉमेडी ऑफ् एरर्स' हीं दोन फार लहान, त्यांत अनुक्रमें २०६४ व १७७८ ओळी भरतात. अर्थात् या दोहोंतही सरासरी पावणेतीनशें ओळींचाच कायतो फरक आहे.

---

is such a synthesis of all. Just as three or four well selected plants will represent to the experienced eye of a botainst the flora of a hemisphere, so the whole Shakespearian world is brought before the imagination by the characters of Prospero, of Ariel, of Caliban, and of Miranda. It is of all poetic generalisations which have ever been made, the most refined and the clearest. In a word, this drama is a poetic synthesis, or as Prospero would express it in the language of a magician, it is a *microcosm* of that dramatic world which his imagination had created:—*The Variorum Edition of Shakespeare, vol. IX. The Tempest, pp. 359.*

* ही यादी Miss T. R. Smith & Mr. Furnivall यांनीं तयार केली असून, ती "The New Shakespeare Society's Transactions," 1880-85, Part II, p. 3 येथें छापलेली आहे. हींत प्रत्येक नाटकांतली ओळींचीं संख्या दिली असून, तदनुसार सर्व नाटकांची प्रतवारी लाविली आहे.

सारांश, शेक्स्पियर कवीच्या सर्व नाटकांत 'टेम्पेस्ट' नाटक आमच्या इष्टोद्देशास सर्वथा अनुकूळ असें आहे. ह्याशिवाय आणखी हींहि एक गोष्ट आहे, कीं रा. कीर्तने यांचें 'टेम्पेस्ट' नाटकाचें एक भाषांतर जरी पूर्वी होऊन गेलें आहे, तरी तें विशेष प्रसिद्ध नसल्यामुळें, या नाटकास अझूनही कांहींसा नवीनपणाच आहे असें ह्मणावयास चिंता नाहीं; व नृत्यगायनादिकाच्या सोहळ्यानें व यक्ष-पिशाच्यादि सत्वांच्या चमत्कारमय अद्भुत देखाव्यांनीं हें मंडित असल्यामुळें, यांत मनोरंजकपणाहि विशेष आहे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून, ह्याच नाटकास प्रथम हात घालण्याचें आमच्या मनांत आलें.

याप्रमाणें हें नाटक ह्या मालेंत प्रथमारंभीं गुंफण्याचीं कारणें कळवून, आतां ह्या नाटकासंबंधानें ऐतिहासिक माहिती सांगण्यासारखी आहे ती सांगतों. ही माहिती ह्मणजे (१) हें नाटक कवीनें केव्हां रचलें; (२) कोणत्या कथानकाच्या पायावर व कोणकोणत्या आधारानें रचलें; व (३) या नाटकाचें अनुकरण कोणीं कसें केलें व त्यावरून त्याच्या लोकप्रियतेचें किनपत अनुमान होतें, वगैरे गोष्टी होत. तर, त्या ह्याच क्रमानें येथें सादर करतों.

शेक्स्पियर मरण पावल्याला आज केवळ तीनशेंच वर्षें झालीं आहेत, व तेव्हां छापण्याची कला प्रचारांत नव्हती असेंहि नाहीं. तरी त्याच्या जन्माची साद्यंत हकीगत निश्चितपणें कांहीं कळत नाहीं, अशी आजला स्थिति आहे. फार काय सांगावें ?—त्यानें आपलीं हीं नाटकें केव्हां लिहिलीं हेंदेखील कित्येक प्रसंगीं निश्चयानें सांगणें कठिण झालें आहे. तो कांहीं मोठा विद्वान नव्हता, व आपण ग्रंथकार व्हावें आणि ग्रंथरूपानें आपलें नांव चिरकाळ रहावें अशी त्याची हाव होती असेंहि दिसत नाहीं. केवळ, परमेश्वरानें त्याच्या ठायीं उत्तम बुद्धि व नाट्यरचनेला उपयोगी असे गुण ठेवले होते, त्यांचा सदुपयोग करून नाटकें लिहावीं, तीं रंगभूमीवर आणावीं व आपला चरितार्थ चालवावा, एवढाच त्याचा हेतु होता. यामुळें, त्यानें

आपल्या नाटकांच्या आरंभीं किंवा शेवटीं, कोठेंहि आपल्या संबंधाचा उल्लेख केलेला आढळत नाहीं किंवा मितिवार सुद्धां त्यांवर घातलेला सांपडत नाहीं. तो जिवंत असतां, त्याच्या बहुतेक नाटकांच्या एकेक, दोनदोन आवृत्ति छापून निघाल्या होत्या; ह्यांस त्यांच्या आकारमानावरून 'चतुष्पत्री आवृत्ति' (Quartos) ह्मणतात; यांच्यांत 'तुफान' नाटक नाहीं. परंतु शेक्स्पियर सन १६१६ ळांत मृत्यु पावल्यावर सातएक वर्षांनीं ह्मणजे सन १६२३ सांत त्याच्या खेळगड्यांनीं, आरंभीं सांगितल्याप्रमाणें, जी पहिल्यानेंच एक 'मंजूषावृत्ति' प्रगट केली, तींत हें नाटक आहे. अर्थात् या नाटकाची छापील प्रत अशी हीच पहिली; ह्यापूर्वीची छापील अथवा एखादी वेगळी हस्तलिखित प्रत आढळांत नाहीं. यावरून हें नाटक कवीनें अगदीं शेवटीं शेवटीं रचलें, असें सामान्यतः अनुमान होतें. तथापि एवढ्यावरून रचनेचा काळ निश्चित होत नाहीं. तो निश्चित करावयाचा, तर अशा स्थितींत, आंतर व बाह्य प्रमाणांवरूनच केला पाहिजे हें उघड आहे अशीं प्रमाणें, शेक्स्पियर कवीच्या नाटकांवर शेकडों जणांनीं जे शेकडों टीकाग्रंथ लिहिले आहेत, त्यांत, शेक्स्पियर कवीचे व तत्समकालीन इतर ग्रंथकारांचे ग्रंथ धुंडाळून, पुष्कळ शोधून काढून दिलीं आहेत. तीं सर्व सांगूं ह्मटलें तर मोठा विस्तार होईल, व तेवढ्या खटाटोपाची तादृश गरजहि आपणास नाहीं. यास्तव त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचा मात्र येथें संक्षेपतः निर्देश करतों.

शेक्स्पियर कवीनें आपलें कोणतें नाटक कोणत्या वर्षीं लिहिलें, हें प्रथमच पद्धतशीर ठरविण्याचें श्रेय मॅलोन या प्रसिद्ध टीकाकारास आहे. याच वेळेस, केपेल ह्मणून दुसरा एक टीकाकार होऊन गेला, त्यानें या संबंधाची बरीच माहिती गोळा करून, आधींच प्रगट केली होती. परंतु ती केवळ विसकळीत होती; तिलाच मॅलोन यानें संगतवार रूप दिलें, व सर्व नाटकांची एक कालानुक्रमवार

यादी तयार केली. ही यादी सन १७७८ रांत प्रसिद्ध झाली आहे. हींत 'तुफान' नाटकाचा काल १६१२ ह्मणून धरला आहे. ही यादी, ते वेळच्या बऱ्याच विद्वानांचें लक्ष या विषयाकडे वेधण्यास कारण होऊन, तिजवर कडाक्याचे वादविवादहि बरेच झाले. यांत उत्तम गोष्ट ही झाली, कीं स्वतः मॅलोन याची नवीन शोध करण्याकडे प्रवृत्ति होऊन, त्यानें आणखी पुष्कळ महत्वाची माहिती उघडकीस आणली. तिच्या योगानें त्याच्या पहिल्या मतांत पुष्कळच फेरबदल होत गेला; तो होतां होतां, सन १८२१ सांत त्यानें आपली शेवटली यादी प्रगट करून, सर्व प्रमाणांसहित या नाटकाच्या रचनेचें १६११ हें वर्ष ह्मणून ठरविलें. यानंतर जॉर्ज चामर्स यानेंहि अशीच एक यादी तयार केली. तींत मॅलोन यानें ठरविलेले रचनाकाळ खोटे ठरवून, 'तुफान' नाटक सन १६१३ रांत रचलें गेलें ह्मणून प्रतिपादिलें आहे. तथापि शेक्स्पियर कवीचें हें नाटक शेवटलें याविषयीं दोघांचेंहि एकमतच आहे. पण सन १८३९ सांत धि रेव्हरंड जोझेफ हन्टर ह्मणून एक पंडित पुढें आले, व त्यांनीं एक नवीच कल्पना पुढें आणली. हन्टर हा स्वतः मोठा विद्वान् होता व त्याची लेखणीहि तरतरीत होती. यामुळें त्यानें 'तुफान' नाटकावर एक छांदार निबंध लिहून, असें प्रतिपादन केलें, कीं हें नाटक कवीनें मुळीं १५९६ वांत रचलें! यांत हन्टर यानें नवीन शोध अथवा माहिती मिळविली ह्मणावें तर मुळींच नाहीं. केवळ आधींच्याच माहितीच्या बळावर कोटीक्रम रचून नुसतें वाक्पांडित्य सपादून मिरविलें आहे; तें बरीक वाहवा करण्यासारखें आहे खचित. पण ज्या स्थळीं मूळांतच अनिश्चितपणाचा अंधार आहे, तेथें याहून अधिक कोण काय करणार? "मागला काळ ह्मणजे अंधारानें भरलेला एक अपरंपार खोल खाडाच होय. अशा या मागल्या काळाच्या काळोखांत, मुली, तुला काय काय दिसतें, सांग पाहूं?" असें प्रास्पेरोनें विचारल्यावरून, तिनें जें साधेंच उत्तर दिलें तें ऐकूनच वात्सल्यबुद्धि प्रास्पेरो तिच्या अल्लडपणाचें जसें कौतुक करतो, तसेंच कौतुक अशा

पांडित्याचें आपण करावें, इतकीच गोष्ट ! यापलीकडे त्यांत कांहीं आहे असें वाटत नाहीं. वस्तुतः, प्राचीन काळाच्या काळोखांत, मृच्छकटिकांत वर्णिल्याप्रमाणें “इतो भाव, इत श्चेटः । भावश्चेटः, चेटो भावः ।” असा चमत्कार किती होतो याचें, हंटरकृत प्रस्तुतचें पांडित्यतांडव हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे !

आतां, ‘ तुफान ’ नाटकाचा रचनाकाळ निर्णीत करणारीं प्रमाणें कोणतीं तीं सांगतों. प्रथमतः, या नाटकाचें नामकरण. शेक्स्पियर कवीनें कांहीं नाटकांचीं नांवें, तीं नाटकें ज्या काळीं लिहिलीं त्या काळास अनुलक्षून, दिलीं आहेत; जशीं, *The Winter's Tale, A Midsummer Night's Dream, Twelfth Night* इ०. याच नमुन्यावर या नाटकास *Tempest* हें नांव कवीनें दिलें असावें असें दिसतें. कारण या नाटकास ‘तुफान’ ह्मणण्यापेक्षां *The Enchanted Island*, अथवा *The Banished Duke*, अथवा *Ferdinand and Miranda* यापैकीं एखादें ठेवलें असतें तर विशेष शोभलें असतें. पण तसें कांहीं न करतां, त्यानें यास ‘तुफान’ असें ह्मटलें, यावरून, हें ज्या वेळीं लिहिलें, तेव्हां इंग्लंडांत नुकतेंच तुफान होऊन गेलें असलें पाहिजे व त्या संबंधाच्या गोष्टी लोकांत चर्चेला पात्र झाल्या असल्या पाहिजेत. अशा गोष्टी नाटकांत आणून लोकांचें लक्ष त्याकडे वेधेल असें नांव देण्याची नाटककारांची चाल सर्वसंमत आहे; तसाच प्रकार येथें झाला आहे असें दिसतें. कारण, सन १६१२ ह्या वर्षी इंग्लंडांत एक मोठें तुफान झालें होतें व त्याची धुमाळी सारखी त्या सालच्या आक्टोबर, नोवेंबर व डिसेंबर ह्या तीन महिने चालू असून सर्वांमुखीं हाच विषय होऊन बसला होता, असें एका बखरींत लिहून ठेविलेलें सांपडलें आहे. यावरून पाहतां तुफान नाटकाचा रचनाकाळ या सालांतलाच असला पाहिजे, हें उघड आहे. हाच निर्णय दृढ करणारें

आणखीं दुसरें प्रमाण ह्मटलें ह्मणजे स्वसमकालीन ग्रंथांत 'तुफान नाटकाचा उल्लेख असणें हें होय. असा उल्लेख, शेक्स्पियर कवीशीं समकालीन जो बेन् जान्सन (Ben Jonson) नामें नट्यकार, त्याच्या "*Every Man in his Humour*" नामक नाटकाला त्यानें, आपल्या इकडील मंगलाचरणाप्रमाणें जो एक प्रास्ताविक कविताबद्ध लेख (prologue) जोडला आहे, * त्यांत आला आहे. आतां, येथें कशी मौज झाली आहे पहा. बेन् जान्सनाचें हेंच नाटक

---

* ह्या कवितालेखांतून कामापुरता पुढील उतारा येथें घेतों:—

" He rather prays, you will be pleased to see
One such to-day, as other plays should be;
Where *neither chorus wafts you o'er the seas,*
Nor creaking throne comes down the boys to please;
Nor nimble squib is seen to make afeard
The gentlewomen; nor roll'd bullet heard
To say, it thunders; nor tempestuous drum
Rumbles, to tell you when the storm doth come;
But deeds and language, such as men do use,
And persons, such as comedy would choose,
When she would shew an image of the times,
And sport with human follies, not with crimes;
Except we make them such, by loving still
Our popular errors, when we know they are ill,
I mean such errors, as you'll all confess,
By laughing at them, they deserve no less;
Which when you heartily do, there's hope left then,
You, *that have so grac'd monsters*, may like men."

यांत इटॅलिसाइझ्ड पदांकडे ध्यान दिलें असतां, 'तुफान' नाटकांतला आरंभींचा बुडत्या गलबताचा देखावा, चवथ्या अंकांतील इंद्राणीप्रभृति अप्सरांचें अवतरण, तुफानांतला कडकडाट व धडधडाट दर्शविण्याकरितां उडविण्यांत येणारे बार व वाजविण्यांत येणारीं भेर्यादि वाद्यें यांवरच कटाक्ष व शेवटीं 'राक्षस पदानें' कालीबनाचा बोध वगैरे गोष्टी स्पष्ट आहेत.

प्रथम सन १५९६ वांत प्रगट झालें, तेव्हां त्यांत वरील प्रास्ताविक लेख नव्हता; पण पुढें त्याच्या सर्व ग्रंथांची मंजूषावृत्ति त्यानें १६१६ व्यांत काढली, तेव्हां मात्र तींत तो नवीनच घातलेला सांपडला. यावरून जें काय सिद्ध होतें हेंच, कीं 'तुफान' नाटक १५९६ वांत वगैरे रचलें असावें असें, वर म्हट-ल्याप्रमाणें, हंटर-प्रभृति कित्येक पंडितांचें जें म्हणणें आहे, तें निव्वळ थोतांड असून, उलट शेक्स्पियर कवीचें 'तुफान' बाहेर आल्यावर, जेव्हां फिरून *Every Man in his Humour* हें नाटक छापण्याची वेळ आली, तेव्हां सहजच ह्या नव्या नाटकाला अनुलक्षून लिहिण्याची ही आयतीच संधि बेन् जान्सनानें साधली, असें म्हणणें प्राप्त आहे. अर्थात्, सन १६१६ च्या आधीं कांहीं वर्षांवर 'तुफान' रचलें गेलें असलें पाहिजे असें अनुमान होतें. हा काळ, वरील प्रमाणांवरून सिद्ध झालेल्या काळाशीं विरुद्ध नाहीं हें स्पष्टच आहे. याशिवाय तिसरें प्रमाण, 'धी व्हर्च्यू मॅनस्क्रिप्ट' (The Vertue Mss.) या नांवानें जो लेख प्रसिद्ध आहे, त्यांत आलेल्या उल्लेखावरून मिळतें. या लेखांत म्हटलें आहे—" सन १६१३ राच्या २० मे रोजीं, इंग्लंडचा राजा जेम्स, याची कन्या एलिझाबेथ व इलेक्टर पॅलटाइन यांजपुढें 'धि वुइंटर्स टेल' व 'धि टेम्पेस्ट' यांसहित आणखी बारा नाटकांचे खेळ झाले." आतां, इलेक्टर पॅलटाइन व राज-कन्या एलिझाबेथ यांचा विवाह सन १६१३ रांत १४ फे-ब्रुवारीला झाला आहे. या दोन गोष्टींवर लक्ष देऊन एका टीकाकारानें* असा अभिप्राय दर्शविला आहे, कीं हें नाटक

---

* हा टीकाकार डा० गार्नेट (Dr. Garnett) होय. याचा एतद्वि-षयक लेख *Universal Review* नामक मासिक पुस्तकांत, सन १८८९ दच्या एप्रिल मासाच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. हा समग्र लेख मोठ्या कल्पकपणानें लिहिला असून, विचार करण्यासारखा आहे. लग्नसमारंभाच्या वेळची इंग्लंडच्या दरबाराची स्थिति व तिच्याशीं नाटकांत दिसून येणारें साम्य त्यांत फार उत्कृष्ट रीतीनें दर्शविलें आहे. त्याची थोडीबहुत कल्पना

शेक्स्पियर कवीनें राजघराण्यांतल्या याच विवाहोत्सवासाठीं मुळीं रचलें. आणि हा अभिप्राय, प्रत्यक्ष नाटकांतल्याच अंतःस्थ प्रमाणांवरून खरा असण्याचा वराच संभव दिसतो. एकंदर

वाचकांस व्हावी, म्हणून त्या मोठ्या लेखांतला हा पुढील लहानसा उतारा येथें घेतों:—

"Shakespeare must have had some very cogent motive for introducing this apparently aimless pageantry (of the fourth Act) into the very heart of this drama. . . . Every thing bespeaks a royal marriage and everything corresponds with the royal marriage of 1613. The foreign prince come from beyond sea, the island princess who has never left her home, the wise father who brings about the auspicious consummation by his policy,—all fonnd their counter-parts among the splendid company that watched the performance on that February night. The perception of the absolute appropriateness of the piece to the occasion must have heightened their enjoyment to a degree which we at present cannot reproduce. Every point would be new and bright, every allusion would be taken up as soon as made . . . The *Tempest* would hardly have existed in its present form, and certainly would have been far from exemplifying Shakespeare's courtly tact and tender humanity, but for the gloom thrown upon the marriage festivities by the recent death of the king's eldest son, Prince Henry, in November. . . . How to reconcile the demands of sorrow and joy on this unparalleled occasion? To ignore the late affliction would be heartless, and an insult to the king; but how to recognise it without darkening the nupital joy? In the entire range of Shakespeare's art there is nothing more exquisite than the skill with which he has solved the problem. The recent calamity is not unrecognized; it is kept continually in view. But by a consummate stroke of genius, the woe is taken away from Prospero, the representative of James, and transferred to the house of his enemy. Thus the sense of loss mingles, a fine and almost an imperceptible element, with the general cheerfulness. In the end, the hitherto sonless Prospero gains a son, as the bereaved James is gaining one in the Palatine."

नाटकाची अल्पविस्तारता, त्यांतील कांहीं भागांचा तुटक-तुटकपणा, मंगलकार्योत्सवाला उचित अशी चवथ्या अंकांतील प्रक्षिप्तप्राय (Masque) गर्भनाटकाची योजना, यांहीं करून हें नाटक फारच घाईनें रचून, तितक्याच घाईनें सजवून, व आवश्यकतेप्रमाणें मूळरचनेंत कोठें कोठें काढघाल करून, रंगभूमीवर आणलेलें असावें, यांत शंका नाहीं. तात्पर्य, ह्या तीनहि गोष्टींचा मेळ घातला असतां, असें वाटूं लागतें कीं हें नाटक सन १६१२ राच्या अखेरीस रचलें गेलें असावें. हाहि काळ वरच्याशीं सरासरीं मिळताच आहे. रचनाकाळ निश्चित करण्याचीं जी आणखी एक रीत आहे, तिच्यावरून तर वरील निर्णयाला पुरतीच बळकटी येते. ही रीत ह्मणजे कवीच्या लेखनसरणीवरून प्रमाण काढणें ही होय. शेक्स्पियर कवीचीं अवल्लपासून अखेरपर्यंतचीं सर्व नाटकें लक्षपूर्वक वाचलीं व तीं एकमेकांशीं ताडून पाहिलीं, तर असें दिसून येतें कीं, कवीचा हात जसजसा आपल्या कर्मांत घटावत चालला, तसतसा त्याच्या कवितापद्धतींत, त्याच्या भाषासरणींत व संविधानकथेच्या त्याच्या वळणांत पुष्कळच फरक पडत गेला आहे. हे फरक तज्ज्ञ इंग्रज टीकाकारांनीं दाखविले आहेत. त्यांशीं वस्तुतः मराठी भाषेला फारसें कर्तव्य नसल्यावरून, ते येथें सांगत नाहीं. तथापि एवढें कळविणें जरूर आहे, कीं 'तुफान' नाटक हें शेक्स्पियर कवीच्या परिणत बुद्धीचें फळ असून, तें त्यानें अगदीं शेवटीं लिहिलें, असा, त्याच्या लेखनसरणींत, कवितापद्धतींत, व संविधानकथेच्या वळणांत पडत गेलेल्या फरकावरून, तज्ज्ञ विद्वानांचा सिद्धांत ठरला आहे.

आतां, ह्या नाटकास पूर्वीच्या एखाद्या कथेचा वगैरे आधार आहे किं काय, हें सांगावयाचें. पण, वस्तुतः पाहतां, ह्या नाटकास कोणत्याहि कथेचा ह्मणण्यासारखा आधार नाहीं. कवीच्या स्वतंत्र कल्पकतेचीच ही सारी इमारत आहे. आतां, त्या वेळच्या कित्येक ग्रंथांतून

कोठें कांहीं वाक्यें, कोठें वर्णनें, कोठें नवीन कल्पना वगैरे उचलून घेतलेली आढळते. या सर्वांचा निर्देश, पुढें ह्या नाटकाचें प्रवेशशः निरूपण देणार आहों, त्यांत त्या त्या प्रसंगीं येणारच आहे; ह्मणून तो येथें करीत नाहीं. तथापि एवढें कळविलें पाहिजे, कीं त्या काळीं अमेरिका खंडाचा शोध नुकताच लागला असल्यामुळें, अनेक धाडशी लोक परदेशास सफरी करीत असत. पैकीं एका सफरींत सर जॉर्ज सॉमर्स वगैरे शेंपन्नास मंडळीवर तुफानाचा दुर्धर प्रसंग गुजरून, त्यांची फार दुर्दशा झाली, व शेवटीं शिकस्तीनें सर्व मंडळी बचावून स्वदेशीं आली. या सॉमर्सच्या सफरीची हकीगत, जूर्डन (jourdan) यानें लिहून, ती सन १६१० हांत पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. या पुस्तकाचें नांव '*A Discovery of the Bermudas &c.*' असें असून, यांत तुफानाचें, व 'तुफानांचें तें प्रख्यात माहेरघर'* बर्मुडा बेट, याचें बरेंच विस्तृत वर्णन दिलें आहे. यावरूनच शेक्स्पियरकवीनें आपलें 'भारलेलें बेट' निर्माण केलें व स्वतः निर्माण केलेल्या तुफानाचें वर्णन सजविलें, असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. कित्येकांच्या मतें, ह्याच सफरीची जी हकीगत वुइल्यम् स्ट्रॅची यानें सन १६१२ रांत प्रगट केली, तीवरून कवीनें हीं आपलीं वर्णनें सजविलीं, असें आहे. कारण, या वर्षांच्या सुमारास शेक्स्पियर व स्ट्रॅची असे दोघे शेजारीं शेजारीं राहात असून, त्यांचा फारच घरोबा पडला होता. रे. हन्टर यानें असें दाखविलें आहे कीं ॲरिओस्टो(Ariosto)ह्मणून एक महाकवि इटाली देशांत होऊन गेला, त्याच्या *The Orlando* नामक काव्याच्या एकेचाळिसाव्या सर्गांत तुफानाचें जें वर्णन आहे, त्याशीं 'टेम्पेस्ट' नाटकांतलें वर्णन जुळतें आहे. अर्थात् इंग्लिश कवीनें इटालियन कवीची ही धडधडीत चोरी केली, असेंच सरासरीं ह्मणण्याचा त्याचा भावार्थ दिसतो. याशिवाय, मॉन्टेन (Montaigne) नामें फ्रेंच निबंधकाराच्या निबंधांचें फ्लोरियो (Florio) यानें केलेलें इंग्रजी भाषांतर (१६०३), अर्ल ऑफ स्टर्लिंग याचें 'डरायस' नामें नाटक (१६०३),

---

* 'तुफान' नाटक, अंक १, प्रवेश २, पृष्ट २९ पहा.

याचप्रमाणें Goldino's *Ovid* व Eden's *History of Travayle* हें ग्रंथ, यांचाहि कांहीं स्थळीं कवीनें आधार घेतला आहे. वस्तुतः हे आधार एवढे महत्वाचे आहेत असें नाहीं, व त्यामुळें कवीच्या बुद्धिस्वकीयत्वाला उणेपणा येतो अशीहि गोष्ट नाही. पण सन १८१७ रांत टीक (Tieck) या टीकाकारानें जी एक नवीच गोष्ट उघडकीस आणली, तीवरून पाहतां, ' टेम्पेस्ट ' नाटकाचें सगळ्याचें सगळें कथानक, जेकब एरर म्हणून कोणी जर्मननाटककार होऊन गेला, त्याच्या *Schöne Sidea* (म्ह० Fair Sidea) नामक नाटकांतून कवीनें घेतलें, असें झालें आहे. आतां, ' टेम्पेस्ट ' नाटकाचें कथानक व ' सायुडिया ' नाटकांतलें कथानक हीं दोनहि परस्पराशीं जुळतात खरीं; तरी ' टेम्पेस्ट ' नाटकांत शेक्स्पियर कवीचें जें चातुर्य दिसून येतें त्याचा शतांशहि ' सायुडिया ' नाटकांत आढळत नाहीं, हें निःसंशय आहे. केवळ कथानकाच्या साम्यावरून, आमच्या मतें, एकानें दुसऱ्याच्या नाटकाची चोरी केली असेंच कल्पावयास पाहिजे असें नाहीं. परस्परसंबंध कांहीं नसतां, दोघांनाहि एकसारखे विचार सुचावे ही गोष्ट संभवनीय आहे. तशांत, कांहीं जुन्या कथा दोघांच्याहि कानावर आल्या असल्यास दोघांच्या कल्पनासृष्टींत साम्य उत्पन्न होण्याचा संभव आहे. आणि तसा संभव प्रकृत ठिकाणीं बराच आहे. कारण असें, कीं एरर ह्याच्या नांवावर जीं नाटकें जर्मन भाषेंत आहेत, तीं सर्व त्यानें नवींच रचलीं असें कांहीं नाहीं; तर, त्याला ह्या कलेचा विशेष नाद असल्याकारणानें, त्यानें जुनींच नाटकें व कथानकें, एकत्र करून व कांहींस नाटकांचें रूप देऊन, प्रसिद्ध केलीं, असें, त्याच्या सर्व नाटकांची जी मंजूषावृत्ति त्याच्या मरणानंतर लगेच प्रगट झाली, तिच्या मुखपृष्ठावरच छापलेल्या मजकुरावरून कळतें. ही एक गोष्ट; आणि इंग्लिश नाटक कंपन्या तेव्हां जर्मनींत वारंवार जात येत असल्यामुळें, त्यांच्या द्वारा, कदाचित् शेक्स्पियर कवीला एरर ह्याच्या नाटकाची किंवा तशा प्राचीन कथानकाची माहिती झाली असेल;

नाहीं असें नाहीं; ही दुसरी गोष्ट. अशा ह्या दोनहि संभवनीय गोष्टी लक्षांत घेतल्या असतां, अद्याप शोध न लागलेल्या अशा एखाद्या जुन्याच कथेच्या आधारानें कदाचित् हें नाटक कवीनें रचिलें असेल असें अनुमान केल्यास चूक होणार नाहीं. आणि असें आहे तर त्याच्या पदरीं ग्रंथचौर्याचा आळ येत नाहीं हें उघड आहे. आमच्या ह्या भाषांतरांतच आह्मी अर्थसादृश्यांचीं कांहीं स्थळें दाखविलीं आहेत; केव्हां केव्हां तर हीं सादृश्यें एवढीं विलक्षण एकरूप असतात, कीं तीं पाहून तोंडांत बोट घालण्याचीच पाळी येते ! उदाहरणार्थ, पृष्ठ १२६ येथील एरिल व जटायु यांच्या भाषणांतील त्वरेचें साम्य पहा ! तेव्हां, यांत कोणीं कोणाची चोरी केली ह्मणून ह्मणावी ? वस्तुतः, आर्यकवि होऊन गेले तेव्हां शेक्स्पियर कवीच्या खापरपंजोबाचा खापरपंजोबा देखील जन्मास आलेला नसेल. अशा वेळीं प्रगट केलेले काव्योद्गार, येथून कित्येक योजनें दूर कीं जेथें संस्कृत भाषा अस्तित्वांत आहे कीं नाहीं हेंसुद्धां माहित नव्हतें, अशा ठिकाणच्या एका इंग्रज कवीच्या उद्गारांशीं साम्य पावतात, हा केवढा चमत्कार आहे ! आणि हा चमत्कार आहे तरी तो असंभाव्य आहे असें मात्र नाहीं. आणखी हीहि एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, कीं एरर याची कृति नाट्यदृष्टीनें अगदींच रासवट व ग्राम्य आहे. ह्याहून 'टेम्पेस्ट' नाटकाची गोष्ट अगदीं वेगळी आहे. तें कितीतरी पटीनें उत्कृष्ट आहे. तेव्हां, ज्याची बुद्धिमत्ता एवढी विशाळ, अशा या महाशय कवीला दुसऱ्याची चोरीच करायला पाहिजे असें नाहीं. हें पाप त्यांच्या पदरीं बांधणें ह्मणजे एखाद्या धनाढ्याला भिकारी ह्मणण्यासारखें, अथवा,

> जें जन्हुकन्यकेचें भाग्य, न पावेचि अल्प सरिता तें ।
>
> मोरोपंत.

या वाणीचा विपर्यास करून, ज्या जान्हवीनें शेकडों अल्प सरितांस आश्रय दिला आहे, तिला पाण्याचा तोटा आहे ह्मणू.

नांवें ठेवण्यासारखें निव्वळ अप्रोजक होय असें आह्मास वाटतें. आणि हीहि एक गोष्ट आहे कीं नुसतें कथासूत्र शेक्स्पियर कवीनें एखाद्या जुन्या दंतकथेवरून, अथवा समजा, एरर याच्या कृतीवरूनहि घेतलें असलें तरी त्यांत मोठेंसें काय झालें ? नाटकांत गुंफून दिलेले अनेक खुबीदार प्रसंग, निरनिराळ्या स्वभावाच्या पात्रांची यथोचित योजना, स्थळादिकांच्या नांवांची व देखाव्यांची मजेदार निवड इत्यादि प्रकारतर निखालस स्वतः कवीचेच होत, व एवढ्यावरूनच त्याच्या अप्रतिम काव्यप्रतिभेची व बुद्धिस्वकीयत्वाची उत्कृष्ट साक्ष पटते यांत लेशमात्र संदेह नाहीं. *

---

* शेक्स्पियर कवीची कल्पना जशी विशाळ होती, तशी त्याची योजकताहि प्रशंसनीयच होती. यामुळें प्रासप्रिय पंतांनीं आपल्या बसावयाच्या खोलीच्या भिंती प्रासानुप्रासपदांनीं भरून टाकिल्या होत्या असें सांगतात, त्याच प्रमाणें या चतुर कवीनें जरी कांहीं केलें नसलें, तरी चांगल्या चांगल्या ग्रंथकारांच्या लेखांतून चांगले चांगले विचार व चांगलीं चांगलीं स्थळें निवडून घेऊन आपल्या हृत्पटिकेवर त्यानें लिहून ठेविलीं असतील हें निःसंशय आहे. याची साक्ष, यानें त्यांच्या ग्रंथांतून घेतलेल्या उताऱ्यांवरूनच पटत आहे. पण शेक्स्पियर कवीच्या कित्येक निःसीम भक्तांस त्याचें एवढें देखील परावलंबनत्व खपत नाहींसें दिसतें. वर सांगीतलेलें रेव्ह. हंन्टर याचें मत खोडून काढित असतां रागवून एक टीकाकार कवीचा कसा कैवार घेतो तें पाहण्यासारखें आहे. तो ह्मणतोः—

"Such theories as those of the excellent Hunter, leave on my mind only a painful impression. Shakespeare is wounded in the house of his friends. He is dealt with as though he were a poet of inferior ability, leading a parasitic life upon his superiors of every land and of every tongue. Ariosto can be original, Shakespeare cannot. Ariosto can imagine the horror of a tempest, a power beyond Shakespeare, it seems, who for *his* description must go to Ariosto........... Is there a spark of likelihood that a man who had so mastered a subjecte l either by personal experience or by conferrence with see-men, would go for a few trumpery phrases or ideas to a distant land-locked poet? The wind that whistles through Shakespeare's cordage, is to be found, I fear, only

तिसरें कलम 'टेम्पेस्ट' नाटकाच्या लोकप्रियतेचें. हें नाटक जगासमोर आलें तेव्हांपासूनच वाचकांस व प्रेक्षकांस फार प्रिय होत आलें आहे. माग एके स्थळीं सांगितल्याप्रमाणें, बेन् जान्सन यानें जरी यांतील कडकडधुंमधुम वगैरे प्रकारास्तव यास नांवें ठेविलीं आहेत, तरी यावर प्रेक्षकांच्या जेवढ्या उड्यावर उड्या पडतात, तेवढ्या इतर थोड्याच नाटकांवर पडल्या असतील! शेक्स्पियर कवीच्या मागोमाग, बोमन्ट आणि फ्लेचर या नांवाच्या नाटककारांची जी जोडी निघाली, तिजपैकीं फ्लेचर याची, हें नाटक पाहून, केवळ मुरकुंडी वळली असें सांगतात. आणि हें खरेंच असावें. याचें एकच प्रमाण असें पहा कीं, त्यानें, यांतच किरकोळ फेरफार करून, आपलें *The Sea Voyage* हें नाटक तयार केलें. याच्याच प्रमाणें सर जॉन सक्लिग यानेंहि *The Goblins* हें एक रचलें. पुढें सन १६७१ रांत प्रसिद्ध कवि ड्रायडन याचें 'टेम्पेस्ट' चेंच रूपांतर *The Enchanted Island* या नांवानें प्रगट झालें. यांत मूळांतलें कवित्व जरी आढळत नाहीं, तरी त्यांतले कित्येक दोष ड्रायडन यानें मोठ्या कुशलतेनें दूर केले आहेत, तेणेंकरून 'टेम्पेस्ट'चें हें रूपांतर मूळाहूनहि अतिशय लोकप्रिय झालें!* पेपीज (Pepys) ह्मणून कोणी एक मोठा दक्ष व साक्षेपी गृहस्थ

in the words of Ariosto's description! After all, Hunter has also a convert, Meissner, who granting to Shakespeare no vestige of originality, adopts all the borrowings from *the Orlando* which Hunter detects, and even adds to the number. He, in fact, has discovered Shakespeare's workshop, and found in it the most remarkable 'lay out' of counterfeiting appliances and burglar's tools that the world has yet seen, or literary 'cracksmen' ever knew!"—H. H. FURNESS' *Variorum Shakespeare—The Tempest*, Vol. IX, p. p. 323-4.

* अलीकडे असें कळून आलें आहे, कीं ड्रायडन यानें डॅव्हेनन्ट याच्या साहाय्यानें 'टेम्पेस्ट'चें जें रूपांतर प्रगट केलें, त्यांतील शेक्स्पियर कवीचा नव्हे असा नवा ह्मणून जो भाग जोडून दिला आहे, तो,

या काळीं होता, तो नित्यरात्रौ 'दिनवृत्त' (diary) टिपून ठेवीत असे. त्यानें आपल्या दिनवृत्तवहींत या नाटकाच्या प्रयोगाविषयीं काय लिहिलें आहे तें वाचण्यासारखें आहे. तो लिहितो:-- "शेक्स्पियरकृत जुन्या टेम्पेस्ट नाटकाचा पहिलाच खेळ आज झाला. तो पाहण्याला जायाचा माझा व एका मित्राचा आज दोन प्रहरीं बेत झाला होता. नाटकगृह तुडुंब भरलें होतें. स्वत: सरकार स्वारी, दरबारी मंडळीसह, आली होती. इतकें करुणरसानें भरलेलें नाटक कधीं पाहिलें नव्हतें"* पुढें आणखी आठच दिवसांनीं पेपिज पुन: लिहितो: "पुन: आज 'टेम्पेस्ट' पाहिलें. फारच मजेदार नाटक. खलाशांचा भाग मात्र अंमळ कंटाळवाणी वाटला. तथापि नाटकांत अनेक प्रकार आणले असल्यामुळें मनाला फार संतोष होतो." † या गृहस्थाला पुढेंपुढें या नाटकाची इतकी गोडी लागली कीं स्वारी आणखी चारपांच वेळां या नाटकाला गेली! यावरून, ते वेळच्या लोकांस हें नाटक किती प्रिय झालें होतें हें बरेंच समजतें. याशिवाय कित्येकांनीं तर यांतीलच पात्रें घेऊन अनेक वेगळीं वेगळीं नाटकें रचलीं आहेत. त्यांत वाल्डून (१७०७) याचें *The Virgin Queen*

बहुतेक, एका स्पानिश नाटककाराच्या नाटकांतून शब्दश: चोरून आणला आहे. या स्पानिश नाटककाराचें नांव काल्डिरान (Calderon) असून, तो, हें रूपांतर बाहेर येण्याच्या आधीं वीस एक वर्षांवर होऊन गेला. ही गोष्ट हर्मन ग्रिम (Herman Grimm) यानें सन १८७५ रांत उघडकीस आणली.—*Funfzehn Essays 1875, p. 205* पहा.

* याचें मूळ असें आहे:—" November 7, 1697— At noon resolved with Sir W. Pen to go to see *The Tempest*, an old play of Shakespeare's acted, as I hear, the first day......The house mighty full; the King and Court there; the most innocent play that ever I saw. The play has no great wit, but yet good, above ordinary plays."

† याचें मूळ असें:—" Nov. 13, 1667— Saw *The Tempest* again, which is very pleasant, and full of so good variety that I cannot be more pleased almost in a comedy, only the seamen's part a little too tedious."

व रेनन याचें *Caliban* हीं सांगण्यासारखीं आहेत. यांतील कथानकें, प्रास्पेरो मिलान नगर येथें येऊन पोंचल्यावर पुढें काय झालें यास अनुलक्षून कल्पिलीं आहेत. टेम्पेस्ट नाटकांतलीं प्रॉस्पेरो, एरिल, मिरांडा व कालीबन हीं मुख्य पात्रें इंग्लंडचे लोकांच्या घरोब्याचीं झालीं असून, एवढीं हृदयंगम होऊन बसलीं आहेत, कीं त्या त्या पत्रांत शेक्स्पियर कवीनें मंत्रवाणीनें भरलेले गुण दर्शविणारे ते चालते बोलते प्राणीच होत अशी त्यांची कल्पना झाली आहे. यामुळें कित्येक कवींनीं या नांवांवरून अनेक कल्पक काव्यें रचलीं आहेत. त्यांत ब्राऊनिंग कवीचें *Caliban upon Setobos* व शेलीचें *Ariel to Miranda* * हीं दोन नांवाजण्यासारखीं आहेत. या नाटकांतलीं तेराएक ठिकाणचीं पद्यें गवयांनीं व वाद्यें वाजविणार मंडळीनीं आपलींशीं केलीं आहेत. सारांश, हें नाटक भूतलावर अवतीर्ण होऊन नेत्रविषय झाल्या वेळेपासून, सर्वांवर जादू पसरीत आलें आहे, व हा याचा गुण सर्व ठिकाणीं सर्व काळीं असाच प्रभाव गाजवीत राहील असा भरंवसा वाटत आहे.

येथवर 'तुफान' नाटकासंबंधानें अवांतर माहिती कळवयाची ती कळविली; आतां आपण थेट नाटकाच्या दरवाज्याशीं येऊन ठेपलों आहों. तेव्हां, एकेक प्रवेश घेऊन, त्यांत काय काय लक्ष देण्यासारखें आहे, कोठें काय मौज आहे, कोठें कशी खुबी केलेली आहे, हें सर्व यथाक्रम पाहूं. हें नाटक परकी देशचें असून, आपणास सर्व प्रकारें नवेंच असल्यामुळें, समजण्यास अंमळ जड जाईल. आपल्याइकडील शाकुंतल घ्या, सौभद्र घ्या किंवा दुसरें कोणतेंहि घ्या, त्यांतील कथानक सर्व आबालवृद्धांस बहुधा माहितीचें असतें; व क्वचित् कोणाला नसलें तरी त्यांतील रीतरिवाज, आचारविचार, पात्रें, स्थळें वगैरे अनेक गोष्टी तर आपल्या नित्याच्या ओळखीच्याच असतात;

* हें शेलीचें काव्य इंग्रजी जाणणाऱ्यांच्या पाहण्यांत असेलच. कोणाच्या नसल्यास तें त्यांस Palgrave's Golden Treasury, Book IV यांत पद्य ४४ स मिळेल.

यामुळें तें नाटक समजण्याला तादृश अडचण पडत नाहीं. तशी प्रकृत नाटकाची गोष्ट नाहीं. यास्तव, अथपासून इतिपर्यंत सर्व नाटकाचें पर्यालोचन करून, स्थलविशेषीं जें कांहीं सांगण्यासारखें असेल तें सांगण्याचें येथें योजलें आहे. ह्याच्या योगानें मूळ नाटक समजण्यास सुलभ पडून, पात्रांचें स्वभाववर्णन व उपसंहारात्मक सामान्य विचार पुढें सादर करणार आहों, त्यांचें ग्रहण करण्याचें सामर्थ्य वाचकांस प्राप्त होईल, असा भरंवसा आहे.

अंक १ ला, प्रवेश १ ला--शेक्स्पियर कवीचें कोणतेंहि नाटक हातीं घेतलें, तरी त्यांत सकृद्दर्शनींच कित्येक विशेष तऱ्हा दिसून येतात. पैकीं एक ही, कीं त्यांत प्रयोगाला आरंभ करावाचा, तो नेहमीं एकदम केला असतो. ह्मणजे दोन किंवा अधिक पात्रें पडद्याबाहेर येऊन, लगेच भाषणाला सुरवात करतात, व त्यांतच, यथावकाश, मागील कथेचा संदर्भ पुढल्याशीं जोडून दिला असतो. अनेक वेळीं तर, भाषणाचा कांहीं अंश बोलून गेला आहे अशी कल्पना करून, बोलत बोलतच, पात्रें प्रवेश करतात. आणि याप्रमाणें नाटकालाच सुरवात होते असें नाहीं; पण कित्येक अंकांना व प्रवेशांना देखील अशीच सुरवात करण्याची त्याची रीत आहे. प्रकृत स्थळींच पहा; पडदा उघडून एकदम नाखवा व तांडेल यांच्या तुफानांतल्या गडबडीला सुरवात झाली. आहे. ही एक तऱ्हा झाली; दुसरी अशी कीं कित्येक नाटकांच्या आरंभींचा पहिला प्रवेस बहुधा धामधुमीचा, गडबडीचा, मारामारीचा असा कांहींतरी धांगडधिंग्याचा असावयाचा. उदाहरणार्थ प्रकृत नाकट घ्या, अथवा रोमियो आणि ज्यूलियट घ्या, किंवा आयेल्लो घ्या. हीच आपल्या इकडील तऱ्हा पाहिली तर प्रथम मंगलाचरणाशिवाय बहुधा चालावयाचेंच नाहीं; पुढें गणपतिसरस्वतींचा प्रसाद, व लगेच सूत्रधार आणि विदूषक या दुकलीच्या बडबडींत नाटकसूत्राचें दिग्दर्शन, असा थाट असावयाचा. आणि संस्कृत पद्धतीप्रमाणें ह्मटलें तरी नांदीपूर्वक नटीसूत्रधारांच्या मुखानें नाटकसूत्राची प्रस्तावना व्हावयाची. आतां,

ह्या सर्वांतहि मुख्य हेतु पाहिला, तर इतकाच कीं वाचकांस व विशेषतः प्रेक्षकांस पुढील नाट्यकृत्याचें ग्रहण करण्यास जागें करावयाचें. हा हेतु दोनहि तऱ्हांनीं सिद्धीस जाण्यासारखा आहे, यांत शंका नाहीं. तथापि यांतून कोणती तऱ्हा बरी, हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. त्याविषयीं विशेष विवेचन पुढे केव्हांतरी करण्यांत येईल. तूर्त सांगावयाचें तें इतकेंच कीं संस्कृत पद्धत विशेष प्रौढ व संभावितपणाची आहे खरी, तरी ती नाटयदृष्टीनें फारच मंद, शांतपणाची व अवजड दिसते; आणि शेक्स्पियर कवीची पद्धत जगांतील व्यवहारास विशेष अनुसरून आहे हें कोणालाहि कबूल करणें भाग आहे.

शेक्स्पियर कवीच्या नाटकांत आरंभींचा पहिला प्रवेश हा केवळ प्रस्तावनेदाखल असल्या कारणानें, त्यांतील भाषणांच्या द्वारा बहुधा कोणतेंतरी पुढील नाटयकृत्य सूचित करण्याचा त्याचा परिपाठ आहे. पण 'तुफान' नाटकाच्या आरंभींचा प्रवेश तशी कांहींच सूचना देत नाहीं. ह्याचा जो कांही उपयोग दिसतो, तो इतकाच कीं हा आपणास आपल्या सत्य जगांतून काढून, जादूनें भारलेल्या चमत्कारमय प्रदेशांत आणून सोडतो; यापलिकडे यांत कांहींच होत नाहीं. तथापि, एकदंरीनें पाहतां, हा प्रवेश फारच महत्वाचा आहे. ह्यांत जी ही आपली उचलबांगडी होते, ती कांहीं सामन्यापैकीं नव्हे. कारण, एक सृष्टि सोडून दुसऱ्या अद्भुत सृष्टींत जाणें ह्मणजे हा पुनर्जन्माचाच प्रकार झाला. स्थित्यंतर ह्मटलें कीं त्यांत घालमेल उडायाचीच. आणि या वेळची ही घालमेल तरी कवीनें मार्मिकपणें मुद्दामच येथें योजलेली दिसते असें आह्मास वाटतें. एक कुडी सोडून दुसरींत प्रवेश करतांना उडणाऱ्या जीवाच्या घालमेलीहून ही त्यानें कमी दाखविली नाहीं, यांत त्यानें सृष्टिनियमांचा व ह्या प्रसंगाचा मेळ घालून, दोहोंचेंहि उत्कृष्ट प्रतिबिंब वठविलें आहे.

ह्या प्रवेशांत तुफानाचा देखावा आहे, व दर्यावर्दी कोळयांचीं भाषणें आहेत. देखाव्याचें वर्णन कवीनें यांतच घालून, सर्व गर्दी न करतां, तें चातुर्यानें पुढील प्रवेशांत मिरांडेच्या व पुढें एरिलाच्या

तोंडीं घातलें आहे. यांत फक्त तुफानामुळें उडालेल्या कोळयांच्या धांदलीचें व त्यांच्या जीवावरच्या धाडसाचें केवळ प्रदर्शन त्यांच्या भाषणद्वारा केलें आहे. कोळयांची भाषा लक्ष देण्यासारखी आहे. तिच्यांतील दांडगेपणा, राकटपणा, बेपर्वाई, मर्दुमकी, धाडस वगैरे विशेष कांहीं विलक्षण आहेत. त्यांची सत्यता व खुबी समुद्रकांठच्या प्रत्येक माणसाच्या पुरी ओळखीची आहे. देशावरल्या वाचकांस मात्र यांतलें मर्म एवढें भासणार नाहीं. त्यांना समुद्राची-सृष्टिनिर्मित ह्या विस्तीर्ण जलाशयाची व त्यावरील तुफानाची कांहींच कल्पना नसेल. पण कोंकणपट्टींतल्या मंडळीस हें वर्णन व हीं भाषणें फारच हृदयंगम वाटतील यांत शंका नाहीं. यांतील शेक्स्पियर कवीचा नाखवा हा कसला अगडबंब दर्यावर्दी आहे! गुलामाला भय कसें तें माहीतच नाहीं; संकटाची पर्वा नाहीं; जीवाची काळजी नाहीं. तो आपल्या कामांत पुरा माहितगार व पुरा कसलेला; आपल्या ठिकाणीं आपली योग्यता व कर्तव्यता पुरी ओळखून वागणारा; आपल्या कामांत कोणी आडवा येऊन ढवळाढवळ करूं लागेल, तर तो कितीहि मोठा असो-प्रत्यक्ष राजा असो, त्याचा मुलाजा न राखणारा; खणखणीत स्वरानें सणसणीत हुकूम फर्मावणारा असा आहे. आणि असें हें चित्र केवळ सात आठ भाषणांतच कवीनें रेखाटलें आहे! ह्या अडदांड नाखव्याला 'सरकार स्वारी गलबतावर आहे हें लक्षांत ठेव, ओरडूं नकोस' ह्मणून ह्मटलें असतां, तो काय ह्मणाला?-'व्हय, थोरले महाराज साहेब आहेत; आहे ठाऊक! एवढे गुरकावतां कोणावर? मोठे सरदार ह्मणवितां, मग कराना ह्या वाऱ्याचा बंदोबस्त आपल्या हुकुमानें, आणि होऊं द्याना चहूंकडे सामसूम! खुशाल तुमचा अंमल चालवा. पाहूं द्या एकदा मजा.-कां, आटपलें?-महाराज, एवढा वेळ जीवंत राहिलां हेच उपकार माना; जा आतां, आपल्या खोलींत जा!"* हें उत्तर किती खुबीदार व कसें व्यवहारज्ञतेचें दर्शक आहे! यांत, ईश्वरनिर्मित पंचमहाभूतांपुढें राजा प्रजा,

* 'तुफान' अंक १ प्रवेश १ ला पहा.

सान थोर, व राव रंक, सर्व सारखे, ही वास्तविक गोष्ट दर्शवून, राजांची व राजाश्रितांची प्रतिष्ठा गाणाऱ्या तोंडपुज्या लोकांना व स्वतां अशी प्रतिष्ठा मिरविणाऱ्या दुर्मद राजांनाहि कसा नाजूक टोमणा मारला आहे! आणि खरेंच, पंचमहाभूतांचीच सत्ता ज्याला ठाऊक व त्यांच्याच सत्तेखालीं जो लहानाचा मोठा झाला, त्याला दरबारी भाषणाचें मार्दव कशाला हावें? व खाशा स्वारीची तरी पर्वा कशाला असावी? असा हा शेक्स्पियर कवीचा नाखवा आहे; आणि तुळाजी आंग्रे व आनंदराव धुळप यांस इंग्रज इतिहासकारांनीं चांचे ह्मणून ह्मटलें आहे, तरी हे दर्यावर्दी मराठे सरदारहि असेच होते! † त्यांच्या धाडसाची व मर्दुमकीची जाण त्यांचे धनी पेशवे यांनीं तर त्या वेळीं जाणलीच व बूजहि राखलीच; पण त्यांच्या ह्या गुणांची प्रशंसा कोणी केव्हांहि करील, यांत शंका नाहीं. शेक्स्पियर कवीच्या नाखव्यानें जसा राजवैभवाचा तसा वरील मराठे दर्यावर्दी सरदारांनींहि वेदोक्त कर्माचा हेवा न करतां, स्वकर्मांतच निरंतर रत राहून तलवार गाजविली! यास्तव, प्रस्तुत प्रसंगीं गांझेलो यानें ह्मटल्याप्रमाणें, कोणालाहि अशा "धटिंगणाच्या बोलण्याचा राग" * येणार नाहीं; इतकेंच केवळ नाहीं, पण "आपल्या नशीबाचा तर, अशा (तुफानाच्या) कासांत उपयोग नाहींच; तेव्हां यांचें नशीब तेंच आमचें दोरखंड! हा गुलाम असा राकट जर नसता तर खचीत पुरीं शंभर वर्षें भरलीं होती" *असें समजून, सर्वांच्या तोंडून त्यांचे जयजयकारच निघतील! याठिकाणीं 'शाकुंतलां'तील कोळ्याची आठवण वांचकांस सहजच होईल, व त्यानें यज्ञाच्या वेळच्या ब्राह्मणांच्या निर्दयात्वास्तव त्यांस जो टोमणा मारला आहे त्याचेंहि स्मरण झाल्यावांचून बहुशः राहणार नाही. पण शेक्स्पियर कवीचा दर्यावर्दी कोळी कोणीकडे, व कालिदासाचा नगरकरी मासेमारू कोळी कोणीकडे? कालिदासानें राजवाड्यांत राहून, जशी राजवाड्यांतली शकुंतला वनांत नेली आहे,

---

† विविधज्ञानविस्तार, पु. ८, अंक ३, पृष्ठ ५४ येथें 'धुळपावरचा पोवाडा' व त्यास पेशव्यांचीं पत्रें दिलीं आहेत तीं पहा.

* तुफान, अंक १, प्र, १ पहा,

तसा वन्यवृत्ति हा कोळीहि नगरकरी करून टाकला आहे. यावरून, कालिदासास 'राजवज्यांतला कालिदास' ह्मणावें असें जें आमच्या एका मार्मिक मित्राचें ह्मणणें आहे तें खरें दिसतें. पण शेक्स्पियर कवीनें मात्र सृष्टिधर्मांचें अवलोकन करून, जशी खरी निर्जन प्रदेशांतली सोंवळी मिरांडा आणली आहे तसा कोळीहि खरा दर्यावर्दी आणला आहे. तथापि दोघेहि कवि स्वकर्मांत पुरे निपुण असल्यामुळें, दोघांहि कोळ्यांच्या भाषणांतील टोमणा-एकाचा राजवैभावाविषयीं व एकाचा ब्राह्मणांच्या अनुकंपामृदुत्वाविषयीं—सारखाच तीव्र, समर्पक व यथार्थ होय.*

वर ह्मटलें आहे कीं या आरंभींच्या प्रवेशांत कवीनें पुढील नाट्यसूत्राचा मागमूस फारसा ठेवलेला नाहीं. तथापि, सर्व नाट्यकृत्याला मुख्य कारणीभूत जें अन्टोनियोचें पात्र व त्याचा जोडीदार जो सिबास्टिन, या दुकलीची ओळख वाचकांस येथें आरंभींच त्यानें करून देऊन, त्यांच्या स्वभावाचें व वर्तनाचेंहि दिग्दर्शन केलें आहे. तें असें कीं अन्टोनियो हा जसा मनानें दुष्ट व वर्तनानें ठक, तसा सिबास्टीन हा पोरकट व मूर्ख असून, ज्येष्ठ भ्रात्याच्या कृपाछत्राखालीं वाढलेला व लाडांमुळें शेफारलेला असा आहे. ह्मणूनच, कावेबाज अन्टोनियो हा त्याचें प्रत्येक बोलणें झेलून धरून, वेळीं अवेळीं त्याला पाठबळ देऊन, व त्याची नेहमीं मनधरणी करून, त्याला आपलासा करून टाकीत आहे; असें त्याचें धोरण येथूनच दिसत आहे. तात्पर्य, सिबास्टीन यानें नाखव्याला एक शिवी दिली कीं अन्टोनियोनें दहा दिल्याच, असें येथें आपण पाहतों; व हाच प्रकार पुढें दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतहि कवीनें मुद्दाम साधलेला आढळतो, तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. याचप्रमाणें गांझेलो हें

---

* वरील टोमणा असा:—

सहजं किल यद्विनिंदितं
न खलु तत्कर्म विवर्जनीयम् ।
पशुमारणकर्मदारुणो
अनुकंपामृदुरेव श्रोत्रियः ।

शाकुन्तलम् । ६।१।

पात्र जरी द्वितीय-तृतीय प्रतीचें आहे, तरी त्याचा प्रकृतिदुर्बळपणा व गोडबोलेपणा यांचाहि संसूचन कवीनें येथूनच करून ठेवलें आहे. याच गुणांला पुढें सात्विक वृत्तीचा प्रास्पेरो (पृष्ठ१६ व फिरून पृष्ठ१२३) 'सज्जनपणा' व 'भलेपणा' ह्मणून ह्मणतो आणि लबाड अन्टोनियो (पृष्ठ ५५) गांझेलो याला 'खुशामती' व 'वडबड करणारा भाट' ह्मणून समजतो, हीहि गोष्ट लक्ष देण्यासारखी आहे.

शोध—पृष्ठ २, ओळ २ येथें एक वाक्य दृष्टिदोषामुळें राहून गेलें आहे. तें असें:—"मात्र आमच्या गलबताला फिरण्याला पुरेशी रिकामी जागा असावी ह्मणजे झालें." हे शब्द 'भीत नाहीं' याचे पुढें वाचावे.

पृष्ठ ४ यावर गांझेलो याच्या भाषणांत गलबताला द्रोणाची व गलबताच्या अस्थिरपणाला शिंदळेच्या मनाची उपमा दिली आहे, तत्संबंधानें 'ही दृष्टांतपद्धति मराठींत अंमळ नवी आहे' असें सांगून, इंदुप्रकाशकार ह्मणतात:-"भाषांतर शब्दांचें करावयाचें नाही; अर्थाचें करावयाचें आहे. दृष्टांत दिलेले असतात, तेहि अर्थाच्या विशदीकरणार्थ दिलेले असतात............आणि या दृष्टांतांचा परिपाठ राष्ट्राच्या संवयी, समजुती, धर्म, रीतिभाती आणि भाषेची धृति यांवर अवलंबून असतो." * हें अगदीं खरें आहे; पण ह्या उपमांत वरील कोणत्याहि गोष्टींचा भंग होतो असें वाटत नाहीं; इतकेंच नाहीं, पण गलबताच्या भंगुरत्वाचें व पाण्यावरील त्याच्या हेलकाव्यांचें उत्कृष्ट संभावन होतें, असें आह्मास वाटतें. हे दृष्टांत नवे असतील कदाचित्; तथापि नवे दृष्टांत घेऊं नयेत असें कोठें सांगितलें आहे ? तशांत वरील दृष्टांत इतके समर्पक आहेत, कीं त्यांचा बोध तत्काळ व्हावयास कांहींच अडचण दिसत नाहीं. खेरीज, येथें भाषांतरहि 'अर्थावर' व 'रीतीभाति समजुती' वगैरे यांवर धोरण ठेवूनच केलें असल्यामुळें, मूळांत जेथें nutshell असा शब्द आहे

---

* इंदुप्रकाश, ता. १६ एप्रिल १९०३ पहा.

तेथें आह्मी ' नरोटी ' वगैरे अश्लील शब्द न घालतां, बदलून 'द्रोण' शब्द मुद्दाम घातला आहे, हें 'इंदु'तील टीकाकाराच्या लक्षांत नाहींसें दिसतें. आतां, ही उपमा नवी असली तरी सहज सुचणारी आहे, हें दाखविण्यासाठीं, एक उतारा, मूळांत कर्त्यांचे वेडेवांकडे वाटले ते शब्द फिरवून, येथें घेतों. ह्या उताऱ्यांत तुफानाचेंच वर्णन असल्यामुळें, या प्रवेशांतील देखाव्याची कांहीं कल्पना त्यावरून होईल व पुढील प्रवेशांतील मिरांडेच्या भाषणांतल्या वर्णनाचीहि सत्यता दिसून येईल, असें वाटतें. तो उतारा असाः—

उठे लाट मोठी समुद्रीं, झरारा
चढे फेस, लागे अति द्वाड वारा.
कडाडा शिडें वाजती, थोर डोलें;
जळीं, द्रोण तैसें, जहाजास झालें!
सुकाणू फिरेना, हटे मागमागें;
जरा जोर देतां जळीं जाऊं लागे.
सुटे धीर, पाणी उडे उंच जेव्हां,
गमे स्वर्गपाताळही एक तेव्हां!
वरी मस्तकीं सर्व आभाळ काळें
फिरों लागतीं, पाहतां, शीघ्र डोळे.
शिरे आंत पाणी,–अहा! घात झाला;
तुटे शीड!–हा मृत्यु चालून आला!

कुंटे–कृत 'राजा शिवाजी'.

वरील पद्यांतलि द्रोणाची उपमा कदाचित् आधुनिक कवीची ह्मणून आक्षेप घेण्यास जागा आहे; पण शिंदळेच्या मनाची उपमातर नवी आहे असें ह्मणतां येणार नाहीं. शिवाय, तींत अमूर्त वस्तूशीं मूर्त वस्तूचें साम्य दाखविण्यांत एक प्रकारचा चमत्कार आहे, तो तर फारच हृदयंगम आहे. शूद्रक कवि ह्मणतो:–

वाप्यां स्नाति विचक्षणो द्विजवरो मूर्खोऽपि वर्णाधमः
फुल्लां नाम्यति वायसोऽपि च लतां, या नामिता बर्हिणा।

ब्रह्मक्षत्रविशस्तरंति च यया नावा, तयैवेतरे
स्त्वं वापीव लतेव नौरिव जनं वेश्याऽसि सर्वं भज ॥*

मृच्छकटिकम् १। ३२।

विषय कोणताहि असो, आपण जर लेखक म्हणवितों, तर त्यावर एका टांकासरसें खरडतां आलें पाहिजे अशी पुष्कळांची समजूत आहे, व असें आपणास येतें अशी कित्येकांस मोठी घमेंड असते. पण हा केवढा मूर्खपणा आहे, हें कोणासहि सांगणें नलगे. शेक्स्पियर कवींची रीत अशी नव्हती. तो मोठा पंडित नसला तरी त्याची बुद्धि कुशाग्र होती, व जो विषय आपल्या नाटकांत घालावयाचा त्याची पुरी माहिती आधीं करून घ्यावयाची अशी त्याची रीत होती, हें, प्रकृत प्रवेशांत जें नाविक ज्ञान त्यानें प्रगट केलें आहे, त्यावरून स्पष्ट दिसतें. पहा, कीं यांत दिलेली माहिती अगदीं बिनचूक आहे, इतकेंच नाहीं, तर यांत जे कित्येक पारिभाविक शब्द आले आहेत तेंहि जसे असावे तसे आहेत; आणि गलबत वल्हावण्याचे कामांत जे हुकूम मुख्याच्या मुखानें इतर नावाड्यांस देवविले आहेत, ते तर एखाद्या आनुभविक कुशल मुख्याला शोभतील असेच अगदीं आहेत, असें चांगल्या चांगल्या वाकबगार नौकाधिपतींचें मत झालें आहे. †

---

* याचें मराठी भाषांतर रा. रा. परशुरामपंत गोडबोले यांनीं केलें आहे तें असें :—

वापींत द्विज शूद्र मूर्ख चतुर स्नानास संपादिती
ज्या नावेंत नरेंद्र विप्र बसले त्या अन्यही बैसती।
मोरें जी वरिली लता तिजवरी गे कावळाही बसे
वापी, नाव, लता, तशीच गणिका सर्वांस भोग्या असे ॥ ३७

† शेक्स्पियर कवीच्या कृतींत कोठें चूक अथवा उणेपणा असूच नये व नाहींहि याविषयीं त्याच्या भक्तांचा मोठा कटाक्ष आहे. याचें एक उदाहरण मागें (पृष्ठ ९०) आलें आहे, व पुढेंहि वारंवार येतीलच. त्यातलें सध्याचें एक आहे.

अंक १ ला, प्र. १ ला.—पहिला प्रवेश जेवढा धांदलीचा व ओरडाओरडीचा, तेवढाच हा शांततेचा व सौम्यपणाचा आहे; यामुळें हा त्याच्या मोकाबल्यानें फारच खुलतो. येथूनच प्रास्पेरोच्या व तद्वारा कवीच्याहि जादूला प्रारंभ झाला ह्मणावयास चिंता नाहीं. नाटकांतील मुख्यपात्रें प्रास्पेरो, मिरांडा, एरिल व कालीबन ह्या चौघांसहि याच प्रवेशांत कवीनें आणून, त्यांच्या मुखानें 'भारलेल्या निर्जन बेटा'चा मागील इतिहास युक्तीनें व्यक्त केला आहे. आटपशीर आणि पुनः अगदीं सरळ रीतीनें इतिहास सांगण्याची ही कवीची हातोटी फार मासलेवाईक आहे. 'बारा वर्षें झालीं-मिरांड, पुरीं बारा वर्षे झालीं' असे, सुस्कारा सोडून, काढलेले उद्गार कानीं पडतांच, कोणाचें अंतःकरण सद्गदित होत नाहीं ? असाच नमुना 'भ्रांतिकृत चमत्कार' (*The Comedy of Errors*) यांतपहिल्या अं. २ प्रवेशांत राजाला इज्यन आपली कर्मकथा सांगत असतांना, दृष्टीस पडतो. हीं दोन नाटकें, मुख्यत्वे करून, प्राचीन ग्रीक नाट्यपद्धतीस अनुसरून लिहिण्याचा कवीचा हेतु असल्या कारणानें, ग्रीक नाटकांतल्या कोरस (chorus) * च्या ऐवजीं ही योजना त्यानें केलेली दिसते. आतां ह्या हकीगतीनें ह्या लांबच लांब प्रवेशाचें तीन

शेक्स्पियर कवीच्या नाविक ज्ञानाविषयीं प्रख्यात पंडित डा० जान्सन यानें शंका घेऊन ह्मटलें आहेः—'In this naval dialogue, perhaps the first example of sailor's language exhibited on the stage, there are, as I have been told, some inaccuracies and contrary orders." याचें खंडन करून, सेकंड लार्ड मल्ग्रेव्ह यानें असें सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं शेक्स्पियर कवीचें ज्ञान परिपूर्ण असून, त्यानें नाखव्याच्या मुखानें फर्माविलेल्या हुकुमांत नांव ठेवण्यास अगदीं जागा नाहीं.

* हें कोरस ह्मणजे गाणारमंडळीचें असे; व त्याचें काम, आपल्या इकडील पौराणिक नाटकांतल्या सूत्रधाराप्रमाणें, गाऊन, अवश्य तेथें मागील पुढील कथासूत्र सुचविण्याचें होतें.

चतुर्थांश व्यापले असल्यामुळें, प्रयोगसमयीं हा प्रवेश कांहींसा कंटाळवाणा होण्याचा संभव आहे. तथापि यांत कवीनें, संभाषणाची तर्तरी ठेवून, व अभिनयाची विविधता साधून, मनोवेधकता आणण्याचा झाला तेवढा यत्न केला आहे. तो असा, कीं प्रास्पेरोचें पूर्ववृत्त, 'करुणमूर्ति' मिरांडेचे कोमलवृत्तिसूचक शंकाप्रश्न, एरिलाच्या मुखानें तुफानाचें वर्णन, त्याचें पूर्ववृत्त, कालीबनाचें अवतारचरित्र, व शेवटीं फर्डिनांड व मिरांडा यांची दृष्टादृष्ट होऊन प्रेमबंधनाचा चमत्कार, अशा अनेक गोष्टींच्या द्वारा, शृंगार, वीर, करुण, अद्भुत, बीभत्स इत्यादि रसांच्या मांत्रिक मिश्रणामुळें, हा प्रवेश, एकंदरीनें फारच गोड झाला आहे.

यांतल्या पहिल्याच भाषणांत मिरांडेच्या स्वभावाचें चित्र रेखलें गेलें आहे. 'पाण्याचा खळवळाट' व 'प्रचंड लाटा' पाहून, तिच्या जिवाची झालेली त्रेधा, वादळाच्या व क्षणिक वैद्युत तेजाच्या कारणाविषयीं तिची विलक्षण कल्पना, न पाहतांहि 'छांदार गलबत' व 'त्यांत चांगलीं माणसें' असल्याविषयीं तिची उपजत बुद्धीनेंच झालेली कल्पना, किंकाळ्या ऐकूनच तिच्या सदय मनाची परदुःखदुःखित वृत्ति, वादळ शांत करण्याविषयीं बापाला तिची लडिवाळपणाची प्रार्थना, व 'शेवटीं आपणापाशीं दैविक शक्ति असती तर अगोदर ह्या दुष्ट समुद्रालाच गाडून टाकण्या'ची तिची तयारी—ह्या सर्व गोष्टींनीं तिच्या कोमल, मधुर, निष्पाप, निर्मळ, पोरकट व लडिवाळ मनोवृत्तींचें उत्कृष्ट उद्भावन होतें. खेरीज, यांत कवित्वशक्तीचीहि अगदीं कमाल झाली आहे.

येथून पुढें, एरिल प्रवेश करीतोंपर्यंत, प्रास्पेरो व मिरांडा ह्या दोघांमध्यें जो संवाद होतो, तो विशेष लक्ष देण्यासारखा आहे. एकतर, यांत त्यांचा पूर्वेतिहास गोंविला असून, प्रास्पेरो हा केवळ, इतर सामान्य, क्षुद्रबुद्धि जादुगिर, गारोडी, व मांत्रिक यांजप्रमाणें, आपल्या तिरस्कारास पात्र होत नसून, कांहीं वेगळ्या प्रतीचा मनुष्य आहे, असें

नजरेस येतें. त्यानें मंत्रविद्या साध्य करण्याचा यत्न चालविला होता, तो इतरांस छळण्यासाठीं, लुबाडण्यासाठीं, व अनन्वित कृत्यें करून स्वतांचें हित करून घेण्यासाठीं नव्हे, तर केवळ जिज्ञासेमुळें किंबहुना परोपकारार्थच चालविला होता, असें मानावयास जागा आहे. व शेवटीं तिचा जो उपयोग त्यानें केला, तोहि, पितृवात्सल्यानें प्रेरित होऊन, आपल्या कन्येच्या हितार्थच केला. यावरून त्याचें थोर मन, व तितकीच थोर आणि गंभीर त्याची वागणूक, प्रगट होते. आतां, नाट्यवस्तूचें उद्भावन होईल असें कोणतेंहि कृत्य येथें घडत नाहीं, किंवा असें कृत्य घडण्याला या हकीगतीनें मदत होते असेंहि नाहीं, हें खरें; तरी नाट्यकृत्याचें आकलन करतां येण्याला, ही माहिती फार उपयोगाची आहे. ही माहिती, इतर ठिकाणीं कोठेंहि देतां आली नसती, व प्रास्पेरो-वाचून कोणाच्यानेंहि सांगतां आली नसती. आज बारा वर्षें कोणास न कळवितां व तत्संबंधानें ब्रहि तोंडावाटे न काढतां, ती त्यानें आपल्या हृदयाच्या आंत सांठवून ठेविली होती. अशी ही माहिती प्रगट करण्याला समयही फार योग्य असा निवडून काढला आहे. याशिवाय, दुसरी गोष्ट अशी कीं येथें मिरांडेच्या तोंडीं जीं भाषणें घातलीं आहेत, त्यांतल्या प्रत्येकांत तिच्या स्वभावाच्या पेटीचा एकेक खण जणों खुला होत आहे, पहा, बापाच्या तोंडची हकीगत ऐकतां ऐकतां तिचे निघालेले कोमल हृदयोद्गार, तिच्या मनांत उद्भवलेले अनेक तर्कवितर्क, तिनें जिज्ञासे-मुळें केलेले शंकाप्रश्न, या सर्वांचें जों जों मनन करावें, तों तों मिरांडेचें चित्र अधिकाधिक स्पष्ट होत जाऊन, तिची चालती बोलती मूर्ति आपल्या अंतःकरणांत उभी राहते!

मिरांडेच्या पहिल्या भाषणावर टीका वर आलीच आहे. पुढें, दुसऱ्या व तिसऱ्या भाषणांत, तिचा सरळपणा; चवथ्यांत, तिचा स्त्रीस्वभाव-जात दुर्बळपणा; पांचव्या, साहाव्या, व सातव्या भाषणांत, तिची पोरपणची फुशारकी; आठव्यांत, थोड्याशा माहितीवरूनहि तर्कशक्ति जागृत होऊन तिनें जी भलतीच शंका घेतली आहे तेणेंकरून व्यक्त होणारा तिचा अल्लडपणा; नवव्यांत व दहाव्यांत, राजकन्योचित आपलें

वैभव गेलें ह्मणून नव्हे, तर बापाला आपल्या निमित्त झालेल्या तापाविषयीं तिचा शोक; अकरा ते चवदापर्यंतच्या भाषणांत, तिची एकचित्तता; पंधराव्यांत, आपल्या आजीविषयीं तिची तरफदारी; सोळाव्यांत, दुःखाच्याच केवळ श्रवणानें दुःखित होण्या इतकें तिचें कोमल मन-या सर्व गोष्टी येथें किती समर्पक व मार्मिक रीतीनें आणिल्या आहेत, याचा विचार प्रत्येकानें आपल्याच मनाशीं करावा. याविषयीं कितीही लिहिलें तरी भाषा तोकडी पडते, हें कबूल करणें भाग आहे.

येथें पंधराव्या भाषणाविषयीं दोन शब्द वेगळे लिहिले पाहिजेत. कारण, यांत मिरांडेनें आजीची जी तरफदारी केली आहे, ती कितपत समर्पक आहे याविषयीं कित्येकांस शंका येण्यासारखी आहे. निबंधमालाकार लिहितातः-"मिरांडेचें हें बोलणं नायिकेच्या शालीनतेस अत्यंत विघातक असून, शिवाय स्वभाववर्णनासहि अगदीं विरुद्ध आहे. कांकीं, जी केवळ निर्जन बेटांत जन्मली असून, नायकाच्या प्रथमदर्शनाच्या वेळीं, त्यास सुंदरसें पिशाच समजली, तिला स्त्रीपुरुषसमागमाची, आणि त्यांतून व्यभिचाराची कल्पना व्हावी हें अगदीं संभवत नाहीं! तशांत, असली अप्रयोजक कल्पना आपल्या आजोच्या संबंधानें करून, ती खुशाल मौजेनें झोकून द्यावी हें इंग्लिश लोकांच्या आचारास व सभ्यतेस मात्र शोभसें आहे!" * ह्या संबंधानं एवढेंच लक्षांत ठेवण्यासारखें आहे, कीं मिरांडा ही निर्जन बेटावर वाढली असल्यामुळें 'शकुंतले'प्रमाणें वन्यवृत्ति खरी, तरी प्रास्पेरोच्या हाताखालीं तिला जें शिक्षण मिळालें होतें, तें, गुहेंत कोंडलेला राजपुत्र रासेलस व राजकन्या यांच्याहून कमी नसून, 'तसें फारच थोड्या राजकन्यांच्या वांट्यास येत असेल' असें (पृष्ठ १६ पहा) स्वतः प्रास्पेरोच्याच मुखानें कवीनें वदवून ठेवलें आहे. यास्तव, तिला व्यभिचाराची वगैरे कल्पना अगदींच नसेल असें ह्मणतां येत नाहीं. तिनें जग प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें एवढेंच कायतें; बाकी, आपल्याकडील एम्. ए.ला जेवढी विलायतेंतल्या व्यवहाराची, तेवढी जगांतल्या व्यवहाराची शाब्दिक माहिती तिला ख-

* निबंधमाला—अंक २३— टेंपेस्ट नाटकावर टीका.

चित असावी, असें मानावयास जागा आहे. आतां 'नायिकेची शालीनता' व 'इंग्लिश लोकांचा आचार व सभ्यता' याचा विचार पुढें अंक ४ येथें येणार आहे, ह्मणून येथें कांहींच लिहित नाहीं; तथापि हे उद्गार फारच मार्मिक व समयाला अगदीं समर्पक असे आहेत असें ह्मटल्यावांचून मात्र राहवत नाहीं.

सूचना:-या संवादांतील कांहीं वाक्यें व कल्पना नवीन असल्यावरून त्यांचा येथें निर्देश करितों. "एकक क्षण तुला ह्मणत आहे–'मिरांडे' ऐक" हा (पृष्ठ ८) संबोधनाचा विशेषप्रकार; "मागला काळ ह्मणजे अंधारानें भरलेला अपरंपार खोल खाडा" ही (पृष्ठ ८) कल्पना; "हें माझ्या राज्यवृक्षावर वाढलेलें बांडगूळ" हे (पृष्ठ ९) अन्टोनियोविषयीं काढलेले उद्गार; खोटें बोलण्यांत "निष्पाप आठवणीला पापांत लोटण्या"ची (पृष्ठ ११) कल्पना; "अश्रुबिंदूंनीं (हे नेहमीं खारटच असतात) समुद्रास भरती आणण्यां"तली (पृष्ठ ११) अतिशयोक्ति—हे सर्व प्रकार लक्ष देण्यासारखे आहेत.

नंतर एरिल प्रवेश करितो. एरिल हें पात्र कवीनें केवळ स्वकल्पनेनें निर्माण केलें आहे. हें या नाटकांत मुख्यांपैकींच असल्यामुळें, त्याची बरोबर कल्पना वाचकांस होणें व ती त्यांनीं करून घेणें अवश्य आहे. मूळ हें नांव air वारा, वायु, हवा, आकाश या अर्थाच्या ग्रीक शब्दापासून निघालें आहे. इंग्रजींत याला spirit अथवा sprite ह्मटलें आहे. पण sprite ची व आपल्यांतील भूतपिशाचादिकांची कल्पना अगदीं वेगळी आहे. मृत मनुष्याच्या आत्म्याला स्पिरिट शब्द लावित असल्यामुळें, आपल्या इकडील भूतपिशाचादिकांप्रमाणें भयोत्पादनाची कल्पना त्यांतहि आहे. पण 'स्पिरिट' ची कल्पना तीहून कांहीं उंची आहे, आणि शेक्स्पियर कवीची 'एरिल'ची कल्पनातर यादोहोंहूनहि उंची आहे. तेव्हां, प्रस्तुत प्रसंगीं 'स्पिरिट' शब्दाला मराठींत काय प्रतिशब्द ठेवावा, ह्मणून विचार केला असतां, पंचाईत येऊन पडते. भूतपिशाचादिकांची कल्पना तर

फारच हिडिस. या नाटकांत 'स्पिरिट्स'चें 'कामरूपत्व' 'गानपटुत्व' वगैरे जे गुण दर्शविले आहेत, त्यांवरून पाहतां 'एरिल' याला 'यक्षगंधर्वकिन्नर' वर्गांत घातल्यास चालण्यासारखें आहे. पण 'एरिल' हा शेक्स्पियर कवीनें आपल्या कल्पनाबळानें 'वायुरूप' करून जेवढा उच्च आकाशांत ठेवून दिला आहे, तेवढाच, कालिदास इत्यादि कवींनीं, मेघदूत, कादंबरी वगैरे ग्रंथांतल्या वर्णनांनीं, 'यक्षगंधर्वकिन्नरां'चा वर्ग, त्यांच्या आकाशस्थ चित्रविचित्र ढगांच्या गंधर्वनगरांतून व हिमालयाच्या वनश्रीयुक्त रमणीय दरीखोऱ्यांतून काढून, शरीरबद्ध मानवस्वरूपास आणून पोचविला आहे. अहो, मेघदूतांतल्या यक्षाला पिशाच कोण ह्मणेल? व त्याची स्त्री यक्षीण, तिला 'जखीण' कोण मानील? तात्पर्य, हीं नायकनायिका दोघेंहि, आरोग्य-सुख-कांति यांहीं संपन्न होत्सातीं, आपणासारखीं 'विकारवश' माणसें होत असें भासतें! पण एरिल हा मात्र नांवाप्रमाणें केवळ 'वायुरूप' असून, अशरीर, अदृश्य, अविकारवश, चंचळ, उत्साही, आनंदमय असा कांहीं विलक्षण मनोगम्य प्राणी कवीनें निर्माण केला आहे! याच कल्पनेस अनुसरून स्पिरिट्स ह्मणजे मजेनें पानाफुलांतून संचार करणारे, व पांखरांप्रमाणें मधुर शब्द करीत, वायूच्या लाटांवर तरंगत जाणारे, सपक्ष, अलौकिक प्राणी होत, अशी कल्पना इंग्रजींत सध्यां रूढ झाली आहे. त्यांची कांहीं कल्पना, भूतपिशाचें व यक्षगंधर्वकिन्नर या दोहोंच्या गुणधर्मांचें एकीकरण केल्यानें आपणास प्राप्त होईल, ती ध्यानांत आणून, त्यांचीं जीं वर्णनें पुढें आलीं आहेत तीं वाचावीं, अशी सूचना आहे.

एरिल कोणकोणतीं कृत्यें करण्यास समर्थ आहे, व प्रास्पेरो मंत्रविद्येनें कोणकोणतीं कृत्यें त्याजकडून करवितो, तीं 'आकाशपंथें उड्डाण करायाचें आहे काय?' वगैरे शब्दांनीं येथें सुचविलीं आहेत. मंत्रविद्येचा हा प्रभाव 'हर्ष' कवीनेंहि असाच वर्णिला आहे, तो येथें ताडून पाहण्यासारखा आहे. त्यानें आणलेला गारुडी ह्मणतोः—

" महाराज, आपला जयजकार असो.

आणू चंद्रातें भूतलावरी?। गिरितें उडवूं गगनांतरीं?।
किंवा अग्नितें जळामाझारीं। पेटवूनि दाखवूं? ॥

कीं मध्यरात्रीं दिनकर। कीं मध्यान्हीं निबिडांधकार।
सांग, कोणता चमत्कार। पहावया इच्छितसां ? ॥"
(शिवरामशास्त्री खरे-कृत भाषांतर)
रत्नावली, अंक ४.

एरिलानें केलेलें तुफानाचें वर्णन फारच मजेदार असून, जो कोणी मार्मिक दृष्टीनें वाचील त्याला तें पटणारें आहे. मृच्छकटिकांत ह्मटल्याप्रमाणें 'पेटतां विजांचा दहन' व सागर खवळल्यावर, पाण्यांत वैद्युत तेजाचीं प्रतिबिंबें पडून, सर्वत्र आगी पेटल्याचा भास व्हावा, किंबहुना सर्व सागर पेटलेला दिसावा हें अगदीं संभाव्य आहे.* हीं तुफानाचीं वर्णनें समक्ष पाहिलेल्या प्रवाशांच्या पुस्तकांतूनच बहुधा अक्षरशः कवीनें घेतलीं आहेत; इतकेंच केवळ नव्हे, पण घडलेल्या कित्येक हकीगती सुद्धां जशाच्या तशाच त्यानें दाखल केल्या आहेत. पृष्ठ २० येथें एरिलानें खलाशांची व गलबतांची कशीकाय व्यवस्था लाविली, ती तो सांगत असतां, एवढेंच लक्षांत ठेवावयाचें, कीं जशी सृष्टिनियमांप्रमाणें

---

* या संबंधाचे Stowe's Chronicles मधून उतारे घेऊन, मॅलोन नामें टीकाकार ह्मणतोः—

"There perished above an hundred ships in the space of two hours. Several pamphlets were published on this occasion, decorated with prints of sinking vessels, castles topping on their warders' head &c. One of them, describing the appearance of the waves of Dover, says that 'the whole seas appeared like a fiery world, all sparkling red.' Another of these narratives recounted the escape of Edmond Pet, a sailor, whose preservation appears to have been no less marvellous than that of *Trinculo* or *Stephano*.

तसाच Hakluyts Voyages (1598) मधला पुढील उतारा पहाः—

"I do remember that in the great and boysterous storme of this foule weather, in the night there came upon the toppe of our maine yards and maine masts a certain little light much like unto the light of a little candle, which.............. ....continued aboard our ship about three houres flying from masts."

लागावयाची, तशीच ही व्यवस्था लागली असून, यक्षरूप एरिल यानें मंत्रसामर्थ्यानें ती लाविली असें कवीनें दाखविलें आहे; अर्थात् सृष्टिनियमांच्या व्यापारांवर हें रूपक बसविलें आहे, असेंच हें समजावयाचें.

तसाच, येथें 'तुफानांचें तें माहेरघर-वर्मुडाबेट' याचा उल्लेख आला आहे. यावरून, प्रास्पेरोचें भारलेलें बेट तें हेंच, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पण अल्जीर्स व नेपल्स यांच्या दरम्यान तें कसें येणार वगैरे स्थलनिश्चयसंबंधीं अडचणी त्यावर येण्यासारख्या आहेत. ह्मणून रेव० हन्टर वगैरे कित्येक विद्वानांनीं, अक्षांशरेखांशांच्या खटपटीनें, हें बेट ह्मणजे भूमध्यसमुद्रांतलें लॅम्पेडचूसा होय, असा निर्णय ठरविला आहे. वस्तुतः, प्रास्पेरोचें 'भारलेलं तें बेट', त्याचा पत्ता कसा कोणाला लागावा? अफाट सागरांत तें कोठेंहि तरंगत असेल! आणि कवीनें तरी तें आपल्या मंत्रमय वाणीनेंच निर्माण केलें नसेलसें कशावरून? यास्तव, त्याचा निश्चय करण्याचा भरीस न पडतां, तें तसेंच आपणहि आपल्या कल्पनासृष्टींत तरंगत राहूं द्यावें हें उत्तम!

पृष्ठें २१--२२--२३ यांत एरिलाचा पूर्वेतिहास आला आहे. त्यावरून त्याची स्वातंत्र्यप्रियता, पराधीन राहून परसेवा करण्याचा कंटाळा, त्याची कृतज्ञता, त्याची लीनता, सेवा पत्करल्यावर ती इमानें इतबारें बजावण्याचा त्याचा गुण वगैरे अनेक गोष्टी कळतात.

शोध—पृष्ठ २१ यावर शेवटलें प्रास्परोचें भाषण असें आहे—"ह्मणूनच खारटणांत" इ. याच्या ऐवजीं पुढीलप्रमाणें वाचावें—"ह्मणूनच, मी सांगतों तीं कामें तुला जड वाटतात! पण माझीं कामें तीं काय!—कोठें, खारटणांत चालत जा, ह्मणतों; कोठें, उत्तरेच्या सळसळणाऱ्या वाऱ्याच्या सोसाट्यापुढें उडत जा ह्मणून सांगतों; अथवा कोठें,जमीन बर्फानें व्यापल्यामुळें गारठून गेली असतां,पृथ्वीच्या पोटांत प्रवेश करून कामें करावयास तुला लावतों! ह्या गोष्टी तुला एवढ्या अवघड आहेत काय?" तसेंच पृष्ठ २२ यावर आरंभीं, एरिल "ह्या गोष्टी मला मुळींच आवडत नाहींत" असें ह्मणतो, या ऐवजीं "मला मुळींच अवघड नाहींत" असें वाचावें.

पृष्ठ २४ यांत, प्रास्परोनें एरिल याला नागकन्येचें रूप घेण्यास सांगितलें आहे, याचें कारण एवढेंच दिसतें कीं या नाटकांत स्त्रीपात्रें कमी आहेत, ही उणीव या एका पात्रानें तरी भरून काढावी.

यापुढें कालीबनाचा प्रवेश. कालीबन हा सिकोराक्ष नांवाच्या चेटकिणीचा पोर. सिकोराक्षेसारख्या चेटकिणी व पंचाक्षरी ते वेळीं काय काय कृत्यें करीत, याची कांहीं कल्पना या हकीगतीवरून होण्यासारखी आहे. शेक्स्पियर कवीच्या काळीं इग्लंडांत मांत्रिकांचें व चेटकिणींचें मोठें बंड होतें, व त्यांच्या अद्भुत, व अनेक वेळांतर, अघोर कर्मांविषयीं सर्वत्र बोभाटा होता. सामान्य लोकांचा व मोठमोठ्या विद्वानांचाहि मंत्र-तंत्रांवर मोठा विश्वास असून, ते वेळचा इंग्लंडचा राजा पहिला जेम्स हा बराच विद्वान असून, त्याला याचें एवढें वेड होतें कीं Demonology (पिशाचशास्त्र) यावर त्यानें लिहिलेला एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. पिशाचांत जशीं कांहीं चांगलीं व कांहीं वाईट असत, त्याचप्रमाणें मांत्रिकांतहि सुष्टदुष्ट असा भेद असे. प्रास्परो हा भला होता, पण सिकोराक्ष ही दुष्ट होती. आपल्याकडे मालतीमाधवांत वगैरे अघोरघंट व कपालकुंडला हीं पात्रें कापालिक पंथाचीं आणलीं आहेत, तशींच सिकोराक्ष होय. त्यांचीं कृत्यें मोठीं अनन्वित व घोर आहेत; पण प्रास्परोप्रमाणें कामंदकीसारख्या योगिनी व योगीही कित्येक तेव्हां असत; नाहीं असें नाहीं.

आतां, कालीबन कसा आहे हें पाहिलें, तर त्याच्या ठिकाणीं त्याच्या आईचें चेटूक होतें असें दिसत नाहीं. तो आपले इकडील ठाकूर, कोळी, कातकरी यांच्यासारखा शुद्ध रानटी मनुष्य आहे. इंग्रज लोक आणि सामान्यतः यूरोपांतल्या बहुतेक देशचे लोक, नव्या जगाचा शोध लागल्यापासून, जिकडे तिकडे सफरी करूं लागले होते व नव्या नव्या देशांत जाऊन तेथली माहिती करून घेऊं लागले होते; अशा वेळीं प्रवाशांनीं तिकडील नागव्या उघड्या, कातडीं पांघरणाऱ्या, धिप्पाड, भेसुर, अशा राक्षसवजा रानटी मनुष्यांचीं जीं वर्णनें केलेलीं इंग्लंडांतील लोकांच्या कानांवर येत, त्यांवरूनच मनुष्य जातीचा ...

कवीनें निर्माण करून, आपणापुढें उभा केला आहे. हें पात्र मुख्यापैकींच आहे. कुशल नटानें मात्र भूमिका घेतली असावी, ह्मणजे त्याच्या अडाणीपणाच्या चेष्टा, त्याच्या भाषणांतला कर्कशपणा, त्याचे शिव्याशाप, त्याचा दुष्टपणा–हीं सर्व इतकी विचित्र आहेत कीं त्यांचा विचित्रपणा पाहून हसतां हसतां पुरे पुरे होत. त्याचा कर्कशपणा तर, आपल्या इकडील जाखाई जोखाई मातेच्या नांवानें ओरडणारा वज्राईचा ठाकूर व संखिणी डंखिणी खचीत तोंडांत बोटें घालतील असा आहे!

पृष्ठ २६ व २७ वर कालीबन हा, प्रास्पेरोनें आपणास कसें फसविलें व त्याच्या मानभावीपणाला भुलून आपण कसे फसलों, हें सांगत आहे. त्या वेळचा त्याचा असंतोष ह्मणजे जित व जेते यांच्यामधील असंतोषाचाच एक नमुना आहे. आतां, त्याला क्रूरपणें वागविण्याला प्रास्पेरोसहि कांहींच कारण नव्हतें असें नाहीं. कालीबन हा मूळचाच निर्व्याज पशुवृत्ति असल्यामुळें, मिरांडेशीं त्यानें अप्रतिष्ठेचें वर्तन केलं होतें; व त्याचा उल्लेख प्रास्पेरो करतो तो त्याला धमकावण्याकरतांच करतो; तरी तशा दुर्धर दास्यांत तडफडत असतांहि, त्याला ह्या गोष्टीचें एवढें हसें कोसळतें कीं तें त्याला आवरत नाहीं, व हसत हसतच, 'ह्या बेटावर चोहोंकडे आजला कालीबनच कालीबन करून सोडले असते' असा चावटपणा तो करतो. हा आहे निव्वळ चावटपणा, व तोहि, ह्या कवीच्या शेकडों ठिकाणच्या शिरस्त्याप्रमाणें, अगदीं कडेलोटाचा! तरी पण तो प्रसंगानुरूप व पात्रापात्रविचारास धरून नाहीं असं कोण ह्मणेल? 'गुप्तमंजूष' तल्या 'सुइणींच्या तुकडी'सारखा मात्र चारगटपणाचा हा नाहीं. हेंच चावट भाषण कालीबनावांचून कोणाच्यातरी तोंडांत शोभलें असतें काय? ह्याच्या योगानें त्याची पशुबुद्धि अशी ढळढळीत व्यक्त होते, कीं तशी ती कशानेंहि एवढी व्यक्त झाली नसती धन्यानें हाक मारल्यावर 'ओ' न देतां, 'जळण पुरेसें आहेहो!' असें, पुढें येणाऱ्या प्रश्नाचें पूर्वीच एकदम उत्तर देण्यानें व 'मला आपलें अगोदर जेवून घेऊं द्या–मग हा काय करील तें करील' अशी उदरैकपरायणता दाखविल्यानेंहि, त्याची पशुबुद्धि व्यक्त होत नाहींशी

नाहीं; तरी त्यांतच आणखी ह्या एका प्रबळ मनोवृत्तीची भर करून कवीनें 'आहारनिद्राभयमैथुनच' हें जें पशुवृत्तींचें प्रसिद्ध लक्षण, तें त्याजवर पूर्णपणें लागू करून दाखविलें आहे. आह्मास खास वाटतें, कीं अशी प्रसंगोचित व पात्रोचित चावटगिरी शेक्स्पियर कवीवांचून कोणास साधेल किं नाहीं याची वानवाच आहे !

जित व जेता हा संबंध उत्पन्न झाला, म्हणजे जेता हा जितावर आपलें वर्चस्व टिकावें ह्मणून, त्यास राक्षस कसा बनवितो, अथवा असेंहि ह्मणावें–जित हा राक्षस कसा बनतो, हें प्रोस्पेरो व कालिबन हीं पात्रें आपणास सांगतात. ह्या असंतोषांचें एकच ठळक उदाहरण असें आहे कीं प्रास्पेरोनें आपल्या मतें कालिबनाला चांगली भाषा बोलावयास शिकविली; पण हे उपकार न मानतां, कलिबन त्याला कसें उत्तर देतो पहा–" तुझी भाषा मला शिकविलीस? बरें केलेंस! तुझ्या भाषेनें (तुला समजतील अशा) शिव्या तरी तुला देतां मला येऊं लागल्या !" हें उत्तर ऐकून, इंग्रजी शिकलेल्या आपल्या इकडील विद्वान वर्तमानपत्रकर्त्यांच्या राज्यकर्त्या इंग्रज लोकांविरुद्ध केलेल्या असंतोषजन्य टीकांची कोणास आठवण होणार नाहीं? आपले देशबंधु भरतखंडांत जाऊन, तेथल्या लोकांना राक्षस बनवतील व अशीं भाषणं बोलण्याचा प्रसंग आणतील, हें स्वप्न, जाणों, शेक्स्पियर कवीला मागेंच पडून चुकलें होतें, असें यावरून वाटतें! हें कवीच्या बुद्धिविशालत्वाचेंच एक उदाहरण आहे.

यानंतर, एरिल हा फर्डिनान्ड याला घेऊन येतो, तो गाणें गात गात येतो. या वेळचीं हीं दोनहि गाणीं आपल्या इकडील संकेताप्रमाणें नाहींत. पहिल्यांत भुतें अथवा यक्ष गंधर्व वगैरे सत्वें, चांदण्या रात्रीं, पाहाटे, मैदानावर जमून, मजेनें कशीं गात व नाचत बागडत असतात याचें, मध्यरात्र उलटून गेल्यावरचें, हें वर्णन आहे. व दुसऱ्यांत, समाध मिळाल्यावर राजाच्या शरीराचें कसें रूपांतर झालें त्याचें वर्णन आहे. यांतील समजुती व वर्णनाचे संकेत जसे वर्णिले आहेत, तसेच ते घेऊन चाललें पाहिजे हें उघड आहे. रात्रीच्या प्रहरीं

भुतांच्या अशा प्रकारच्या खेळासंबंधाचें इंग्रजींत एक जुनें गाणें आमच्यां पाहण्यांत आलें, तें मजेदार असून, एतद्विषयक तिकडील कविसंकेत स्फुट करणारें आहे, असें वाटल्यावरून येथें देतों. तें असें:—

THE URCHINS' DANCE.

"By the moon we sport and play,
With the night begings our day;
As we frisk, the dew doth fall;
Trip it, little urchins, all,
Lightly as the little bee,
Two by two, and three by three,
And abo t go we, go we."

याच ठिकाणीं, समुद्राच्या लाटा ('जलसंचयाचे महान् आघात') शांत करण्याचा गुण गायनांत आहे हा संकेत उल्लेखित केला आहे, तो लक्ष देण्यासारखा आहे. पृष्ठ ३० वर 'डोळ्यांच्या झालरीचा पडदा वर उचल' असें प्रास्पेरो मुलीस ह्मणतो, हेंहि डोळ्याच्या पापणिचें रूपक नवेंच पण सुरेख व मासलेवाईक आहे.

फर्डिनान्ड व मिरांडा यांच्या प्रथम दृष्टादृष्टीचा हा प्रसंग फारच नाजुक व हृदयंगम आहे. तिघांच्या हृदयांत तीन प्रकारच्या कशा वृत्ति उत्पन्न होत आहेत व त्या सर्वांचें पर्यवसान अखेर परस्पर-प्रेमबंधनांत कसें होत आहे हें फार फार लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

पृष्ठें ३५ व ३६ येथें 'रक्षणस्थान सोड' या संदिग्ध शब्दांकडे लक्षदिले असतां फर्डिनान्ड याची 'सर्व शक्ति हरण' झाली व त्याच्या 'स्नायूंस फिरून बाल्यदशा प्राप्त झाली' ही सर्व अवस्था, प्रास्पेरोच्या जादूच्या 'ह्या काठीनें' झाली 'किंवा सुंदरीच्या मुखकमळा'च्या प्रभावानें झाली हें सांगणें कठिण झालें आहे; तथापि हें सृष्टिधर्माच्या क्रियेचे व जादूच्या व्यापाराचें ऐक्य जें कवीनें येथें दाखविलें आहे तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अंक २ रा, प्रवेश १ ला—ह्या प्रवेशांत, प्रास्पेरोचे वैरी कशा प्रकारचे मनुष्य आहेत, हें कवीनें आपणास दाखविलें आहे. कपट-पटु अंटोनियो हा सर्व गळेकापूंच्या कंपूत अग्रगण्य असून, दिवसें

दिवसें आपल्या कर्मांत तरबेज होत होत, क्रूरत्वाच्या शिखरावर कसा येऊन पोंचला आहे व त्याला कोणत्याहि दुष्ट कृत्याची चाड कशी वाटेनाशी झाली आहे,हें सर्व येथें आपण पाहतो. त्याच्या नीच कृत्यांत सिबास्टीन हा त्याला एक जोडीदार मिळाला आहे. हा अलांझो याचा धाकटा भाऊ; अंटोनियोप्रमाणेंच आपल्या वडील भावाच्या कृपाछत्राखालीं त्याच्या 'राज्यवृक्षावर वाढलेलें बांडगूळ' हें. अंटोनियो हा जितका लबाड व कावेबाज, तितकाच सिबास्टीन मूर्ख, अजागळ व दुसऱ्याच्या तंत्रानें वागणारा. अंक १ ला, प्रवेश १ ला याच्या पर्यालोचनांत सांगितल्याप्रमाणें, या प्रवेशांतही सिबास्टिनाला चढवून अंटोनियो हा आपला कार्यभाग साधूं पहात आहे. पण आपण अजागळ आहों व हा ठक आपणाला फसवित आहे हें मात्र सिबास्टीनाच्या लक्षांत येत नाहीं! हा सिबास्टीनाचा अजागळपणा त्याच्या भाषणांतही व्यक्त होतो. पहा, जेव्हां तेव्हां तो अंटोनियोची नक्कल करूं पाहतो; पण अन्टोनियोच्या भाषणांतली पकड मात्र सिबास्टिनाच्या भाषणांत दिसून येत नाहीं. दोहोंमधील हा फरक कवीनें मुद्दाम राखला आहे, असें दिसतें. एकंदरीनें, अंटोनियो व सिबास्टीन अर्थात एक महाठक आणि एक निव्वळ अजागळ यांची ही जोडी-एकमेकांच्या सांनिध्यानें फारच खुलते यांत संशय नाहीं.

तुफानांत सांपडून गलबत फुटल्यावर, या प्रवेशांत आणलेली मंडळी भारलेल्या बेटाच्या कांठवर येऊन लागते. तेव्हां, आपण संकटांतून निभावलों याचा आनंद मानून, ते कसे उडत बागडत आहेत व कशी आपसांत थट्टामस्करी करीत आहेत, हें येथें दाखविलें आहे. राजाच्या पदरच्या पण दरबारी मंडळीचा हा पाणचटपणा, ते वेळच्या इंग्लंडदेशच्या जेम्स राजाच्या वाड्यांत नाटक पाहूं आलेल्या दरबारच्या मंडळीप्रमाणेंच, आपल्या इकडल्या राजदरबारच्या लोकांना फारच बहारीचा व ओळखीचा वाटेल यांत शंका नाहीं. या वेळची अंटोनियो व सिबास्टीन यांचीं कोटीक्रमाचीं भाषणें, त्यांच्या तरुणपणच्या विचारशून्य व उत्साही स्वभावास पूर्णपणें शोभेशीं आहेत.

थेथें पहिल्यापासून शेवटपर्यंत चारगटपणाच भरलेला आहे; तरी तो कसा यथावकाश आणला आहे! यांत, अलांझो राजा वृद्ध असून शोकाकुल झालेला दिसत आहे; गांझेलो हा त्याशीं समवयस्क असून, गोड गोड भाषणांनीं त्याचें मन रिझवूं पहात आहे; अंटोनियो हा सिबास्टिनाचें प्रत्येक बोलणें झेलून धरून, त्याला चढवित आहे; सिबास्टीन हा अजागळपणें चढून जाऊन, बेपरवाईनें व निर्भिडपणें चारगटपणा करीत आहे, व प्रत्यक्ष, आपला वडील भाऊ अलझो, यासहि टाकून बोलत आहे; हें सर्व आपण पाहतों. याप्रमाणें यांचा हा धिंगाणा चालला असतां, तो केव्हां संपेल असें झाल्यामुळें, गांझेलो मात्र त्यांच्या बोलण्याचा ओघ पालटून, एक नवाच विषय काढतो; व 'मी जर येथचा राजा असतों तर काय केलें असतें, आहेका ठाऊक?' असें ह्मणून पुढें आणखी सांगतों--'सर्वांना सर्व वस्तूंची सारखी वाटणी करून टाकली असती......मग राजा कोण आणि प्रजा कोण?'

यावर, कोटीबाजपणाचा आव घालून, सिबास्टीन ह्मणतो–'तरी पण तुह्मी राजश्री तेथचे राजेसाहेब होणारच!' याच बोलण्याला पाठपुरावा देऊन, अंटोनियो मुद्देसुत कसा शेरा मारितो, पहा–'राज्य-व्यवस्थेच्या या समीकरणांत शेवटीं वाहतां वाहतां स्वारी मूळपद विसरली!' हें भाषण किती समर्पक व मार्मिक आहे! याची सत्यता व व्यापकता व्यवहारांत नेहमीं अनुभवास येते. पहा, 'राज्यव्यवस्थेच्या समीकरणांत, गांझेलोसारखे शिधे, गोडबोले व भोळवट दरबारी मनुष्यच नव्हत, पण मी-मी ह्मणणारे चतुरस्त्र मुत्सद्दीहि केव्हां केव्हां 'वाहतां वाहतां मूळ पद विसरतात' असें दृष्टीस पडतें! आपली अर्धी कारकीर्द संपवून सध्यां स्वदेशीं रजेवर गेलेले, आपले गव्हर्नर जनरल, लॉर्ड कर्झन, यांनीं जें नुकतेंच एक भाषण आपल्या देशबंधूंपुढें केलें, त्यांतच ह्याचें प्रत्यंतर पाहिजेतर पाहतां येईल. त्यांतून एक लहानसा उतारा आरंभीं 'सुचने'खालीं घेतला आहेच, तोच पूर्वांशासहित समग्र येथें फिरून देतों, ह्मणजे झालें. तो येणें प्रमाणें:—

"My main object during the past few years in India has been identical with that which I take to have been the object of every Governor-General before me, and of every patriotic Englishman who knows India—namely, to render the foundations of our rule in that country more secure. And if you ask me why, the reason is *not for the honour and glory of the thing, and still less for the selfish advantage of England and Englishmen*! . . . We are absolutely necessary to India. That is recognised by the best of the people themselves, just as it is by us. . . . I cannot myself conceive of a time as remotely possible, in which it would be either practical or desirable that we should take our hand off the Indian plough. . . . . Carlyle once posed a curious question—nameiy, whether the British peopel would sooner lose their Shakespeare or their Indian Empire; and he decided in favour of thel atter. Because, he said,—'your Indian Empire in any case must go sooner or later; bnt Shakespeare cannot go. He lasts for ever with us. We cannot give up our Shakespeare.' Well, ... there is no reason why we should lose either. Let us keep both. Let India remain *our India* just as much as Shakespeare is our Shakespeare,—that is to say, as *a part of the inalienable heritage of Englishmen, and the lasting glory of the British race* ! "—LORD CURZON at the *London Union Club*, *Ist August*, 1904.

यांत इटालिसाइझ्ड शब्द आहेत ते आह्मीं तसे केले आहेत. त्यांकडे लक्ष दिलें असतां, असें दिसून येईल कीं, ह्या भरतभूमीला निरंतरच्या गुलामगिरींत ठेवण्याचें कारण, लॉर्डसाहेबांच्या मतें, त्यांत इंग्रजलोकांस भूषण आहे व लाभ आहे, हें नाहीं. असें असतांहि, भरतभूमि हातची जाऊं द्यावीशी त्यांस वाटत नाहीं. याचें खरें कारण, आणखी दोन वाक्यें बोलून गेल्यावर, तेंच फिरून सांगतात, तें असें कीं *our India* हें आपलें वतन अर्थात् लाभाचें स्थान व भूषणाचें कारण आहे! ह्या दोन कारणांमधील विरोध फोडून सांगायाला पाहिजे असें नाहीं. आतां, यांत आनंदाची गोष्ट एवढीच आहे, कीं लॉर्ड साहेब व त्यांचे देशबंधु हे, शेक्स्पियर आपलासा समजून त्याजवर जसें प्रेम ठेवतात, तसेंच प्रेम ह्या आमच्या भरतभूमीवर ठेवून, तिला निरंतरची आपलीशी करूं पाहात आहेत! वस्तुतः हे त्यांचे केवढे उपकार होत! आतां, अशा रीतीनें दुसऱ्याचें वंशपरंपरागत वतन होऊन बसण्यांत ह्या भरतभूमीला कितपत भूषण आहे, व

आह्मा तिच्या लेकरांना कसें काय सुख लाधणार आहे, हे प्रश्न वादग्रस्त आहेत; त्यांचा निर्णय कालांतरानें होईल. सध्यां बोलून काय फळ ? सध्यां सांगावयाचें तें एवढेंच कीं, आह्मी मात्र, लॉर्ड साहेबांच्या व त्यांच्या देशबंधूंच्या सुखांत लेशमात्र अंतर न पाडतां, त्यांचा शेक्स्पियर आपलासा करून टाकीत आहों ! ह्या गोष्टीला ते आक्षेप घेणार नाहींत, एवढेंच नाहीं, तर अभिनंदनच करतील, अशी दृढ आशा आहे ! हा आमचा गरिबीचा सद्धेतु सर्वांस मान्य होवो, असें आह्मी इच्छितों.

या प्रवेशांतला, दरबारी मंडळींनें, वेळ अवेळ न पाहतां, चालविलेला चारगटपणा संपल्यावर, सर्वांस श्रमांमुळें, अथवा (येथें कवीनें दर्शविल्याप्रमाणें) एरिलाच्या कृतीनें झोपा लागतात; अंटोनियो व सिबास्टिन यांस मात्र लागत नाहींत. याचें कारण काय ? त्यांजवर मंत्राचा प्रभाव चालत नाहीं, अथवा अंटोनियोनें ह्मटल्याप्रमाणें 'एथल्या हवेचाच हा गुण' दिसून येत नाहीं किं काय ? यांतलें कोणतें कारण, हें कवीनें, त्याच्या नेहमींच्या क्रमाप्रमाणेंच, कुशळतेनें येथेंहि गुप्त ठेविलें आहे. येथून पुढें अंटोनियो व सिबास्टीन यांची मसलत सुरू होते. हळूहळू चाळवीत चाळवीत अंटोनियो हा अलांझो राजाचा वध करण्याला सिबास्टीन याला कसा प्रवृत्त करीत आहे, हें येथें पाहण्यासारखें आहे. 'निराशेंतून उत्पन्न झालेल्या ' त्याच्या 'आशेचें एक टोंक जरी खालीं बसलें तरी तिचें दुसरें टोंक उंच वर गेलेलें ' त्याला दिसत आहे, व ही गोष्ट तो सिबास्टीनाच्या मनांत भरवीत आहे. या अट्टल ठकाला, जगाची तर नाहींच, पण मनाचीहि चाड असलेली दिसत नाहीं. कारण 'तें पायांतलें खेटर समजून खुशाल पायांत घालून तडातड चालत जाणा'रा तो आहे. 'मन ही एक देवता आहे व ती हृदयांत वास करीते; पण माझ्या हृदयांत तर मी तिला कोठें पाहत नाहीं' असें (पृष्ठ ५६) स्वतांच तो सांगतो. यावरून त्याचें मन ठकबाजीला किती निरवढलें होतें, हें स्पष्ट समजतें. शिवाय ह्या नीचाला जगांतील सर्व लोकहि आपणाप्रमाणें नीचच दिसत होते. कारण राजा अलांझो व त्याचा मित्र गांझेलो यांचे वध केल्यावर

'मग बाकीची मंडळी काय?—ताटाखालचीं मांजरें!-दूध पाहिलें कीं केली डावली पुढें! ह्मणू त्या घटकेला होस-हो बोलून टोला पाडणारीं हीं निव्वळ घड्याळें!' अशी मनुष्यमात्राविषयीं त्याची कल्पना आहे! ही किती नीच आहे, हें सांगणें नलगे.

ह्या प्रवेशांत (पृष्ठ ४४) राजपुत्र बुडतां बुडतां कांठाशीं कसा पोंहत गेला, हें फ्रान्सिस्को वर्णन करून सांगतो, तें वर्णन; सिबास्टीन हा, राजानें राजकन्येला दूरदेशीं नेऊन वैरल्या-बद्दल त्याला टोंचून बोलत आहे तीं (पृष्ठ ४५—४६) त्याचीं दोन भाषणें; राज्यव्यवस्थेच्या समीकरणाचीं (पृष्ठ ५७--४८) गांझेलो याचीं दोन भाषणें; सर्वांची निजानीज झाल्यावर, सिबा-स्टिनाशीं अंटोनियोचा जो संवाद होतो, त्यांतली अंटोनियोचीं बहुतेक भाषणें; हीं सर्व काव्यदृष्टीनें फारच मनोहर आहेत.

एकंदरींत हा प्रवेश बहारीचा आहे, यांत शंका नाहीं. तथापि अप्रबुद्ध वाचकांस व प्रेक्षकांस (निदान आपल्याकडे) हा इतका गोड लागत नाहीं, असें कित्येकांच्या सांगण्यावरून समजतें. याचें कारण असें दिसतें कीं दरबारच्या मंडळीचा पाणचटपणा परकी देशाचा असल्यामुळें, इकडील लोकांस तो बरोबर कळत नाहीं. पण हा पाणचटपणा कवीनें मुद्दामच आणलेला दिसतो. कारण हा आरंभीं जेवढा बेचव व शुष्क वाटतो, तेवढा पुढील भाग अंटोनियोच्या अधमपणामुळें व सिबास्टीनाच्या मूर्खपणामुळें गंभीर होऊन विशेष खुलतो, हें उघड आहे.

अंक २ रा. प्रवेश २ रा—यांत कालिबन, त्रिकालिक व स्टिफानो, हें त्रिकूट येतें. नव्या व जुन्या जगांतले हे राक्षस आणून, हा प्रवेश केवळ हाशा पिकविण्याकरितांच दाखल केला आहे. यांत आरंभीं कालिबनाचे शिव्याशाप व आपल्या छळाचें वर्णन; पुढें सुधारलेल्या जुन्या जगांतल्या दोघा ठेंगू राक्षसांशीं त्याची गांठ पडतांच, त्यानें स्वकार्यार्थ केवळ पशुबुद्धीनें चालविलेली त्यांची मनधरणी;व दारूच्या अमलानें त्याचें झिंगणें, वगैरे प्रकार फारच हास्यकारक आहेत. याच ठिकाणीं हेंहि

सांगणें अवश्य आहे कीं स्टिफानो व त्रिकालिक यांचा सुधारलेल्या देशचा मूर्खपणा, पाजीपणा, शुष्क आढ्यता वगैरे पाहून कोणालाहीं त्यांचा तिटकारा आल्यावांचून राहणार नाहीं. असे हलकट मनुष्य, शेक्स्पियर कवीचे काळीं, इंग्लंडांत व सामान्यतः फ्रान्स, स्पेन, पोर्तु-गाल वगैरे देशांत थोडे थोडके निघाले होते असें नाहीं, व यांनीं नव्या जगांत बहामा, मेक्सिको वगैरे अनेक देशांत जाऊन व या भरतखंडांतहि येऊन, कसकसे पराक्रम गाजविले हें जगाच्या इतिहासांत प्रसिद्धच आहे. वास्कोडिगामा, अलबुकर्क, डुले, क्लाइव्ह, हेस्टिंग्स वगैरे सद्गृहस्थ एके काळीं इकडे येऊन गेले, ते भरतखडां-तले स्टिफानो व त्रिकालिकच नव्हत काय? अशा मंडळीच्या चरित्रां-वरूनच हे नव्या जगांतले दोन राक्षस कवीनें निर्माण केले असें दिसतें.

त्रिकालिक याच्या (पृष्ठ ६१) भाषणांत, वर सांगितलेल्या धाडशी लोकांच्या जलपर्यटनाचा उल्लेख आलेला आहे. हे लोक दूरदेशीं जाऊन कसकशा चमत्कारिक वस्तु गोळा करून आणीत, व इंग्लंडदेशचे खेळाडू, गुलहौशी लोक, त्यांच्या नानाप्रकारच्या खोट्या गप्पांस खऱ्या भुलून कसे पैसे नाशीत,हें यावरून चांगलें कळतें.असेच उल्लेख पुढें एक दोन ठिकाणीं (पृष्ठ ९०–९२) आले आहेत. (पृष्ठ ७०) यांत 'दास्य-विमोचना ' वरील कालिबनाचें गाणें फार मजेदार आहे.

अंक ३ रा, प्रवेश १ ला—यांतील फर्डिनांड व मिरांडा यांचा सर्वच संवाद रसिकांस हृदयंगम वाटणारा आहे.

अंक ३ रा प्रवेश २ रा—वस्तुतः, हा प्रवेश खोगिरभरतीकरि-तांच आहे. यांत, सुधारलेला राक्षस स्टिफानो हा स्वतः मूर्ख असतां व दुसऱ्याचा नीच दास असतां,बिचाऱ्या मूढ व भोळवट कालिबनाला आपल्या दास्यांत कसा आणित आहे व आपणासमोर गुढगे टेंकावयास लावून, त्याजवर आपलें गनिमीपणाचें वर्चस्व कसें बसवीत आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पुढें या राज्यस्थापकांतहि क्षुल्लक कारणावरून तंटे लागतात व एक दुसऱ्यास फांसावर चढविण्यास तयार होतो. हें पाहून, हेस्टिंग्स, व ज्यूनियस सहीचीं पत्रें लिहिणारा

फ्रान्सिस यांच्यांत कलागत लागून, कलकत्याच्या कौन्सिलांत कसा बखेडा माजला असेल ह्याचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें. हा एक प्रकार; आणखी दुसरा हा, कीं स्टिफानो व त्रिकालिक यांनीं, कालिबनाच्या चिथावणीवरून, प्रास्पेरोचा नाश करण्याची जी मसलत चालविली होती, ती या प्रवेशांत बरीच रंगाला आलेली दिसत आहे. ही मसलत म्हणजे एके काळीं भरतखंडांत इंग्रेज व फ्रेंच यांनीं परस्परांचा नाश करण्याच्या हेतूनें चालविलेल्या खटपटीचाच नमुना ह्मणावयास चिंता नाहीं.

अंक ३ रा, प्रवेश ३ रा—यांत प्रास्परोचे वैरी कसे हातटेकीस आले आहेत हें आपण पाहतों. त्यांच्या कृतकर्मांची त्यांस आठवण देण्याकरितां, एरिल त्यांजपुढें अन्न आणून ठेवितो, व ते तें खाण्याचा विचार करितात तोंच तार्टे तो गिधाडाच्या रूपानें येऊन, त्यांजपुढचीं सर्व घेऊन जातो. या वेळचें एरिलाचें भाषण मोठें आहे. सुरेख या ठिकाणीं लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट एवढीच कीं, पापाचें स्मरण देतांच, अलांझो राजास अनुताप होतो; परंतु ‘ बहुत दिवसांनीं उपटणारें विष जसें वेळ आली ह्मणजे प्रभाव दाखवूं लागतें, तसें यांचें पाप आतां यांच्या काळजाला झोंबूं लागलें’ (पृष्ठ ९६) असतांहि, सिबास्टीन व अंटोनियो डगमगत नाहींत; इतकेंच नव्हे, पण भुतांचा ‘तांडाच्या तांडा आला तरी दाद देणार नाहीं’ अशी वडबड करूं लागतात. वस्तुतः, हें त्यांचें वर्तन त्यांच्या शीलास अनुसरूनच आहे. जे समुद्रांतून बुडतां बुडतां वाचले असतांहि, राजद्रोह व भ्रातृद्रोह करून अलांझो व गांझेलो यांचे वध करावयास चुकत नाहींत, त्यांस अनुताप कोठला?

अंक ४ था, प्रवेश १ ला—यांत, आरंभीं प्रास्पेरो हा, फर्डिनांड याचें समाधान करून, त्याला आपली मुलगी अर्पण करितो. येथवर हा सर्व प्रकार ठीक आहे. पण पुढें प्रास्पेरो, जो आतां सासरा झाला, तो जांवायास स्पष्ट शब्दांनीं काय ह्मणतो ऐका—“ ही जरी मी तुला दिली, तरी इतक्यांतच तुला हिच्या कौमार्याचा भंग

करितां कामा नये. नेपल्स येथें गेल्यावर.............. ही तुझीच आहे; तोंवर तुला धीर धरला पाहिजे." अशी ही आज्ञा सासऱ्यानें जांवायाला करण्याचा परिपाठ तर आपल्या इकडे कोठें आढळून येणार नाहींच; आणि आढळलाच तर तो आपल्या इकडील समजुती-प्रमाणें प्रतिष्ठितपणास कितपत बरा दिसेल हें सांगणें नलगे. पण प्रास्पेरो नुसती आज्ञा करूनच थांबत नाहीं; ही आज्ञा मोड-ल्यास, परिणाम काय होईल, हेंहि, शाप देऊन, जांवयास सांगतो, तें असें: -" परमेश्वर तुझें कधीं कल्याण करणार नाहीं. अशा संबं-धाचा शेवट द्वेष, तिरस्कार आणि कलह यांतच अवश्य होईल. आणि अशा संबंधाला जीं फळें येतील त्यांचा ओंगळपणा पाहून तुम्हीच मग नाकें मुरडाल!" यावर जांवई तरी कमी नाहींत; ते जबाब देतात, तोही इतकाच स्पष्ट व निर्भिड आहे (पृष्ठ ९८–९९). हा सासरे-जांवायांचा संवाद (याचीच पुनरावृत्ति १०१ पृष्ठावर झाली आहे तीहि पाहण्यासारखी आहे) आपल्या इकडील कानांस कसासाच लागेल, हें खरें आहे तरी तो पाश्चिमात्य लोकांमधील आहे, एवढें लक्षांत ठेविलें म्हणजे झालें. तिकडे वधूवरें सज्ञान व प्रौढदशेंत असतात, व वधूची मनधरणी करण्याची चाल प्रचारांत आहे हेंही प्रसिद्धच आहे. यामुळें सासरे–जांवायांचा संबंध एवढा संकोचाकुल नसतो. याशिवाय स्त्रीपुरुषसंबंधांतहि तिकडील व आपल्या इकडील समजुतींत बराच फेर आहे. मग पतिपत्नीच्या संबंधांत इकडल्या इतकी लाज व संकोच नसल्यास काय नवल आहे? ह्या गोष्टी लक्षांत ठेविल्या असतां, इंग्रजी नाटकांतील व कादंबऱ्यांतील अशा प्रसंगांचें वर्णन विसंगत वाटणार नाहीं असें वाटतें तशांत प्रस्तुत प्रसंगीं प्रास्पेरो हा केवळ सासऱ्याच्याच नात्यानें बोलत नाहीं, तर तो कर्ता-करविता व सर्वज्ञ असा महा मांत्रिक आहे, व अकल्पित अशी कांहीं इष्ट गोष्ट घडवून आणण्याचा यत्न करीत आहे; तेव्हां एवढें निर्भीडपणें त्यानें बोलावें यांत फारसें गैरशिस्त दिसत नाहीं.

यानंतर अप्सरांचें गर्भनाटक येतें. हें येथें मुद्दाम घुसडून दिल्यासार-खेंच वाटतें. तरी त्यांत कवीनें मोठी खुबी केली आहे. कारण,

तें केवळ, प्रास्पेरोची व त्याच्या रूपानें शेक्स्पियर कवीचीहि 'अशीच इच्छा आहे' (पृष्ट १०२) व 'घटकाभर मौज करावी' असें त्यास वाटत आहे, ह्मणूनच दाखल केलें आहे. ह्या उपोद्घाताच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें, हें नाटक मुळीं राजघराण्यांतल्या एका लग्नसमारंभाकरितां म्हणून कवीनें तयार केलें असल्यामुळें, त्यानें यांत अशी योजना केली आहे कीं नाटकांतल्या लग्नसमारंभातले वाद्यगानादि मंगलप्रकार आणि खऱ्याखुऱ्या लग्नसमारंभातले हे प्रकार, दोनही एकरूपच दिसावे. अशा रीतीनें नाटकांतल्या लग्नसमारंभानें खऱ्या लग्नसमारंभांतल्या वधुवरांचा व वऱ्हाडीमंडळीचा गौरव झालेला पाहून, प्रेक्षकांस किती आनंद झाला असेल व पुढेंहि होईल, हें सांगणें नलगे.

या गर्भनाटकांतील पात्रें इंद्रधनुषा, क्षेत्रपालिका, व इंद्राणी हीं इंद्रधनुष्य, पृथ्वी, व आकाश यांचीं निव्वळ रूपकें होत, हें त्यांच्या वर्णनांवरून स्पष्टच आहे. या पात्रांच्या तोंडीं गाणीं घातलीं आहेत, व त्यांत अपार सृष्टिसौंदर्याचें आणि धनधान्यादि वैभववैपुल्याचें वर्णन आहे; तेणें करून मन प्रसन्न व आनंदित व्हावें अशी योजना दिसते. हीं रूपकें व वर्णनें आपल्या इकडील अभिरुचीस नवींच आहेत, यास्तव आह्मींहि विशेष काळजी घेऊनच तीं मराठींत आणण्याचा यत्न केला आहे. (पृष्ठ १८५) येथें मदन व तन्मोहिनी माया यांची हकीगत आपल्याइकडील कविसंकेतास धरून नसली, तरी ती कल्पित मानून निर्वाह केल्यास रसांत व्याघात होईल असें वाटत नाहीं. पण याविषयीं वाचकांस जो अनुभव येईल तोच खरा, हें कबूल केलें पाहिजे.

अंक ५ वा, प्रवेश १ ला—यांत नाटकाचा शेवट, आणि त्याबरोबरच प्रास्पेरोच्या कष्टदशेचा शेवट व्हावयाचा असून, तोहि सर्वांचा मिलाफ होऊन गोड असाच होतो. त्याचे सर्व वैरी निर्वीर्य होत्साते, हातटेकीस येऊन त्याजपुढें उभे आहेत, व त्यांस कृतकर्माचा पश्चाताप झाला आहे; तेव्हां, त्यांजवरील मंत्राचा अंमल उतरून त्यांस शुद्धीवर आणणें एवढेंच कायतें उरलें आहे. व त्यासाठीं

नानाप्रकारच्या भुतांचीं नांवें घेऊन प्रास्पेरो त्यांस बोलावित आहे (पृष्ठ १२१). हें बोलावणें, ह्मणजे आपल्या इकडील गोंधळी वगैरे लोकांच्या 'जेजुरीच्या खंडोबा गोंधळा ये, तुळजापुरच्या भवानी गोंधळा ये, अशा प्रकारच्या आव्हानाप्रमाणेंच आहे. या वेळीं मंत्रविद्येचा प्रयोग प्रास्पेरो करतो तो शेवटलाच. इतःपर 'जादूची काठी मोडून ती कित्येक पुरुष खोल भुईंत गाडून टाकण्या'चा आणि 'जादुविद्येचें पुस्तकहि, ठाव न लागे असें, खोल समुद्रांत नेऊन बुडविण्या'चा त्याचा संकल्प झाला असून, 'ह्या अप्रशस्त मंत्रविद्येचा' तो त्याग करितो, आणि आजपासून तिचा उपयोग करणार नाहीं ह्मणून शपथ वाहतो.

पुढें, एकामागून एक, अलांझो, गांझेलो, अंटोनियो, सिवास्टीन, फर्डिनांड, मिरांडा, हीं सर्व पात्रें एके ठिकाणीं होतात; सर्वांचें सख्य होतें; व प्रास्पेरो सर्वांस त्यांच्या अपराधांची क्षमा करतो. इतक्यांत नाखवा वगैरे मंडळी येऊन, 'गलबत सुरक्षित आहे, इतकेंच नव्हे; तर शिडें व दोरखंडेंहि कोरीं करकरीत दिसत आहेत' ह्मणून विदित करते. यांच्याच मागोमाग, स्टिफानो, त्रिकालिक, व कालिबन हे त्रिवर्ग राक्षसांहि एरिलाच्या प्रेरणेनें तेथें येतात. व त्यांचीं अजागळ व मूर्खपणाचीं कृत्यें उघडकीस येऊन, सर्वांचा हांशा पिकविण्यास तीं कारण होतात. याप्रमाणें प्रास्पेरोचा हेतु सिद्ध होतांच, एरिलाची मुक्तता होऊन, त्यास निरंतरचें स्वातंत्र्य प्राप्त होतें. व अशा आनंदांत सर्व मंडळी, गलबतांत बसून स्वदेशीं जाण्यास सिद्ध झाली असतां, शेटवचा पडदा पडून नाटक समाप्त होतें.

या अंकांत सांगण्यासारखा विशेष प्रकार कांहीं नाहीं. पृष्ट१२० वर मात्र, गांझेलो याच्या दाढीवरून टपटप गळणाऱ्या अश्रूंचें, 'थंडीच्या दिवसांत घराच्या केंबळीवरून वळचणीखालीं गळणाऱ्या दंवाच्या बिंदूशीं साम्य वर्णिलें आहे, तें इतकें सरस व यथातथ आहे कीं त्याकडे कोणाचेंहि लक्ष गेल्यावांचून राहणार नाहीं. याच पृष्ठावर, 'मी मनुष्य असतों तर माझें मन द्रवलें असतें' असें, अलांझो वगैरे मंडळीची ती अवस्था पाहून, एरिल ह्मणतो. यावरून, वायुरूप, अर्थात्, आपल्या इकडील भाषेनें ह्मटलें तर, चिन्मय जो एरिल,

त्याला, जडरूप जीं मनुष्यें, त्यांच्या संपर्कानें, जडविकार प्राप्त होऊं लागले, असें दर्शविण्याचा कवीचा भाव दिसतो. यांतील रहस्य, चित् अविकारी असून, देहाच्या उपाधीनेंच तें विकारवश होतें हें जें आपल्याकडील वेदांतमत, त्यांतल्या रहस्यासारखेंच आहे. पृष्ठें १२१–१२५ यांतील प्रास्पेरोचीं भाषणें मनावर गांभीर्याचा ठसा उमटविणारीं आहेत.

येथवर सर्व नाटकाचें पर्यालोचन आपण केलें. आतां, त्यांतील पात्रें कशींकाय आहेत हें पहावयाचें. सर्वांत मुख्य पात्र म्हटलें म्हणजे प्रास्पेरो. याच्या अंगीं जादु विद्येच्या बळानें 'कर्तुमकर्तुं' शक्ति होती असें येथें दाखविलें आहे. तथापि त्यासहि अनेक संकटें भोगावीं लागतात; इतकेंच नाहीं, पण घरगुती कामकाजासाठीं त्याला कालीबनासारख्याला हाताशीं धरावा लागतो. आतां, या संकटांचें कारण पाहूं गेलें तर कवीनें आपल्या बुद्धीनें जें दर्शविलें आहे, तें असें कीं, प्रत्येक मनुष्यास स्वकर्तव्य असें कांहींतरी असतें, तें त्यानें केलें पाहिजे; न केल्यास अनेक दुःखें प्राप्त होतात. हेंच तत्व कवीनें *'Henry VI'* व *'Measure for Measure'* या नाटकांतूनहि प्रतिपादलें आहें. व याच तत्वास अनुसरून म्हटलें म्हणजे, प्रास्पेरो हा राजा होता, त्यापक्षीं राज्यकारभार पाहणें हें त्याचें कर्तव्य होतें, तें त्यानें न केल्यामुळें तो पदभ्रष्ट झाला हें ठीकच झालें. कारण, त्यानें विद्यानंदांत निमग्न होऊन राज्यकारभार सोडला यामुळें त्याच्या भावाला राज्यपद मिळविण्यास सहजच सवड मिळाली; एरवीं मिळाली नसती, हें उघड आहे. वस्तुतः, त्याजवर आलेलीं संकटें त्यानें आपल्या हातानेंच ओढून आणलीं होतीं, असें म्हणावयास चिंता नाहीं. तथापि ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं प्राप्त झालेल्या निर्जनवासानेंही त्याला बरेंच शाहणें केलें,व दुःखा-अंतीं सुख अशी जी म्हण आहे तिची सत्यता त्याच्या पूर्णपणें प्रत्ययास आणली. आतां, त्याच्या हातची राजकीय सत्ता नाहींशी झाली व दैन्यावस्थेंत त्यास दिवस कंठावे लागले, हें खरें; तरी

विद्येच्या ज्या नादानें तो धुळीस मिळाला, तोच नाद त्यानें दृढनिश्चयानें चालविल्यामुळें त्यांतच त्याला यश मिळून, मानवी शक्तीहूनहि अद्भुत जी वायवीय शक्ति, ती त्यास प्राप्त झाली, व तो एक मोठा बलिष्ठ जादुगीर बनला. हें काय लहान सान कार्य झालें ? पण कवीनें त्याला जादुगीर बनविण्यांतहि थोडी खुबी केली आहे. तो सामान्य जादुगिरांप्रमाणें आपमतलबी, अल्पदृष्टि व नीच नाहीं. कारण त्यानें आपल्या जादुविद्येचा उपयोग इतरांस सुखी करण्यांत केला, व 'क्षमा करणें व अपकार विसरून उपकार करणें' (अंक५ वा प्रवेश१ ला, पृष्ठ १२१) यांतच खरें थोरपण आहे हें तत्व सर्व जगास विदित केलें. त्याच्या या कृतीचा अलांझो याच्या कृतीशीं मुकाबला केला असतां, अलांझो याची वागणूक किती ओंगळ दिसते हें सांगणें नलगे. अलांझो याची केवळ स्वार्थावर नजर; राज्यकारणास्तव तो आपली मुलगी क्लारिबेल हिला, तिची मर्जी नसतां, कोठें दूरदेशीं आफ्रिकेंत नेऊन वैरतो. पण प्रास्परो हा आपल्या मुलीच्या सुखाकरितां आपल्या जन्मवैऱ्यांसहि क्षमा करतो व शत्रूंस मित्र करून घेतो. ह्या दोनहि राजपुरुषांच्या वागणुकींतील हें अंतर लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

या नाटकांत सर्व नाटयसूत्रें एका प्रास्पेरोच्या हातीं आहेत, व तोच सर्व कार्यांत कर्ता-करविता आहे. यामुळें त्याची एकंदर वागणूक व भाषणसरणी कडकडीत, करारीपणाची, दृढनिश्चयाची, व कांहींशी निष्ठुर अशी दिसते. अनेक संकटें भोगल्यामुळें व जगाचा कष्टमय अनुभव भरपूर घेतला असल्यामुळें, त्याचें मन इतकें शुष्क व राठ झालें होतें, व स्वभाव एवढा तापट व तिरसट झाला होता, कीं मठ्ठ कालिबनावरच नव्हे, पण त्याच्या गोजिऱ्या व आवडत्या एरिलावरहि तो प्रसंगीं तुटून पडतो; व आपली आवडती मुलगी-'जी त्याचे पंचप्राणच होय व तो जगणार तो तरी जिच्यासाठीं'—तिनें यत्किंचित् विरोध दाखवितांच, तिलाहि धमकावण्यास तो कमी करीत नाहीं (अंक १ ला प्रवेश २ रा पृष्ठ ३५). असें आहे, तरी त्याचें मन मूळचें निष्ठुर

नव्हतें. पहा, त्याला जगाचा कंटाळा आला होता व तो परलोकच्या तयारीसहि सरासरी लागला होता; तरी तशा स्थितींतहि तो मुलीचें कौतुक करतो, तसाच एरिल यासहि हाका मारतो त्याहि कौतुकानेंच मारतो. यावरून अझूनहि त्याच्या ठिकाणीं रसिकता वास करीत होती हें स्पष्ट आहे. याशिवाय तो त्यास स्वतंत्र करण्याचें वारंवार आश्वासन देतो आणि प्रत्यक्ष आपल्या वैऱ्यांचेहि अपराध गिळून, त्यांस क्षमा करतो. हीं कृत्येंहि त्याच्या सदय व उदार अंतःकरणाची साक्ष देतात, व त्याजविषयीं आपल्या मनांत आदर उत्पन्न करून गंभीरपणाचा ठसा उमटावितात.

कर्तव्यांत चुकल्यास राज्यपदास मुकावें लागतें, ह्या अनुभवाबरोबरच प्रास्पेरो याची अशीहि खात्री होऊन चुकली, कीं सुखाची इच्छा करण्यापूर्वी कष्ट सोसून, त्या सुखाला आपण पात्र आहों, असें प्रत्येकानें सिद्ध करून दाखविलें पाहिजे; तात्पर्य, कष्टांवांचून सुखाची किंमत नाहीं. ह्मणूनच तो ऐरिल याला पूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या आधीं कांहीं काळ पर्यंत दास्य करावयास लावतो; त्याचप्रमाणें फर्डीनांड यालाहि मिरांडा अर्पण करून कृतार्थ करण्यापूर्वी लाकडें वाहून नेण्याचें काम सांगतो; आणि याच कारणास्तव, उपकाराद्दल अपकार करणाऱ्या कालिबनाला निरंतर दास्य करावयास लावितो. या नाटकांत जर कांहीं बोध करावयाचा कवीचा उद्देश असला तर तो हाच होय, असें वाटतें.

एकंदरीनें, प्रास्पेरो हें पात्र फारच उठावाचें वठलें आहे; त्याकडे प्रेक्षकांचें व वाचकांचें सहजच विशेष लक्ष वेधतें. व तसें लक्ष वेधावें अशी कवीचीहि योजना पाहल्यापासून असावीसें दिसतें. कारण, प्रास्पेरो ह्मणजे शेक्स्पियर,—हें स्वतः कवीचेंच प्रतिबिंब होय. त्यानें ह्या पात्राच्या द्वारा आपली स्थिति, आपलें कर्तृत्व, आपली इच्छा —एकंदरीनें आपला व त्याबरोबरच आपल्या काळच्या काव्यकलेचा व रंगभूमीचा इतिहास येथें प्रगट केला आहे, असें पुष्कळांचें ह्मणणें आहे; आणि तें खोटें नाहीं. प्रास्पेरोची जादु ही शेक्स्पियर कवीची

कवित्वशक्ति होय. कवितेच्या नादीं लागून, तो आरंभीं बराच फसतो, व लंडन शहरासारख्या अफाट सागरांत लोटत लोटत येऊन पडतो. इंग्लिश रंगभूमि हें एक बेट त्याच्या हातीं लागतें, व तो तेथचा राजा होतो. ह्या त्याच्या राज्यांत अनेक यक्ष व गंधर्व, अर्थात् चांगले चांगले कवि त्याच्या दृष्टीस पडतात. पण ते सर्व त्या कुकवितारूप सिकोराक्ष चेटकीच्या अमलाखालीं कष्टांत लोळत असलेले आढळतात. त्यांस तो मुक्त करतो, व आपल्या आळ्यांत आणून, एक वेगळाच कविसांप्रदाय स्थापन करतो. याप्रमाणें हा पूर्वेतिहास झाल्यावर, 'तुफान' नाटक निर्माण करून, तो जाणों, आपला रसिक मित्र व अनुयायी जो फ्लेचर, त्याच्या गळ्यांत, सत्कवितारूप मिरांडा—जी, जगन्नाथरायकवीनें ह्मटल्याप्रमाणें, खरोखरींच

.... कवितेव मनोऽभिरामा
रामा कदापि हृदयान्मम नापयाति ।

भामिनीविलास. । ३

अशा योग्यतेची, तिच्या हातून माळ घालविल्यावर, आपल्या जन्माचें सार्थक झालें असें मानून, ज्या भारलेल्या रंगभूमीवर आपण अद्भुत चमत्कार केले, तिला शेवटचा नमस्कार ठोकतो, व प्रास्पेरोच्या मुखानें, 'ह्या जादुविद्येचा मी आज त्याग करतों' असें ह्मणून, उत्तरवय घरीं स्वस्थ बसून काढण्याचा आपला संकल्प सर्वांस विदित करतो. याप्रमाणें ह्या नाटकांतील कथानकाचें कवीच्या चरित्राशीं व स्वतः कवीचें प्रास्पेरोच्या स्थितीशीं पूर्ण तादात्म्य दिसून येतें. यांत वास्तविक प्रकार काय आहे, हें सांगतां येणें कठिण आहे; तथापि वरील तुलना बसवितां येण्यासारखी असून, ती बरीच मौजेची आहे यांत शंका नाहीं.*

---

* प्रास्पेरोशीं कवीच्या स्थितीचें हें तादात्म्य पुष्कळांनीं दर्शविलें आहे, पण त्यांतहि डौडन याची तुलना फार मासलेवाईक आहे, त्याच्या लेखांतून हा पुढील अल्प उतारा घेतला आहे, तोच वरील गोष्टीची साक्ष देईल. तो ह्मणतोः—

"If I were to allow my fancy to run out in play, I should describe Prospero as the man of genius, the great artist lacking at first in practical gifts which lead to material success, and set adrift on the perilous sea of life, in which he finds his enchanted island, where he may achieve his works of wonder. He bears with him Art in its infancy—the marvellous child, Miranda. The grosser passions and appetites—Caliban, whom he subdues to his service....................And who is Ferdinand? Is he not, with his gallantry and

दुसरें प्रमुख पात्र झटलें म्हणजे मिरांडा. शेक्स्पियर कवीनें आपल्या नाटकांतून पुष्कळ प्रकारच्या पुष्कळ नायिका आणिल्या आहेत, व त्यांचीं वर्णनेंहि मनोरम अशीं वठविलीं आहेत. तथापि त्यांत मिरांडा हें पात्र कांहीं अलौकिक आहे. तिला अलौकिक म्हणावयाचें तें केवळ शब्दार्थवादानेंच नव्हे; तर वस्तुगत्याच ती तशी होय. युरोपियन टीकाकारांनींतर तिला 'सृष्टिदेवीच्या कृपेंतली पोर' व 'भारलेल्या स्वर्गांतली ईव्ह' झणून झटलें आहे. फर्डिनांड तिला पाहतांच (पृष्ठ ३१) 'अप्सरा' झणून समजतो; व पुढेंहि तिच्या स्वरूपाची तारीफ करून, तो झणतो—' सर्व उत्तमोत्तम वस्तूंतलें सौंदर्य एकवट करूनच, ब्रह्मदेवानें तुला घडली, असें मला वाटतें !' (पृष्ठ ७४); आणि असें तरुण फर्डिनान्ड यालाच वाटतें असें नाहीं; तर वयोवृद्ध अलांझो राजाचाहि असाच ग्रह होऊन, 'ही कोणी देवांगना तर नव्हेना ?' (पृष्ठ १३३) असे उद्गार त्याच्या तोंडून निघतात. एकंदरीनें, सौंदर्य व कांति यांच्या दृष्टीनें पाहिलें, तर मिरांडा 'अलौकिक' होती यांत शंका नाहीं. तथापि तिच्या आंगचे गुण पाहिले, तर हें तिचें 'अलौकिकत्व' नाहींसें होतें, व ती इहलोकची असून,

---

beauty, the young Fletcher, in conjunction with whom Shakespeare worked upon *The Two noble Kinsmen* and *King Henry VIII*? Fletcher is conceived as a follower of the Shakespearian style and method in dramatic art...........It is Ariel, an airy spirit—the imaginative genius of Poetry, but recently delivered in England from long slavery to Sycorax. Prospero's departure from the island is the abandoning by Shakespeare of the English theatre"—*Shakespeare, his Mind and Art*, 1875, pp 245.

लोवेल (Lowull) यांचें मतहि असेंच आहे. तो झणतो.

"If I read *The Tempest* rightly, it is an example of how a poet should write an allegory..................In Prospero shall we not recognise the Artist himself,—

'That did not better for his life provide
Than public means which public manners breeds,
Whence comes it that his name receives a bran'—

who has forfeited a shining place in the world's eye by devotion to his art and who turned adrift on the ocean of life, has shipwrecked on that Fortunate Island (as men always do who find their true vocation), where he is absolute lord, making all the powers of Nature serve him"—*Among my Books*, 1870, P. 199.

इतर सच्छील व समंजस मनुष्यस्त्रियांपैकींच एक आहे असें वाटूं लागतें. आणि असें वाटतें ह्मणून कांहीं विषाद वाटत नाहीं. कारण, ज्या गुणांच्या योगानें मनुष्यें मनुष्यांस प्रिय होतात, व परस्परसहवासाला योग्य होऊन, त्यांस मनुष्यत्व प्राप्त होतें, ते गुण 'अलौकिक' देवांगनांस कोठले? वस्तुतः, हे गुण इहलोकचे होत; व हे मिरांडेच्या ठिकाणीं पूर्णपणें वास करीत होते. या संबंधानें फर्डिनांड याला सकृद्दर्शनींच आलेल्या शंकेचें निरसन करून, तीच सांगते—'मी मानवकन्या बरीक खरी' (पृष्ठ ३१). याप्रमाणें, मिरांडा ही स्वरूपानें कितीहि 'अलौकिक' असली तरी ती सर्व प्रकारें मनुष्यस्त्रीच होय, व यामुळेंच ती आपल्या एवढ्या आवडीस पात्र होते. कवीनें जर तिला काल्पनिक गुणांचें स्थान करून, मनुष्यकोटीच्या बाहेर, फार उंच, ठेवून दिली असती, तर कदाचित् आपण तिची फार तारिफ करून, पूज्यभावनेनें तिजकडे टक लावून पहात राहिलों असतों इतकेंच. पण त्यानें तिला, खऱ्या कवित्वगुणानें, मनुष्यस्त्री निर्माण केली, व तिच्या ठिकाणीं स्त्रीजात गुणांबरोबरच स्त्रीजात प्रकृतिदौर्बल्यादि दोषहि ठेवून,

आशंकसे यदग्निं तदिदं स्पर्शक्षमं रत्नम्।

शाकुन्तल। १।

अशी आपली खात्री पटविली. पण ही स्त्रीरत्न अशी दुष्यंताप्रमाणें आपली खात्री झाली असतांहि, आपणास तिच्या दौर्बल्याचा तिटकारा येत नाहीं; एवढेंच नाहीं. पण उलट तिची कींव मात्र येते, व अशा स्त्रीविषयीं मनांत अभिलाषपूर्वक औत्सुक्य उत्पन्न होतें. मिरांडा एवढी गोड—एवढी प्रिय कां वाटते—तिच्या ठिकाणीं कवीनें अशी काय जादु भरली आहे—याविषयीं पुष्कळांस मोठा अचंबा वाटतो; पण, 'अलौकिक' स्वरूप व 'लौकिक' गुण यांची जी मजेदार सांगड कवीनें या ठिकाणीं घालून दिली आहे, तिचेंच हें फळ होय, अशी आमची समजूत आहे. एकंदरीनें, मिरांडा ह्मणजे 'अलौकिक' शुद्ध स्वरूपाप्रमाणेंच, स्त्रीजात 'लौकिक' गुणांची एक शुद्ध पुतळी कवीनें निर्माण केली आहे, असें ह्मणावयास चिंता नाहीं *

* ह्याची प्रतीति पुढील लेखावरून येईल:—

"Let us imagine any other woman placed beside Miranda—even one of Shakespeare's own loveliest and sweetest creations—there is not one of them that could sustain the comparison for a moment; not one that would not appear somewhat coarse or artificial when brought into immediate contact with this *pure child of nature*, this *Eve of an enchanted paradise*."—MRS. JAMESON *characteristics of Women*, p. 230

मिरांडेच्या चरित्रांत कवीनें अद्भुत व अपूर्व अशी जी एक मौज केली आहे, तिकडेहि येथें अंमळ लक्ष देणें अवश्य आहे. तिनें बापावांचून पुरुषाला तर काय, पण कोणा स्त्रीला स्वप्नांतहि पाहिलें नव्हतें; तेव्हां, अशा व्यक्तीच्या हृदयांत प्रथम प्रेमोद्भव कसा होतो व सर्वसंचारी मदनाचा प्रभाव त्यावर कसा गाजतो, हा पाहण्यासारखा चमत्कार दाखविण्याला कवीला येथें आयतीच सवड मिळाली आहे. व ती त्यानें वायां न जाऊं देतां, हा चमत्कार फारच चातुर्यानें व मार्मिकपणें दाखविला आहे. मिरांडा व फर्डिनान्ड यांच्या दृष्टादृष्टीचा व भेटीचा प्रसंग ह्मणजे अद्भुत पण नाजुक अशा शृंगाराचा एक उत्कृष्ट नमुना होय, असें आह्मास वाटतें. अशा प्रकारचा चमत्कार फारच थोड्या कवींनीं साधला आहे. आपलेकडील कल्पक कवि भवभूति यानें मालतीमाधवांत, नायकनायिकांच्या प्रथमप्रेमोदयाची कथा वर्णिली आहे; व विशेषतः माधवाच्या मनांत मालतीच्या सकृद्दर्शनानें प्रेमाचा उद्भव कसा झाला हें त्याच्याच मुखानें वदविलें आहे. याशिवाय, रामायणांतहि ‘ शांता व ऋष्यशृंग ’ यांच्या प्रणयविवाहाची कथा अशीच वर्णिली आहे. त्या दोहींत व शेक्स्पियर कवीच्या मिरांडेच्या वर्णनांत बरेंच साम्य आहे, त्याकडे लक्ष देण्यासारखें आहे.

या नाटकांत प्रमुख पात्रें चार—पैकीं प्रास्पेरो व मिरांडा यांच्या स्वभावांचें वर्णन वर विस्तारानें आम्हीं केलें. बाकी दोहोंविषयीं, ह्मणजे, एरिल व कालिबन यांविषयीं लिहावयाचें. पण पर्यालोचनांत त्यांविषयीं बराच मजकूर येऊन गेला असल्यामुळें व हें प्रकरण फारच लांबलें असल्यामुळें अधिक लिहित नाहीं. तथापि जें सांगावयाचें तें इतकेंच, कीं ह्या दोनहि पात्रांचे स्वभाव एकमेकांच्या अगदीं विरुद्ध आहेत. एक जेवढा चंचल, चैतन्यरूप व प्रज्ञ, तेवढाच दुसरा काष्ठलोष्ठवत् मंद्र व अज्ञ आहे. दोघांसहि स्वतंत्रेची आवड फार व ते तिचे मोठे भक्त; पण एकाची इच्छा, बंधमुक्त होऊन, स्वतंत्रतेचीं श्रेष्ठ सुखें उपभोगावयाची, व दुसऱ्याच्या इच्छेची धाव कसें-बसें सध्यांच्या अडचणींतून निसटून ‘नवा धनी’ सोधण्याकडे! कवीनें येथें, एरिलाच्या मुखांत एक (पृष्ठ १२५) व कालिबनाच्या मुखांत एक (पृष्ट ७०) अशीं स्वतंत्रतेवरचीं जीं दोन गाणीं घातलीं आहेत, तीं फार मासलेवाईक आहेत. त्यांत शाहण्याच्या व मूर्खाच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेंत काय अंतर असतें, तें उत्कृष्ट प्रकारें दाखविलें आहे.

यांखेरीज दुसरीं पात्रें ह्मटलीं ह्मणजे अलांझो, फर्डिनांड, अंटोनियो, सिबास्टिन, व गांझेलो हीं होत. हीं गौण आहेत. केवळ रूढी-

प्रमाणें सुष्टदुष्टपणा यांच्यांत दाखविला आहे, इतकेंच; यापलीकडे यांच्या चरित्रघटनेंत सांगण्यासारखें फारसें नाहीं. तथापि लक्ष देण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे परस्परविरुद्ध स्वभावांच्या पात्रांच्या जोड्या नाटकांत आणण्याची ह्या कवीची रीत. ह्या रीतीस अनुसरून, त्यानें येथें पुढीलप्रमाणें पात्रांच्या सांगडी घातलेल्या आहेतः–प्रास्पेरो व अलांझो, फर्डिनान्ड व मिरांडा, एरिल व कालिबन, अन्टोनियो व सिबास्टिन, गांझेलो व अड्रिन वगैरे. ह्यांपैकीं एकेका जोडींतील पात्रांची नैसर्गिक स्थिति बहुतेक एकसारखी असतां, त्यांच्या मनाचें धर्म व त्यांच्या कृति यांचा विचार केला, तर त्या त्या पात्रांच्या घटनेंत महदंतर दिसून येतें, व तेणेंकरून त्या त्या पात्रांच्या आंगचे सद्गुण किंवा दुर्गुण परस्परतुलनेनें विशेष खुलतात. उदाहरणार्थ, प्रास्पेरो व अलान्झो हीं दोनच पात्रें घ्या. हे दोघेहि समवयस्क व स्वतंत्र राजे असून, एकाचे ठिकाणीं विद्येची आवड, औदार्य, परोपकारबुद्धि व अपत्यस्नेह वगैरे गुण दिसून येतात; पण ह्याच गुणांचा दुसऱ्याच्या ठिकाणीं पूर्ण अभाव असून, हेवा, परापहारबुद्धि, स्वार्थपरायणता, व

कुतोऽपत्यस्नेहः कुटिलनयनिष्णातमनसाम्? । मालतीमाधव

या न्यायानें अपत्यसुखाकडे पूर्ण काणा डोळा करणें वगैरे मनोविकारांचें प्राबल्य आढळतें! मिरांडा व फर्डिनान्ड यांचीहि अशीच तऱ्हा. ह्या दोघांच्या मनांत खऱ्या प्रेमाचा–व तोहि सकृद्दर्शनीं–सारखाच उद्भव झाला असतां, पुरुषाचें तर काय, पण कोणा स्त्रीचेंहि दर्शन स्वप्नांतहि झालेलें नाहीं, अशी एकाची स्थिति व 'आजवर पुष्कळ स्त्रिया मी पाहिल्या....व कांहींकींच्या भाषणाचें माधुर्य चाखून माझे उत्सुक कान संतुष्ट झाले' अशी दुसऱ्याची स्थिति! अशा परस्परविरुद्ध स्थितींतल्या मनुष्यांची भाषणपद्धति व वागणूक कशी असते हें येथें दृष्टीस पडतें. यानंतर, एरिल व कालीबन यांजमधील विरोध, तसाच अन्टोनियो व सिबास्टीन या दोघा भ्रातृद्रोही इसमांच्या स्वभावांतला फरक, यांविषयीं मागें सविस्तर लिहिलेंच आहे. ह्या नाटकांत पात्रांच्या ज्या जोड्या लाविल्या आहेत त्या व त्यांच्या प्रकृतिघटनेंत जें अंतर ठेवलें आहे तें–ही सारी योजना कवीनें बुद्ध्याच केलेली आहे, व तेणेंकरून परस्परतुलना करणास सुलभ पडून त्या त्या पात्रांचे स्वभाव ढळढळीत रेखले जावे असा यांत त्याचा उद्देश दिसतो. एकंदरीनें, जीं जीं पात्रें ह्या नाटकांत कवीनें आणलीं आहेत तीं सर्व मार्मिकपणेंच आणलीं आहेत, व त्यांची घटनाहि मोठ्या दक्षतेनें केली आहे, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

शेक्स्पियर कवींचें 'तुफान' नाटक वाचून पाहिल्यावर व त्यांतील घटनेचा विचार केला असतां, आपल्या इकडील एका नामांकित संस्कृत कवीनें, हिंदुस्थान देशाच्या प्राचीन इतिहासांतून एक राज्यकारणी प्रसंग घेऊन, 'तुफान' नाटक निर्माण केलें आहे, त्याची आठवण अभिज्ञ वाचकांस झाल्यावांचून राहणार नाहीं. हें प्राच्य 'तुफान' नाटक ह्मणजे विशाखदत्ताचें 'मुद्राराक्षस' होय. तुफान व मुद्राराक्षस यांच्यांत कांहीं विलक्षण साम्य असून, तें मजेदारहि आहे. यास्तव तें थोडक्यांत येथें दर्शवितों.

तुफान नाटकांतलें मुख्य पात्र प्रास्पेरो. तो त्यांत जसा 'कर्तुमकर्तुं' शक्तिमान् तसा मुद्राराक्षसांत चाणक्य होय. हे दोघे पुरुष, एक काल्पनिकजादूनें व दुसरा (राज्यकारस्थानाच्या) 'नयपवनहत मोहभस्मा'नें (मुद्राराक्षस, अंक १ श्लोक ११,) अनेक युक्त्या रचून, इष्ट हेतु घडवून आणतात. हा हेतु ह्मणजे एकांत मिरांडा व शत्रुपक्षाकडील राजपुत्र फर्डिनांड यांचें लग्न, व दुसऱ्यांत चाणक्यानें हातीं धरलेला चंद्रगुप्त व शत्रुपक्षीय अमात्य राक्षस यांचें सख्य घडवून आणणें हा होय. बरें, ह्या दोनहि पात्रांची स्थितीरीति पाहिली, तर तीहि त्या त्या नाटकांच्या कर्त्यांनीं सरासरीं एकसारखीच रेखलेली दृष्टीस पडते. पहा, प्रास्पेरो काय आणि चाणक्य काय-दोघेहि स्वतः विद्वान असून, दोघांसहि विद्येची मोठी आवड. ह्मणूनच 'तीं पुस्तकें नी ती खोली -हेंच आमचें विस्तीर्ण राज्य' (पृष्ठ १२) असें एकास वाटतें; आणि दुसराहि सर्वश्रेष्ठ असा ब्राह्मणकुलोत्पन्न महोपाध्याय असल्यामुळें, स्वाध्याय हेंच आपलें बळ व त्याचा व्यासंग हेंच जन्माचें सार्थक असें मानतो, हें उघड आहे. एकास दुष्टबुद्धि भावानें, राजद्रोह व भ्रातृद्रोह करून, राज्यपदभ्रष्ट केलें होतें, व दुसऱ्यासहि त्याच्या राज्यपदारूढ दुर्मद यजमानानें, ब्रह्मद्वेष पत्करून, 'अग्रासनतोऽवकृष्ट-' त्याच्या (मुद्राराक्षस अं. १।१२) अपमानास पात्र केलें होतें. एकास बिळासारख्या भिकार गुहेंत दिवस काढावे लागत होते, व दुसऱ्याचें निवासस्थान, स्ववृत्तिपरत्वेंच,

शरणमपि समिद्भिः शुष्यमाणाभिराभिः
विनमितपटलान्तं दृश्यते जीर्णकुड्यम्

मुद्राराक्षस—अंक ३।१५.

अशा थाटाचें होतें. आणि हें एवढें 'तुफान' उत्पन्न करण्यांत एकाचा हेतु पाहिला, व इकडे, नवनंदाचा उच्छेद करून उत्तीर्णप्रतिज्ञ झाला असतांहि 'मुद्रेच्या साह्यानें अमात्य राक्षसास जिंकून' आपलासा करण्याकरितां एवढा खटाटोप करण्यांत दुसऱ्याचा, हेतु पाहिला तर त्यादोहोंत

स्वार्थबुद्धीचा लवलेशहि होतासें दिसत नाहीं कारण, दोघांच्याहि हृदयांत राज्यें मिळवून त्यांचा उपभोग घेण्याचा हाव किंवा गोडी वास करीत होती असें ह्मणण्यास कांहीं जागा नाहीं. मग त्यांच्या एवढ्या प्रयासाचें कारण काय ?--हें कारण दोघांस एकच होतें. तें हेंच कीं आपण ज्यांना हातीं धरलें व जीं सर्वस्वीं आपणावर अवलंबून, अशा आपल्या प्रियजनांचें कल्याण करून त्यांस निरंतरचें सुखी करावें. याच निरपेक्ष परोपकारबुद्धीनें प्रेरित होऊन,

" जें कांहीं मीं केलें आहे तें सारें तुजसाठीं,
माझे लाडके, तुजसाठीं बरें"—तुफान. पृष्ट ७.

असें ह्मणून, एकजण, प्रत्यक्ष आपले वैरी हस्तगत झाले असतांहि त्यांजवर क्षमा करतो; व दुसराहि, ह्याच बुद्धीनें व अशाच प्रकारें,

" सोऽहमिदानीमवसितप्रतिज्ञाभारोऽपि वृषलापेक्षया शस्त्रं धारयामि " मुद्राराक्षस, (तेलंग यांची आवृत्ति, पृष्ठ २९)

असें बोलून, आपल्या प्रिय शिष्यास मिळवून दिलेल्या ज्याचा पाया दृढतर करण्यासाठीं शत्रुपक्षीय अमात्यास आपलासा करून घेतो.

ह्याप्रमाणें तुफान व मुद्राराक्षस यांतील अनुक्रमें प्रास्पेरो व चाणक्य हीं दोन मुख्य पात्रें घेऊन, त्यांत कसें साम्य आहे तें दाखविलें. हें साम्य येथवरच आहे असें नाहीं. ह्याच पात्रांनीं हाताशीं धरलेलीं जीं दुसरीं दोन पात्रें, तींहि अशींच एकसारखीं एक आहेत. हीं पात्रें मिरांडा व चंद्रगुप्त होत. ह्यांतून एक स्त्रीपात्र व दुसरें पुरुषपात्र. तेव्हां, हा एवढा ढोबळ फरक दिसत असतां, ह्यांच्यांत साम्य तें काय असणार, असें कोणासहि वाटणार आहे. पण थोड्याशा विचारा-अंतीं दिसून येईल कीं, मिरांडा व चंद्रगुप्त हीं दोघेंहि आपापल्या गुरुजनांच्या हाताखालीं शिक्षित झालेलीं व सर्वस्वीं यांच्याच कृपेवर अवलंबून अशीं आहेत. ह्या मूळांतल्या सारखेपणामुळें पुढें त्यांच्या वागणुकींत व विचारांतहि सारखेपणा उत्पन्न झाला आहे. पहा, मिरांडा तर बोलून चालून स्त्रीजातच; तेव्हां तिच्या ठिकाणीं स्त्रीजात दौर्बल्य व परावलंबनत्व दिसून आल्यास नवल नाहीं. पण चंद्रगुप्त, आकृतिनें व अधिकारानें, पुरुष व राजा असतांहि त्याच्या कृतींचें व मनोवृत्तीचें वळण पाहिलेंतर सरासरीं जनानी थाटाचेंच दृष्टीस पडतें. फार काय सांगावें ? तो चाणक्याच्या एवढा कह्यांत वागणारा आहे कीं, चाणक्यानें केवळ कृतक कलह करावयास सांगीतलें असतां, त्याला तें पातकप्राय वाटून तो ह्मणतो:—

कृतक कलहं कृत्वा किञ्चत्कालान्तरं स्वतंत्रेण व्यवहर्तव्यमित्यार्यादेशः, । स च कथमपि मया पातकमिवाभ्युपगतः ।
मुद्राराक्षसः—तेलंग याची आवृत्ति पृष्ठ ११५

खरोखर, या ठिकाणीं त्यानें महापातिव्रता द्रौपदी हिच्यावरहि एका निष्टपणांत व दुर्बळपणांत ताण केली असें ह्मणावयास चिंता नाहीं! कीचकाच्या वधासाठीं भीमानें द्रौपदीला सांगीतलें कीं मी तुला वश आहें असें तूं त्याला खोटेंच ह्मण. हा भीमाचा उपदेश जरी निरुपायास्तव तिला स्वीकारावा लागला, तरी तो तिला, बायकांच्या रीतीप्रमाणें, कसासाच वाटला. ह्या प्रसंगाचें वर्णन पंतांनीं फारच खुबीदार केलें आहे, तें असें:—

> त्यास (किचकास) खरें भासेसें प्रियशिक्षित सस्मित स्वयें वदला।
> परि कांपली सतीची तनु, जैशी मंद मारुतें कदली ॥

ह्या द्रौपदीच्या वृत्तींत व चंद्रगुप्ताच्या वृत्तींत काय अंतर आहे? ह्या ठिकाणीं हीहि एक गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे कीं, स्त्रियांस स्वातंत्र्य नाहीं या मनुवचनाधारें, व निसर्गतःच शारीरिक दौर्बल्य त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें, त्यांचें परावलंबनत्व एवढें दोषरूप होत नाहीं, एवढेंच नाहीं, पण उलटें पुरुष वर्गाच्यादृष्टीनें त्यांच्या सच्छीलतेस शोभाच देतें. पण पुरुषाची व विशेषतः जो राजा ह्मणवितो त्याची गोष्ट तशी नाहीं.यास्तव,ज्याचा स्वातंत्र्यावर पूर्ण हक्क आहे,व विशेषतः 'आर्यादेश'हि तसाच आहे, त्याला स्वतंत्रपणें वागणें जर महत्पातक वाटतें, तर अशाला बायल्याहूनहि बायल्या म्हटल्यास काय चिंता आहे? सारांश, चंद्रगुप्ताचें पात्र आकृतीनें स्त्रीरूप नाहीं, इतकेंच कायतें; बाकीं, वर ह्मटल्याप्रमाणें त्याच्या वागणुकीचा थाट व घाटहि, येथून तेथून, स्त्रीपात्राप्रमाणेंच कवीनें दाखविला आहे, हें स्पष्ट आहे. आतां हें पात्र,कवीनें,अशा प्रकारचें आणलें,तें उगाच कांहींतरी आणलें असें ह्मणवत नाहीं. तें त्यानें बुद्ध्याच असें. आणलें असून तद्वारा दुहेरी हेतु साधण्याचा यत्न केला आहे असें आह्मी समजतों. तो असा कीं,ह्या पात्राच्या द्वारें दुर्बळ राजांची स्थिति कशी असते हें दाखवावें, व त्याबरोबरच,ह्या नाटकांत स्त्रीपात्र नाहीं, त्याचीही, जमल्यास, सोय लावावी.मुद्राराक्षस नाटकांत,कोठें शेवटीं शेवटीं,कोना कोपऱ्यांत, चंदनदासाच्या स्त्रीला आणली आहे,तिजवांचून एकहि चांगलेंसें श्रेष्ठ स्त्रीपात्र त्यांत नाहीं. तसेंच तुफान नाटकांतहि, मिरांडेखेरीज, वास्तविक दुसरें स्त्रीपात्र नाहीं.यास्तव,शेक्स्पियर कवीनें आकृतिशून्य पण कामरूप अशा एरिलास आरंभापासूनच 'सुंदर नागकन्येचें रूप' घ्यावयास लावून,कशीबशी(तुफान—उपोद्घात,पृष्ठ११०)आणखी एका स्त्रीपात्राची भर केली आहे.पण केवळ राज्यक्रांतिविषयक'मुद्राराक्षसां'त स्त्रीपात्र आणावयाला कोठून स्थळ मिळावें? यास्तव, त्याच्या चतुर कर्त्यानें,दुसऱ्याच्या हातांत बाहुल्याप्रमाणें वागणाऱ्या चंद्रगुप्तासारख्या

पुरुषासच बायल्या करून टाकून, वरील मोठी उणीव भरून काढण्याची ही अपूर्व युक्ति केली असें वाटतें! कीं, दुसऱ्यांच्या बळावर गादीवर बसलेल्या राजांची स्थिति, एकंदरीनें, किती बायली थाटाची व घाटाची असते, व तशी नसल्यास कशी होते ही सर्वांस ठाऊक असलेली गोष्ट चंद्रगुप्ताच्या उदाहरणानें दाखविण्याचा जो कवीचा मूळ हेतु, तो साधण्यासहि हीच युक्ति बरी दिसल्यावरून हीच त्या कामास आणली. आणि खरोखर कवीचा हा हेतु त्याला इतर कोणत्याहि युक्तीनें इतका उत्कृष्ट साधतां आला असता असें वाटत नाहीं सारांश, ह्या युक्तीनें, विशाखदत्तानें एकांत दोन कामें साधून, येथें शेक्स्पियर कवीवरहि कडी केली असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

याचप्रमाणें पाहूं गेल्यास बाकीच्या पात्रांमध्येंहि साम्य दिसून येणार नाहीं, असें नाहीं. पण विस्तरभयास्तव तसें न करितां, एवढेंच सांगतों कीं,जगाच्या व्यवहारांत रुळलेला, मानी व अंमळ डौली पण पूर्णपणें गृहस्थचालीप्रमाणें स्वस्त्रीपरायण अशा फर्डिनान्डाशीं, मुत्सद्दीपणांत निष्णात, मानी, स्वच्छील, सात्विक व पूर्ण स्वामिभक्त अशा अमात्य राक्षसाची, राज्यलोभास्तव अजाळपणें अन्टोनियोच्या नादीं लागलेल्या सिबास्टिनाशीं, त्याच हेतूमुळें व तितक्याच अजागळपणें राक्षसाच्या शुष्क आश्वासनांच्या नादीं लागलेल्या मलयकेतूची; तशीच, गोडबोल्या व सज्जन अशा गांझेलोशीं, मृदुप्रकृति वाणियाभाई चंदनदासाची वगैरे तुलना करून, साम्य जुळवित गेल्यास सहज जुळवितां येईल, व तें पाहून कोणाहि विचारी मनुष्याचें मन चकित झाल्यावांचून राहणार नाहीं.

तुफान व मुद्राराक्षसास ह्या नाटकांतील कित्येक पात्रांमध्यें आढळून येणारें साम्य वर दाखविलें. त्यांतून कित्येक सारख्या गोष्टी केवळ ओढून ताणून जुळविलेल्या आहेत, असें कांहींकांचें ह्मणणें पडेल. व त्या तशा नाहींतच असेंहि प्रतिपादण्याचें धाडस आह्मा रीत नाहीं. तथापि, हेतु एक असला तर महाकवींच्या अंतःकरणप्रवृत्तिहि एकसारख्या एक होऊन, त्यांच्या कृतींत साम्य उद्भवण्याचा संभव आहे हें येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे. याचें प्रत्यंतर ह्याच दोन नाटकांच्या पहिल्या अंकावरून येण्यासारखें आहे. तें असें कीं, चाणक्याची वाणी, तुफानांतल्या कडकडाटाप्रमाणें, कडाडली असतां, ' नंदवंशप्ररोह ' जाळणाऱ्या ' क्रोधानला 'चें जें वर्णन सुरवातीलाच त्यानें केलें आहे तें. पुढें त्याचें लांबचलांब जें आत्मत भाषण

आहे तें, व त्यापुढें त्याचे अनेक प्रणिधि येऊन नाट्यसूत्रांचें जें कथन करतात तें–हीं सारीं 'टेम्पेस्ट'मधील प्रास्पेरो व मिरांडा यांच्यामधील संवादांशीं व पुढें प्रणिधिरूप एरिलाच्या कथनाशीं सर्वांशानें जमतात. इतकेंच नाहीं पण मुद्राराक्षसाचा आरंभ व बहुतेक सारा पहिला अंक आणि तुफानांतल्या पहिल्या अंकाचा दुसरा प्रवेश, यांच्यांत इतका सारखेपणा आहे कीं संभवनीय असतें, तर एका कवीनें दुसऱ्याची कृति पाहून त्याचें अनुकरण केलें असावें असा संशय घेण्यास जागा झाली असती. कसेंहि असलें, तरी आपलीं नाटकें रचतांना, ह्या दोघाहि कवीचा बेत एकच दिसतो, व त्याविषयीं कोणी वाद घालील असें वाटत नाहीं. हा बेत ह्मणजे एकांत प्रास्पेरो व दुसऱ्यांत चाणक्य, या मुख्य पात्रांची घटना भारदस्त, सर्वसमर्थ व गंभीर दाखवावयाची. तो दोघांनीहि मोठ्या शितापीनें तडीस नेला आहे, यांत शंका नाहीं. यावरून दोघे कवि नाटयकलेंत किती निपूण आहेत हें स्पष्ट दिसतें.

याच प्रमाणें येथें कै. अण्णा किर्लोस्कर, यांच्या 'स्वतंत्र उत्तम, संगीत साभद्र' नाटकाचीहि वरील नाटकद्वयाशीं तुलना केली तर वावगें होईल असें वाटत नाहीं. अलीकडे लोकाभिरुचीस पसंत पडलेल्या संगीत सौभद्रांत व वरील नाटकद्वयांत तुलनेला कांहीं जागा असेल, असें आह्मास वाटलें नव्हतें. पण विविधज्ञानविस्तार मासिकाच्या [पु. ३४ अंक ८--९, आगष्ट–सप्टंबर १९०३] अंकांत संगीत सौभद्रावर एक टीकात्मक लेख प्रगट झालेला पाहण्यांत आल्यावरून, ही कल्पना आमचे मनांत आली, हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. यास्तव सदर लेख लिहिणाराचे आभार मानून, ही तुलना कशीकाय जमते तें थोडक्यांत पाहूं.

सौभद्राची कथा सर्वश्रुतच आहे. त्याचें सामान्य स्वरूप सदर लेखक सांगतात, तें असें:—'सौभद्र हें नाटक कारस्थानाचें आहे; ह्मणजे यांत कृष्णाच्या कारस्थानानें अर्जुनसुभद्राविवाह घडवून आणला आहे' हेंच स्वरूपवर्णन 'तुफान' व 'मुद्राराक्षस' यांसहि लागू पडतें; ह्मणजे, एकांत प्रास्पेरोच्या व दुसऱ्यांत चाणक्याच्या कारस्थानानें अर्थात, अनुक्रमें, जादूनें व राज्यकारणरूप 'मोहभस्मा'नें, फर्डिनांड व मिरांडा यांचा विवाह, आणि राक्षस व चंद्रगुप्त यांचें सख्य, ह्या दोन गोष्टी जुळवून आणल्या आहेत. याशिवाय कित्येक अवांतर गोष्टीहि बऱ्याच जमवून दाखवितां येतील. येथवर सर्व ठीक आहे कारण हा केवळ मूळ कथानकाचा भाग झाला. पण पुढें नाट्यकलेचा भाग आला, व त्याकडे मार्मिकपणें व नाट्यकलेच्या दृष्टीनें पाहूं लागलों, ह्मणजे

सौभद्र' व वरील नाटकद्वय यांच्यांतील साधर्म्य आटपलें. मग त्यांची जी 'तुलना' करावयाची, ती केवळ वैधर्म्यानेंच करावी लागते. पहा, कीं प्रत्येकांतील मुख्य पात्र ह्मटलें ह्मणजे, अनुक्रमें, कृष्ण, प्रास्पेरो, व चाणक्य हें होय. पैकीं प्रास्पेरो व चाणक्य हीं पात्रें त्या त्या नाटकांच्या कर्त्यांनीं कशीं उठावाचीं रेखलीं आहेत! जीं कार्यें ज्या अद्भुत साधानानें कृष्ण करवितो, तींच प्रास्पेरो व चाणक्य हे तशाच प्रकारें करवितात. पण ह्या पात्रांच्या ठिकाणीं जो पराक्रम, जो जोर, जें सर्वसमर्थत्व व कर्तुमकर्तुंशक्तिमत्व दिसून येतें, व तेणें-करून तीं जशीं तेजस्वी दिसतात, तसा कांहींच प्रकार कृष्णाच्या पात्रांत आढळत नाहीं. कृष्ण हें पात्र'अडून गोळ्या मारणारें' अत एव अगदींच गौण व गचाळ झालें आहे. वस्तुत:, संगीत सौभद्र हें केवळ पौराणिक नाटक;व त्यांतला कृष्ण हा,जळीं स्थळीं पाषाणीं अलिप्त राहून अदृश्यपणें जगाचीं सूत्रें नाचविणारा असा भगवान् परमात्मा होय, ही जी पौराणिक कल्पना, तीच घेऊन सरासरीं उभें केलेलें हें पात्र आहे. ह्यांत काय चमत्कार आहे? व कवीचें कौशल्य तरी काय आहे? पुराणांतलें एखादें आख्यान घ्यावें व चार पात्रें जमवून, त्यांच्या तोंडीं कांहीं पद्यें व कांहीं गद्यभाषणें घालावीं,ह्मणजे झालें नाटक तयार, ही जी, पौराणिक नाटकांचे आद्याचार्य विष्णुदास कवि यांची धाटणी, तिचाच आदर करून सिद्ध केलेलें 'स्वतंत्र उत्तम संगीत सौभद्र!'त्यां-तल्या मुख्यच पात्राची काय दशा ती वर सांगितलीच आहे. आणि इतर पात्रांची तरी बरी गत आहे असें नाहींच? नाटकाचें मुख्य अंग ह्मटलें ह्मणजे पात्रांचें प्रकृतिस्वकीयत्व (characterization); तें पौरा-णिक नाटकाला कोठलें? किर्लोस्करांच्या 'रामराज्यवियोगां'त तें कांहीं आहे; पण 'सौभद्रां'त मुळींच नाहीं ह्मटल्यास, चूक होणार नाहीं. ह्याशिवाय ज्या आणखी पुष्कळ दोषास्पद गोष्टी ह्यांत आहेत, त्या 'विस्तारां'तील टीकाकारानेंहि दाखविल्याच आहेत. यास्तव त्यांची पुनरुक्ति येथें न करतां, एवढेंच सांगतों, कीं 'संगीत सौभद्र' हें संगीताच्या टामटुम आवाजाला भुलणाऱ्या, गाजर-पारखी तमासगिरांच्या मतानें मात्र स्वतंत्र उत्तम नाटक; बाकी नाट्यदृष्टीनें तें अगदाच कौशल्यहीन व अप्रौढ होय;मार्मिक व निर्भिड टीकाकारतर त्यास पौराणिक नाटकांच्याच पंक्तीस नेऊन बसवील, हें नि:संशय आहे!

वर 'तुफान' नाटकाशीं आपल्या इकडील नांवाजलेल्या दोन नाटकांची तुलना करून, शेक्स्पियर कवीच्या कृतीचीं काय योग्यता आहे ती वाचकांस कळावी अशी तजवीज केली.

अनायासें, तुलनेला जीं दोन नाटकें घेतलीं तीं अशींच सांपडलीं कीं, तार्किकांच्या अन्वयव्यतिरेकपद्धतीस अनुसरून, ही तुलना आह्मास साधर्म्य व वैधर्म्य अशा दोहोंप्रकारें करून दाखवितां आली. तीवरून जें काय सिद्ध होतें तें हेंच कीं कविश्रेष्ठ ते कविश्रेष्ठ! कोठें शेक्स्पियर, कोठें विशाखदत्त व भजनीं लागलेल्या रावसाहेब मंडळीनें साहेब बनाविलेले कोठें अण्णा'साहेब' किर्लोस्कर!! शेक्स्पियर काय, विशाखदत्त काय, व विष्णुशास्त्र्यासारखे समर्थ महाराष्ट्र ग्रंथकार काय—हे सारे कविश्रेष्ठ होत. अशांशीं अण्णांच्या भक्त मंडळीनें त्यांस बरोबरी करावयास लावूं नये हें उत्तम, व यांतच सर्वांचा बोज आहे असें आह्मी समजतों. स्वतः अण्णांनीं तर तसें धाष्टर्य कधीं केलें नाहीं. आणि केलें असतें, तर 'मुद्राराक्षसा'चा कर्ता विशाखदत्तच त्यांस चाणक्याच्या वाणीनें सांगतां, कीं साहेब!

........................केवलं ते
साधर्म्ये मदनुकृतेः प्रधानवैरम्।

मुद्राराक्षस, अंक ३, श्लोक १२

असो; याप्रमाणें 'तुफान' नाटकाविषयीं सांगावयाचें तें सर्व सांगितलें. आतां, उपसंहारादाखल दोन शब्द लिहून, पुरें करतों. हें नाटक या कवीच्या चांगल्या नाटकांपैकींच असून,त्याच्या परिपक्व बुद्धीचें फळ होय. हें फार अल्पविस्तार, सरळ व साधें असल्यामुळें, नीरस व सामान्य प्रतीचें ह्मणून कित्येकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. पण कवीनें हें नाटक वृद्धपणीं रचलें असल्यामुळें,त्याच्या ते वेळच्या मनाच्या स्थितीस अनुसरून,यांत त्यानें साधेपणाच साधला आहे.यास्तव साधेपणा व सरळपणा हाच याचा प्रधान गुण होय. मागें सांगितलेंच आहे कीं प्रास्पेरो हा स्वतः शेक्स्पियर होय.याच कारणावरून ह्या नाटकाला एक प्रकारचें महत्व आलें आहे. शिवाय, यांत जरी प्रेमकथेचा संदर्भ आणला आहे, तरी वस्तुतः हें नाटक राज्यकारणविषयकच असल्याकारणानें याचें रूपक ह्या भरतखंडावरहि बसवितां येत असल्यामुळें आपल्यादृष्टीनें यास विशेषच महत्व आलें आहे, असें आह्मास वाटतें. आणि शेक्स्पियर कवीची दिव्य ज्ञानदृष्टि जर यथार्थ होणें असेल, तर जडमति कालीबनाच्या स्वाधीन भारलेलें बेट करून स्वभूमीला निघून जाणाऱ्या प्रास्पेरोप्रमाणें या सुवर्णभूमीला आलेला आंग्लजनवर्गहि येथील अज्ञ जनांस सज्ञान केल्यावर, कित्येक इंग्रज मुत्सद्यांनीं बोलून दाखविल्याप्रमाणें,या देशाची सत्ता त्यांच्या हातीं देण्यास सिद्ध होईल, अशी आशा आहे. ही आशा तो सर्वसमर्थ प्रभु सफळ करो!

तुफान

नाटकाचें संविधानक.



दूर समुद्रांत एक बेट होतें. एके काळीं, त्यावर, दोनच मनुष्यें राहात होतीं—एक वृद्ध पुरुष, त्याचें नांव प्रास्पेरो; आणि वयांत आलेली त्याची एक सुंदर मुलगी, तिचें नांव मिरांडा. ती या बेटावर आली तेव्हां फारच लहान होती; ह्मणून बापाखेरीज कोणाही पुरुषाला पाहिल्याचें तिला आठवत नव्हतें.

त्यांची राहावयाची जागा ह्मणजे एक गुहा होती—गुहा कसली? बीळच ह्मटलें तरी चालेल. ही गुहा शिळांची केली होती, व आंत कित्येक खण पाडले होते. एका खणांत प्रास्पेरो अभ्यास करीत असे; ही त्याची अभ्यासाची जागा. येथें त्यानें आपलीं पुस्तकें ठेविलीं होतीं. त्या काळीं विद्वानांस जादुविद्येचा भारी नाद असे, त्याच विषयाचीं हीं सारीं पुस्तकें मुख्यत्वें होतीं. शिवाय, प्रास्पेरोला या विद्येचा तेव्हां विशेष उपयोगही होता. कारण, विलक्षण दैवगतीनें तो ज्या बेटावर येऊन पडला होता, तें बेट सिकोराक्ष नांवाच्या जखिणीनें भारून टाकलें होतें. हा त्या बेटावर आला त्याच्या आधीं नुकतीच ती मरण

पावली होती. तिनें कित्येक यक्षांस वश करून घेऊन, त्यांस दुष्ट बुद्धीचीं कांहीं कामें सांगितलीं होतीं व तीं त्यांनीं न केल्यावरून, त्या सठवीनें रागावून, त्यांस मोठमोठ्या जुनाट झाडांच्या ढोलींत कोंडून टाकलें होतें. प्रास्पेरो यानें येतांच आधीं त्यांस आपल्या विद्येच्या बळानें सोडविलें. यामुळें ही यक्षमंडळी पुढें नेहमीं प्रास्पेरो याच्या आज्ञेंत वागूं लागली. त्यांच्यांत एरिल हा मुख्य होता.

एरिल हा दिसण्यांत मोठा चपळ व कांहींसा खोड्याळ असे; तरी जातीचा कांहीं द्वाड नव्हता. प्रास्पेरो याच्या सेवेला कालीबन ह्मणून एक ओंगळ राक्षस असे, त्याचे मात्र तो भारी हाल करी; आणि असा त्रास देण्यांत त्याला मोठी मौज वाटे. तें थोडेंसें फाजीलच होतें खरें; तरी हें लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं वर सांगितलेल्या जखिणीचा हा मुलगा असून, पहिल्यापासून त्याचा व एरिलाचा उभा दावा होता. प्रास्पेरो याला हा कालीबन रानांत भटकतांना आढळला—मोठी विलक्षण मूर्ति—अष्टांगवक्र! मनुष्यासारखा तर नाहींच, पण माकडासारखाच कांहींसा त्याचा आकार होता! तरी प्रास्पेरो यानें त्याला घरीं आणलें, आणि खायाला प्यायाला घालून, प्रथम त्याला बोलायाला शिकवलें. प्रास्पेरो यानें त्याला आणखी देखील ममतेनें वागविलें असतें; परंतु त्याच्या आई-सारखाच त्याचाहि स्वभाव दुष्ट असल्या कारणानें, तो चांगलें किंवा उपयोगाचें कांहीं काम शिकेल ही बिलकुल आशा नव्हती. मग त्याला दास करून, रानांतून जळवण वगैरे

आणावयाचीं अवघड व मेहनतीचीं कामें प्रास्पेरो यानें त्याच्या मागें लाविलीं; व हीं कामें करवून घेण्याची आवडती कामगिरी एरिल यास सांगितली.

आतां, कालीबन हा पुष्कळ वेळां आपल्या कामाचा आळस करी किंवा त्यांत चुके, तेव्हां एरिल नकळत येऊन त्याला चिमकोरे घेई; केव्हां केव्हां तर चिखलांत देखील पाडी. पण एका प्रास्पेरोवांचून इतरांना एरिल अदृश्य असल्या कारणानें, हे हाल कोण करतो हें कालीबन याच्या बिलकुल लक्षांत येत नसे. मग, याप्रमाणें तो भांबावून गेला ह्मणजे ऐरिलानें माकडाचें रूप घेऊन यावें, व त्याच्याकडे वेडींवांकडीं तोंडें करून, बाचकुल्या दाखवाव्या; इतक्यांत हें रूप टाकून साळूचें रूप घ्यावें, आणि कालीबनाच्या वाटेवर येऊन पडावें. मग तीं अणीदार सालपिसें आपल्या अनवाणी पायांना बोचतील ह्मणून सहजच कालीबन ह्याला भय पडे. अशा एक ना दोन, हजार खोड्या व हजार चेष्टा एरिल नित्य करीत असे, आणि प्रास्पेरो यानें नेमून दिलेल्या कामाची जेव्हां कालीबन हयगय करी, तेव्हां त्याचे हाल हाल करून त्याला अगदीं जेरीस आणीत असे.

वर सांगितल्याप्रमाणें, ही बलिष्ठ यक्षसेना ह्मणूं ती कामें करावयाला सदोदित सिद्ध असल्यामुळें, तिच्या बळावर, प्रास्पेरो याला वारा व वारि यांवर हवें तसें आधिपत्य गाजवितां येत असे. ह्या यक्षांनीं, त्याच्या आज्ञेवरून, एकदा मोठें भयंकर तुफान उत्पन्न केलें असतां, त्याच्या तडाख्यांत सांपडलेल्या एका

छांदार दिसणाऱ्या गलबताकडे बोट दाखवून, प्रास्पेरो आपल्या मुलीला ह्मणाला—"तें गलबत पाहिलेंस का? कसें, प्रतिक्षणीं गगनास कवटाळणाऱ्या लाटांमध्यें गडप होऊं पहात आहे! त्यांत आपणासारखींच माणसें आहेत बरें." त्यावर मुलगी ह्मणते—"हें एवढें वादळ जर आपल्या शक्तीनें तुह्मीं उत्पन्न केलें आहे, तर बाबा, तें शांत कराना तेवढें! बाबा, बाबा! तें गलबत आतां बुडून, त्याचे तुकडे तुकडे होतील, आणि त्यांतलीं सारीं माणसें बिचारीं खास प्राणांस मुकतील! तर, दया करून, त्यांना वांचवाना बरें! मला शक्ति असती, तर अगोदर ह्या मेल्या समुद्राला पृथ्वीच्या पोटांत पार गाडून टाकला असता! मग हा ह्या गलबताला व त्यांतल्या माणसांना कसा बुडविता?"

प्रास्पेरो ह्मणाला—"मुली, एवढी भांबावून जाऊं नको. यांत कोणाला काडीभरहि अपाय झालेला नाहीं. तसें होऊं नये ह्मणून माझी सक्त आज्ञा आहे. मीं जें हें केलें आहे, तें सारें, माझे लाडके, तुझ्यासाठींच केलें आहे बरें. तूं कोण, आलीस कोठून, हें तुला कांहींएक ठाऊक नाहीं. तसेंच, मी तुझा बाप व या गुहेंत तो राहतो याहून माझ्याविषयीं तरी तुला काय माहीत आहे? येथें येण्या आधींचें कांहीं तुला आठवतें? मला नाहीं वाटत, आठवत असेलसें. कारण, तेव्हां तूं पुरी तीन वर्षांची देखील नव्हतीस."

मिरांडेनें उत्तर केलें—"हो, मला आठवतें तर!"

प्रास्पेरो ह्मणतो—"काय आठवतें?—एखादें घर किंवा कांहीं माणसें? काय तुला आठवतें? सांग पाहूं?"

मिरांडा ह्मणाली—"स्वप्नांतल्यासारखें कांहीं कांहीं मला आठवतें. पण मागें माझ्याबरोबर चारपांच बाया असत, नव्हेका हो बाबा?"

प्रास्पेरो तिला ह्मणतो—"असत खऱ्या, आणि चारपांच कां?—पुष्कळ असत. पण हें एवढें तुझ्या मनांत अजूनहि कसें राहिलें बरें! मोठा चमत्कार आहे! आतां, इकडे कशी आलीस हें कांहीं तुला आठवतें?"

यावर, "छेः, आणखी कांहींएक मला आठवत नाहीं" असें मिरांडेनें ह्मटल्यावरून, प्रास्पेरो आपली हकीगत सांगूं लागला. तो ह्मणाला—"बारा वर्षें झालीं, मिरांडे! पूर्वीं मी मिलान नगरीचा राजा होतों, आणि तूं माझी एकुलती एक मुलगी व वारस असून, राजकन्या होतीस. मला एक धाकटा भाऊ होता, त्याचें नांव अंटोनियो. त्याच्यावर माझा पूर्ण विश्वास असल्या कारणानें, मीं राज्यकारभाराचें बहुतेक कामकाज त्याजकडे सोंपविलें, आणि स्वतः एकांत स्थळीं बसून माझ्या आवडीचा अभ्यास मी मन लावून करूं लागलों. मग सर्व ऐहिक गोष्टींचा त्याग करून, मीं आपलें सारें लक्ष आत्मोन्नतीकडे लाविलें व रात्रंदिवस पुस्तकांशीं मैत्री जोडली. हें पाहून, माझा भाऊ ह्मणजे तुझा चुलता, अंटोनियो, यानें धडधडीत मजशीं कपट मांडलें. कारण, माझी सर्व सत्ता आपल्या हातीं येतांच, आपणच खरे राजे असें तो समजूं लागला. माझ्या प्रजाजनांची

प्रीति संपादण्याची ही संधि त्याला मिळाल्यावर, त्याच्या दुष्ट हृदयांत सहजच राज्यलोभाचा मोड उगवला, आणि लगेच माझें राज्य बळकावण्याचा घाट त्यानें घातला. तो असा कीं ज्याच्याशीं माझें हाडवैर, त्या नेपल्स शहरच्या राजाचें सख्य करून, त्याच्याच साहाय्यानें त्यानें हा आपला बेत तडीस नेला.

इतकें ऐकून मिरांडा विचारते—"पण बाबा, त्यानें त्याच क्षणीं कां नाहीं बरें आपले प्राण घेतले?"

प्रास्पेरो यानें उत्तर केलें—"मुली, तसें करण्याची त्याची छाती नव्हती. कारण, माझ्या प्रजाजनांची भक्तिच मजवर तशी होती. पुढें अन्टोनियो यानें तुला आणि मला एका पडावांत घालून दूर समुद्रांत नेलें, व दुसऱ्या एका कुजलेल्या पडावांत जबरदस्तीनें उतरवून आपण निघून गेला. ह्या पडावाला, अर्थातच, शीड, डोलकाठी, दोरखंडें वगैरे कांहीं नव्हतें. त्याला वाटलें, हीं बापलेकरें आतां बुडून मरतील! परंतु माझ्या दरबारीं गांझेलो नांवाचा एक सरदार होता, त्याची माझ्यावर फार भक्ति होती. ह्या गृहस्थानें, कोणालाही न कळूं देतां, या पडावावर गोडें पाणी, खाण्याचे पदार्थ, वस्त्रें वगैरे जिनसा आधींच आणून ठेवविल्या होत्या, आणि यांबरोबरच, माझें राज्य ज्याच्या पासंगाला देखील पुरणार नाहीं अशीं कांहीं पुस्तकेंही माझ्यासाठीं त्यानें ठेविलीं होतीं.

मिरांडेनें ह्मटलें—"बाबा, तेव्हां तुह्माला माझें केवढें ओझें झालें असेल बरें!" प्रास्पेरो ह्मणाला—"नाहींग बाळे! ओझें कसलें? तूं होतीस ह्मणून तर मी वांचलों. तुझें तें

हंसरें मुख पाहून, खरोखर, माझ्या अस्थिर हृदयाला कांहीं लोकोत्तर धैर्य आलें, आणि संकटांचें जें ताट मजपुढें वाढून आलें होतें, तें गट्ट करून बसण्यास मी शक्तिमान् झालों! आपली अन्नसामग्री, आपण येथें येऊन लागलों, तोंवर पुरली. पुढें या निर्जन बेटावर आपण राहूं लागलों, तेव्हांपासून माझें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे तुला शिकवावयाचें; यांतच मला मोठा आनंद वाटे. आणि ह्या माझ्या शिक्षणापासून तुझें खरोखरच मोठें कल्याण झालें आहे."

मिरांडा ह्मणाली—"खचित, हे तुमचे मोठे उपकार होत. पण, बाबा, हें तुफान तुह्मीं कां उत्पन्न केलें आहे, हें मला सांगाल का?"

प्रास्पेरो ह्मणाला—"सांगतों, ऐक. ह्या तुफानानें, नेपल्स नगरीचा राजा व माझा दुष्टबुद्धि भाऊ या दोघांस सध्यां या बेटावर आणून टाकलें आहे."

इतकें बोलून, प्रास्पेरोनें जादूची काठी हळूच मिरांडेच्या आंगाला लावली, व तत्काळ ती झोपीं गेली. इकडे, एरील नांवाचा यक्ष त्याच्यापुढें येऊन उभा राहिला, आणि त्यानें, तुफानाची इत्थंभूत हकीगत व गलबतावरच्या मंडळीची कशी काय व्यवस्था केली ती सविस्तर खबर आपल्या धन्यास निवेदन केली. आतां, ही यक्षमंडळी मिरांडेच्या मुळींच कधीं दृष्टीस पडत नव्हती, यामुळें पुढें कोणी नसतां, नुसत्या हवेंत वेड्यासारखें हा काय बोलतो (कारण तिराहिताला असेंच वाटणार) अशी शंका घेऊन मिरांडेनें आपणास उगाच भलभलते प्रश्न

करूं नयेत अशी प्रास्पेरो याची मर्जी होती; ह्मणून एरिलाशीं बोलण्यापूर्वीं त्यानें मिरांडेला निद्रावश केली.

एरील यक्षास प्रास्पेरो विचारतो-" कसें काय, यक्षा? सांगितलेली कामगिरी कशी काय बजाविलीस, सांग पाहूं?"

एरील ह्यानेंहि, तुफान कसें उत्पन्न केलें ती सारी हकीगत मोठ्या रसाळ वाणीनें वर्णून सांगितली. खलाशी कसे घाबरे झाले, मंडळीनें समुद्रांत कशा भराभर उड्या घातल्या, आणि त्यांतही फर्डिनान्ड यानें कशी अघाडी मारली, व हा आपला आवडता पुत्र पाण्यांत पडून गडप झालासें पाहून, राजाची काय अवस्था झाली वगैरे सर्व गोष्टी इत्थंभूत त्यानें सांगितल्या. आणि शेवटीं ह्मणाला-" परंतु, महाराज, त्याला लेशभरही अपाय झालेला नाहीं. सध्यां त्याला बेटाच्या एका कोनांत एकीकडे सोडून मी आलों आहें. तेथें तो वाईट तोंड करून व उरावर आपले दोनही हात स्वस्तिकासारखे जुळून ठेवून, आपला बाप बुडून मेला अशा समजुतीनें शोक करीत बसला आहे. परंतु त्याच्या केसालाही धक्का लागलेला नाहीं. फार काय सागूं? त्याच्या आंगांतला बहुमोल आंगरखा जरी समुद्रांत भिजला आहे तरी त्याला कोठें डाग किंवा सुरकुती सुद्धां पडलेली नाहीं. कदाचित् मूळचा सुद्धां तो एवढा सुरेख व घडीदार नसेल!"

संतोष पावून प्रास्पेरो ह्मणतो-" वाहवा! एरिला, फार चांगली कामगिरी बजाविलीस. पण, आतां त्या राजपुत्राला

येथवर घेऊन ये पाहूं. माझ्या मुलीच्या दृष्टीस तो पडला पाहिजे. पण, नेपल्स नगरीचा राजा व आमचे बंधुराज हे दोघे कोठें आहेत, सांग बरें ?"

एरिलानें सांगितलें—"मी आलों तेव्हां ते राजपुत्राला धुंडीत होते. परंतु प्रत्यक्ष बुडतांना पाहिला असल्यावर, सांपडण्याची आशा कसली, हें ते पुरते समजून आहेत. खलाशांपैकीं सुद्धां जरी सर्वजण जीवंत आहेत, तरी आपण एकटेच कायते बचावलों असें ज्याला त्याला वाटत आहे. याचप्रमाणें आणखी सांगण्यासारखें एवढेंच, कीं गलबत जरी कोणालाही दिसत नाहीं ह्मणून काळजी पडली आहे, तरी तें बंदरांत सुरक्षित आणून बंदोबस्तानें नांगरून ठेविलें आहे."

प्रास्पेरो ह्मणाला—"एरिला, तुझी कामगिरी तर तूं उत्कृष्ट रीतीनें केलीस; तरी तुला आणखी थोडें काम आहे."

यावर एरिल ह्मणाला—"आणखी काम आहेच काय ? पण, महाराज, आपणाला थोडी आठवण देऊं द्या. तुला लौकरच मुक्त करूं ह्मणून आपण ह्मटलें आहे बरें. मी आपली आजपर्यंत कशी सेवा केली आहे ?—कधीं खोटें नाटें सांगितलें नाहीं, चुका केल्या नाहींत, हयगय केली नाहीं, हो ना ह्मटलें नाहीं; लक्षांत असावें इतकें !"

प्रास्पेरो संतापून ह्मणाला—"काय ? इतक्यांतच सुटकेची गोष्ट ? कसकशा यातनांतून मी तुला सोडविलें—कांहीं आठवण कर. सिकोराक्ष सठवीला इतक्यांतच विसरलास अं ? वार्धक्यानें

व नक्रगतीनें सर्वांगवक्र झालेल्या त्या जखिणीची आठवण अगदींच बुजाली, नाहीं काय? बोल; ती कोठली? दे उत्तर."

एरिल ह्मणाला—"अल्जिर्स येथली."

प्रास्पेरो ह्मणतो—"होय,खरेंना? तिनें तुझी कसकशी दशा केली, हा पाढा तुजजवळून मला रोज वाचवून घेतला पाहिजे; त्याशिवाय तुला आठवण राहणें नाहीं. त्या दुष्टेनें अल्जिर्स येथें जादूनें कसा कहर केला तो कानांनीं ऐकवत देखील नाहीं. मग लोकांनीं तिला तेथून घालवून दिली; ती खलाशांनीं गलबतावर घालून, शेवटीं या बेटावर आणून सोडली. सध्यां तूं माझा दास आहेस, तेव्हां तिचा होतास. पण तूं किती नाजूक आणि तिच्या आज्ञा किती घोर—किती ओंगळ! या आज्ञा तूं करीनास असें जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां झाडाच्या ढोलींत घालून तिनें तुला कोंडून टाकलें. मी आलों, आणि पाहतों, तों तूं अशा स्थितींत रडत ओरडत आहेस. लक्षांत आहे का?—या यातनेंतून मीं तुला सोडविलें आहे."

उपकार स्मरून, एरिलानें लज्जेनें मान खालीं घातली. तो ह्मणाला—"महाराज, चुकलों, क्षमा करा; सांगाल तें तें ऐकतों."

प्रास्पेरो ह्मणतो—"ऐक तर. आणि नीट वागलास तर लौकरच तुला मी मुक्त करीन." असें ह्मणून आणखी काम काय करावयाचें तें त्यानें सर्व त्याला सांगितलें. मग एरिल तसाच उडाला, तो, जेथें फर्डिनान्ड याला त्यानें ठेविलें होतें,

तेथें आला. फर्डिनान्ड अझूनही तसाच मैदानावर खिन्न मुद्रेनें विचार करीत बसला होता. त्याला पाहतांच, एरिल ह्मणाला—" चलावें, राजश्री, चलावें. आह्मी तुह्माला आतां हळूहळु नेणार. आमच्या मिरांडाबाईना तुमचें हें सुंदर शरीर, मला वाटतें, पहावयाचें आहे, तेव्हां तुह्माला नेलेंच पाहिजे. चला तर, या असे माझ्या मागून." इतकें बोलून तो गाणें गात चालूं लागला.

गाणें.

['थोर तुझे उपकार' या चालीवर.]

हा बघ भुंके श्वान । हा बघ भुं भुं भुंके श्वान ॥
कुक्कुटही घे तान । हा बघ भुं भुं भुंके श्वान ॥ ध्रु० ॥
या झडकरि या सुवर्णपुलिनीं, किति सुंदर मैदान ॥ १ ॥
झाली झाली वेळ आपुली, ऐका, द्या अवधान ॥ २ ॥
स्वकरीं घ्या हो घ्या कर चुंबुनि, द्या त्या आदरमान ॥ ३ ॥
वायु करा स्थिर, शांत होउं द्या हा सागर दुस्मान ॥ ४ ॥
टाका मागें पुढतिं पाउलें बरोबरीनें छान ॥ ५ ॥
यक्ष गड्यांनो, दक्षपणें गा मंजुळ घेउनि तान ॥ ६ ॥

यानंतर जें दुसरें एक गाणें एरिलानें ह्मटलें त्यांतील संदर्भावरून, आपला बाप बुडून मरण पावला ही गोष्ट समजतांच, राजपुत्राचें मन ज्या संभ्रमांत पडलें होतें, त्यांतून मुक्त झालें, आणि तो खाड्कन भानावर आला. मग उठून, ज्या दिशेनें एरिलाच्या गाण्याचे सूर ऐकूं येत होते तिकडेच आश्रय पाहात तो चालला. चालतां चालतां, ज्या एका विस्तीर्ण वृक्षाच्या छायेखालीं प्रास्पेरो व मिरांडा बसलीं होतीं, तेथें येऊन तो पोंचला.

त्याला पाहतांच, प्रास्पेरो ह्मणतो—" मिरांडे, तें समोर काय दिसतें, सांग पाहूं ?"

आतां, मिरांडेनें आजपर्यंत बापावांचून पुरुष कसा तो डोळ्यांनीं पाहिलाच नव्हता; तेव्हां फर्डिनान्ड याला पाहतांच तिला मोठें आश्चर्य वाटलें. व ती कौतुकानें ह्मणते—" काय ? हा कोणी यक्षच आहे वाटतें ? बाबा बाबा, कसा हो तरी हा पाहात आहे चोहोंकडे ! वाः, काय सुंदर मूर्ति ! यक्ष नव्हे का हा ?"

बाप ह्मणतो—" छेग मुली, यक्ष नव्हे. अग हा खातो, पितो, निजतो, उठतो; सर्व विकार आपणाला होतात तसेच यालाहि होतात. तूं पाहतेस, हा तरुण पुरुष त्या बुडालेल्या गलबतांतला बरें ! याचा चेहरा सध्यां दुःखामुळें अंमळ उतरलेला दिसतो; तो तसा नसता तर तूं ह्याला देखणा ह्मणूनच ह्मणतीस. पण सध्यां हा बापडा आपल्या नाहींशा झालेल्या मंडळीला इकडे तिकडे पाहात आहे !"

आतां, मिरांडेची समजूत अशी होती, कीं जगांत पुरुष ह्मटले ह्मणजे, आपल्या बापासारखी ज्यांची मुद्रा गंभीर आणि दाढी पिकलेली, असेच सारे असावयाचे. ह्मणून तरुण फर्डिनान्ड याच्या अलौकिक लावण्याचें तिला मोठें कौतुक वाटलें यांत नवल काय ? इकडे फर्डिनान्ड यानें एरिलाच्या गाण्याचे अलौकिक सूर ऐकल्यापासून, त्याचीहि अशी समजूत होऊन गेली, कीं आपण कोणत्यातरी भारलेल्या बेटावर येऊन पडलों असून, येथें काय काय अद्भुत चमत्कार आतां दिसणार आणि

काय काय नाहींत याला पारच नाहीं. होईल तें तें थोडें। अशी त्याची समजूत झाल्यामुळें, त्या निर्जन प्रदेशांत मिरांडेला पाहतांच, त्यानें एकदम तर्क केला, कीं ही सुंदर रमणी कोणी वनदेवता असून, ह्या बेटाची स्वामिनी असावी. मग अशा बुद्धीनेंच तो तिच्याशीं बोलूं लागला.

पण मिरांडेनें त्याला भीत भीतच ह्मटलें—" मी कांहीं कोणी देवता नाहीं; सामान्य मानवकन्याच आहें." एवढें बोलून, आपली कुळकथा सांगण्याचा तिचा बेत होता; इतक्यांत मध्येंच प्रास्पेरो याणें आपलें भाषण सुरू केलें. पहिल्याच भेटीला (असेंच हें ह्मणायाचें) हीं दोघेंहि एकमेकांवर एवढीं अनुरक्त झालीं ही गोष्ट स्पष्टपणें प्रास्पेरो याच्या लक्षांत आली. तिचें त्याला वाईट तर वाटलें नाहींच, पण दोघेंही एकमेकांस भुलून एकमेकांची प्रशंसा करूं लागलीं हें पाहून त्याला मोठें कौतुक झालें. तथापि, फर्डिनान्ड याचें हें प्रेम कितपत स्थिर आहे हें पाहण्याच्या हेतूनें, दोघांच्या प्रेमबंधनांत अडचणी घालण्याचा त्यानें बेत केला. मग पुढें होऊन, तो निष्ठुर मुद्रेनें फर्डिनान्ड याजकडे पाहून ह्मणतो–" या बेटावर तूं हेर ह्मणून आला आहेस, नव्हे काय? एकूण, हें बेट मजपासून जिंकून घ्यावें असा तुझा बेत दिसतो! पण लक्षांत ठेव–मी या बेटाचा राजा आहें." पुढें तो असेंही आणखी ह्मणाला––" चलरे ए, चल मज बरोबर! तुझे हात नी पाय एकत्र बांधून, पहा कशी गठडी वळतों ती. समुद्राचें खारें पाणी तुला प्यायाला, आणि खाजऱ्या सुरणाचा कांदा नी सुकीं

मुळकंडें नी नाचण्याचें भुसकुट यांचा छांदार रांधा तुला जेवायाला! चल."

यावर फर्डिनान्ड ह्मणतो—"छत्! कधीं नाहीं येणार. असला आदरसत्कार आह्माला नाहीं खपायाचा! असली शत्रूची छाती तर त्यानें करून पहावा!" इतकें बोलून त्यानें तलवारीला हात घातला; पण प्रास्पेरो याणें आपली जादूची काठी फिरवून, त्याला, तो उभा होता त्याच जागीं, स्थिर करून टाकलें. तेणेंकरून जागचें हलतां देखील येईना अशी त्याची स्थिति झाली.

बापाच्या खांद्यावर ओळकंबून मिरांडा ह्मणाली—"नकाहो, बाबा, नका एवढे निष्ठुर होऊं. दया करा. मी पाहिजे तर त्यांची जमीन! मग तर झालें? आतांपर्यंत मीं पाहिले असे पुरुष दोनच—एक तुह्मी आणि हे दुसरे. मला तर वाटतें, हे फार सज्जन आहेत; इतके अधम नाहींत!"

प्रास्पेरो तिला दटावून ह्मणतो—"चूप! तोंडावाटे अक्षर काढूं नको. काढलेंस तर तुझी खोडकीच मोडतों, पहा! हें काय? ह्या चोराची एवढी रदबदली कशाला? तुला वाटतें—याच्यासारखे देखणे जगांत कोणी नाहींतच. तूं अद्याप कोणाला पाहिलें आहेस?—येऊन जाऊन, कालीबनाला आणि ह्याला. मूर्ख कुठली! अग, कालीबनापुढें हा तुला देखणा वाटतो एवढेंच; बाकी याच्याहूनही देखणे पुरुष जगांत शेकडोशें आहेत." हें तो बोलला, तें केवळ आपल्या मुलीचें मन कितपत दृढ आहे हें पाहण्याकरतांच बोलला. पण यावर मिरांडा

लगेच काय ह्मणाली ?—"माझी आवड आपली साधी आहे ! आणखी चांगले पुरुष पाहाण्याची मला मुळीं इच्छाच नाहीं !"

तिचें हें भाषण ऐकलें न ऐकलेंसें करून, प्रास्पेरो राजपुत्रास ह्मणतो—"चल, पुढें ये असा. नाहीं ह्मणावयाची तुझी आतां प्राज्ञा नाहीं."

फर्डिनान्ड यानें उत्तर दिलें—"नाहीं खरीच !" आपली शक्ति जादूच्या बळानें हरण झाली हें त्याच्या ध्यानीं मनीं सुद्धां नव्हतें. यामुळें, चल ह्मणतांच, प्रास्पेरो याच्या मागून आपणास कां जावें लागलें याचा त्याला मोठा अचंबा वाटला. मग, प्रास्पेरो याच्या मागोमाग गुहेकडे जातांना, मिरांडा दिसे तेथवर मागें मुरडून पहात तो चालला असतां, ह्मणतो—"माझा जीव अगदीं गुदमरून गेला आहे—जणों मी स्वप्नांतच आहें ! ह्या माणसाची दरडावणी कांहीं विलक्षण आहे, आणि मला क्षीणताहि बरीच भासूं लागली आहे, तरी ह्यांची फारशी पर्वा मी करीत नाहीं. बंदिवास देखील पत्करला— मात्र अशा बंदिवासांतहि, दिवसांतून एकदा ह्या सुंदरीचें मुखकमल माझ्या दृष्टीस पडावें !"

प्रास्पेरो याणें राजपुत्रास नेलें तें गुहेमधल्या एका खणांत कोंडून ठेविलें. परंतु तेथेंहि फार वेळ न ठेवतां, त्यानें त्याला बाहेर काढून कांहीं अवघड काम करावयास लावलें. मग ही गोष्ट आपल्या मुलीला कळवून, जणों आपण आपल्या अभ्यासाच्या खोलींत गेलों असें त्यानें दाखविलें; पण

खरोखर तसें न करितां, तीं दोघें पुढें काय बोलतात चालतात हें नकळत पाहाण्याचा त्यानें निश्चय केला.

प्रास्पेरो यानें राजपुत्रास, लांकडाचे अवजड ओंडे वाहून आणून, एकावरएक रचून ठेवण्यास, सांगितलें होतें. पण, राजांच्या मुलांना अशा श्रमाच्या कामांची संवय कोठून? फर्डिनान्ड तर हे ओंडे वाहतां वाहतां घामाघूम होऊन, अगदीं मट्यास आला. अशी ही आपल्या प्रियकराची दशा पाहतांच, मिरांडेच्या मनाला कळवळा येऊन, ती त्यास ह्मणाली—"अहो, एवढी जीवावरपड मेहनत करूं नका. माझे बाबा सध्यां आपल्या अभ्यासांत गुंतले आहेत. आतां तीन तास तरी त्यांची धास्ती नको. ह्मणून ह्मणतें, अंमळ विसांवा घ्या."

पण फर्डिनान्ड तिला उत्तर करतो—"सुभगे, तसें करतां येत नाहीं. आधीं मला माझें काम करून टाकलें पाहिजे. मग विसांव्याची गोष्ट."

तेव्हां मिरांडा ह्मणते—"बरें तर, मी आणूं लागतें लांकडें; तोंवर तुह्मी अंमळ खालीं बसा."

परंतु ह्या गोष्टीला फर्डिनान्ड कबूल होईना. याप्रमाणें मदत व्हावयाची राहिली दूर, पण मिरांडेमुळें उलटा त्याचा खोळंबा मात्र झाला. कारण बोलतां बोलतां त्यांचें बोलणें वाढलें, आणि तेणेंकरून लांकडें वाहण्याचें काम मंदावलें.

फर्डिनान्ड याचें प्रेम कितपत स्थिर आहे याची परीक्षा पाहण्यासाठींच प्रास्पेरोनें हें काम त्याला सांगितलें होतें.

यास्तव, त्याच्या मुलीला वाटलें होतें त्याप्रमाणें, तो पुस्तकें वाचीत न बसतां, तीं काय बोलतात तें अडून ऐकत जवळच उभा राहिला होता.

फर्डिनान्ड यानें प्रथम तिचें नांव तिला विचारलें. तें तर तिन पटकन् सांगितलेंच; पण ह्मणाली—"मीं नांव सांगितलें ही मोठी चूक केली. नांव सांगूं नको ह्मणून बाबांनीं मला बजावून सांगीतलें होतें."

मिरान्डेनें बापाची आज्ञा मोडल्याची ही पहिलीच खेप; तरी याचा त्याला अगदीं राग आला नाहीं. ती एकाएकीं प्रेमपाशांत सांपडली, हा खेळ वस्तुतः प्रास्पेरोच्या जादूचाच होता, ह्मणून प्रेमाच्या भरांत ती आज्ञा विसरली यांत तिचा दोष नव्हता हें मनांत येऊन त्याला हसें मात्र आलें. पुढें फर्डिनान्ड आणखी पुष्कळ गोष्टी बोलला; त्यांचा आशय इतकाच होता कीं, आपण आजपर्यंत जेवढ्या स्त्रिया पाहिल्या त्यांत तूंच कायती सर्वोत्कृष्ट असून तूंच आपणाला प्रिय आहेस. हें त्याचें बोलणें ऐकून, प्रास्पेरोला मोठा संतोष झाला.

तिच्या स्वरूपाची स्तुति करून फर्डिनान्ड पुढें ह्मणाला—"मिरान्डे, खरेंच सांगतों, एकाहि स्त्रीला तुझ्या सौंदर्याची सर येणार नाहीं." यावर ती ह्मणाली—"मलातर, बाई, अझून कोणाही स्त्रीचें तोंड पाहिल्याचें आठवत नाहीं. आणि पुरुष तरी कोणकोण पाहिले आहेत?—एक आमचे बाबा, आणि आज एक आपण. जगांत सौंदर्य कशास ह्मणतात हें मला ठाऊक नाहीं. मग तुमच्यावांचून कोणाचें रूप मनांत आणावें?

मला तर आपलें हेंच स्वरूप बरें वाटतें. आणि आपल्या समागमाचा लाभ जर होईल तर जगांत मला कशाचीहि परवा नाहीं, हें खचित सांगतें. पण ही मी कांहींच्या बाहींच काय बडबडत सुटलें? बाबांच्या आज्ञेचें अगदीं भानच नाहीं मला!"

हें ऐकून प्रास्पेरो याला फिरून कौतुकानें हसें आलें, आणि मान हलवून, तो आपल्याशीं ह्मणाला—"हा घाट तर सर्व मनाप्रमाणें उतरत चालला. खचीत, आमची ही बाळी आतां नेपल्स नगरची राणी होणार!"

हे विचार त्याच्या मनांत घोळत आहेत, तों इकडे फर्डिनान्ड यानें प्रौढपणें पुनः भाषण सुरू केलें, तें बराच वेळपर्यंत चाललें. दरबारी प्रौढ भाषेनें कसें बोलतात याचें तरुण राजवंशीयांस बाळकडूच असतें, ह्मणावयास चिंता नाहीं. बोलतां बोलतां, त्या बिचाऱ्या अल्लड मिरांडेला त्यानें आढ्यतेनें असेंहि कळविलें कीं नेपल्स नगरीच्या गादीचे आपण वारस असून, तुला राणी करण्याचा आपला विचार आहे.

तेव्हां मिरांडेच्या डोळ्यांवाटे टपटप आनंदाश्रु गळाले. ती ह्मणाली—"हें खरेंच काय? मला आनंद होत असतांना डोळ्यांवाटे हीं आंसवें येतात तेव्हां मी किती वेडी बरें! असो; मी आतां शुद्धांतःकरणानें एवढेंच विचारतें—मग यांत मला भाबडी ह्मणा कीं कांहीं ह्मणा—माझ्या मनांतून आपली धर्मपत्नी व्हावें असें आहे; आपण अंगीकार केलाना?"

यावर फर्डिनान्ड आनंदानें प्रेमसूचक शब्द कांहीं बोलणार,

तोंच प्रास्पेरो पुढें आला. मग उघडच, फर्डिनान्ड याचें तोंड बंद झालें.

मुलीला हातीं धरून प्रास्पेरो ह्मणतो—"ये, बाळे! भिऊं नको. तुमचें बोलणें मी सारें अडून ऐकलें. त्यानें मला फारफार संतोष झाला, समजलीस? आणि हें पहा! राजकुमारा, तुला मीं कष्ट दिले याचा खेद तूं मानूं नकोस. त्याचा वचपा मी काढून टाकतों. ही माझी लाडकी मी होऊन तुला अर्पण करतों. मग तर झालें? तुझें प्रेम कितपत खरें आहे हें पाहण्याकरतांच हे कष्ट मीं दिले होते. असो. त्याविषयीं आतां संशय उरला नाहीं. तुझी परीक्षा पाहिली; मला संतोष झाला; तर आतां, देणगी ह्मणूनच ही मी तुला दिली. आणि तूंहि आपल्या गुणांनीं हिला आपलीशी केली आहेसच, त्यापक्षीं हिचा अंगीकार केला असें ह्मण ह्मणजे झालें. मला हिचा एवढा गर्व वाटतो ह्मणून तूं हसूं नकोस. हिची कितीहि प्रशंसा केली तरी खचित थोडी आहे."

नंतर दोघांकडे पाहून तो ह्मणाला—" थोडें अगत्याचें काम आहे तिकडे मला आतां गेलें पाहिजे. इतक्यांतच मी येतों; तोंवर उभयतांना कांहीं बोलणें असेल तर येथें बसून खुशाल बोला." मिरांडेला हेंच हावें होतें, व तशीच बापाचीहि आज्ञा झाली; मग ती हुंचूं कशाला करते?

याप्रमाणें, त्यांना तेथें सोडून प्रास्पेरा निघाला. लगेच त्यानें एरिल याचें स्मरण केलें. तोहि येऊन समोर

उभा राहिला; आणि प्रास्पेरो याचा भाऊ व नेपल्स-नगरचा राजा यांचा आपण कसकसा समाचार घेतला हे त्यास मोठ्या उत्कंठेनें सांगूं लागला. तो ह्मणाला—"महाराज, अशा एकेक विलक्षण वस्तु त्यांच्या दृष्टीस पाडल्या व अद्भुत गोष्टी ऐकविल्या, कीं भयानें ते सर्वजण इतके गडबडून गेले आहेत, कीं त्यांचे मेंदु देखील ठिकाणावर नाहींत. अशा स्थितींत, मग, सर्व मंडळी दाही दिशा हिंडूं लागली, व हिंडून हिंडून शिणली असतां व अन्नावांचून त्यांचा जीव व्याकूळ झाला असतां, त्यांजपुढें उत्तम रसभरित पक्वान्नांचीं ताटें मी एकदम आणून ठेवलीं. मग खाण्यासाठीं ते त्यास हात लावतात तोंच अत्यंत वखवखलेल्या राक्षसी गिधाडाच्या रूपानें येऊन, मीच तीं सर्व ताटें देखतां देखतां नाहींशीं केलीं. पुढें हा सोंगाड्या गृध्र त्यांस हाका मारून बोलूं लागला. ह्मणजे मीच ह्मणालों—'अहो! प्रास्पेरोला त्याच्या राज्यांतून दुष्ट बुद्धीनें कोणी काढून लाविलें? बोला. आणि त्याची मुलगी, केवळ लहान अर्भक असतां, तिच्या सकट त्याला, तो मरावा ह्मणून, समुद्रांत कोणी आणून सोडलें?—कांहीं आठवण आहे काय? त्या पापासाठींच तुह्मा सर्वांना हीं भयंकर संकटें आज भोगावीं लागत आहेत!"

हे शब्द ऐकतांच, नेपल्स नगरच्या राजाला व त्या कपटी अंटोनियोला कृतकर्माचा मोठा पश्चात्ताप झाला; आणि प्रास्पेरो याला आपण दुःख दिलें हा त्याचा मोठा अन्याय केला याबद्दल त्यांना फार वाईट वाटलें. मग, हा ह्यांचा

पश्चात्ताप खरा आहे, वर वर नाहीं अशी खात्री करून, एरिल आपल्या धन्याला ह्मणाला—"फार काय सांगूं? मी पिशाच्च आहेना? पण मला देखील त्यांची स्थिति पाहून फार किंव आली."

"असें आहे तर मग त्यांना आधीं येथें घेऊन ये पाहूं" प्रास्पेरो ह्मणाला—"तूं पिशाच्च असून, तुला सुद्धां त्यांचा एवढा कळवळा येतो, तर मी बोलून चालून त्यांच्या सारखाच मनुष्य—मला त्यांचा कळवळा कसा नाहीं येणार? तर जा, अगोदर त्यांना इकडे घेऊन ये."

एरिल तसाच गेला, तो, लौकरच, राजाला, अंटोनियोला व वृद्ध गांझेलोला, एकामागें एक घालून, ओळीनें घेऊन आला. या सर्वांना आपल्या धन्यासमोर ओढून आणण्यासाठीं त्यानें तानबाजीचें सुरेखसें गाणें गाइलें. तें इतकें मधुर होतें कीं त्यानें तो सारा प्रदेश नादावून गेला. व ह्याच गाण्याचे सूर ऐकून, ते सर्वजण आश्चर्य करीत चालले. हा गांझेलो कोण?—तर प्रास्पेराचा नाश व्हावा अशा बुद्धीनें, अन्टोनियो यानें त्याला एका उघड्या होडक्यांत घालून जेव्हां समुद्रांत सोडलें, तेव्हां ज्यानें, याचीं आवडीचीं पुस्तकें व खाण्याची सामुग्री त्याच्या होडक्यांत आणून ठेवण्याची तर्तूद केली होती, तो—एवढ्यानें बहुधा वाचकांस त्याची ओळख पटेल असें वाटतें.

या सर्वांचीं डोकीं दुःखानें व भीतीनें एवढीं गुंग होऊन गेलीं होतीं, कीं प्रत्यक्ष प्रास्पेरो त्यांच्या दृष्टीस पडला तरी त्यांच्यानें तो ओळखवला नाहीं. तेव्हां, प्रथम त्यानें त्या भल्या

वृद्ध गांझेलोला ओळख दिली. ती अशी कीं, 'अरे भले गृहस्था! आमचे जीव वांचविलेस तोच तूं नव्हेस काय?' अशी त्याला नांवानें हाक मारली. ही ओळख पटल्यावर, मग, आपण ज्याला अन्यायानें दुःख दिलें तोच हा प्रास्पेरो असें राजाच्या व अन्टोनियोच्याही लक्षांत आलें.

इतकें झालें तेव्हां अन्टोनियो याचें हृदय पश्चात्तापानें भरून येऊन, तो सद्गदित झाला व त्याच्या डोळ्यांवाटे अश्रु वाहूं लागले. मग काकुळतीस येऊन, त्यानें आपल्या भावाची क्षमा मागितली. प्रास्पेरो याला पदच्युत करण्यांत आपण त्याच्या भावाला मदत केली ही मोठी चूक केली, व तीबद्दल आपणास फारफार वाईट वाटत आहे असें राजानेंही स्पष्ट ह्मटलें. हा त्यांचा भाव खरा आहे असें जाणून प्रास्पेरो यानेंहि त्यांना क्षमा केली, व आतां माझें राज्य मला द्या ह्मणजे झालें ह्मणून मागणें केलें. त्याप्रमाणें, त्यांनींहि तें देण्याचें कबूल केल्यावर, तो नेपल्स नगरच्या राजाला उद्देशून ह्मणाला—"तुह्मी मला राज्य दिलें हे तुमचे मोठे उपकार झाले; त्यांची फेड होईल अशी तुह्मालाहि देण्यासारखी एक देणगी मजपाशीं आहे." असें बोलून त्यानें गुहेचा दरवाजा उघडला व 'हे घ्या आपले चिरंजीव' ह्मणून ह्मटलें. यावेळीं फर्डिनान्ड मिरांडेबरोबर बुद्धिबळें खेळत आंत बसला होता.

कांहीं कल्पना नसतां ही अशी अवचित भेट झाली ह्मणून त्या बापलेकांना त्यावेळीं जो आनंद झाला तो गगनांत मावेना. कारण, तुफानांत आपला मुलगा गेला ह्मणून बापाला वाटत

होतें, व बाप गमावला अशींच लेकाचीहि समजूत होती. यामुळें आज आपणांस नव्याच वस्तूचा लाभ झाला असें क्षणभर त्यांस वाटलें.

ह्या सर्व मंडळीस पाहतांच मिरांडा ह्मणाली—" हा काय बाई चमत्कार ह्मणावा ! अहाहा ! कितीहो हे सुंदर प्राणी येथें ! ज्या जगांत अशीं माणसें आहेत तें हें जग खचित धन्य आहे !"

मिरांडेची यौवनकळा व तिचें अप्रतिम लावण्य हीं पाहून, नेपल्स नगरीचा राजा तर इतका चकित झाला, कीं तितका राजपुत्र देखील झाला नसेल. तो ह्मणाला—"ही हो तरुणी कोण ? आमची फाकाफाक करून, अशा रीतीनें फिरून भेट घालून देणारी कोणी देवता तर नव्हे ही ?" यावर "नाहीं बाबा" असें फर्डिनान्ड यानें उत्तर दिलें. आणि मिरांडेची प्रथमच दृष्टादृष्ट झाली तेव्हां जशी आपली चुकी झाली होती तशीच आपले बापाचीहि झाली आहे, हें पाहून, किंचित् हंसतच तो ह्मणाला—"ही तर मानुष कन्याच आहे. पण बाबा, ज्याची कृति अमानुष अशा परमेश्वराच्या कृपेनें ती सध्यां माझी झाली आहे. हिचा अंगीकार केला तेव्हां आपली अनुज्ञा मला घेतां आली नाहीं, याचें बरीक वाईट वाटतें. पण आपण जिवंत आहां असें मला वाटलें नाहीं. मिलान नगरीचे विख्यात महाराज प्रास्पेरो, ते हे; व यांची ही कन्या. यांचें नांव माझ्या कानांवरून पुष्कळ वेळां गेलें होतें; प्रत्यक्ष भेट मात्र झाली नव्हती, ती आज झाली. यांनीं मला आज

नवा जन्म दिला; आणि ह्या सुंदरीच्या संबंधानें तर हे माझे खरेच तीर्थरूपहि झाले आहेत."

राजा ह्मणाला—"तर मग, मीहि हिला तीर्थरूपच झालों ह्मणावयाचा! पण काय हो, आपल्याच मुलीची आपण क्षमा मागावी हें कसेंसेंच दिसतें, नाहीं बरें?"

प्रास्पेरो ह्मणाला—"जाऊं द्या; त्यांत काय आहे? शेवट गोड झाला, आतां गत गोष्टींची आठवण करून दुःख करूं नका."

इतकें बोलून प्रास्पेरो यानें अंटोनियोला आलिंगन दिलें, व तुला सर्व गोष्टींची क्षमा आहे असें फिरून सांगितलें. तो ह्मणाला—"सर्वसमर्थ परमेश्वराची लीला कांहीं अगाध आहे, मिलान नगरीच्या गरीबशा राज्यांतून मला तुह्मीं काढून लावावें आणि त्यायोगें माझ्या कन्येला नेपल्स नगरीच्या थोरल्या गादीवर वारसा प्राप्त व्हावा, असाच ईश्वरी नेमानेम होतासें दिसतें. कारण अशा ह्या निर्जन बेटांत फर्डिनान्ड व मिरांडा यांची गांठ पडून त्यांचें प्रेम जडलें, हें एरवीं कसें घडतें?"

हे प्रेमगर्भ शब्द प्रास्पेरो बोलला ते केवळ आपल्या भावाला कांहीं समाधान वाटावें ह्मणून बोलला; तरी त्यांनीं समाधान न वाटतां अन्टोनियोच्या हृदयाला घरेंच पडले. तेव्हां शरम व खेद यांनीं सद्गदित होत्साता तो रडूं लागला; त्याच्यानें एक शब्दहि बोलवेना. इकडे भल्या वृद्ध गांझेलोच्याहि डोळ्यांना पाणी आलें. पण तें, अशा प्रकारें सर्वांचा समेट झाल्यामुळें त्याला जो आनंद झाला त्यामुळें आलें, हें उघडच आहे.

मग त्यानें परमेश्वराची प्रार्थना करून, त्या तरुण जोडप्याला निरंतर सुखी ठेवावें, असें त्याजपाशीं मागणें मागितलें.

यावर तथास्तु असें ह्मटल्यावर प्रास्पेरो यानें सर्वांस हेंहि कळविलें कीं—" गलबताची काळजी कोणालाहि नलगे. तें बंदरांत सुरक्षित असून, तुमचे सर्व खलाशीहि त्यावर आहेत. आतां आपण सर्व उद्यां सकाळीं आपल्या देशीं जाण्याला निघावें. मुलीसह मीहि तुमचेबरोबर येणारच. पण सध्यां आपण सर्वांनीं आमच्या गरीबशा गुहेंत चलावें व जी मीठभाकर असेल तिला मान द्यावा, अशी माझी सर्वांस विनंति आहे. मग संध्याकाळीं मी आपली हकीगत, येथें या निर्जन बेटावर येऊन लागलों तेव्हांपासूनची, सविस्तर आपणास सांगेन ह्मणतों. तिच्या योगानें आपणास खचित चांगली करमणूक होईल." असें बोलून त्यानें कालीबनाला हाक मारली व भोजन तयार कर व गुहेंत नीट व्यवस्था ठेव ह्मणून आज्ञा केली. कालीबनाला पाहतांच सर्व मंडळीस मोठें आश्चर्य झालें, व ही एवढी वेडीविद्री कुरूप मूर्ति कोठें मिळाली ह्मणून ते विचारूं लागले. प्रास्पेरो ह्मणाला—"अहो हा आमचा एकुलता एक चाकर, ह्या भेसूर राक्षसांवांचून दुसरें येथें आह्माला कोण आहे ? तेव्हां आहे हा बराच आहे ह्मणून ह्मटलें पाहिजे."

प्रास्पेरो स्वदेशीं जायाला निघाला, पण त्याच्या आधीं त्यानें एरिलाला दास्यांतून मुक्त केलें. तेणेंकरून त्या लहानशा चपळ यक्षाला पराकाष्ठेचा आनंद झाला. हा एरिल जरी धनी सांगे तीं तीं कामगिरी मनापासून करी, कधीं हयगय करीत नसे,

तरी दुसऱ्याच्या आधीन राहणें त्याला एकंदरीनें नको असे. स्वतंत्रतेनें रहावें व सुखें भोगावीं असा त्याचा फार हेतु होता. रानांतल्या पक्ष्यांप्रमाणें अंतरीक्षांत यथेच्छ झेप घालून सकल सृष्टींचें अवलोकन करावें व हिरव्यागार झाडांच्या गर्द छाये-खालीं, फुललेल्या झुडुपांमधून व मोहरलेल्या राईंतून उड्या मारीत फिरावें व अशा क्रीडा करून मनाला रमवावें याची त्याला फार हौस असे. त्याला जवळ हाक मारून प्रास्पेरो ह्मणाला—"जा, यक्षा जा, आतां वाटेल तिकडे जा; तुला आजपासून मुक्त केलें आहे. तुजवांचून मला घडीघडी चुक-ल्यासारखें होईल खरें. तथापि मी तुला आतां अडवून ठेवीत नाहीं."

यावर एरिल ह्मणाला—"अहाहा ! मजवर ही केवढी कृपा झाली ! महाराज, आपला निरंतर जयजयकार असो ! मला आपण मुक्त केलें खरें, तरी एक गोष्ट केल्यावांचून माझ्यानें आपणाला सोडवत नाहीं. अनुकूल वायु घेऊन आपल्या गल-बताबरोबर येण्याचा माझा विचार आहे. आपण सुखरूप घरीं पोचलां ह्मणजे मग आपण मला रजा द्यावी, तोंवर ह्या तुमच्या विश्वासू यक्षाच्या मदतीची तुह्माला गरज आहे, असें वाटतें. पण एकदा मोकळे झालों ह्मणजे मग काय, आमची मोठी चैन आहे !" असें ह्मणून त्यानें सुंदरसें एक गाणें गाइलें, तें हें:—

(दिंडी)

मधुर पिऊं मधुबिंदु मधुकरीशीं,
सुखें पहुडूं मृदु कमलगर्भदेशीं, ।

स्वैर फिरतां, अपरात्रि घूकगीतां
परिसुं तोषें,–सारीच चैन आतां ! ॥
चैन आतां, मधुकाल सुखद आला,
कुसुमतति हे लटकली सुविटपाला, ।
तेथ कलिकानलिकांतरंगिं राहूं,
कुररिवरि वा बसुं, फिरूं, मजा पाहूं ! ॥

झालें, जादूविद्येच्या ग्रंथांचें व भारलेल्या काठीचें काम संपलें. आतां त्यांचें प्रयोजन उरलें नाहीं. मग प्रास्पेरोनें त ग्रंथ व ती काठी, ह्या दोनहि वस्तु जामिनींत खोल पुरून टाकल्या; कारण जादुविद्येचा इतःपर कधीं उपयोग करावयाचा नाहीं असाच त्याचा निश्चय झाला.

शत्रु नम्र झाले, भावाशीं समेट झाला व नेपल्स नगरच्या राजासारखा सोयरा जोडला; आणखी काय पाहिजे ? प्रास्पेरोच्या सुखास आतां पार नाहींसा झाला. जन्मभूमीला जायाचें, आपलें राज्य स्वाधीन करून घ्यायाचें आणि फर्डिनान्ड व आपली कन्या मिरांडा यांच्या लग्नाचा सुखसोहळा पहावयाचा, एवढेंच कायतें उरलें, पण या सर्व गोष्टी घडून येण्याला कोणतीहि अडचण याउपर उरली नाहीं. तशांत, नेपल्स येथें गेलों कीं प्रथम लग्नाचीच गोष्ट, आणि तेंहि मोठ्या थाटानेंच करायाचें असा आपला बेत असल्याचें स्वतः नेपल्स नगरच्या राजानेंच सांगितलें.

मग, ठरल्याप्रमाणें दुसरेच दिवशीं सर्वजणें गलबतांत बसलीं. एरिलाच्या देखरेखीखालीं त्यांचा प्रवास सुखकारकच झाला, आणि ते मोठ्या आनंदानें नेपल्स बंदरीं येऊन पोंचले.

तुफान नाटकांतील पात्रें.

पुरुषवर्ग.

अलांझो............नेपल्स नगरचा राजा.

सिबास्टीन.........अलांझो याचा धाकटा भाऊ.

प्रास्पेरो............मिलान नगरचा राजा.

अंटोनियो..........प्रास्पेरो याचा धाटका भाऊ; यानें मिलान नगरची गादी बळकावली होती.

फर्डिनान्ड.........नेपल्स नगरच्या राजाचा मुलगा व वारस; नायक.

गान्झेलो...........दरबारचा एक माहितगार वृद्ध गृहस्थ

अड्रियन
फान्सिस्को } .....दरबारी मनुष्य.

कालीबन..........एक कुरूप, राक्षसवजा, रानटी मनुष्य; हा प्रास्पेरो याचा सेवक.

त्रिकालिक.........नेपल्स नगरच्या राजाच्या पदरचा खुषमस्कऱ्या.

स्टिफानो..........नेपल्स नगरच्या राजाचा दारूबाज आचारी.

नाखवा
तांडेल
खलाशी } ....गलबतावरचे अधिकारी.

स्त्रीवर्ग.

मिरांडा............प्रास्पेरो याची मुलगी; नायिका

एरिल.............स्त्रीचें रूप घेतलेलें कामरूप यक्षयोनितलें एक सत्व; हा प्रास्पेरो याचा एक सेवक.

इंद्राणी
इंद्रधनुषा
क्षेत्रपालिका
वन्यकुमारी
कृषीवल } ....कामरूप यक्षयोनितल्या सत्वांनीं घेतलेल्या भूमिका.

याशिवाय इतर यक्ष, भुतें, पिशाच्चें वगैरे.

स्थळें—प्रथम सागरांतलें एक गलबत; पुढें, भारलेल्या बेटावरचे वेगवेगळाले प्रदेश.

तुफान.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थल—एका भारलेल्या बेटाजवळचा समुद्राचा भाग.

[विजा व गडगडाट यांसहित सोसाटयाचा वारा सुटला असून, एका गलबतावर खलाशांची एकच धांदल चालली असतां, तांडेल व एक खलाशी असे येतात.]

तांडेल—वो नाखवा!

नाखवा—जी साब, काय खबर?

तांडेल—नाखवा, खलाशांना ह्मणावें, अंमळ दमानें हात चालवा, दमानें; नाहींतर, पहा, भाटीवर लागाल बरें! चालवा, चालवा; नेट धरा अंमळ.

[कांहीं खलाशी येतात.]

नाखवा—हय् गड्यांनो हय्! चालूं द्या, बाबांनो! जरासा नेट धरा. तो शिडाचा शेंडा खालीं घ्या अगोदर—खालीं घ्या, ह्मणतोंना! होः हो! तांडेलाच्या खुणेच्या शिळीकडे नीट कान द्या बरें!—वाऱ्या, आतां सूट, वाटेल

तेवढा सूट. आपलें पोट ह्या सगळ्या समुद्रा एवढें फुगविलेंस तरी मी आतां भीत नाहीं.

[अलांझो, सिबास्टिन, अन्टोनियो, फर्डिनान्ड, गान्झेलो व आणखी कांहीं मंडळी येते.]

अलांझो—नाखवे दादा, जपून काम चालवा बरें ! तांडेल कुठें आहे ? हुशार रहा, समजलां ?

नाखवा—खालीं जा अगोदर तुह्मी. पायां पडतों, महाराज !

अन्टोनियो—तांडेल कुठें आहे, नाखवा ?

नाखवा—व्हय्, हे बोलताहेत हे. महाराज, आमची सगळी मेहनत आज फुकट घालवूं पाहतां; दुसरें कांहीं नाहीं ! आधीं आपल्या खोलींत जाऊन बसा कसे गुप चीप ! एकीकडून हा तुफान वारा आणि एकीकडून तुम्ही—भली आमची आज पाठ पुरविली आहे !

गान्झेलो—अरे बाबा ! गडबडतोस काय असा ? धीर धर.

नाखवा—पण हा समुद्र धीर धरील तेव्हांना ? चला, गप्प बसा ! मोठा राजा झाला, ह्मणून ह्या वाऱ्याला काय त्याची पर्वा ? चला, खोलींत जा कसे आपले गपचीप ! आम्हाला नका उगीच त्रास देऊं असा !

गान्झेलो—भले माणसा, कांहीं लक्षांत आण; गलबतावर कोण आहेत ?

नाखवा—व्हय्, थोरले महाराज साहेब आहेत; आहे ठाऊक ! पण एवढे गुरकावतां कशाला ? आमच्या जिवाची नाहींका आह्मालः कांहींच काळजी ? एवढे सरदार ह्मणवितां, मग कराना ह्या वाऱ्याचा बंदोबस्त आपल्या हुकुमानें आणि होऊं द्याना चहूंकडे सामसूम ! आम्ही

आपले स्वस्थ बसतों कसे—हे टाकले दोर ! चालवा, खुशाल तुमचा अंमल चालवा. पाहूं द्या एकदा मजा.—कां ? आटपलें ?—महाराज, एवढा वेळपर्यंत जिवंत राहिलां हेच मोठे उपकार माना, आणि जा आतां, आपल्या खोलींत जा; कांहीं भलता प्रसंग आलाच तर तयारीनें असा.——शाबास गड्यांनो, शाबास ! सरा, बाजूस व्हा—बाजूस व्हा, ह्मणतोंना ? [जातो]

गान्झेलो—-ह्या धटिंगणाच्या बोलण्याचा मला अगदीं राग येत नाहीं; माझ्या मनाला उलटा बराच धीर येतो. गलबत बुडेल कीं काय, अशी धास्ती ह्याच्या मनाला शिवत असल्याचें ह्याच्या मुद्रेवरून तरी दिसत नाहीं. मुद्रा काय बाळाची ?—जसा भडे राक्षसच ! परमेश्वरा, अशाशीं गांठ असल्यावर, तो वागवील तसेंच खरें; सोसलें पाहिजे. आमच्या नशीबाचा तर अशा कामांत उपयोग नाहींच; तेव्हां यांचें नशीब तेंच आमचें दोरखंड ! करतां काय ? पण हा गुलाम असा राकट जर नसता, तर खचीत आज आमचीं पुरीं शंभर वर्षें भरलीं होतीं.

[खलाशांखेरीज सर्व जातात, व नाखवा पुनः प्रवेश करतो.]

नाखवा——घोस घ्या, घोस !—एकदम खालीं—ओढा, ओढा ! मधलें शीड चढवा माथ्यावर, नी जाऊं द्या शिधें !

[खालीं गलबला होतो]

मरोरे यांची ही गडबड ! हिच्या पुढें वाऱ्याचा सोसाटा देखील कमी !— मग आमच्या धांदलीची काय कथा ?

[सिबास्टिन, आन्टोनियो व गांझेलो पुनः प्रवेश करतात.]

अरे, आले फिरून! अरे तुमचें येथें काय काम? बुडेना का गलबत—आमचें काय जातें? बोला, सोडूं काम आणि बसूं स्वस्थ?—तुह्माला काय आज, वाटतें, मरायचें आहे?

सिबास्टिन—आग लागोरे तुझ्या ह्या तोंडाला! गाढव, बेशरम कुठला! कोणाच्या अंगावर ओरडतोस?

नाखवा—तर या, तुह्मीच करा हें काम!

अन्टोनियो—ठोका ठोका, गुलामाला ठोका! बेरडा! धटिंगण कुठला, मरणाचें भय कोणाला दाखवितोस? एकवेळ तूंच भिशील मरणाला; आह्मी धूप घालतों त्याला, धूप; समजलास?

गांझेलो—पण थांबा. मी खचीत सांगतों तुह्माला; द्रोणाहून जरी गलबत फुसकट असलें आणि शिंदळेच्या मनाहून जरी तें अस्थिर असलें, तरी देखील तें बुडण्याची धास्ती नको; मग मरणाचा हा रिकामका तंटा हवा कशाला?

नाखवा—हो: हो! धरा, धरा, थांबवून धरा. चढवा आतां दोन्ही शिडें, आणि जाऊं द्या पार समुद्रांत.

[खलाशी ओले चिंब झालेले येतात.]

खलाशी—झाला, घात झाला! देवाचें नांव घ्या आतां! आटपलें!

नाखवा—काय? आह्मी सारे मरणार तर आतां?

[जातात.]

गांझेलो—अहो, महाराज आणि राजपुत्र देवाचा धावा करीताहेत; आपणावर तोच प्रसंग आहे; चला, आपणही तसेंच करूं.

सिबास्टिन—छे: ! माझें तर रागानें मस्तक फिरलें !

अन्टोनियो—ह्या दारुबाज हरामखोराच्या पायीं;–ह्या राक्षसाच्या पायीं, आपण सारे आज प्राणास मुकणार. ह्या गुलामाला दहादां समुद्रांत बुडविलें तरी थोडें होणार आहे !

गांझेलो—समुद्राचा एकेक बिंदु ह्मणेल, मी याला बुडवीन ह्मणून, आणि समुद्र स्वतां ह्मणेल, मी आपला रुंद जाबडा पसरून याला गिळीन ह्मणून, तरी सुद्धां मी याला तसा मरूं देणार नाहीं.–अगोदर फाशीं देईन, कधीं सोडणार नाहीं !

[आणखी गलबला होतो ! ‘ धांवरे ! देवा ! धांव ! ’ ‘फुटलें हो गलबत फुटलें ! ’ ‘ प्रिये, बाळांनो, भाऊराया येतों बरें आतां,’ घात ! ‘ घात !! घात !!! ’]

अन्टोनियो—चला, महाराजांजी जी गत तीच आपली !

सिबास्टिन—तर, महाराजांना शेवटचे भेटून तरी घेऊं या.

[दोघे जातात.]

गांझेलो—मला यावेळीं कोणी पैशा एवढा जमीनीचा तुकडा देईल तर मागेल तेवढा लांबरुंद समुद्राचा प्रदेश त्याला मी खुषीनें देईन,–मग ती जमीन ओसाड असो, खर्पड असो, पाणथळ असो, कशीही असो - मला आपली चालेल ! पण परमेश्वराची इच्छा ! तिच्या पुढें काय उपाय ? बाकीं, जमीनीवर मरण येतें तर किती उत्तम !

[जातो.]

प्रवेश २ रा.

स्थळ—भारलेल्या बेटांत गुहेपासून जवळच समुद्रकांठ.

[प्रास्पेरो व मिरांडा येतात.]

मिरांडा—कोण हा पाण्याचा खळबळाट, आणि केवढाल्या ह्या प्रचंड लाटा ! हें एवढें वादळ जर आपल्या शक्तीनें तुह्मी उत्पन्न केलें आहे, तर, बाबा, तें शांत कराना तेवढें ! कोण हा काळाकुट्ट धूर ! मला वाटलें, हें आकाश इतक्यांतच त्याचे लोटचे लोट खालीं लोटून देईल;* पण हा समुद्र, प्रचंड लाटा उसळून व गगनाचें चुंबन करून ह्या एवढया धुराचें कारण जो अग्नि त्याला विझवून टाकीत असावा; व कडकडून प्रगटणाऱ्या विजांसही बंद करीत असावा ! काय छांदार गलबत; पण बिचाऱ्याचे तुकडे कींहो होऊन गेले ! त्यांत तशींच कोणी चांगलीं माणसें असतील, नाहीं बरें ? अगाईग ! ह्यांच्या ह्या किंकाळयांनीं माझे पोटांत धस्स होतें, आणि ह्यांच्या ह्या आक्रोशांनीं माझा जीव कसा खालवर होतो ! हाय, हाय ! बिचारीं सगळींजणें प्राणास मुकलीं ! मजपाशीं जर दैविक शक्ति असती, तर अगोदर ह्या मेल्या समुद्राला पृथ्वीच्या पोटांत पार गाडून टाकला असता ! मग हा ह्या सुंदर गलबताला व ह्या कासावीस झालेल्या प्राण्यांना कसा गडप करता ?

---

*अर्थसादृश्यार्थ इंग्रजी मूळाशीं शूद्रक कवीचा पुढील उद्गार ताडून पहाः—

Miranda—* * * The sky, it seems,
would pour down stinking pitch.

विटः—लिम्पतीव तमोऽङ्गानि, वर्षतीवाञ्जनं नभः ।

मृच्छकटिकम् । १

प्रास्पेरो—मुली, एवढी भांबावून जाऊं नको. यांत भांबावण्याचें काय कारण? अग मित्रे, यांत कोणालाही कांहीं अपाय झालेला नाहीं, समजलीस?

मिरांडा—हाय! हाय!! कोण हा प्रसंग!

प्रास्पेरो—अग, तुला सांगितलेंना?-कोणालाही अपाय झालेला नाहीं ह्मणून? जें कांहीं केलें आहे तें सारें तुजसाठीं, माझे लाडके, केवळ तुजसाठीं बरें! तूं कोण, मी कोण, आलों कोठून, हें तुला कांहीं एक ठाऊक नाहीं. एवढें बरीक ठाऊक, कीं माझें नांव प्रास्पेरो, ही भिकार गुहा-हें बीळ-हें माझें घर, आणि असला हा तुझा बाप!-याहून अधिक तुला काय ठाऊक आहे?

मिरांडा--खरेंच, कशाला असेल? मी मुळीं असल्या गोष्टींचा विचारच कधीं केला नाहीं.

प्रास्पेरो--ठीक आहे तर. ही सगळी हकीगत तुला आज सांगतों. हात पुढें कर पाहूं, आणि हा माझा जादूचा आंगरखा घे. (आंगरखा काढतो.) आंगरख्या, बैस तूं येथें. मुली डोळे पूस. असें काय रडावें, बाळे? उगी, उगी! गलबताची भयंकर स्थिति पाहून तुझें कोमल हृदय भरून आलें हें ठीकच; परंतु मी आपल्या जादूच्या योगानें अशी योजना केली आहे, कीं कोणाच्या केसालाही धक्का लागूं नये. तुला मात्र किंकाळ्या ऐकूं आल्या आणि गलबत बुडतांना दिसलें; पण खरा प्रकार तसा नाहीं. ये, बैस येथें अशी. तुला आतां सर्व कांहीं उघड करून सांगतों.

मिरांडा--तूं कोण हें तुला सांगतों हो, असें तुह्मी हजार वेळां ह्मटलें असेल; पण बाबा, लागलींच तुह्मी थांबतां,

आणि ह्मणतां–'सध्यां नाहीं.' मग मी काय करणार? पण जिवाला मात्र हुरहुर लागून राहते!

प्रास्पेरो—पण सांगण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे. एकेक क्षण तुला ह्मणत आहे-'मिरांडे, ऐक, नीट कान देऊन ऐक!' तर मीही ह्मणतों–'मुली, आतां अधिक बोलूं नको आणि काय सांगतों तें नीट लक्ष देऊन ऐक.' पण, ह्या गुहेंत आपण येऊन राहूं लागलों, त्याच्या पूर्वीचें कांहीं तुला आठवतें? मला नाहीं वाटत, आठवत असेलसें. तेव्हां काय, तूं पुरी तीन वर्षांची देखील नव्हतीस.

मिरांडा—हो; मला आठवतें तर!

प्रास्पेरो—काय आठवतें?–एखादें घर, कीं कोणी माणसें? काय तुला आठवतें सांग पाहूं? तुझ्या मनांत अझूनही कोणकोणत्या वस्तूंची आठवण तगून राहिली आहे?

मिरांडा-फार मागली गोष्ट. आणि मला जें कांहीं स्मरतें तें तरी नुसतें स्वप्नांतल्यासारखें–त्यांत खात्रीलायक असें कांहीं नाहीं. मागें माझ्याबरोबर चारपांच बाया असत, नव्हे काहो बाबा?

प्रास्पेरो—हो हो, असत खऱ्या; आणि चारपांच कां? पुष्कळ असत. पण कायग मुली, तुझ्या मनांत हें एवढें आतांपर्यंत राहिलें तरी कसें?–मोठा चमत्कार आहे. मागला काळ ह्मणजे अंधारानें भरलेला एक अपरंपार खोल खाडाच होय! मागल्या काळाच्या अशा ह्या काळोखांत आणखी काय काय तुला दिसतें, सांग पाहूं? येथें येण्याच्या अगोदरची कांहीं आठवण जर तुला असली, तर येथें तूं कशी आलीस हेंही तुला आठवेलच.

मिरांडा—नाहीं, बाबा; मला तें कांहींएक आठवत नाहीं.

प्रास्पेरो--बारा वर्षें झालीं, मिरांडे--पुरीं बारा वर्षें झालीं; तेव्हां तुझा बाप मिलान नगरीचा राजा होता, आणि त्याच्या हातीं सर्व सत्ता होती.

मिरांडा--तर मग तुह्मी माझे बाबा नव्हां?

प्रास्पेरो--अग, तुझी आई अत्यंत सद्गुणी आणि पवित्र बायको होती, आणि ती ह्मणे--'ही तुमची मुलगी, कांहीं अशी तशी नाहीं उगीच'--समजलीस?--तुझा बाप हा मिलान नगरीचा राजा आणि तूं त्याची एकुलती एक मुलगी--राजकन्या आणि वारस.

मिरांडा--खरेंच का बाबा? पण, आपणाला येथें यावें लागलें, हें कोणा दुष्टाचें कृत्य बरें? तरी पण, आपण येथवर आलों हेंच आपलें मोठें नशीब; नाहीं बरें, बाबा?

प्रास्पेरो--दोन्हीही खरींच. कारण, असें पहा, मुली,--तूं ह्मटलेंस तसें दुष्ट कृत्यच आपणाला इकडे येण्यास कारण झालें; आणि पुढें येथें येऊन लागलों, हें तरी आपलें मोठें नशीबच. नव्हे तर काय?

मिरांडा--हाय हाय! बाबा तुह्माला किती तरी त्रास दिला मीं! माझ्या आठवणीपासूनच्याच वेळचा विचार केला, तरी एवढा त्रास! माझें तर हृदय कसें भरून आलें! बाबा, क्षमा करा, क्षमा करा!

प्रास्पेरो--ऐक पुढें. माझा भाऊ ह्मणजे तुझा चुलता--त्याचें नांव अन्टोनियो, समजलीस? नीट लक्षांत ठेव. शिव शिव! भाऊ म्हणवितो आणि विश्वासघात--असा भ्रातृद्रोह! तुजवर माझा भारी जीव, पण त्याच्यावर कांहीं कमी नव्हता; आणि ह्मणूनच राज्याचा सर्व कारभार

त्याजवर सोंपवून मी स्वस्थ होतों. मिलान नगरीचें राज्य म्हणजे त्यावेळीं सर्वांत पहिल्या प्रतीचें, आणि प्रास्पेरो हाही सरदार पहिल्या प्रतीचाच—कारण तेव्हां माझा मानच तसा होता. आणि विद्येच्या बाबतींत म्हणशील तर माझा हात धरणारा तेव्हां कोणी नव्हता. याप्रमाणें, माझा सगळा भर विद्याभ्यासावर असल्या कारणानें, राज्यकारभाराचें सारें ओझें मी आपल्या भावाच्या शिरावर लोटलें. राज्यांत काय चाललें आहे, याची मला बिलकुल शुद्ध नाहीं. मी आपला गुप्तविद्येच्या ब्रह्मानंदांत निमग्न; मला काय राज्याची पर्वा? हें पाहून तुझ्या कृतघ्न चुलत्यानें—त्या लबाडानें—कां, लक्ष आहेना इकडे?

मिरांडा--बाबा, कान देऊन ऐकतें आहे.

प्रास्पेरो--लोकांचे अर्ज ऐकावे, त्यांच्या प्रार्थना मान्य कराव्या अथवा नाकाराव्या, कोणी डोईजड झालासा वाटल्यास त्याला खालीं ओढावें, व कोणास वरही चढवावें, वगैरे गोष्टींची त्याला एकदां माहितगारी होतांच, त्यानें प्रथम, माझे अनुयायी व चाकरनोकर होते, त्यांपैकीं जेवढे वळले तेवढ्यांस आपलेसे करून घेतले; आणि जे वळतना, त्यांना दूर करून, त्यांच्या जागीं दुसरे ठेवले. याप्रमाणें अनुयायी मंडळीचा जम बसून, राज्यसत्तेची किल्ली हातीं येतांच आपण सांगूं ती पूर्वदिशा अशी तऱ्हा त्यानें मांडली! फार काय सांगूं?—अग, हें माझ्या राज्यवृक्षावर वाढलेलें—यथास्थित पोसून विस्तार पावलेलें हें बांडगूळ! —काय, तुझें लक्ष नाहीं मी बोलतों इकडे?

मिरांडा--नाहीं कसें, बाबा? सर्व कांहीं मी ऐकतें आहें.

प्रास्पेरो--ऐकतेसना? मी काय म्हणतों, तें नीट ध्यानांत धर. याप्रमाणें ऐहिक गोष्टींचा त्याग करून, मी आपलें सगळें लक्ष आत्मोन्नतीकडे लावलें; एकांत स्थळ धरलें, आणि रात्रंदिवस अभ्यास चालविला. जगाला ह्या अभ्यासाची फारशी किंमत वाटत नाहीं. न वाटेना? पण मला फार वाटते. आणि ह्मणूनच सर्व सोडून देऊन, मी एकांतांत राहूं लागलों. यानें झालें काय? माझ्या भावाच्या नीच हृदयांत दुष्टबुद्धीचा मोड उगवला. त्यानें माझ्याशीं धडधडीत कपट मांडलें; आणि त्याजवर जो एवढा विश्वास मी टाकला, त्या माझ्या विश्वासाला पुढें असें फळ आलें! भल्या बापाला जसा कुपुत्र व्हावा, तसा प्रकार झाला! कारण, पहा, जेवढा दृढ माझा विश्वास तेवढें गूढ त्याचें कपट! छे छे! त्याच्या कपटाला कांही तरी सीमा? माझ्या भोळ्या विश्वासाला जशी मर्यादा नव्हती, तसा त्याच्या अमर्याद कपटाटाही कांहीं विचार नव्हता! शेवटीं, माझा सर्व खजिना व राज्याचें सारें उत्पन्न त्यानें बळकावलें; इतकेंच केवळ नाहीं, तर माझ्या नांवाच्या दराऱ्यानेंच जीं कार्यें व्हावयाचीं तीं देखील तो बिनधोक करूं लागला. सारांश, सर्वांचा मालकच तो होऊन बसला. पहा, कित्येक जण धडधडीत खोटें बोलतात; आणि हें आपलें खोटें बोलणें, खोटें नव्हे, पण खरें ह्मणून बोलत आहों अशी आपल्या मनाची समजूत करून घेऊन, ते म्हणतात--आह्माला मुळीं आठवणच नाहीं;-असें ह्मणून आपल्या निष्पाप आठवणीला पापांत लोटतात; तसेंच माझ्या भावानें केलें. ह्मणजे प्रथम माझें राज्य त्यानें

बळकावलें; पण बळकावलें असें न ह्मणतां, जणों मी नाहींच असें धरून, माझ्या ठिकाणीं आपण आहों असें त्यानें मानलें. मग, समळीं राजचिन्हें धारण करून आणि स्वतांस स्पष्टपणें राजा ह्मणवून, तो राजासारखा वागूं लागला, व सर्व व्यवहारही आपल्याच नांवानें चालवूं लागला. येथेंच त्याचा राज्यलोभ थांबता तरी बरें; पण नाहीं, आणखी बळावला!–कां ध्यान आहेना इकडे?

मिरांडा—तुमची हकीगत ऐकावयाकरतां–फार काय सांगूं, बाबा?– बहिऱ्यांचा बहिरेपणा सुद्धां नाहींसा होईल.*

प्रास्पेरो—पुढें, आपण घेतलेलें हें राजाचें सोंग व ज्यासाठीं हें सोंग घेणें प्राप्त झालें तो मी, यांमध्यें रिकामका आडपडदा हवा कशाला, असें मनांत आणून, आपण स्वतंत्रपणें मिलान नगरीचे राजे असें करून टाकण्याचाच घाट त्यानें घातला. आम्ही बिचारे पडलों रखडत! आह्माला कोण विचारतो? आमचीं तीं पुस्तकें नी ती खोली– हेंच आमचें विस्तीर्ण राज्य! त्याला वाटलें– हा कसला आतां येतो, आणि कसलें राज्य करतो? ह्या भ्रमिष्टाला राज्य करण्याची काय शक्ति आहे? मग त्यानें– शिव शिव! कोण ही राज्यतृष्णा!—नेपल्सच्या राजाशीं सख्य केलें, त्याला सालीना खंडणी देण्याचें

---

* अर्थसादृश्यार्थ इंग्रजी मूळाशीं वामन पंडिताचे पुढील उद्गार ताडून पहा.

Miranda—Your tale, sir, would cure deafness.

द्विजसुता, तुझिया वचनामृतें,
मज गमे, उठतील शवें मृतें!

वामनचरित्र.

कबूल केलें, तो श्रेष्ठ व आपण मांडलिक असाही संबंध त्यानें पत्करला, त्याची थुंकी झेलण्याचें व्रत धरलें, आणि मिलान नगरीची सत्ता—जिला दुसऱ्यापुढें नाक घासण्याचें आजपर्यंत कधीं ठाऊक नव्हतें,—तिला त्याच्या पायांवर घालून, अपमानाच्या अगदीं पराकाष्ठेस नेऊन पोंचविलें!

मिरांडा——शिव शिव ! काय ही दशा !

प्रास्पेरो——आतां त्याची एकेक कृति पहा आणि पुढें तिचे परिणाम काय झाले ते पहा; आणि मग तूंच सांग, ह्याला भाऊ ह्मणावें कीं काय ह्मणावें ?

मिरांडा——छेग बाई ! आमच्या आजीला तर यांत नांव ठेवूं देण्याचें पाप मी करणार नाहीं. हिऱ्याच्या खाणीला कधीं कधीं गारगोटीही लागते, नाहीं असें नाहीं !

प्रास्पेरो——पुढें त्यानें काय केलें, तें आतां ऐक. नेपल्सच्या राजाचें आणि आमचें जन्माचें हाडवैर. त्याला काय ? हा त्याच्याकडे जाण्याची खोटी, तों लगेच त्यानें ह्याला हो ह्मटलें. आणि असें ठरलें कीं ह्यानें नेपल्सच्या आश्रयाखालीं मांडलिक ह्मणून राहावें आणि सालोंसाल खंडणी देत जावी— किती कोण जाणे, मला पुरतें समजलें नाहीं— आणि याबद्दल नेपल्सच्या राजानें तेव्हांचे तेव्हां मिलान नगर घेऊन, मला व माझ्या संबंधाच्या माणसांना राज्याबाहेर काढून द्यावें, आणि मग सर्व सोहाळ्यासह आमच्या या भाऊरावांना गादीवर बसवावें ! असें ठरतांच एक बंडखोर फौज लगेच जमा झाली, आणि ठरलेल्या उद्देशानें, मध्यरात्रीच्या सुमारास मिलान शहरावर चालून आली. या राजश्रींनीं तत्काळ शहराचे दरवाजे उघडले,

आणि फौज आंत घुसून, तिनें तमाम शहर हस्तगत केलें. इकडे, ह्याच कटांतल्या मिलाफी मंडळीनें घाबऱ्या घाबऱ्या मजकडे येऊन, मला व तुला, तशा काळ्याकुट्ट अंधकारांतून, माझ्या एकांत स्थळांतून काढून दूर नेलें. त्या वेळीं, तूं काय, रडून रडून आकांत केलास!

मिरांडा--हाय हाय! ऐकूनच माझें काळीज चूर होतें! बाबा, मी तेव्हां कशी रडलें हें तर मला आठवत नाहींच; पण तसेंच रडें आतां बरीक मी रडून दाखवितें; कारण, तुमच्या भाषणानें माझे डोळे अगदीं भरून आले.

प्रास्पेरो--थांब, आणखी ऐक. तेवढें सांगितलें ह्मणजे आतां आपणास काय करायचें, तें तुला सांगावयाला ठीक पडेल. कारण, सध्यां मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे हीच. ती तुला कळावी, ह्मणून तर ही एवढी मागील कुळकथा तुला सांगावी लागली.

मिरांडा--पण बाबा, त्याच क्षणीं, कां नाहीं बरें त्यांनीं आपले प्राण घेतले?

प्रास्पेरो--अग पोरी, ठीक विचारलेंस. हकीगत सांगतांनाच मला वाटलें कीं हा प्रश्न पुढें येणार! बये, मनांत आणलें असतें, तरी देखील त्यांना तसें करतां आलें नसतें. कारण, माझ्यावर माझ्या प्रजाजनांची भक्तिच तशी होती. ती लक्षांत आणून, त्यांनीं आपणास काडी इतकेंही दुखवलें नाहीं; हें तर काय? पण रक्तपाताचा नुसता संशय कोणास येईल असें देखील कृत्य केलें नाहीं; आपल्या दुष्ट कृत्यांवर उलटें सुरेखसें पांघरूण घातलें. आतां सगळें भारूड तुला सांगत बसत नाहीं; इतकेंच

सांगतों कीं त्यांनीं घाई करून आपणाला एका पडावावर नेलें, आणि समुद्रांत बरेच दूर गेल्यावर, दुसऱ्या एका कुजक्या पडावांत आपणास उतरलें. पडाव कसला तो— एक जुनें मोडकें तोडकें होडकें होतें, झालें ! त्याला दोरखंड नाहीं, वल्हीं नाहींत, शीड नाहीं, डोलकाठी नाहीं,— कांहीं नाहीं. अशा पडावांतून उंदीरसुद्धां उपजत बुद्धीनें पळून गेले असते. अशा या मज्जनप्राय पडावांत आपणास सोडून ते निघून गेले ! झालें. आपण तेव्हां पुष्कळ रडलों आणि पुष्कळ सुस्कारे सोडले; पण समुद्राच्या खळखळाटापुढें तें रडें काय होय? आणि वाऱ्याच्या सोसाट्यापुढें ते सुस्कारे काय होत? आपली थोडीच कींव त्यांना येणार ! आणि आलीही असती, तरी तिचा काय उपयोग? गोड न वाटतां, ती उलटी विषादास मात्र कारण झाली असती !

मिरांडा—-शिव शिव ! मी तुह्माला तेव्हां केवढें ओझें झालें असेन, बाबा !

प्रास्पेरो—-नाहींग बाळे ! ओझें कसलें ? तूं होतीस ह्मणून तर मी वांचलों ! अशा दुःखांतही तूं केवळ हास्यमुख होतीस; खरोखर, परमेश्वरानेंच तुला हें लोकोत्तर धैर्य दिलें ! आणि ह्मणूनच दुःखानें मी व्याकूळ होऊन गेलों असतां आणि रडून रडून अश्रुबिंदूंनीं समुद्राला भरती आणली असतां— बाळे, काय सांगू ?—त्या तुझ्या हसऱ्या मुखानें माझ्या उदास जिवाला समाधान देऊन, पुढें जें संकटांचें ताट वाढून आलें होतें तें गट्ट करून बसण्यास मला शक्तिमान केलें !

मिरांडा—-पण, बाबा, आपण किनाऱ्यावर कसे आलों ?

प्रास्पेरो--केवळ ईश्वराच्याच कृपेनें! गलबतावर खावयाचे कांहीं पदार्थ होते, तसेंच थोडेंसें गोडें पाणीही होतें–ही तजवीज, गांझेलो नांवाचा एक नेपल्स येथील सर्दार आपणाला काढून लावण्याचा बेत तडीस नेण्याच्या कामावर मुख्य नेमिला होता, त्याला माझी करुणा येऊन, त्यानें करून ठेविली होती. याशिवाय आणखी कांहीं मौल्यवान वस्त्रप्रावरणें, कांहीं चिरगुटें पांघुरणें आणि दुसऱ्या कांहीं नित्याच्या उपयोगाच्या वस्तु, ह्याही बऱ्याचशा त्यानें त्या पडावावर सांठवून ठेवल्या होत्या. आपणाला आतांपर्यंत चालल्या आहेत त्या ह्याच वस्तु. ह्याच गृहस्थानें,—हा केवळ त्याचा सज्जनपणाच समजला पाहिजे, दुसरें कांहीं नाहीं—आणखी माझ्या अभ्यासाच्या खोलींतलीं कांहीं पुस्तकेंही मला आणून दिलीं. त्याला ठाऊक होतें–मला ह्या पुस्तकांचा भारी नाद आहे, आणि राज्याहूनही त्यांची किंमत मी अधिक लेखितों.

मिरांडा--अशा गृहस्थाला मी एकदां डोळेभर पाहीन तर बरें!

प्रास्पेरो--चल, मला आतां गेलें पाहिजे.—पण (मिरांडा उठतेशी पाहून) तूं नको येऊं. बैस येथेंच (जादूचा आंगरखा घालून). समुद्रांतल्या आपल्या दुःखाचा शेवट तेवढा आतां ऐक, म्हणजे झालें. ह्या बेटावर येऊन आपण लागलों; आणि तेव्हांपासून मी तुझा पंतोजी होऊन तुला शिकविलें. मुली, यांत तुझें केवढें कल्याण मी केलें? तसें फारच थोड्या राजकन्यांच्या वांट्याला येत असेल! त्यांचा सारा वेळ म्हटला म्हणजे नटण्या मुरडण्यांत जावयाचा;

आणि त्यांना शिक्षण देणारांना तरी एवढी काळजी कोठली? तसें तुझें झालें नाहीं.

मिरांडा--हे तुमचे मोठे उपकार होत! पण, बाबा, माझा आतां एक प्रश्न आहे—माझ्या मनांत एकसारखा तो घोळतो आहे—विचारतेंच. हें तुफान तुह्मी कां उत्पन्न केलें आहे, हें मला सांगालका?

प्रास्पेरो--विचारतेसच तर आणखी एवढें सांगतों. सध्यां आमच्या बलिष्ठ दैवानें—ह्या आमच्या उदार मित्रानें—कारण त्याची वडील बहीण लक्ष्मी हिची आमच्यावर कृपादृष्टी वळली आहेसें दिसतें—विलक्षण योग घडवून आमचे वैरी ह्या बेटावर आणून सोडले आहेत. ज्ञानदृष्टीनें मला असेंही आणखी कळतें कीं आमचे ग्रह सांप्रत उच्चीचे आले आहेत. तेव्हां हा शुभयोग वायां दवडला—या वेळीं साधला नाहीं, तर आमचें दैव फुटलें ह्मणून समजावें; मग तें पुनः उघडण्याची आशा नको!—बस, पुरे. आतां अधिक प्रश्न नकोत.- ये तुला झोप येतेना? नीज येथें. ही झोप माझ्या पथ्यावरच आहे. काय नामी झोप! नीज, नीज—नाहीं ह्मणून चालायाचें नाहींच! (मिरांडा निजते). सेवका, चल, पुढें ये! चल, माझी तयारी आहे आतां. अरे एरिला, समोर ये असा.

[एरिल येतो.]

एरिल---जी महाराज! वंदन करतों. सर्वज्ञा, सर्वसमर्था! काय आज्ञा आहे? आकाशपंथें उड्डाण करायाचें आहे? अपार सागर तरून जावयाचा आहे? प्रज्वलित अग्नि-

कुंडांत उडी घालायाची आहे? अथवा वळकट्या पडलेल्या शीतळ मेघमालेवर मौजेनें आरूढ व्हावयाचें आहे? कोणती कामगिरी आहे? तिला हा दास--एरिल--मनोभावानें सिद्ध आहे.

प्रास्पेरो--माझे आज्ञेवरून, तुफान उत्पन्न करून, सांगितलें तसतसें सर्व केलेंस काय? त्यांत कोठें कांहीं चूक?

एरिल--नाहीं महाराज! सांगितल्या बरहुकूम सर्व कांहीं केलें आहे. आज्ञा घेऊन निघालों तों पहिल्यानें राजाच्याच गलबतावर चढलों, आणि तेथें अशी मजा उडवून दिली, कीं क्षणांत नाळीवर तर क्षणांत सुकाणावर, क्षणांत बैठकीवर तर क्षणांत एकेका खोलींत, असा ठिकठिकाणीं नाचून सर्वांस घाबरवून सोडलें! लगेच वेगवेगळे अनेक देह धारण करून, वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळी आग पेटल्याचा भास पाडला! आणि ह्या आगी, मग, अगदीं थेट विजांप्रमाणें, क्षणांत डोलकाठीवर तर क्षणांत शिडाच्या बांशाच्या दोहों शेंड्यांवर चमकून, क्षणांत जवळ जवळ येऊन एकमेकींत मिळून गेल्याशा दाखविल्या. भयंकर गडगडाटाच्या पूर्वीं विजा चमकतात, त्या देखील एवढ्या चकन प्रकाश पाडून डोळे दिपवीत नसतील! विजा आणि गडगडाट यांचा, तोफांच्या गोळ्यांप्रमाणें, धडाका उडवून देऊन, क्षणभर असें भासविलें कीं समुद्रावर आधिपत्य गाजविणाऱ्या वरुणदेवतेलाच जणों घेरा पडत आहे! आणि त्यामुळें त्याच्या त्या दांडग्या लाटा थरथर कापूं लागून, त्याच्या हातांतला विक्राळ त्रिशूळ देखील उलथून पडूं पहात आहे!

प्रास्पेरो--शाबास, यक्षा, शाबास! अरे, पण, अशा अशा युक्त्यांनीं देखील बुद्धीला भ्रम पडला नाहीं इतका दृढ व स्थिर मनाचा त्यांत तुला कोण आढळला बरें?

एरिल--छे, महाराज! शपथेला एकजण मुद्धां नाहीं! जो पहावा तो भांबावून गेलेला! सर्वजण जसे जिवावर उदार होऊन, वेडीं वेडीं कृत्यें करूं लागले. फार काय सांगूं, महाराज? फेसाळलेल्या तुफान समुद्रांत भराभर सर्वांनीं उड्या घातल्या! मी पण इकडे आगीचा खूप भडाका उडवून दिला!--सर्वांत पहिली उडी फर्डिनान्ड याची! तेव्हां त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले होते! एकेक रोम त्याला केस कोण ह्मणेल?--बरूच्या ताटासारखा ताठ! उडी घालतांना किंकाळून, तो ह्मणाला--' अरेरे, हीं एवढीं भूतें येथें आलीं तरी कोठून? भूतखाना तर नाहींना आज मोकळा झाला?'

प्रास्पेरो--वाहवा! खासें केलेंस! असो; पण हें सगळें झालें कुठें? किनाऱ्यानजीकच झालें ना?

एरिल--तर काय?--अगदीं किनाऱ्याशीं.

प्रास्पेरो--पण, कायरे, सर्वजण खुशाल आहेतना?

एरिल--हें काय विचारावें, महाराज? कोणाच्या केसाला देखील धक्का लागलेला नाहीं! फार काय सांगूं? त्यांच्या आंगांतल्या आंगरख्यांना कोठें डाग कीं सुरकुती सुद्धां सांपडणार नाहीं--यांचे मूळचे देखील असे सुरेख व घडीदार नसतील! आणि महाराज, तुमच्या सांगीप्रमाणें, त्यांच्या टोळ्या करून, वेगवेगळ्या ठिकाणीं त्यांस नेऊन सोडलें आहे. राजपुत्राला मात्र एकट्याला, एका कोनांत

आडवळणाला, ठेवून आलों आहें. तेथें तो खुशाल सुस्कारे टाकीत, शीतळ वाऱ्याच्या झुळकीबरोबर ताजा तवाना होत बसला आहे; आणि तोंड वाईट करून, त्यानें आपले हात असे उरावर ठेवले आहेत. [उरावर आपले हात स्वस्तिकप्राय ठेवून दाखवितो.]

प्रास्पेरो--सांग पाहूं आतां, राजाच्या गलबताचें काय केलेंस, आणि बाकीच्यांचें काय केलेंस?

एरिल--राजाचें गलबत बंदरांत सुरक्षित आणून लाविलें आहे. आपणाला आठवतेंका, महाराज?—आपण एकदां, ऐन मध्यरात्रीं मला उठवून, बर्मुडा बेटावरून—तुफानांच्या त्या प्रख्यात माहेरघरांतून—थोडेंसें दंव घेऊन ये ह्मणून ह्मटलें होतें, तेंच तें ठिकाण. ह्या ठिकाणीं हें गलबत कोणालाही सांपडणार नाहीं. त्यावरील खलाशांना सर्वांना बैठकीच्या जाळीखालीं ठेवून देऊन, आधींच थकलेल्या त्या लोकांवर मंत्र टाकून, त्यांना निजवून टाकलें आहे. बाकीच्या गलबतांची चोहोंकडे फांकाफांक करून टाकली असून, तीं, त्यांवरील खलाशांसहित ढकलत ढकलत, भूमध्य समुद्रांत येऊन, तेथून निराशेनें हळुहळु नेपल्स बंदराकडे चाललीं आहेत. राजाचें गलबत बुडालें आणि राजाही बुडून मेला अशीच, त्यांनीं समक्ष पाहिल्यावरून, त्यांची समजूत झालेली आहे.

प्रास्पेरो---एरिला, सांगितली कामगिरी तर, बुवा, बरोबर बजाविलीस; पण अझूनही तुझें थोडें काम आहे. अझून किती घटका दिवस आहे?

एरिल---आतां कुठें दोन प्रहर झाले; अझून दोन प्रहर दिवस आहे.

प्रास्पेरो---मग चिंता नाहीं. साहा वाजेपर्यंत वेळ आहे. हा वेळ आपणाला--तुला नी मला--मोठा मौल्यवान आहे, बाबा.

एरिल---मग काय?--आणखी काम आहेच? मला आपण, महाराज, एवढी मेहनत दिली व मी घेतली; तर, दिलेल्या वचनाची आठवण असूं द्या ह्मणजे झालें, एवढीच माझी विनंति आहे. वचनाप्रमाणें आपण माझें कांहींच केलें नाहीं अझून, ह्मणून ह्मणतों.

प्रास्पेरो--काय द्वाड आहेसरे तूं! काय? तुला काय पाहिजे?

एरिल---दुसरें काय, महाराज?--माझें स्वातंत्र्य!

प्रास्पेरो---वेळ आली नाहीं तोंच? चूप, बोलूं नको अधिक!

एरिल---महाराज, माझा एक अर्ज आहे मी आपली आजपर्यंत कशी सेवा केली आहे! कधीं खोटें नाटें सांगितलें नाहीं, चुका केल्या नाहींत, कधीं हयगय केली नाहीं, किंवा होना ह्मटलें नाहीं; असा वागलों ह्मणजे ठरल्या मुदतींत एक वर्ष कमी करूं ह्मणून आपण ह्मटलें होतें, महाराज.

प्रास्पेरो---पण कसकशा यातनांतून मी तुला सोडविलें? याची कांहीं आठवण आहेका?

एरिल---कशी नसेल?

प्रास्पेरो---पण नाहींशी दिसते! ह्मणूनच खारटणांत रखडण्याचें तुला बरें वाटतें, उत्तरेच्या सळसळणाऱ्या वाऱ्याच्या सोसाट्यापुढें उडत जाण्याचें तुला आवडतें, आणि सगळी जमीन बर्फानें व्यापल्यामुळें गारठून गेली असतां पृथ्वीच्या पोटांत प्रवेश करून कामें कर-

ण्याचे कष्ट तुला गोड लागतात! नाहींका? हें सर्व मला ठाऊक आहे!

एरिल--नाहीं, महाराज; ह्या गोष्टी मला मुळींच आवडत नाहींत.

प्रास्पेरो--मूर्खा! अधमा! किती खोटें बोलतोस? सिकोराक्ष सटवीला इतक्यांत विसरलास अं? वार्धक्यानें आणि मत्सरमूलक नक्रगतीनें सर्वांगवक्र झालेल्या त्या जाखिणीची आठवण अगदींच बुजाली, नाहीं काय?

एरिल--नाहीं, महाराज!

प्रास्पेरो--नाहीं कशी? तसें दिसतेंच आहे. बोल, ती कोठची? दे उत्तर.

एरिल--अल्जिर्स देशची.

प्रास्पेरो--होय. खरें ना? तिनें तुझी कसकशी दशा केली, हा पाढा महिन्यांतून एकदां तुजपासून मला वाचवून घेतला पाहिजे; त्याशिवाय तुला आठवण नाहीं रहावयाची. ह्या दुष्ट सिकोराक्ष चेटकीनें, नाना प्रकारच्या खोड्या करून व भयंकर चेटुकें रचून--कीं जीं कानांनीं ऐकवत देखील नाहींत--अल्जिर्स येथें असा कहर उसळून दिला कीं तिला तेथून लोकांनीं घालवून दिलें; हें तुला ठाऊकच आहे. त्यांनीं तिला ठारच केली असती; पण कांहीं कारणास्तव तेवढें राहिलें. बोल; ह्मणतों यांत काय खोटें आहे?--सांग.

एरिल--नाहीं महाराज. अक्षरही खोटें नाहीं.

प्रास्पेरो--मग ही थिडका--ही घाऱ्या डोळ्यांची थेरडी--तेथून निघाली, ती आपल्या पोराला घेऊन, गलबतावर चढली; आणि खलाशांनीं अखेरीस, मोठ्या कष्टांनीं, या

बेटावर आणून तिला सोडलें. बोल; खरें कि नाहीं? ही हकीगत तूंच आपल्या तोंडानें ओकलास, नाहीं काय? सध्यां तूं माझा दास आहेस; तेव्हां तिचा होतास. पण तूं किती नाजूक, आणि तिच्या आज्ञा किती घोर–किती ओंगळ! मग या तिच्या आज्ञा तूं ऐकत नाहींस, असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां रागानें, एका जुनाट झाडाच्या ढोलींत तिनें तुला अडकवून टाकलें! कोण भयंकर तिचा राग!–शांत होणें कठीणच. अशा असह्य बंदीवासांत तूं मोठ्या कष्टांत दिवस काढीत असतां, ती अवदसा मरण पावली, आणि तुला बंधमुक्त न केल्यामुळें तूं दळ्याप्रमाणें आपल्या दुःखाचें रडगाणें गात, बारा वर्षं तेथेंच कुचंबत पडलास! ह्या बेटावर तेव्हां मनुष्याचा वाराही नव्हता; नाहीं म्हणायाला, त्याच जाखिणीचें एक पोर होतें. पण कुतरें तें! त्याला मनुष्य कोण ह्मणेल?

एरिल––होय; कालिबन त्याचें नांव.

प्रास्पेरो––तोच तो. ज्याला सध्यां मी आपला दास केला आहे, तोच तो कालीबन. अगदीं पशु बेटा!–अरे, तुझी पहिल्यानेंच गांठ पडली, तेव्हां तूं कसे हाल काढीत होतास? कांहीं आहेका आठवण? त्या वेळचें तुझें तें रडणें–कुढणें–कण्हणें ऐकून क्रूर लांडग्यांना सुद्धां रडें येई! आणखी एवढा खुनशी पशु रीस, पण त्याच्या देखील हृदयाचें पाणी पाणी होऊन जाई! खरें म्हटलें तर अशा घोर यातना महान पाप्याला मात्र योग्य; त्या

तिनें तुला भोगावयास लाविल्या ? पण याच यातना पुढें तिच्यानेंही नाहींशा होत ना, तेव्हां तुला कोणी सोडविलें? लक्षांत आहे काय? मी येथें आलों आणि तुझें कुढणें माझ्या कानीं पडलें, तेव्हां माझ्याच कृतीनें ती झाडाची ढोल चिरली आणि तुला मोकळा केला!

एरिल--खरोखर, हे तुमचे मोठे उपकार होत!

प्रास्पेरो--आतां एकच सांगतों. जास्ती गडबड केलीस तर ओकवृक्षाचें चांगलेंसें गांठ्याळ खोड पाहून, त्याला भोंक पाडून, त्यांत तुला फिरून कोंडून टाकीन. मग बस खुशाल तेथें आणखी बारा वर्षें रखडत!

एरिल--चुकलों, महाराज! क्षमा करा! आपली जी जी आज्ञा होईल तिची इत:पर मजकडून लेशमात्र अवज्ञा होणार नाहीं! आह्मा यक्षजनांच्या हातून व्हावयाचीं सर्व कामें मी अगदीं मुकाट्यानें करीत जाईन, महाराज!

प्रास्पेरो--कर तर! आणि असें केलेंस ह्मणजे दोन चार दिवसांनींच तुझी स्वतंत्रता तुला मिळेल.

एरिल--अहाहा! केवढें औदार्य! केवढें हें थोरपण! बरें तर, काय करूं ह्मणतां? सांगा पाहूं? बोला बोला. उशीर नको उगाच!

प्रास्पेरो--जा तर; अगोदर नागकन्येचें सुंदर रूप घेऊन ये. तूं कामरूप आहेस, मला माहीत आहे. पण, हें तुझें रूप, एक तुला कीं एक मला मात्र दिसावें,-इतर कोणालाही दिसूं नये; समजलास? जा आतां, सांगितल्या-प्रमाणें कर. संभाळ बरें!

[एरिल जातो.]

बाळे ! जागी हो ! जागी हो ! अग काय ही झोप !

मिरांडा—बाबा, किती अद्भुत तुमची हकीगत ! ऐकूनच माझें हृदय भरून आलें ! कांहीं सुचत नाहीं !

प्रास्पेरो—जाऊं दे. आतां त्या गोष्टींची आठवण देखील नको. ये अशी, पाहूं. चल, आपण त्या कालीबनाकडे जाऊं. पक्का निगरगट्ट आहे ! विचारलें तर सरळ उत्तर सुद्धां देत नाहीं, गुलाम !

मिरांडा—बाबा, तो फारच दुष्ट आहे. त्याच्याकडे, बाई, माझ्यानें पाहवत देखील नाहीं.

प्रास्पेरो—पण करतां काय ? त्याच्यावांचून तर आपलें चालत नाहींना ? तो रोज आपणासाठीं चुलीला विस्तव घालतो, जळवण आणतो, आणखीही बरींच कामें करतो. हा आपणाला त्याचा केवढा उपयोग आहे ? —कायरे ए ! कालीबन ! अरे कालीबन ! गधड्या ओ दे !

कालीबन—(आंतूनच) जळवण पुरेसें आहे हो.

प्रास्पेरो—असा समोर ये ! मी काय ओरडतों ? आलास का ? तुला दुसरें कांहीं काम सांगायचें आहे; चल लौकर !

[नागकन्येचें रूप घेतलेला एरिल पुनः प्रवेश करतो.]

वाः ! काय सुंदर नागकन्या ही ! एरिला ! ऐक, तुझ्या कानांत सांगतों काय करावयाचें तें.

एरिल—महाराज, ठीक आहे. अगदीं असें करतों. [जातो.]

प्रास्पेरो—अरे ए नीचा ! डुकरा ! राक्षसा ! सैताना ! केव्हांचा मी हाका मारतों आहें ?

[कालीबन प्रवेश करतो.]

कालीबन--अरे, अरे, अरे! माझी माता सिकोराक्ष, ही घाणेरड्या डबक्यांतले विषारी जलबिंदु घेऊन ते घुबडाच्या पिसानें मंत्रित असे, तसले जलबिंदु पडोतरे तुह्मा दोघांच्या टाळक्यांवर! आणि होरपळून जावोतरे तुमचीं सर्वांगें त्या दक्षिणेकडच्या वावटळीनें!

प्रास्पेरो--तोंड आटप, गाढवा! याचें उट्टें आज रात्रीं निघाल्यावांचून खचीत राहात नाहीं, लक्षांत ठेव! कोल-दांडा घालून घेण्याची किंवा कुशींत काढण्या लावून घेण्याची ही तयारी चालली आहे वाटतें! शिवाय आमच्या आज्ञेंतल्या भुतांनाही आज ठीक काम मिळेलसें दिसतें. तीं सारीं आज मध्यरात्रीला या स्वारीवर तुटून पडणार! मग तीं तुझे असे लचके तोडतील कीं तुझ्या आंगाचें धिरडें होऊन जाईल,-जसें काहीं मधाचें पोळेंच! एकेका लचक्यासरशी पण अशी आग निघेल कीं तशी गांधिल माशीच्या दंशालाही नसेल!

कालीबन-- मला आपला अगोदर जेवून घेऊं द्या-मग हा काय करील तें करील! खरें ह्मटलें तर हें बेट माझें; माझ्या सिकोराक्ष मातेच्या मागें याचा मालक मी! असें असून, यानें मजपासून घेतलें हिस्कावून! अरे मानभाव्या! येथें आलास, तेव्हां तूंच नव्हेका मला मोठा लोभ दाखविलास, मला गोंजारलेंस, माझ्याशीं गोडगोड बोललास, खायाला प्यायाला चांगलें चांगलें दिलेंस-दिवसा जळतो मोठा दिवा, रात्रीं जळतो तो लहान दिवा, असें बोलायाला शिकवलेंस-तेव्हां तूं मला बरा वाटलास. आणि ह्मणूनच, बेटावर कोठें काय आहे, कोठें काय आहे, हें तुला

दाखवून दिलें. हे गोड झरे, हे खारे झरे, हे कोळसे, ही नापीक जमीन, ही सुपीक जमीन - काय काय तुला दाखविलें ! पण किती गाढव मी ! कशाला हें दाखविलें बरें ! हाय ! हाय ! हाय ! सिकोराक्ष मातेचे मंतरलेले ते बेडूक नी त्या बेडक्या, तीं वाघळें नी तीं घुबडें–सर्व तुह्मा दोघांच्या टाळक्यावर आदळोत ! अरे पहा ! पूर्वीं मी माझा राजा होतों; आणि आतां तुझा दास बनलों आहें ! येथें दगडाच्या खबदडींत तूं मला ढोरासारखें कोंडून ठेवलें आहेस–बेटावर कोठें हिकडे तिकडे अंमळ फिरूं ह्मणेन तर फिरकूं देत नाहींस !

प्रास्पेरो—गाढवा ! हरामखोरा ! किती खोटें बोलतोस ? तुझी दया करून नाहीं उपयोग. तुला फटके पाहिजेत, फटके ! दुसरें कांहीं नाहीं. तूं मनुष्य समजून, तुझ्याशीं वागलों, हीच मोठी चूक ! तूं काय ! –सैतानाची अवलाद ! मी तुला चांगला घरांत घेतला–माझ्या स्वतांच्या खोलींत नीज ह्मटलें-त्याचें फळ तूं असें दाखविलेंस–माझ्या मुलीचीच अब्रू घ्यायाला निघालास !

कालीबन--आहाहा ! आहाहा ! ओहोहो ! ओहोहो ! वा: काय नामी झालें असतें ! पण तूं आडवा आलासरे, त्यानें सारें बिघडलें ! नाहींतर या बेटावर चोहोंकडे आजला कालीबनच कालीबन करून सोडले असते !

प्रास्पेरो –छीः छीः छीः ! धिक्कार असो तुला, अधमा ! दुष्टबुद्धि तुझ्या नखशिखांत भरली असल्यावर, सुबुद्धि कोठून तुला आठवावी ? मला बरिक तुझी मोठी दया आली, आणि मी तुला नीट बोलायला शिकविलें. अजूनही

शेंकडों गोष्टी प्रत्यहीं मला शिकवाव्याच लागतात! मूर्खा! कसें बोलावें तें देखीलरे तुला माहीत नव्हतें! पशूसारखा अस्पष्टपणें नुसता तूं ओरडस! तेव्हां, 'अरे, असें बोल, या वस्तूला अमुक ह्मणतात! तिला तमुक ह्मणतात' असें तुला वारंवार पढविलें. पण तुझें हाडच मुळीं दुर्बुद्धीचें! पढविलें तेवढें कसेंबसें शिकलास; पण मूळचा अंकुर कांहीं गेला नाहीं! चागल्या गुणांचा आणि तुझा उभा दावा! तेव्हां चांगलेपणा तुझ्या आंगांत आणला तरी टिकावा कसा? तूं गेलास पुनः आपल्या वळणावर! असें पाहून, मग मी ह्या बिळांत तुला चिणून टाकलें! तुझ्या नशिबीं हेंच! पण, खरें ह्मटलें तर, तुला याहीपेक्षां कांहीं कडक शिक्षा पाहिजे!

कालीबन--काय ह्मणालास, मला बोलायाला शिकविलेंस? होय, तुझी भाषा मला शिकविलीस--हा माझा फायदाच झाला! तुला शिव्यातरी देतां मला येऊं लागल्या! जरीमरी पडोरे तुझ्या माथ्यावर! नी करो तुझें तळपट एकदांचें!

प्रास्पेरो- चल जा, नीच, गधड्या! थोडा विस्तव आणून दे अगोदर. मग तुला दुसरें काम आहे. अशी मान काय हिसडतोस? संभाळ, सागतों ह्यांत कोठें चूक तर होऊं दे, किंवा हो ना तर ह्मण, ह्मणजे दाखवितों काय तें! आपला तो कोलदंडा आहेच! त्यानें पहा कसा तुला मऊ करतों, आणि तुझीं हाडें कशीं चुरडून टाकतों तीं! मग तूं असा ओरडशील कीं पशुसुद्धां ऐकून थरथर कांपतील!

कालीबन--नकोरे दादा, पायां पडतों ! नकोरे नको ! (आत्मगत) काय करावें ? याचें ऐकलें पाहिजे. काय भयंकर याचे मंत्र ! आईचा तो देव सोटोबा-केवढें जाज्वल्य दैवत !- पण तो सुद्धां गाय झाला त्यांच्या-पुढें !- त्यांची कांहीं मात्रा चालेना !

प्रास्पेरो--पाहतोस काय, बुबडा ? जाव, हरामखोर, जाव! नीव !

(कालीबन जातो.)

[एरिल अदृश्य रूपानें, उड्या मारित व गाणें गात, पुनः प्रवेश करतो; आणि त्याच्या मागून फर्डिनान्ड येतो.]

एरिल-- **(गाणें.)**

[" थोर तुझे उपकार । आई० " या चालीवर.]

हा बघ भुंके श्वान ॥ भुं भुं० ॥ ध्रु०
झाली झाली वेळ आपली । कुक्कुटही घे तान ॥
कु कूं कु । कुक्कुटही घे तान ॥ भुं भुं० ॥ १
या झडकरी ह्या सुवर्ण पुलिनीं । किति सुंदर मैदान ॥ भुं भुं० ॥ २
स्वकरीं घ्या हो घ्या कर चुंबुनि । द्या त्या आदरमान ॥ भुं भुं० ॥ ३
वायु करा स्थिर, शांत होऊं द्या । हा सागर दुस्मान ॥ भुं भुं० ॥ ४
मागें पुढतीं टाकिं पाउलें । बरोबरीनें छान ॥ भुं भुं० ॥ ५
यक्ष गडयांनो दक्षपणें गा । मंजुळ घेउन तान ॥ भुं भुं० ॥ ६

फर्डिनान्ड--गाणें कोठून ऐकूं येत आहे बरें ! काय ? आकाशांतून ? अथवा येथूनच कोठून ? अरे, हें बंदही झालें ! हं हं ! या बेटावरच्याच कोणा देवतेच्या प्रीत्यर्थ हें बहुधा असावें ! मी ह्या टेकडीवर बसलों होतों, आणि माझे बाबा बुडाल्याबद्दल शोक करित होतों-इतक्यांत ती गाण्याची लकेर माझ्या कानावरून अशी समुद्राकडे

गेली. अहाहा! काय मधुर! या लकेरीनें मनःसंताप-जन्य माझे अश्रुपात आणि या जलसंचयाचे महान् आघात—या दोहोंसही एकदमच शांत करून टाकलें! मग मी उठलों, आणि तिच्याच अनुरोधानें निघालों—अथवा निघालों कसला? तिनेंच मला येथें आकर्षून आणलें! -अरे पण ही गेली, गेली!-नाहीं नाहीं—फिरून ऐकू येऊं लागली!

एरिल-- (**गाणें.**)

[' झाली ज्याची उपवर दुहिता ' या चालीवर.]

घण घण घंटानाद भयाण। ऐके बापा दे निट कर्ण ॥ धृ०
तव जनकाच्या प्रेतविधीची। स्पष्ट गमे रे हे मज खूण ॥ १
खोल पुरुष दश बुडून गांठी। सागरतल जों अपार जाण ॥ २
यदस्थिचीं रे विद्रुमखंडें। विमल सकलही झालीं तूर्ण ॥ ३
फार काय वदुं?—नेत्रांचींही। अमोल मौक्तिक फळें सुवर्ण ॥ ४
यापरि झाली तत्तनु सकलही। रत्नमयी जी अशुद्धखाण ॥ ५
हा तों रत्नाकरसंगतिचा। अहह! थोर कीं महिमा पूर्ण ॥ ६
असत्य चित्तीं येथ न मान। लेशभरिहि, मी वाहिन आण ॥ ७
घे प्रत्यय घे—जलदेवी ह्या। वाजविती रे घंटा घण घण ॥ ८

फर्डिनान्ड--काय? या गाण्यांत माझ्या बाबांचा संदर्भ? छेः, हें कांहीं बुवा मानवी कृत्य दिसत नाहीं. हे गाण्याचे सूर कांहीं पृथ्वीवरचे नव्हत.—आतां तर, सूर वरूनच ऐकूं येऊं लागले!

प्रास्पेरो—मुली, डोळ्याचा तो झालरीचा पडदा अंमळ वर उचल. आणि लांबवर दृष्टि फेक. समोर काय दिसतें, पहा.

मिरांडा—काय? काय हें? कोणी यक्षजन? अहाहा! कसाग बाई तरी पाहतो हा! वाः! काय सुंदर मूर्ति! —पण काय? यक्षच!

प्रास्पेरो—अहाग वेडे! अग, हा खातो, पितो, बसतो, उठतो—सर्व कांहीं आपण करतों तसेंच हा करतो! इकडे येत आहे, हा तरुण मनुष्य त्या बुडालेल्या गलबतांतला बरें! सध्यां हा शोकानें व्याकूळ झालेला आहे.—खरेंच, शोक हा सौंदर्य लोपविणारा राहुच होय, अथवा हा सौभाग्य-भक्षक किडा ह्मणावा पहा, शोकाकुल नसता तर तूंच ह्याला देखणा ह्मणून ह्मगतीस! पण सध्यां हा बिचारा आपल्या नाहींशा झालेल्या मंडळीला हिकडे तिकडे पहात आहे!

मिरांडा—मी तर बाई याला देवलोकींचाच ह्मणेन! याच्या इतकी सुंदर वस्तु सगळ्या जगांत मला कुठें दिसली नाहीं!

प्रास्पेरो – (स्वगत) हं हं! हा घाट तर उतरावा तसा उतरत चालला. यक्षा, अरे यक्षा, आतां बरीक दोन दिवसांच्या आंतच तुला मुक्त करतों बरें.

फर्डिनान्ड—खचीत! हीच ती अप्सरा—जिच्या निमित्त हें गायन चाललें आहे! अप्सरे! माझी तुजपाशीं एक प्रार्थना आहे. कृपा करून मान्य; कर नाहीं ह्मणूं नको. प्रार्थना ह्मणून एवढीच कीं तुझें याच बेटावर वास्तव्य कीं दुसरे कोठें? येथेंच असेल तर मी कसें वागावें हें आतां तूंच मला सांग ह्मणजे झालें. पण याचें उत्तर सध्यां नलगे, अगोदर हें सांग—खरी ह्मटली तर, हीच माझी पहिली प्रार्थना. हे त्रैलोक्यसुंदरी! तूं कोण? मानवकन्या कीं, दुसरीच कोणी?

मिरांडा—छे बाई! मी कांहीं त्रैलोक्यसुंदरी नाहीं; मानव-कन्या बरीक खरी.

फर्डिनान्ड—काय? आमचीच भाषा बोलते ही! परमेश्वराची लीला कांहीं अगाध आहे! ही भाषा जे लोक बोलतात त्यांच्यांत मी श्रेष्ठ—माझ्याहून वरिष्ठ कोणी नाहीं. पण उपयोग काय? अशा प्रसंगी तिकडे असतों तर—

प्रास्पेरो—तूं वरिष्ठ? कसा बरें? नेपल्स नगरच्या राजानें तुझे हे शब्द ऐकले तर काय ह्मणेल?

फर्डिनान्ड—मी आतां एकटा एक!—केवळ निराधार प्राणी! तथापि नेपल्स नगरीचें नांव तुह्मीं घेतलें याचें मला मोठें कौतुक वाटतें! नेपल्सच्या राजानें हे शब्द ऐकले तर तो काय ह्मणेल?—नेपल्स राजा हे शब्द ऐकतोच आहे, आणि ह्मणतोच आहे काय ह्मणायचें तें! आणि तोच ऐकतो आहे नी तोच ह्मणतो आहे, ह्मणूनच मी रडतों आहें! नेपल्सचा राजा आहे कोठें?—आतां मीच सर्व! नेपल्सचे महाराज—ज्यांच्यासाठीं या माझ्या डोळ्यांना अश्रूंचे पूर लोटताहेत, त्या माझ्या बाबांना ह्याच डोळ्यांनीं बुडतांना किहो पाहिलें!

मिरांडा—शिव शिव शिव!

फर्डिनान्ड—गेले! बुडाले! आणि सर्व सरदारही बुडाले! त्यांच्या बरोबरच तो मिलान नगरचा राजा, त्याचा तो शूर पुत्र—गेले—दोघेही गेले बिचारे!

प्रास्पेरो—(स्वगत) मिलानचा राजा आणि त्याची ही सवाई शूर कन्या, यांणीं तुझें हें बोलणें केव्हांच खोटें पाडलें असतें—पण नको, सध्यां नको.—अरे! हीं दोघें तर अगदीं पहिल्याच भेटीला परस्परांवर अनुरक्त झालींशीं

दिसतात !—नामी, एरिला, अगदीं नामी ! मी तुला आतां मुक्त करतोंच बरें ! (फर्डिनान्ड यास संबोधून मोठ्यानें) हें पहा, तूं मोठी चूक केलीस, ऐकलेंस ?

मिरांडा—कां बरें माझे बाबा आज एवढे निष्ठुर स्वरानें बोलतात ? आजपर्यंत मी पाहिले कायते दोनच पुरुष, आणि आतां हे तिसरे. तरी ज्यांचे साठीं माझें हृदय इतकें उत्कंठित होतें, असे हे पहिलेच ! बाबांनाच आतां माझी कींव येऊन, त्यांचें मन वळेल तर ठीक !

फर्डिनान्ड—सुंदरी, अझून तूं अविवाहित असलीस आणि तुझें मन कोठेंही जडलें नसलें, तर माझे मनांतून, तुला नेपल्स नगरीची राणी करावी असें आहे.

प्रास्पेरो—अरे, इकडे मी काय ह्मणतों, तें आधीं ऐक. (स्वगत) हीं तर दोघेंही एकमेकांच्या पाशांत पडलीं. पण एवढी गर्दी कामाची नाहीं. याला थोडे तरी आढेवेढे पाहिजेत. वस्तु अनायासें मिळाली ह्मणजे तिची किंमत राहत नाहीं. (फर्डिनान्ड याला संबोधून मोठ्यानें) ऐकलेंस मी काय ह्मणतों तें ? माझी तुला आज्ञा आहे इकडे लक्ष दे. तूं आतांच ह्मणाला नाहींस—मी राजा आहें ह्मणून ? पण तूं रे राजा कसा ? हं हं मी समजलों—या बेटावर तूं हेर ह्मणून आला आहेस—नव्हे काय ? हें बेट मजपासून जिंकून घ्यावें, असा तुझा बेत दिसतो. पण लक्षांत ठेव—या बेटाचा राजा मी आहें.

फर्डिनान्ड—शपथ, माझा तसा हेतु मुळींच नाहीं.

मिरांडा—अशी सुंदर मूर्ति ह्मणजे सद्गुणांचें माहेरघर. तींत दुर्वासनेला स्थळ मिळणें असंभाव्यच.* आणि जर मिळालेंच तर दुर्वासनेशीं सद्गुणांनीं मैत्री केली ह्मणावयाची! आणखी काय?

प्रास्पेरो—(फर्डिनान्ड यास) चल. ये माझ्या मागून. (मिरांडेस) त्याची रदबदली नको; तुला काय प्रयोजन? अग, हा राजद्रोही आहे समजली!—चलरे ए! तुझे हात नी पाय एकत्र बांधून, पहा कशी गठडी वळतों ती! थांब, समुद्राचें खारें पाणी तुला प्यायाला, आणि खाजऱ्या सुरणाचा कांदा, नी सुकलेली मुळकंडें, नी नाचण्याचें भुस्कुट, नी त्यांतच आणखी भाजलेल्या आठ्या—असा हा छांदार रांधा तुला जेवायाला! चल!

फर्डिनान्ड—छत्! कधीं नाहीं येणार!† असला आदारसत्कार आह्माला नाहीं खपायाचा! असली शत्रूची छाती तर त्यानें करून पहावी!

[तलवार उसपता, पण तत्क्षणींच जादूच्या बळानें त्याचा हात लटका पडतो.].

---

* विचार सादृश्याचें उदाहरण:—

Miranda:—There's nothing ill can dwell in such a temple.

नैतादृशा आकृतिविशेषा गुणविरोधिनो भवंति।

शाकुंतल ४.

† विचारसादृश्यार्थ हें प्रास्पेरोला फर्डिनान्ड याचें व इंद्राला रघूचें दोनहीं उत्तरें ताडून पहाण्यारखीं आहेत:—

Ferdinand—:No: I will resist such entertainment till
Mine enemy has more power.

गृहाण शस्त्रं यदि सर्ग एष ते
नखल्वनिर्जित्य रघुं कृती भवान्।

रघुवंश, सर्ग ५.

मिरांडा—बाबा ! बाबा ! नका हो एवढा अविचार करूं !—नका हो अंत पाहूं ! हे फार विचारी आहेत—क्रूर नाहींत ! यांचें एवढें भय कशाचें ?

प्रास्पेरो—काय, काय ? फिरून बोल ? मोठी आली आहे आजाला नात शिकवायाला ! पायांतली वहाण पायांतच पाहिजे ! (फर्डिनान्ड यास) चोरा ! तलवार आटप आपली ! आव तर पहा केवढा ! पण हात चालेल तर शपथ ! कारण उघडच आहे; तुझें अपराधी मनच तुला खात आहे ! ये ये, असा ये पाहूं ? रक्षणस्थान सोड ! आतांच ह्या काठीनें मी तुझी सर्व शक्ति हरण करून, तुझ्या हातांतलें शस्त्र खालीं पाडतों !

मिरांडा—नकाहो, बाबा, नका ! मी पाया पडतें !

प्रास्पेरो—चल, दूर हो ! माझ्या आंगरख्याला ओळंबं नको अशी !

मिरांडा—दया करा, बाबा ! हवी तर मी त्यांची जामीन ! मग तर झालें ?

प्रास्पेरो—चूप ! अक्षर तर कांढ तोंडावाटे, कीं तुझी खोडकीच मोडतों—घालवून देखील देईन वेळेवर—कधीं सोडणार नाहीं ! हें काय ? ह्या चोरासाठीं एवढी रदबदली ! नांव काढूं नको फिरून ! हो बाजूला. याच्यासारखे देखणे कोणी जगांत नाहींतच वाटतें ? तूं अद्याप पाहिलें आहेस काय ? येऊन जाऊन, कालीबन आणि हा ! मूर्ख कुठली ! अग, असे शेकडोंजण आहेत कीं त्यांच्यापुढें हा केवळ कालीबन, आणि ह्याच्या पुढें ते जणों मदनाचे पुतळे !

मिरांडा—असूं द्या; माझी आवड आपली साधी आहे; एवढी उंची नाहीं! आणखी चांगले पुरुष पाहण्याची मला मुळीं इच्छाच नाहीं!

प्रास्पेरो—चल, येरे असा! अधिक गडबड नको.—झालें—संपलें बळ! तुझ्या स्नायूंना फिरून बाल्यदशा प्राप्त होऊन, ते लटपटूं लागले! त्यांच्यांत शक्ति राहिली आहे कोठें?

फर्डिनान्ड—असें झालें खरें! माझा जीव अगदीं गुदमरून गेला आहे—मी जणों स्वप्नांतच आहे! बापाचें मरण, मला भासूं लागलेली क्षीणता, माझ्या इष्टमित्रांचा नाश, आणि ह्या मनुष्याची दरडावणी—ह्यानें तर मला अगदीं आकळून टाकलेंच आहे, ह्मणा—ह्यांतून कशाचीही पर्वा मी करणार नाहीं. बंदीवास देखील पत्करला—मात्र अशा बंदिवासांतही, दिवसांतून एकदां—अगदीं एकदांच—या सुंदरीचें मुखकमळ पाहावयास मिळावें! मग ही एवढा जागा सोडून, स्वतंत्रतेला ह्मणावें, तुला चारी दिशा मोकळ्या आहेत; खुशाल तिनें तिकडे नांदावें! ह्या बंदीवासांतच जी जागा मिळेल तीच मला पुष्कळ झाली!

प्रास्पेरो—(स्वगत) ठीक आहे. (फर्डिनान्ड यास मोठ्यानें) चल! असा पुढें ये! [एकीकडे] गड्या एरिला! वा: काय मजा उडवून दिलीस! (फर्डिनान्ड यास मोठ्यानें) चल! माझ्या मागून ये! (एरिल यास एकीकडे) आतां आणखी एकच काम उरलें आहे, तेवढें कर ह्मणजे झालें!

मिरांडा—(फर्डिनान्ड यास) स्वस्थ असा बरें! कांहीं काळजी नको. बोलण्यावरून, तुह्मांला आमचे बाबा खाष्ट

वाटतील, पण स्वभावानें ते तसे नाहींत हो! हा त्यांचा राग कांहीं नेहमींचा नव्हे.

प्रास्पेरो--[एरिल यास एकीकडे] वारा जसा डोंगरावर अबाधितपणें खेळतो, तसा, एरिला, तूंही स्वच्छंदानें हवा तिकडे फिरायाला लौकरच मोकळा होशील. पण अगोदर, सांगितलेल्या गोष्टी बिनचूक झाल्या पाहिजेत.

एरिल-- अगदीं-अगदीं बिनचूक !

प्रास्पेरो--मुली, चल बरोबर. त्याची एवढी रदबदली नलगे.

[सर्व जातात.]

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थल—सदर बेटावरचेंच दुसरें ठिकाण.

[अलांझो, सिबास्टीन, अन्टोनियो, गांझेलो, अड्रीन, फ्रान्सिस्को, आणि इतर येतात.]

गान्झेलो—[अलांझो यास उद्देशून] अहो महाराज, आतां यांतच आनंद मानावा हें बरें. आनंद मानण्याला आह्माला तर कारण आहेच; पण आपणालाही आहे, सर्वस्वींच संहार होणार, त्यापेक्षां वांचलों हें मोठें भाग्य नव्हेका? अहो, हे प्रसंग कांहीं नवे नव्हत; नेहमींचेच आहेत. आज ऐकावें, तों खलाशाची बायको रडत आहे; उद्यां पहावें तों गलबताचा धनी डोकें धरून बसला आहे; परवां पहावें तों कोणी व्यापारी उर बडवितो आहे.—अशा गोष्टी प्रत्यहीं चालल्याच आहेत. परंतु अद्भुत गोष्ट ह्मटली ह्मणजे आपण वांचलों हीच. अशा रीतीनें निभावून येणें फारच थोड्यांच्या वांट्यास येत असेल! ह्मणून, महाराज, मी ह्मणतों–यांत दुःख मानावें किंवा आनंद मानावा हें आपणच पहा.

अलांझो—पुरे हो!

सिबास्टिन—त्यांना कसला आनंद? याहून शिळ्या आंबटीचा भुर्का देखील त्यांना गोड लागेल!

अन्टोनियो—छेः! शांतवन करण्याला आलेले हे गृहस्थ इतक्यावरच महाराजांना सोडणार नाहींत.

सिबास्टिन—हे पहा, आपल्या अकलेला किल्ली देऊं लागले; इतक्यांतच ठोके पडूं लागतील !

गान्झेलो— महाराज !—

सिबास्टिन—घ्या, मोजा आतां—एक.

गांझेलो—अहो, जें जें दुःख येईल तें तें जर आपण मनावर घेत गेलों तर जन्मभर आपल्या वांट्याला काय येणार ?

सिबास्टिन—मोहोर !

गांझेलो—मोहोर ? खरेंच, महाराजांच्या दुःखाला सध्यां मोहरच आला आहे, असें ह्मणावयास चिंता नाहीं. तुला वाटलें मी थट्टा केली, तरी पण तुझें ह्मणणें कांहीं खोटें नाहीं.

सिबास्टिन—वाः ! मी बोललों एक आणि तुह्मी समजलां भलतेंच. मी तर थट्टाच केली; तुह्मी मात्र भोळेपणानें ती खऱ्या अर्थानें घेतली.

गांझेलो—ह्मणून ह्मणतों, महाराज—

अन्टोनियो—पुरे, पुरे ! काय जीभ वळवळते आहे यांची !

अलांझो—पुरे हो, आटपा आतां.

गान्झेलो—बरें तर, हें माझें आटपलें. तरी पण—

सिबास्टिन—तरी पण थोडी पिरपिर आहेच.

अन्टोनियो— काय हो ! पैजच मांडली, तर अधिक पिरपिऱ्या कोण ?—गान्झेलो कीं अड्रीन ?

सिबास्टिन—अर्थात्, आमचे वृद्ध कपि.

अन्टोनियो—छेः, आमचा आपला हुप्या वानर.

सिबास्टिन—कबूल ! पैजेला काय लावतां ? बोला.

अन्टोनियो—पैजेला काय ?—हशा !

सिबास्टिन--चिंता नाहीं; ठरलें.

अड्रीन--हा जरी केवळ निर्जन प्रदेश आहे-

सिबास्टिन--हा: हा: हा: हा!

अंटोनियो--घ्या; तुमच्या पैजेचा ऐवज तुह्मांला पावला?

अड्रीन--जरी मनुष्योपजीवनशून्य आणि बव्हंशीं दुष्प्रवेश्य असा आहे-

सिबास्टिन--तरी पण,

अंटोनियो--तरी पण त्याशिवाय चालत नाहीं बरें!

अड्रीन--तरीपण-तरी पण, हें स्थळ नाजुक, स्पृहणीय, दुर्ज्ञेय आणि शांतिप्रद आहे खचित.

अंटोनियो--हो हो, शांतीबाई फारच नाजूक बायको होती खरी!

सिबास्टिन--आणि मी सांगतों-स्पृहणीय पण खरीच. आमच्या पंडितांच्या उदरांतून निघाली ती अन्यथा कशी असेल?-पंडितांचीच वाणी ती!

अड्रीन--अहाहा, किती मधुर हवा येत आहे!

सिबास्टिन--अवा मधुर खरीच-फारच देखणी! अंमळ घाणेरडी आहे इतकेंच!

अंटोनियो--एखाद्या डबक्यांत बुचकळून आली असेल बया, असेंही ह्मणाना!

गांझेलो--जीवनाला अनुकूळ अशी येथें सर्व परिस्थिति आहे.

अन्टोनियो--खरी स्थिति मात्र त्याच्या अगदीं उलट आहे! जगण्याचीच मुळीं वानवा!

सिबास्टिन--छे, जगण्याची गोष्टच काढूं नका.

गांझेलो--अहाहा ! किती कोंवळें आणि टवटवीत गवत हें !–हिरवें लुसलुशीत !

अन्टोनियो-- (गांझेलोच्या दाढीकडे बोट करून) हा–हा प्रदेश मात्र करडा दिसतो.

सिबास्टिन--त्यावर तुरळक हिरवी कोवळी झाकही आहे हो–नाहीं असें नाहीं.

अन्टोनियो--अं:, तरी हे फारसे कांहीं चुकले नाहींत.

सिबास्टिन--छे:, मुळींच नाहींत, खरें तेवढें कायतें चुकलें.

गांझेलो--आणि सर्वांत विशेष जो एक चमत्कार आहे–अहाहा ! तो कोणाला सांगीतला तर खरा देखील वाटायाचा नाहीं.

सिबास्टिन--असे शेकडों चमत्कार जसे खरे असतात तशांतलाच हा; आणखी काय ?

गान्झेलो--अहो, आपले आंगरखेच पहाना ? समुद्राच्या पाण्यांत जरी हे एवढे भिजले तरी नवेच्या नवेच ! क्षाराचा गंधही नाहीं ह्यांना–जशी कांहीं आतांच घडी मोडली आहे !

अन्टोनियो--हा खिसाच पहाना ? जर ह्याला बोलतां येतें तर हाच सांगता, ही निव्वळ गप्प आहे ह्मणून.

सिबास्टीन--कोणाला ठाऊक ? कदाचित हा खिसाच ती गप्प लुच्चेगिरीनें गडप करता.

गान्झेलो--मलातर वाटतें, आफ्रिकेंत गेल्यावर टयूनिसच्या राजाशीं महाराजांच्या कन्येचें लग्न झालें, तेव्हांच्या समारंभांत जसे आमचे आंगरखे कोरे व घडीदार होते तसेच

ते आतांही दिसतात–बिलकुल चुरले नाहींत कीं मळले नाहींत.

सिबास्टीन––लग्न काय? शुभ लग्नच तें. आणि आमची बोळवण तरी काय उत्तम झाली!

अड्रीन––महाराजांच्या कन्येसारखें अलौकिक स्त्रीरत्न ट्यूनिस नगराला राणी ह्मणून लाभलें, त्यापक्षीं तें नगर धन्य होय. अशी राणी तेथल्या लोकांनीं कित्येक वर्षांत पाहिली नसेल.

गान्झेलो––असें ऐकतों कीं डिडो नांवाची तेथें एक राणी होऊन गेली, ती फारच लावण्यवती होती. तेव्हां तिच्या मागून तरी पाहिली नसेल खचीत.

अन्टोनियो––कोण? डिडो विधवा राणी? मरोरे ती डिडो विधवा रांड! ती येथें कशाला?

सिबास्टीन––काय ह्मटलें विधवा? अहो, एक बायको मेली असतां, परिग्रहबहुत्वानेंही ईनीयस राजा जसा विधुर, तशीच ही डिडो राणी विधवा; आणखी काय? असें भलतेंच काय तह्मी समजतां?

अड्रीन––कोणाची ही गोष्ट आपण बोलतां?–डिडो राणीची? ती ट्यूनिस शहरची हें आज तुह्मापासूनच मला शिकलें पाहिजे. अहो, ती तर कार्थेज शहरची होती, ट्यूनिस शहरची कोठली?

गांझेलो––बरें तर, हें आमचें ट्यूनिसच कार्थेज समजा!

अड्रीन––कार्थेज समजायाचें?

गांझेलो––हो; कार्थेज समजा; त्याविषयीं माझी पक्की खात्री आहे.

अन्टोनियो--अहो, हे जें जें ह्मणतील तें तें खरेंच माना. ह्यांचा शब्द ह्मणजे केवळ ब्रह्मवाक्य आहे.

सिबास्टीन--नाहीं तर काय? पहा, ह्यांच्या शब्दानेंच कार्थेज शहराला ट्यूनिस बनवून त्या नष्टप्राय शहराला घरादारानिशीं आणि किल्लेकोटानिशीं अस्तित्वांत आगलें! काय समजतां तुम्ही यांचें सामर्थ्य?

अन्टोनियो--आतां आणखी कोणती अघटित गोष्ट हे घडवून आणणार?

सिबास्टीन--मला वाटतें, हें बेटच्या बेट खिशांत घालून स्वारी घरीं घेऊन जाणार, आणि आपल्या मुलाला शिताफळ ह्मणून खेळायाला देणार.

अन्टोनियो--अगदीं बरोबर बोललां-आणि त्यांतल्या बिया समुद्रांत लावून, असलीं आणखी शेंकडों बेटें उत्पन्न करणार,-खरें किं नाहीं?

गांझेलो—ह्मणजे करणारच.

अन्टोनियो--नाहीं कोण ह्मणतो? याला थोडक्यासाच अवधि आहे कायतो.

गांझेलो--जाऊं द्या हो हा शुष्कवाद. आह्मी बोलत होतों आपल्या पोशाखाविषयीं. महाराजांच्या कन्येच्या लग्नांत ट्यूनिस येथें जसे आपण आंगरखे घातले होते तसेच हे आज कोरे व घडीदार दिसत आहेत; नाहींका महाराज? अगदीं आपल्या कन्येच्या लग्नांतल्यासारखे!-जी आपली कन्या आतां ट्यूनिसची राणी झाली आहे, तिच्या लग्नांत होते तसे अगदीं!

अंटोनियो–आणि कधीं न ऐकली आणि न देखली अशी एक धिंडकाही तेथें होऊन गेली, ती नाहींका तुमच्या लक्षांत ?

सिबास्टीन––कृपा करून त्या विधवा डिडो राणीचें मात्र नांव घेऊं नकारे बुवा कोणी !

अंटोनियो––होयरे होय, तीच विधवा डिडो राणी ! वाहवारे विधवा डिडो राणी !

गांझेलो––महाराज, माझी ही बंडीच पहाना ? अगदीं पहिल्या दिवसासारखी आज नवट दिसत आहे–ह्मणजे एकेपरी नवटच ही.

अन्टोनियो––ही परी यांनीं नवीच शोधून काढली; निसटून जाण्याला ही एक पळवाट ह्यांनीं ठेवली हें बरें केलें.

गांझेलो––ह्मणजे, आपल्या कन्येच्या लग्नांत मी ही प्रथम घातली, तेव्हांच्या सारखीच नव्हेका ही ?

अलांझो––माझी मर्जी नसतांना, तुह्मी कां बळेंच माझ्या कानांत हे शब्द कोंबतां ? अरेरे ! माझ्या मुलीला मीं तिकडे दिली नसती तरी बरें ! पहा, तिकडून आलों नाहीं, तों वाटेंतच मुलगा गेला ! आणि माझ्या मतानें तर इटालीपासून एवढी दूर तिला मी दिली, तीही मला आतां अंतरलीच ! मला नाहीं वाटत, ती इतःपर माझ्या दृष्टीस पडेलशी ! हाय हाय ! बाळा, कुठेंरे गेलास ? नेपल्स व मिलान या गाद्यांना आतां कोण धनी ? आह्मीं आतां कोणाच्या तोंडाकडे पहावें ? कोणत्या भाग्यवान माशानें तुजवर आपली भूक शांत केली ?

फ्रान्सिस्को––महाराज, असें कां ह्मणतां ? युवराज अजून खचीत जिवंत आहेत. मोठमोठ्या लाटा फोडून व

त्यांच्या पृष्ठभागावर स्वार होऊन, धैर्यानें मार्ग क्रमतांना त्यांना मी आपल्या डोळयांनीं पाहिलें. शत्रुत्वाच्या त्वेषानें समुद्र त्यांच्यावर मोटमोठ्या लाटा उसळीत असतांनाही, त्या लाटांस बाजूस टाकून, छोटे महाराजांची स्वारी अबाधितपणें पाणी तोडीत चालली होती; व जी जी लाट येई तिला छाती देऊन, आणि लाटांवर लाटा थडाथड आपटत असतांही धैर्यानें डोकें वर ठेवून, ते किनाऱ्याकडे वळले होते. याप्रमाणें आपल्या दृढदीर्घ बाहूंचे तडाखे चालवून, आपल्या शरीराला वल्हावीत वल्हावीत अखेरीस ते किनाऱ्याशी पोंचले; आणि किनाऱ्यानेंही पुढें लवून त्यांस प्रणामपूर्वक आश्रय दिला. माझीतर खात्री आहे, युवराज जमिनीवर कोठेंतरी येऊन लागले असून, अगदीं खुशाल आहेत.

अलांझो––आतां कसला खुशाल? माझा बाळ गेला–निखालस गेला!

सिबास्टीन––महाराज, हें सारें आपल्याच हेक्याचें फळ बरें! यांत दुसऱ्याला कांहीं बोल नाहीं. राजकन्येला आपल्या इकडल्याच कोणा राजाला देऊन कृतार्थ केलें असतें तर हा प्रसंग आज कशाला येता? तें सोडून कोठें दूरदेशीं आफ्रिकेंत तिला आपण नेऊन वैरली; यामुळेंच हा मोठा धक्का आपणाला बसला. याशिवाय मुलगीही दूरदेशीं पडून ती डोळयांआड झाल्यामुळें आपल्या डोळ्यांचें पाणी न खळण्यास हेंही आणखी वेगळें कारण झालें.

अलांझो––नकोरे बाबा आणखी छळूं, पुरे आतां!

सिबास्टीन--अहो, आह्मीं सर्वांनीं आपापले परी आपणास पुष्कळ विनविलें; आपणापुढें पदर पसरले आणि ह्मटलें 'महाराज, असें करूं नका.' स्वतां ताईसाहेबांना सुद्धां मोठें संकट येऊन पडलें. एकीकडून आपली आज्ञा--आपला दपटशा, आणि दुसरीकडून स्वतांची नावड--यांत कोणतें पारडें नमतें, ह्याखालीं त्या बिचारीचा जीव व्याकुळ झाला! महाराज, या एवढ्या कृत्यांत आपले चिरंजीव तर गेलेच--बहुधा त्यांची इतःपर आशा नको. आणि आपल्या बरोबरचीही बहुतेक मंडळी नाश पावली असल्यामुळें नेपल्स आणि मिलान येथें एवढ्या स्त्रिया विधवा झाल्या असतील कीं त्यांच्या शांतवनाला तरी आतां कोणी मागें आहेत कीं नाहींत याची वानवाच आहे. हा सगळा दोष, महाराज, आपला आहे!

अलांझो--ह्मणूनच सर्वांत दुःखाचा मोठा वांटाही मजकडेच आला आहे.

गांझलो--रावसाहेब, तुह्मी बोललां त्यांत जरी सत्य आहे तरी मार्दव नाहीं तशांत असें बोलण्याचा हा प्रसंग नव्हे. अहो, जखमेवर तेल सोडावें कीं ती बळानें चोळावी? दुःखावर डाग देण्यांत काय अर्थ?

सिबास्टीन--आहे ठाऊक पांडित्य.

अंटोनियो--अहो, हें प्रतिधन्वंतरीचेंच पांडित्य.

गांझलो--महाराज, तुह्मी अशा कपाळाला आठ्या घातल्या ह्मणजे सर्वत्र दुर्दिनाची छाया पसरून आमची हवा बिघडते--आह्माला बरें वाटत नाहींसें होतें.

सिबास्टीन--काय? हवा बिघडते?

अंटोनियो--फारच बिघडते बुवा !

गांझेलो--या बेटावर मला जर व्यवस्था लावावयाची असती तर--

अंटोनियो--तर या राजश्रींनीं येथें कुहिली लाविली असती.

सिबास्टीन--छेहो. कडुनिंब किंवा निव्वळ निवडुंग ह्मणाना ?

गांझेलो--आणि मी जर याचा राजा असतों, तर मी काय केलें असतें, आहेका ठाऊक ?

सिबास्टीन--झिंगून पडलां नसतां एवढेंच कायतें--कारण दारू कुठें आहे येथें ?

गांझेलो--आजपर्यंतची जी रीत आहे तिच्या उलट सर्व कांहीं केलें असतें; ह्मणजे सर्वांना सर्व वस्तूंची सारखी वांटणी करून टाकली असती. मग व्यापार नको, धंदा नको, न्याय नको, आणि न्यायाधीशाचें नांवही नको; विद्येचें तर कामच नाहीं; श्रीमंती, गरिबी, सेवाचाकरी--कांहीं एक नाहीं; करारमदार, वारसा, शेतांचे बांध, जमिनीच्या शिवा, मळे आणि दुसऱ्याही असल्याच शेकडों भानगडी--कांहीं पंचाईत नाहीं--सब निकाल ! धान्य नको, तेल नको, पाणी नको, भांडीं नकोत; धंदेरोजगारांचें काम नाहीं. सर्व लोकांनीं खुशाल बसावें चापून--मांडीवर मांडी चढवून;--आणि बायकांनीं सुद्धां तसेंच. मग काय ? सर्वत्र परम पावित्र्य आणि परम निष्कलंकत्व मूर्तिमंत वास्तव्य करूं लागणार. मग राजा कोण आणि प्रजा कोण ? तरी पण--

सिबास्टीन--तरी पण काय ?--तरी पण तुह्मी राजश्री तेथचे राजेसाहेब होणारच !--आणखी काय ?

अंटोनियो--राज्यव्यवस्थेच्या ह्या समीकरणांत शेवटीं वाहतां वाहतां स्वारी मूळ पद विसरली !

गांझेलो--याप्रमाणें सर्व वस्तूंची सारखी वांटणी झाल्यावर सृष्टिदवीनें खुशाल शेत पिकवण्याचें काम करावें. त्यासाठीं कोणाला खपायाला नको आणि राबायाला नको. द्रोहबुद्धि, निंदा, आयुधक्रिया, भालेराई, चाकुबाजी, बंदुका आणि त्या अवजड तोफा-साफ यांचें नांवही मी आमच्या राज्यांत काढूं देणार नाहीं. सृष्टिदेवतेनें जें काय करायचें तें एवढेंच कीं तिनें उद्योगावांचून मनुष्यांला पीक देत जावें, व सर्वत्र धान्याची रगाडीच रगाडी करून, माझ्या पवित्र व निष्पाप प्रजेला पोटभर अन्न पुरवावें !

सिबास्टीन--अहो, ह्यांच्या राज्यांत लग्नाविघ्नाची कांहीं गरज नाहींका हो ?

अंटोनियो--अरे छत् ! काय गरज ? कारण रिकामटेकड्यांच्या ह्या राज्यांत जी पहावी ती वेस्वा आणि जो पहावा तो तिच्या पाठचा !

गांझेलो--मग महाराज, काय सांगूं ? आह्मी अशा प्रकारें राज्य करूं कीं सर्वजण ह्मणूं लागतील--'वा: हें सत्ययुग आलें बरें !'

सिबास्टीन--ह्या प्रतापी नव्या महाराजांचा जयजयकार असो !

अंटोनियो--गांझेलो महाराजकी जय !

गांझेलो--आणखी, ऐकलेंका महाराज ?

अलांझो—नको ऐकायाला; पुरे, आतां पुरे करा! आणखी अक्षर नको!

गांझेलो—महाराजांचें बोलणें वाजवी आहे—तें मला अगदीं मान्य आहे. मी जें बोललों तें ह्या गृहस्थांना कांहीं तरी हसायाला हवें ह्मणून बोललों. कारण ही मंडळी एवढी भडभडी व उल्लू आहे कीं हसायाला यांना कांहींच लागत नाहीं.

अंटोनियो—कां? तुह्मी आहां तर खरे! आणखी काय पाहिजे?

गांझेलो—अहो, आह्मी कसले? हसवण्याच्या कामांत तुमच्यापुढ आह्मी कोणी नव्हों; आणि कोणी नव्हे अशालाच तुह्मी हसणार तर—हुं, चालूं द्या—खुशाल हसा!

अंटोनियो—कां? कसा कोरडा ओढला!

सिबास्टीन—अं:, उपयोग काय? त्याचा फटकारा लागेल तरना?

गांझेलो—आपण सर्वच जण मोठे प्रतापी आहां, यांत शंका नाहीं. न जाणों चंद्राला सुद्धां त्याच्या कक्षेंतून काढून खिशांत टाकाल! कोणीं सांगावें? पण तो आपल्या कळा प्रत्यहीं बदलतो ह्मणून बरें. तशा न बदलता, तर त्याजवर खचित असा कांहीं प्रसंग आलाच असता!

[रागदारीवर गाणें चालले असतां एरिल अदृश्य रूपानें प्रवेश करतो.]

सिबास्टीन—ह्मणजे? येताच, आणि येणारच. आह्मी आहोंच तसे. असें केल्यावर मग आमची स्वारी तशीच

उड्डाण करून वावुळें आणि पाकोळ्या पकडण्याला जायची एकदम !—आणखी काय ?

अंटोनियो——(गान्झेलो यास) छे: ! रावसाहेब, असे रागावूं नका बुवा !

गांझेलो——अहो, राग कशाचा ? मात्र मी आपलें शहाणपण इतःपर वारेमाप बहकूं देणार नाहीं ह्मणजे झालें—पण माझे डोळे अगदीं पेंगूं लागले. तर, तुह्मी बसा हसत, आह्मी आपले निजतों कसे.

अंटोनियो——फार उत्तम. निजा राव, खुशाल निजा. आणि आह्मी हसतों तें, कान उघडे ठेवून, येईल ऐकायाला तेवढें ऐका.

[अलान्झो, सिबास्टीन, व अन्टोनियो यांखेरीज सर्वजण निजतात.]

अलांझो——कायहो ! इतक्यांतच ह्या सर्वांना झोपा लागल्या ? (सुस्कारा टाकून) मला जर अंमळ झोप लागेल, आणि त्याबरोबरच माझ्या विचारांनाही लागेल तर किती बरें होईल ? पण डोळे मिटूं लागले, त्यापक्षीं झोप येणार असें दिसतें.

सिबास्टीन——महाराज, येत असेल तर असलें सुख दवडूं नका. आधीं दुःखितांच्या वांट्यास ती येत नाहीं; आणि आलीच तर ती त्यांना सुखच घेऊन येते.

अंटोनियो——आपण निजा, महाराज; आह्मी बसतों येथें पहारा करीत. आपण निर्धास्त विश्रांति घ्या; कांहीं काळजी नको.

अलांझो--बरें आहे. मलातर भारी झोप आली. छे:, आतां निजतोंच.

[अलांझो निजतो; एरिल निष्क्रमण करतो.]

सिबास्टीन--कायहो! काय विलक्षण झोपा लागल्या ह्यांना!

अंटोनियो--हा, येथल्या हवेचाच गुण.

सिबास्टीन--मग, आपले डोळे कां मिटत नाहींत? मलातर झोपेचें कांहींच चिन्ह दिसत नाहीं.

अंटोनियो--आणि मलाही नाहीं. मी अगदीं खडखडीत आहें. आणि ही मंडळी पहावी तों सर्वजण जसे बेत करूनच एकावर एक लोटले आहेत! वज्रपात होऊन मुरकुंडी वळावी तशी यांची गत झाली आहे.–पण, सिबास्टीन महाराज! तुमचें भाग्य काय ह्मणतें–कायहो, काय ह्मणतें? पण नको, इतक्यांत नको. तरी पण मला लक्षण कांहीं वेगळें दिसतें. तुझ्या चर्येवरूनच त्याचा उलगडा होत आहे. हा पहा, मुगुट तुझ्या मस्तकावर येऊन बसलेला मला दिसत आहे!

सिबास्टीन--अरे! हें का ? तूं झोपेंत तर नाहींना बोलत?

अंटोनियो--कां बरें? माझें बोलणें नाहीं तुला ऐकूं येत?

सिबास्टीन--येतें तर; पण रावसाहेब, आपण बोलत आहों हें सर्व झोपेंत तर नाहींना? मला खचीत वाटतें, तूं बोलत आहेस हें तरी निदान झोपेंतलें भाषण! तूं काय बोललास?–फिरून बोल. ही झोप मोठी विचित्र दिसते! वा:, डोळे पहावे तों अगदीं उघडे–टकटकीत; आणि

फिरून झोपेंतली स्थिति आहे ती आहेच! हिंडायाचें, फिरायाचें, बोलायाचें, हसायाचें,—आणि फिरून गाढ झोप कायम ती कायमच! मला नाहीं कांहीं कळत!

अंटोनियो——अरे वेड्या! या वेळीं असा निजलास तर तुझें दैवच निजलें ह्मणून समज; अथवा जन्माचें नष्ट झालें, असेंच ह्मणसना? चांगला जागा आहेस आणि डोळे कां मिटतोस?

सिबास्टीन——वाः, झोपेंत काय नामी बडबडतो आहेस! पण तुझ्या ह्या बडवडण्यांत खचित कांहीं विशेष अर्थ आहे.

अंटोनियो——बाबारे, नेहमीसारखी ही मी थट्टा करीत नाहीं. खरेंच सांगतों, या वेळीं चांगला दूरवर विचार कर. आणि असा विचार केलास तर तुझें वैभव पहा दसपट वाढेल.

सिबास्टीन——मग पुढें?—छे बुवा, मला नाहीं कांहीं कळत. मी शुद्ध डवक्यांतल्या पाण्यासारखा संथ झालों आहे.

अंटोनियो—ठीक आहे तर; बाहेर फुटून कसें वाहावें तें मी तुला शिकवतों.

सिबास्टीन——खरेंच; शिकवशील तर बरें होईल. आळस आमच्या कुळाचा पुरातन मित्र, त्यामुळें माझ्या हृदयांत नुसत्या विचारांचा मात्र सांठा झाला आहे.

अंटोनियो——काय सांगूं रे! काहीं एक विचार मनांत आला ह्मणजे तो कसा सिद्धीस न्यावा, हें जर तुला कळतें, तर किती बरें झालें असतें! कर, तोंडानें वाटेल तेवढी रिकामी निंदा कर. पण ध्यानांत ठेव—जों जों तो विचार मोडून काढावा तों तों त्याला कशी तेजी येत जाते! अरे, विचार

पुष्कळांच्या मनांत घोळतात; पण ते इतके कांहीं खोल तळाशीं जाऊन बसतात कीं मग तेथून कांहीं केल्यानें ते हलतच नाहींत. याचें कारण काय?—एक अशा मनुष्यांचा भेकडपणा अथवा एक त्यांचा आळस.

सिबास्टीन—मग पुढें? तुझ्या ह्या कावऱ्या बावऱ्या डोळ्यांवरून आणि एकंदर चर्येवरूनच दिसतें, कीं तुझ्या उदरांतून आणखी कांहीं बाहेर येत आहे. मग जें बोलणें असेल तें बोलून टाकीनास एकदां. बाळंतिणीप्रमाणें तुला एवढे कष्ट कां वाटतात?

अंटोनियो—बरें तर, ऐक आतां. स्पष्टच सांगतों—हा गृहस्थ महाराजांना आपल्या आठवणीवरून सांगतो कीं युवराज किनाऱ्याला लागले. अहाहा! केवढी धड याची आठवण? मूढ बेटा! ही स्वारी गडप झाली ह्मणजे तरी कोणा लेकाला याची धड आठवण राहणार आहे? आणि असले हे राजश्री महाराजांना आश्वासन देतात व महाराज त्यावर विश्वास ठेवतात! बाकी, कोणालाही आशा लावण्याच्या कामांत यांचा हात खंडा—यांचा हा धंदाच ह्मणावा!—आणि हा गृहस्थ महाराजांची खात्री पटवितो कीं युवराज जिवंत आहेत ह्मणून. आतां याला काय ह्मणावें? हा झोपी गेलेला गृहस्थ पोहतो आहे ह्मणून कोणी ह्मणेलका? जर ह्मणेल तर मग युवराज बुडाला नाहीं—जिवंत आहे, असें मीही ह्मणेन.

सिबास्टीन—छे:, जिवंत असेल असें दिसत नाहीं.—याविषयीं माझी तरी निराशा आहे.

अंटोनियो--बरोबर, अगदीं बरोबर. अरे, पण याच निराशेंतून केवढी मोठी आशा ही इकडे उत्पन्न होत आहे! त्या आंगानें आशा खालीं बसली तर ह्या आंगानें तिचें टोंक एवढें उंच वर गेलेलें दिसत आहे कीं त्याच्या पलीकडे लोभाचीही दृष्टि पोंचणें कठिणच! आणि पोंचली तरी याहून अधिक तें काय मिळणार?—पण युवराज बुडून मेला ही माझी तर खात्री आहे; तुझी नाहींका?

सिबास्टीन--मलाही तसेंच वाटतें—तो कोठून जगणार?

अंटोनियो--असें जर आहे, तर तूंच सांग,—नेपल्सच्या गादीला वारस कोण?

सिबास्टीन--कोण ह्मणजे?—क्लारिबेल.

अंटोनियो--हं हं क्लारिबेल? ती तर बसली ट्यूनिस शहरांत राणी होऊन. कोठें तें ट्यूनिस?—मनुष्यवस्तीच्याही बाहेर दहा योजनें दूर—साता समुद्रांपलीकडे! नेपल्स शहरची खबर कोण तिला जाऊन सांगतो? आणि कसली ती ऐकते? चंद्र तर बोलून चालून थंडच;-तेव्हां स्वतः सूर्यच दूत होऊन जाईल तर नकळे! पण या कल्पनेंत काय जीव आहे? आणि समज इकडली कांहीं अधिक उणी बातमी तेथवर गेली; तरी काय? तिचीं मुलें मोठीं होतील, आणि तीं वयांत येतील व भांडायाला उठतील, तेव्हां पाहतां येईल. तूर्त ह्याच बयाच्या प्रसंगानें आपणा सर्वांवर समुद्रांत मरावयाची पाळी आली आहे एवढें बरीक खरें. आपलें दैव थोर, ह्मणून निभावलों, इतकीच गोष्ट. आतां, ह्या दैवानें आपणास येथें आणून टाकलें, यांत काय हेतु बरें? कांहीं तरी असला पाहिजे खचित. मला तर वाटतें, दैवाच्या ह्या

खेळांत, झाली ही केवळ प्रस्तावना झाली; बाकीचें कृत्य तुझ्या आणि माझ्या हातून करविण्याचा त्याचा बेत दिसतो.

सिबास्टीन---ह्या बडबडीचा अर्थ काय? कसें ह्मणतोस तूं? माझ्या भावाची मुलगी, ही ट्यूनिस नगरची राणी–होय; ती नेपल्सच्या गादीची वारस–होय; आणि ट्यूनिस व नेपल्स यांच्यामध्यें बरेंचसें अंतर आहे.–आहे खरें. बरें मग?

अंटोनियो—मग, हें जें शेंकडों मैलांचें अंतर, त्यांतला एकेक मैल तुझ्या कानाशीं ओरडून सांगत आहे–"अरे खुळ्या! ती क्लारिबेल कसली येते परत नेपल्स नगराला एवढी दूर!" तर पडूंदे तिला घोरत ट्यूनिस येथें; पण, राव, तुह्मी मात्र जागे असा ह्मणजे झालें! -सांग पाहूं? हे येथें पडले आहेत, यांच्यांत आणि मरणांत काय अंतर आहे बरें! आणि आधीं तरी काय? ह्यांची स्थिति अशीच मृतप्राय नव्हती काय? नेपल्स नगराचें राज्य, काय, ह्यांनाच करतां येतें? आणि दुसरे कोणाला करतां येत नाहीं? ह्या गांझेलोप्रमाणें हवी तेवढी व हवी तशी बडबड करणारे भाट, दुसरे कोणी मिळणारच नाहींत काय? मला वाटतें, मलासुद्धां ह्या गांझेलोप्रमाणें खुशाल खुशामत करतां येईल! काय सांगूं रे! माझ्यासारखेंच जर तुझें मन असतें, तर ह्या झोपेचा कितीतरी उपयोग होता–आपलें नशीबच उदयास आणलें असतेंस! कां? मी काय ह्मणतों तें आलेंका लक्षांत?

सिबास्टीन—हो; कांहीं आलेंसें वाटतें.

अंटोनियो--मग, अशा संतोषवृत्तीनें तुझ्या भाग्योदयाला मदत होईल असें तुला वाटतेंका ?

सिबास्टीन--होर गड्या हो! आतां आलें लक्षांत. पण तूं नाहींका आपल्या भावाला काढून लावलास ?-तसेंच कीं नाहीं ?

अंटोनियो--तर काय ? आणि पाहिलीस, माझी स्थिति सध्यां कशी उत्तम झाली आहे! पहिल्यापेक्षां किती तरी बरी. आमच्या भावाची आश्रित मंडळी तेव्हां माझ्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागत असे; पण आतां ते सारे माझे दास-थुंकीझेल !

सिबास्टीन--अरे पण, तुझें मन तुला काय सांगतें ?

अंटोनियो--अरे हो ! कसलें आणलें आहेस मन ! मन, मन, तें कोठें असतें, सांग पाहूं ? मी तर तें पायांतलें खेटर समजून, खुशाल पायांत घालून तडातड चालत जातों ! लोक ह्मणतात-मन ही एक देवता आहे, व ती हृदयांत वास करते; पण माझ्या हृदयांत तर मी तिला कोठें पाहात नाहीं ? मी आणि मिलान नगरीची गादी यांच्या दरम्यान अशीं छपन्न मनें येऊन उभीं राहिलीं तरी काय ?-साखरेप्रमाणें जागचे जागीं विरून जातील; आह्माला लेश-मात्र अपाय करणार नाहींत. हा तुझा भाऊ आणि ज्या भुईवर तो पडला आहे ती भुई, यांत काय अंतर आहे ? याच स्थितींत तो जर सदोदित राहिल, तर त्याला तूं, काय-मेला असेंच नाहींका ह्मणणार ? मीतर ही माझी विश्वासू कट्यार वीतभर खोल खुपसून, त्याला जागचे जागीं निजवितों. हें इतकें होत आहे तों तूं ह्या जुन्या खोडाला-

ह्या विवेकानंदमूर्तींना–डोळे पांढरे करायाला लाव म्हणजे आटपलें! कारण, शिव्याशाप द्यावयाला ही पीडा नको उगीच मागें. मग बाकीची मंडळी काय ?–ताटाखालचीं मांजरें; दूध पाहिलें कीं केली डावली पुढें! म्हणू त्या घटकेला, होस हो बोलून, टोला पाडणारीं हीं निव्वळ घड्याळें!

सिबास्टीन–होयरे गड्या होय! तुझाच कित्ता मी गिरवणार. तूं जसें मिलान मिळवलेंस तसें मलाही नेपल्स मिळेल; आणखी काय? ठीक आहे. उसप तलवार आणि उडव; म्हणजे एका क्षणांत तुझी खंडणी बंद. याशिवाय, मी राजा होऊन तुझ्यावर कृपादृष्टि ठेवीन ती वेगळी.

अंटोनियो––आपण दोघेही एकदम उडवूं. मी हात चालविला कीं लगेच तूंही तसाच गांझेलोला उडव! समजलास?

सिबास्टीन––पण, थांब, तुला कांहीं सांगायाचें आहे. अंमळ इकडे ये. [एकीकडे जाऊन हळुहळू बोलतात.]

[गाणें चाललें असतां एरिल अदृश्य रूपानें येतो.]

एरिल––अरे गृहस्था, तुजवर सध्यां केवढें जिवावरचें संकट आलें आहे! तुझ्या मित्राला जादूविद्येच्या बळानें हें समजलें व त्यानें मला तुझ्या रक्षणार्थ इकडे पाठविलें म्हणून बरें झालें; नाहीं तर आज तूं व तुजबरोबरच माझ्या धन्याचे सारे बेत एकदमच आटपले होते.

[गांझेलो याच्या कानांत गातो.]

गाणें.

[प्रिये, पहा, रात्रीचा समय.॥ या चालीवर.]

उठा उठा, करुनि दूर झोंप, वरा । दक्षता सदा ॥ ध्रुव० ॥
स्वस्थपणें झोंप घेत । पडलां निर्वेध येथ ।
बंडखोर करिति बेत । धरुनि दुर्मदा ॥ १
प्राण जरी प्रिय असती । सोडा झणिं निद्रा ती ।
सावधान चित्तवृत्ति । त्वरित होऊं द्या ॥ २

अंटोनियो—–तर, हो तयार–चटकन!

गांझेलो—–परमेश्वरा! महाराजांना आतां तूंच सांभाळ बरें.

[सर्व जागे होतात.]

अलांझो—हं! हें काय? काय आहे गलबल? अहो, जागे व्हा, जागे व्हा! अरे, तुह्मी तलवारी उपसून असे उभे कां? तुमचे चेहरे रे कां एवढे कावरे बावरे?

गांझेलो—–कायहो? काय आहे?

सिबास्टीन—–आपण निजलां तेव्हांपासून आह्मी पहारा करीत आहों, आणि महाराज, इतक्यांतच मस्तवाल बैलांच्या डुरकण्याप्रमाणें–अथवा सिंहाच्या गर्जनेप्रमाणेंच ह्मणाना? एकदम आवाज आमच्या कानीं आला. तो ऐकूनच नाहींका तुह्मी जागे झालां? आह्मी तर एकदम दचकलों, व आमचे कान अगदीं भणभणले.

अलांझो—–छे बुवा! आह्माला कांहीं एक ऐकूं आलें नाहीं.

अंटोनियो-–अबब! केवढा कर्कशआवाज झाला ह्मणतां!-की त्यानें मोठ्या भडे राक्षसाच्या देखील कानटाळ्या बसल्या असत्या. खचीत, ही एका सिंहाची नव्हे, पण सिंहांच्या मोठ्याशा टोळीची ओरड असावी. काय सांगावें? तिनें सगळी पृथ्वी कींहो दणाणून दिली!

अलांझो--कायहो, तुह्माला ऐकूं आली ही ओरड ?

गांझेलो--खोटें वाटेल महाराज, पण खरेंच सांगतों. मला तर बुवा कांहीं गुणगुणणें ऐकूं आलें; आणि तेंही फिरून फार मजेचें. त्याच्याच योगानें मी उठलों; मी उठलों आणि लगेच आपल्याला उठविलें. पुढें डोळे उघडून पाहतों तों हे आपले हत्यारें उपसून उभे! आवाज झाला हें कांहीं खोटें नाहीं.–कांहीं असो, आपण आपलें सावध-गिरीनें असावें हें चांगलें. अथवा चला, येथून दुसरीकडे तरी जाऊं. आणि न जाणों, आलाच प्रसंग तर तलवारी काढून तयारीनेंच असूं.

अलांझो—बरें तर व्हा पुढें, पाहूं? लागला तर बाळाचा शोधही लावूं.

गान्झेलो—परमेश्वरा, सिंहव्याघ्रादिकांपासून तूंच कर युव-राजाचें रक्षण. महाराज, ते कोठें तरी येथें जवळपासच असतील.

अलान्झो--बरे चला, व्हा पुढें.

एरिल—चला, आपणही आमचे धनी प्रास्पेरो यांजकडे जाऊं आणि काय काय केलें तें त्यांस कळवूंया. [एकीकडे] राजा जा जा, खुशाल मुलाला शोध; कांहीं धास्ती नाहीं.

[सर्व जातात.]

प्रवेश २ रा.

स्थळ—याच बेटावर दुसरें एक ठिकाण.

[डोक्यावर मोळी घेऊन कालीबन येतो. इतक्यांत मेघ गर्जने-
सारखा मोठा आवाज होतो.]

कालीबन—सूर्यनारायणा रे, खाचा नी खंदक नी खाजणें, डबकीं नी दलदली, यांतून जी जी घाण तूं सोखून घेतोस, ती दे सारी ह्या प्रास्परवर कोसळून, आणि याचा झडूं देरे केस नी केस आंगावरचा! त्याचीं तीं भुतें माझें हें बोलणें आतांच येथें सर्व ऐकत असतील, पण ऐकतना; मला शिव्या शाप दिलेच पाहिजेत—मी देणारच. नाहीं तरी त्यांचें ओरबाडणें कुठें चुकतें? बागुलबुवा दाखवायाचा, भेवडायाचें, चिखलांत पाडायाचें, उजेड दाखवून गुडुप अंधारांत टाकायाचें, रस्ता चुकवायाचा—त्यांच्या ह्या पीडा कुठें टळतात? एवढया तेवढया गोष्टीवरून सुद्धां तो ह्या भुतांना माझ्यावर घालतो. मग तीं कधीं माकडें होतात, आणि दांत दाखवून व तोंडें करून शेवटीं मला कडकडून चावतात; कधीं डुकरें होऊन माझ्या वाटेवर येऊन पडतात; मग त्यांचे सराटे सहजच माझ्या उघड्या पायांना टुपतात; कधीं साप होतात आणि माझ्या आंगाभोंवतीं वेटाळून, जिभेच्या चिरफळया वारंवार बाहेर काढतात व फिस्कारून फिस्कारून मला नको नकोसें करून सोडतात. हें पहा, हें पहा, आलेंरे आलें! (त्रिकालिक प्रवेश करतो.) हें त्याचें एक भूत आलें. मोळी आणायाला वेळ लागला ह्मणून रे हें आतां मला छळणार; काय रे करूं?

ह्याच्या दृष्टीस न पडेन तरी बरें. भुईवर लांब होऊन पडूं या. (तसें करतो.)

त्रिकालिक—येथें पहावें तों झाड नाहीं, झुडुप नाहीं—थंडीवाऱ्याचा कोठें निवाऱ्याला बसूं ह्मटलें तर कांहीं सोय नाहीं. आणि वादळाचीं चिन्हें तर पुनः दिसूं लागलीं. हा पहा—वाऱ्याचा सूं आवाज ऐकूं येऊं लागला. ओहो! हा पहा ढग—कोण काळा कुट्ट! आणखी हा दुसरा! अबब! केवढा प्रचंड हा! दारूच्या तुडुंब पिंपासारखा हा जर फुटला तर, मला वाटतें, मुसळधारा लागतील व चोहोंकडे पाणीच पाणी होऊन जाईल! आणि आतांच जो हा गडगडाट झाला तसा जर फिरून होईल, तर मोठी पंचाईतच. क्षणभर मला आपले कान कोठें लपवतां येते तरी बरें!—अरे, हें काय पण येथें?—माणूस कीं मासा? काय?—हा वळवळतो? खचित, हा मासाच. ही घाण मासळीचीच. कशी वस्कन आली पहा! फार दिवसांची जुनी आहे बरें ही! मी ओळखली. अरे वा! हा मासा तरी विलक्षणच दिसतो. या वेळीं मी इंग्लंडांत असतों, तर काय बहार झाली असती! या माशाला रंगबिंग देऊन रस्त्यावर प्रदर्शनार्थ मांडला असता; आणि आमच्या खेळाडु गुलहौशी मूर्खांपासून खूप पैसे काढले असते. अहो, इंग्लंडांत काय—असें एखादें चमत्कारिक जनावर नेलें कीं गबर व्हायला कांहीं उशीर नाहीं. कोणी बिचारा आंधळा पांगळा भिकारी आला तर ते लोक एक पैसा सोडणार नाहींत; पण शिद्ध्याचें किंवा अमेरिकन इंडियनाचें मढें येऊं

च्या कीं तें पाहण्याकरितां दहा देखील फेकतील. अरे, पण या माशाला माणसाचे पाय दिसतात. आणि त्याचे पंखही कसे अगदीं माणसाच्या हातांसारखे ! (हात लावून) होय, याचें आंग चांगलें गरम लागतें.–पण छे, माझी समज अगदीं चुकली. आतां नाहीं तसें वाटत. मासा नव्हे–हा कोणी तरी या बेटावरचा मनुष्य आहे. विचारा तुफानाच्या सपाट्यांत सांपडून येथें कुडकुडत पडला आहे, झालें ! (इतक्यांत मोठ्यानें गडगडाट होतो) हाय, हाय, फिरून तुफान सुरू झालें! आतां काय करावें? याच्या कांबळ्यांत तरी शिरूं या. दुसरा आधारच नाहीं. कोणाच्याही कुशींत घुसणें मला आवडत नाहीं, पण प्रसंग सर्व कांहीं आवडायाला लावतो.

[स्टिफानो दारूचें एक नळकांडें हातांत घेऊन
गात गात प्रवेश करतो.]

स्टिफानो– (गाणें.)

['नृपममता रामावरतीं '–याचालीवर.]

नांव नको ह्या दर्याचें ।
मरण बरें धरणीवरचें ॥
उपाय अमुचा चालेना ।
दर्यानें केली दैना ॥
करुं कसें ? ॥

छेः ! हें गाणें अगदीं भिकार—मर्तिकाच्या वेळचें दारू पिऊन जरा हुशारी तरी आणूं या. वाः ! काय मजा आहे ! (दारू पीत पीत गातो.)

गाणें.*

[चाल लावणीची.]

तांडेलानं, नावाड्यानं, आणि नाखवा दादानं ।
अह्मि समयांनीं मिळून [illegible] बेत एकदा गमतीनं ॥ ध्रुव०
धरतीवरल्या पतिव्रतांना [illegible] णुं येथ मथवुन ।
जरि पटक्याचें निशाण [illegible] दिला तेंच सोडुन ॥ १ ॥
बघुन गाजिचा थाट का[illegible] गेल्या गडबडुन ।
साळी काळी गोळी होउनि मारि मिठी जलदिनं ॥ २ ॥
तारी झारी भरुनि रुपेरी धाव घेत मागुन ।
नेसुन हिरवी साडि हिरा ये लइ नखरा करुन ॥ ३ ॥
चिमा सखीच्या हस्त गळां ती ठेवि मस्त ऐटिनं ।
याच रंगामधीं दंग मी, गुंगुन गेलें मन ॥ ४ ॥
परी बरांडी रांड एकली बसलि गरम होउन ।
तोंड वांकडें, नाक फेंदरें, देइ शिव्या ठासुन ॥ ५ ॥
तारि–हिरीशीं कधीं पटेना, देताचि धुडकावुन ।
ह्मणुन सोबती कधीं न बघती हिच्याकडे ढुंकुन ॥ ६ ॥
चला यारहो ! दर्यावरती हिच्या वरी थुंकुन ।
मरो अवा ही, हिच्या संगतीं होइल धुळधाण ॥ ७ ॥

छेः ! हें सुद्धां भिकारच–अगदीं मन देत नाहीं. पण या दारूंत मजा आहे ह्मणून बरें. (आणखी दारू पितो.)

कालिबन––अरेरे ! मेलों, मेलों, मेलों !

स्टिफानो–– हें रे कोण ? भुतें तर नाहींतना येथें ? हाँ ! रानटी भिल्लांचीं रूपें घेऊन या, अथवा जनावरें

---

* हें गाणें मूळाला इतकें धरून नाहीं; तरी प्रसंगाला अनुसरून आहे असें ह्मणायास चिंता नाहीं. अशा गाण्यांत मोठासा अर्थ नसतो; यास्तव कवीच्या इच्छेचा बोध त्यावरून झाला ह्मणजे पुरे. मागें येऊन गेलेलीं व पुढें येणारीं बहुतेक गाणीं याच धोरणानें मराठींत उतरलीं आहेत, हेंही येथें प्रसंगानुरोधानें सांगून ठेवणें जरूर आहे. याशिवाय, या गाण्यांत 'साळी' 'तारी' 'हिरा' व 'चिमा' यांचा लाक्षणिक अर्थानें 'तंबाकू' 'ताडी' 'भांग' व 'चिलीम' या कटाक्ष आहे हेंही मार्मिक वाचकांच्या लक्षांत येईलच.

होऊन या–तुमच्या ह्या असल्या चेष्टांना आणि वेड्याविद्या सोंगांना मी दाद देणार नाहीं. रे, मी आतांच तुफानांतून व समुद्रांतून गटंगळ्या खात आलोंना?–तो हा मी गाजी तुह्माला–चारपायांच्या भुतानों–तुह्माला भिणार? ह्मणतात ना? दोन पायांचा प्राणी चार पायांच्या प्राण्याला कधीं हार जाणार नाहीं. हीच ह्मण, माझ्या नाकांतून श्वास चाले, तोंवर मी खोटी होऊं देणार नाहीं; समजलां?

कालिबन—अरेरेरे. मेलों, मेलों, मेलों! भुतानें पछाडलें!

स्टिफानो—अरे हें भूत नव्हे! कोणी तरी बेटावरचा हा चार पायांचा राक्षस दिसतो. खरेंच, याला तापाची हुडहुडी भरली आहे. पण हा गुलाम आमची भाषा कोठें शिकला? चिंता नाहीं–धीर देऊन याला बरें वाटलें तर पाहतों. बरें वाटलें तर ठीकच; याला माणसाळून नेपल्स शहराला घेऊन जातां येईल. मला वाटतें, मोठ्या बादशहाला देखील असली भेट नेली तर अमान्य होणार नाहीं.

कालिबन—मारूं नकोरे बाबा, मारूं नको. तुझ्या पायां पडतों. मोळी लौकर आणीत जाईन, बाबा!

स्टिफानो—मला वाटतें, ह्याला वायूचा झटका आला आहे. हा शुद्धींत बोलत नाहीं. बरें तर याला आपली बाटली पाजून पाहूं. पूर्वी कधीं हा प्याला नसला तर ही याला लौकरच ताळ्यावर आणील. यांतून हा बरा झाला, ह्मणजे माणसाळून, आपण तर याला देशाला घेऊन जाणार. ह्याच्या जिवावर जितका पैसा मिळवूं तेवढा थोडाच.

कारण, ज्याच्या हातीं हा पडेल त्याला हा खूप पैसा देऊन जाईल,—चांगली चंगळच उडवून देईल.

कालिबन——होय, अझून तूं मला दुखविलेंस नाहींस खरें; पण तुझा काय नेम? होय, मला वाटतेंच—तुझ्या ह्या थरथर कांपण्यावरून, हा पहा प्रास्पेरोच्या मंत्रानें तुझ्या आंगांत संचार केला.

स्टिफानो——अरे लेका, असा शुद्धीवर ये. तोंड उघड. अरे, घे, थोडी घे. अरे माकडा, हिनें तुला वाचा फुटेल—वाचा. उघड, उघड, तोंड वांस. खचित, तुझें कापरें जाईल. तें फिरून कधीं येणार नाहीं. अरे, तुला ठाऊक नाहीं, मी तुझा सोबती आहें—सोबती. दांतखिळी उकल.

त्रिकालिक——अरे, हा तर ओळखीचा शब्द दिसतो. होय! तोच तो.—पण तो तर बुडून मेला. येथें कोठला? मग हीं भुतें तर नसतीलना? अरे धांवारे धांवा! भुतानें पछाडलें—

स्टिफानो——काय? चार पाय आणि दोन तोंडें! वाः! कायहो नामी राक्षस हा! ह्याचें पुढलें तोंड पाहावें तों गोड बोलणारें आणि मागचें पाहावें तों अभद्र बोलणारें. माझें नळकांडें सबंद जरी खपलें तरी बेहत्तर; मी याला बरा करणार—आणि याची हुडहुडी पार नाहींशी करून टाकणार. ये ये ये—घे; थोडी घे; तुझ्या दुसऱ्या तोंडांतहीं थोडी ओततों.

त्रिकालिक——अरे, स्टिफानो!—

स्टिफानो——काय? तुझें हें दुसरें तोंड मला नांव घेऊन हाका मारतें! तोबा! तोबा! हें तर भूत दिसतें बुवा!

राक्षस कसला? जाऊं द्या कीं; काय ह्याच्या नादीं लागतां? द्या सोडून.

त्रिकालिक––अरे स्टिफानो! तूं स्टिफानोच नव्हेका? तोच तूं असशील तर तुझा हात दे मला, पाहूं? आणि माझ्याशीं नीट बोल. मी त्रिकालिक, तुझा सोबती; भिऊं नको. मला ओळखित नाहींस?

स्टिफानो––तूं जर खराच त्रिकालिक असशील तर बाहेर ये असा. मी ही तुझी बारीक तंगडी धरून तुला ओढतों. ही बारीक तंगडी बहुधा त्रिकालिकाचीच. जर त्रिकालिक असशील–अरे होरे हो गड्या! तूं आमचा त्रिकालिकच. अरे, ह्या राक्षसाच्या रे हातीं कोठून पडलास? काय? हा तोंडावाटे त्रिकालिक तर नाहींना ओकत?

त्रिकालिक––छेरे गड्या! हा तर राक्षस आहे–विजांच्या कडकडाटानें भिऊन येथें पडला आहे.–पण कायरे स्टिफानो, तूं बुडाला नाहींस?–खरेंच बुडाला नाहींस? बुडाला नसलास तर बरें. पण कायरे, तुफान गेलें?–अगदीं नाहींसें झालें? बाबारे, तुफानाच्या भयास्तव ह्या राक्षसाच्या कांबळ्यांत मी घुसलों. कायरे स्टिफानो, तूं जिवंत आहेसना पण? एकून नेपल्सनगरापैकीं दोन असामी तर निभावले ह्मणायाचे!

स्टिफानो––मला हलवून असा घुसळूं नकोस.–माझें पोटांत ढवळताहे.

कालिबन––(स्वगत) अरे, हीं कांहीं भुतें नव्हत. हें चिन्ह बरें दिसतें. ज्यानें अमृत माझ्या घशांत ओतलें, तो मोठा

छांदार देव ह्मटला पाहिजे. चला, आपण त्याला शरण जाऊं–त्याच्या पायां पडूं. (तसें करतो.)

स्टिफानो– पण तूंरे कसा सुटलास? येथें कसा आलास? पण घे; अगोदर एक घोट तर घे. आणि मग सांग, तूं कसा बचावलास तें. मी तर बुवा दारूच्या पिंपावर बसून मजेनें आलों. खलाशांनीं बाहेर काढलेल्या पिंपांतलें एक माझ्या हातीं लागलें. ह्या दारूचीच शपथ, खोटें सांगेन तर, मग कांठावर आल्यावर हें नळकांडें तयार केलें, आणि तसाच फिरत इकडे आलों.

कालिबन––(मध्येंच पुढें येऊन) आणि या नळकांड्याचीच शपथ, मी तुझ्या पायांचा दास आहें. अरे, हें अमृत पृथ्वीवर कोठलें?

स्टिफानो––घे; आणखी एक ठांस. तूं कसा बचावलास, आतां सांग पाहूं?

त्रिकालिक––मी तर, गड्या, बदकासारखा सराळ्या मारीत मारीत आलों! ह्या गळ्याची शपथ, मला चांगलें अगदीं बदकासारखें पोहतां येतें.

स्टिफानो––बरें घे; आणखी एक घे. तूं जरी बदकासारखा पोहलास, तरी आहेस, शिंच्या, पाणकोंबडा–अजागळ कुठला!

त्रिकालिक––कायरे, आणखी थोडीशी मिळेलका?

स्टिफानो––अरे गड्या हो! भितोस कां? एक सबंद पिंप पडलें आहे. खडकाला एके ठिकाणीं खांच्या आहे, त्यांत तें मी लपवून ठेविलें आहे.–हेंच आमचें मद्यागार! बरें, पण हा राक्षस काय ह्मणतो?–कायरे, तुझी हुडहुडी गेलीका?–कीं आहे कांहीं शिल्लक?

कालिबन—तूं रे कोठून आलास ?–आकाशांतून ?

स्टिफानो—अरे हो ! चन्द्रावरून. शपथ, एकदा मी चन्द्र-लोकावर होतों खराच !

कालिबन—खरेंना पण ? तरीच तुला पाहिलेंसें मला वाटतें–खचित माझ्या धन्याच्या मुलीनें तुला एकदा दाखविलें होतें, तेव्हांपासून मी तुला ओळखतों.—तुझा तो कुत्रा आणि ती झाडाची डाहाळी–सर्व कांहीं मला ठाऊक आहे.

स्टिफानो—ठीक आहे. ये, तर ठांस एक पाहूं आणखी लागली तर फिरून भरून आणूं नळकंडें. काय चिंता आहे ?

त्रिकालिक—वाः, नशिबानें हा राक्षस फार भोळा भेटला. मी याला फार भीत होतों. पण, अंः, यांच्यांत कांहीं जीव नाहीं ! चंद्रावरचा मनुष्य ! कोण भोळसट हा राक्षस ह्मणावा ! पण ह्याची बरी चैन झाली आहे !

कालिबन—चल, देवा ! बेटावरची कोणती जागा सुपीक आणि कोणती नापीक, ही खडान खडा माहिती तुला करून देतों, ये. मी या चरणाचा दास आहें. तूं माझा देव; तुझ्या पायांची धूळ चाटूं दे मला. कृपा कर, देवा ! अधिक कांहीं मागत नाहीं.

त्रिकालिक—वारे वा ! हा तर पक्का लबाड व दारूबाज दिसतो ! काय ह्मणे–मी चरणाचा दास, दारू प्यायाला मिळावी ह्मणून ? संभाळ बरें, देवा ! निजलास तर तुझें हें नळकांडें जाग्यावर राहणार नाहीं; पक्कें समज.

कालिबन—मी तुझा दास आहें; शपथ, मी दास आहें. मला पदरांत घे एवढा.

स्टिफानो--ठीक आहे. ये, पड पायां, आणि वाहा शपथ.

त्रिकालिक--या राक्षसाला पाहून मला भारी हंसूं येतें. याचें डोचकें पहा कसें कुत्र्यासारखें! थुः! फारच ओंगळ! मला तर वाटतें, याला खूप बडवावा, पण--

स्टिफानो--ये, धर पाय.

त्रिकालिक--पण हा तर झिंगला--अंमल चढला याला! कोणरे बुवा ओंगळ!

कालिबन--चल, देवा! तुला छांदार झरे दाखवितों; चांगलीं चांगलीं फळें आणून देतों; छांदार मासे धरून देतों; आणि जाळायाला सपाटून लांकडें आणून देतों. मरोरे तो प्रास्पर! त्याच्यावर जरीमरी पडो! कोण खाष्ट! साफ मी त्याची चाकरी करणार नाहीं.--यापुढें त्याला लांकडें आणून देणार नाहीं. तूं सांग. ह्मणशील तें तें तुझें ऐकेन--तुझा मी दास! खरोखर तूं किती छांदार देव आहेस!

त्रिकालिक--छिः छिः छिः! हा बेटा अगदींच किंहो मूर्ख! दारू पिऊन मस्त झालेल्या ह्या बिचाऱ्या दारूबाजाला हा बेटा देव समजतो!

कालिबन--देवा, तुझ्यासाठीं थोडीं सिताफळें आणूंका? मी आपल्या लांब लांब नखांनीं उकरून कांहीं सुळकंडें तरी आणून देऊंका? चल माझ्यासंगें; मी तुला चांगल्या चांगल्या पांखरांचीं घरटीं दाखवितों, मजेदार स्वादिष्ट मासळी धरून देतों. ये मज संगतीं.

स्टिफानो--तुझी ही बडबड पुरे कर, आणि मला आधीं रस्ता दाखीव.--गड्या त्रिकालिका, आपले महाराज आणि

इतर मंडळी सारेजण बुडाले, यांत कांहीं संशय नाहीं. यास्तव आपण हें बेट आपल्या ताब्यांत घेऊं बरें का. (कालिबनास) धररे, अंमळ हें नळकांडें धर.—गड्या त्रिकालिका, नळकांडें रिकामें झालें ह्मणून चिंता करूं नको—लौकरच फिरून भरून आणूं, बरें का.

कालिबन—(दारूच्या तारेंत गातो.)

गाणें.

घालून बांध पाण्याला । नग कधींच अडवायाला ।
नग मासे पकडायाला । सरपणही आणायाला ।
(चाल) मी अतां मोकळा होणार ।
कुणा नच भिणार ।
चहुंकडे फिरणार ।
राजावाणी र ।
मज अतां कुणाची डर ॥ १ ॥
नग अतां पाणि आणाया । खरकटीं भांडिं घासाया ।
धुरकटांत चुल फुंकाया । आणिक ती राख भराया ॥
(चाल) मला नव धनी होणार ।
कुणा नच भिणार ।
चहुंकडे फिरणार ।
बन् बन् काली र ।
तुज अतां कुणाची डर ॥ २ ॥

त्रिकालिक—वाहवारे राक्षस! वाहवारे झिंग्या! वाहवारे बडबड!

कालीबन—मजा, मजा, मजा! आज मोठी मजा! सुटलों, सुटलों, सुटलों! एकदांचा जाचांतून सुटलों!

स्टिफानो—अरे राक्षसा, आधीं रस्ता दाखीव, ह्मटलेंना? पुढें हो. [सर्व जातात.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ.—प्रास्पेरो याच्या गुहेपुढील जागा.

[फर्डिनान्ड खांद्यावर एक मोठें ओंडकर घेऊन येतो.]

फर्डिनान्ड—काहीं काहीं खेळ फार त्रासदायक असतात; पण त्यांपासून होणाऱ्या आनंदापुढें त्यांचा त्रास वाटत नाहीं. हलकीं सलकीं कामें करण्यांत मनुष्याला मोठेपण नसतांनाही, केव्हां केव्हां तीं तो मोठ्या हौशीनें करतो. याच प्रमाणें दिसण्यांत अगदीं साध्या गोष्टी; पण त्यांचे परिणाम पहावे तर फारच अघटित. आतां, हेंच मला नेमून दिलेलें काम पहाना?–किती तरी जड आणि त्रासदायक वाटेल असतें. पण तसें मुळींच वाटत नाहीं; उलटें तें एवढें आयासाचें असतांनाही सुखकारकच वाटतें! त्या हृदयस्वामिनीच्या नेत्रांत असें कांहीं अमृत भरलें आहे कीं त्यानें अचेतन वस्तूंनाही चेतना प्राप्त होते; मग मला उत्साह प्राप्त होतो यांत काय नवल? * अहाहा! कोठें तिचा शांत स्वभाव, आणि कोठें तिच्या बापाचा खाष्टपणा–निष्ठुरपणाचा जणूं पुतळाच! त्यानें

---

* हें मूळ वाक्य असें आहेः—

The Mistress which I serve quickens what's dead.

असाच उद्गार, मागें पृष्ट १२ अंक १ ला, प्रवेश २ रा, येथें मिरान्डेच्या भाषणांत आला आहे, तो व त्याशीं समानार्थक वामन पंडिताचा उद्गार सादृश्यार्थ दिला आहे, तो ह्याशीं ताडून पहावा.

केवढयानें दरडावून मला आज्ञा केली! ह्मणाला–‘फार्डिनान्ड, हीं हजार ओंडकरें पडलीं आहेत; हीं इकडून तिकडे वाहून ने आणि नीट रचून ठेव.’ हें ऐकून माझ्या हृदयस्वामिनीला फार फार वाईट वाटलें. पण करते काय बिचारी? मला कष्ट करतांना पाहून ती पराकाष्ठेची कष्टी होते! बापडी धाई धाई रडते, आणि ह्मणते–‘कामाची योग्यता काय? आणि तें करणाराची योग्यता काय?’ पण मी आपलें काम अगदींच विसरलों. हे विचार मनांत आले ह्मणजे हें असें होतें. तथापि ते एवढे गोड लागतात कीं मी फार थकून गेलों आहे तरी तितक्यानेंच जिवाला अंमळ हुषारी वाटूं लागते व फिरून मी ताजातवाना होतों.–काम करतांना करतोंसें देखील मला वाटत नाहीं.

[मिरांडा येते, आणि कांहीं थोड्या अंतरावर, तिला व फर्डिनान्ड या दोघांनाही नकळत, प्रास्पेरो प्रवेश करतो.]

मिरांडा––शिव शिव, काय करावें? अहो, एवढे कष्ट करूं नये. जळों तीं लाकडें! त्यांवर वीज कां नाहीं पडली? थांबावें, अंमळ खालीं बसावें; आणि थोडा विसांवा तरी घ्यावा. मला तर वाटतें, हीं लाकडें जळतांना देखील, कष्ट दिल्याचें स्मरून, टिपें गाळतील! * सध्यां बाबा अभ्यासाला बसले आहेत; तर माझें ऐकावें, अंमळ विसांवा घ्यावा. आणखी प्रहरभर ते येण्याची धास्ती नाहीं.

फार्डिनान्ड––मला, कसेंही करून, सूर्य मावळण्याच्या आधीं, हें काम संपविलेंच पाहिजे. बसून काय करूं?

---

* कित्येक लाकडांतून, जळतांना, बाष्पमय तैलस द्रव गळतो हें पुष्कळांच्या पहाण्यांत असेल, या गोष्टीवर येथें कवीचें लक्ष आहे.

मिरांडा--बरें तर, मी वाहूं लागतें लाकडें! तोंवर आपण बसावें येथें. द्या-तें खांद्यावरचें ओंडकूर द्या मजपाशीं; मी नेतें.

फर्डिनान्ड--छे छे! तसें कसें होईल? माझ्या हातापायांचे तुकडे पडले आणि माझी मान मोडली तरी काय चिंता आहे! मी येथें रिकामका बसून, तुला हें असलें अप्रतिष्ठेचें काम करावयास लावूं काय?-असें कधीं होणार नाहीं. हें काम खचीत तुला शोभेसें नाहीं.

मिरांडा--अहो, हें जेवढें आपणाला शोभेसें आहे तेवढेंच मला शोभेसें आहे. पण मला तें जड वाटणार नाहीं इतकेंच काय तें. कारण मी आपण होऊन तें करीत आहें, व तुह्माला मनांत नसतांना करावयाचें आहे.

प्रास्पेरो--(स्वगत) काय चाहटळ पोर! ही बिघडली,-अगदीं हुरळली! येथें एकदम निघून आली यावरून हें उघड झालें.

मिरांडा--अहो, तुह्मी फारच थकलेसे दिसतां.

फर्डिनांड--छेः सुंदरी, तूं जवळ असल्यावर काळोखी रात्र सुद्धां दैदीप्यमान प्रभातसमयाप्रमाणें आनंददायक होऊन मला हुशारी आणील-मग थकव्याचें नांव कशाला? पण, माझी एक प्रार्थना आहे. तुझें नांव काय बरें? एवढयाच करितां विचार करतों कीं, जेव्हां जेव्हां मी परमेश्वराची प्रार्थना करीन तेव्हां तेव्हां अमकीचें बरें कर ह्मणून मी त्याला विनवीत जाईन.

मिरांडा--माझें नांव?-माझें नांव मिरांडा-(ओठ चावून) अरेरे! बाबांची आज्ञा मोडली! नांव सांगूं नको ह्मणून

बाबांनीं मला बजावून सांगितलें होतें, आणि मी तर सांगून चुकलें! आतां?

फर्डिनान्ड--मिरांडे!—वाः, किती गोड नांव! यापुढें मरंद सुद्धां कमी गोड! हे सुंदरी! तुझी जेवढी स्तुति करावी तेवढी थोडीच. जगांत जेवढ्या ह्मणून अमोलिक वस्तु आहेत, त्या सर्वांनीं देखील तुझें मोल होणें नाहीं. काय सांगूं? मी आजवर पुष्कळ स्त्रिया पाहिल्या; त्यांत कित्येक मला मोठ्या सुंदर दिसल्या, व कांहींकींच्या भाषणाचें माधुर्य चाखून माझे उत्सुक कान संतुष्ट झाले. कांहीं कांहीं गुण त्यांच्यांत सर्वोत्कृष्ट होते यांत शंका नाहीं; व त्या त्या गुणांस्तव त्या त्या स्त्रिया मला बऱ्याशा वाटल्या हें ठीकच. पण त्यांतल्या एकींतही मला आतां जीव दिसत नाहीं. छेः! जी पहावी ती खोडकर; कांहींना कांहीं तरी उणेपणा आहेच. एरवीं सर्व गोष्टींनीं संपन्न असूनही, एकेकीच्या ठिकाणीं एखादा असा ढोबळ दोष असावा कीं त्यामुळें सर्वांवर विरजण पडावें! परंतु, मिरांडे, तुला दोष ठेवायाला कोठेंच कींग स्थळ नाहीं. तुझी सर कोणाला येईल? सर्व उत्तमोत्तम वस्तूंतलें सौंदर्य एकवट करूनच तुला ब्रह्मदेवानें घडली असें मला वाटतें.*

---

* अर्थ सादृश्यार्थ, मूळ इंग्रजींशीं कालीदासकवीचा पुढील उद्गार ताडून पहाः—

Ferdinand :— Admired Miranda!
Indeed the top of admiration! worth
What is dearest to the world * * *
* * * * * * * But you, O you,

[पुढील पृष्ठावर चालू]

मिरांडा--स्त्रिया कशा असतात हें मला ठाऊक नाहीं. आरशांत मी आपलें पाहतें तेवढेंच; त्याशिवाय कोणाही स्त्रीचें तोंड आजपर्यंत मी पाहिलें नाहीं आणि पुरुष तरी मी कितीसे पाहिले आहेत?—एक आमचे बाबा आणि आज एक तुह्मी. खरोखर, जगांत पुरुष कसे असतात, याची मला कांहीं एक कल्पना होत नाहीं. आणि तुमच्यावांचून इतर कोणतेंही रूप माझ्या मनानें मला कल्पितां येत नाहीं; मग त्याशीं तुमच्या रूपाची तुलना करण्याची गोष्ट कशाला? बोलायाला लाज वाटते—आणि लाज हेंच माझें सारें धन—परंतु उघडपणें बोलल्यावांचून राहवत नाहीं; बोलतेंच—महाराज, जर मला तुमच्या समागमाचा

[मागील पृष्ठावरून पुढें चालू.]

So perfect and so peerless, are created
Of every creature's best!

सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन, यथाप्रदेशं विनिवेशितेन ।
सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्ना-देकस्थसौंदर्यदिदृक्षयेव ॥

कुमारसंभव.

तसेंच महाभारतांतलें तिलोत्तमेचें वर्णन:—

अवश्य ह्मणोनि विश्वकर्मा । तिहीं लोकींच्या ललामा ।
एकवटोनि दिव्य प्रतिमा । तिलोत्तमा तें निर्मी ॥
तिळतिळ जडोनि रत्नकण । सजीव घडलें प्रमदारत्न ।
ह्मणोन तिलोत्तमा अभिधान । ब्रह्मा ठेवी तियेतें ॥
सुकुमार सुंदर सुलक्षणी । चातुर्यप्रकाशाची खाणी ।
जीतें अवलोकितां नयनीं । चोज आलें अद्भुत ॥

मुक्तेश्वर.

लोकत्रयस्थ तिळतिळ उत्तम लावण्य मेळवुनि यत्नें ।
स्त्रीरत्न रची, जाणों अवयव ते न, खचलींच तीं रत्नें ॥

मोरोपंत.

लाभ होईल, तर मला जगांत इतर कशाचीही परवा नाहीं. पण ही मी कांहींच्या बाहींच काय बडबडत सुटलें? बाबांच्या आज्ञेचें मला आज कसें अगदींच भान राहिलें नाहीं!

फर्डिनान्ड--मिरांडे, मी कोण ह्मणून विचारशील तर ऐक. मी राजपुत्र आहें. आणि शिव शिव!—माझी तशी इच्छा नाहीं.—पण राजपदही मजकडे आलें आहे, अशी माझी अटकळ आहे. आणि हे सुंदरी! जो मी नाकावर माशीही कधीं बसूं देणारा नव्हे, तो मी हीं लाकडें वाहण्याची गुलामगिरी पत्करून कसा राहिलों याचें तुला आश्चर्य वाटेल. पण माझ्या हृदयांत काय आहे तें तुला सांगतों. आणिक काय सांगूं?—सुमुखि, तूं दृष्टीस पडलीस त्याचक्षणीं माझ्या हृदयाला एकाएकीं जाणों पंख फुटले; आणि तें तुजकडे उडून येऊन, तेथेंच अडून राहिलें. काय करूं? त्यानें मला तुझा दास केला आहे. ह्मणूनच हे लाकडें वाहण्याचे काबाडकष्ट सोसण्यास मी सिद्ध झालों; एरवीं कधीं झालों नसतों.

मिरांडा--एकूण मजवर तुमचें प्रेम आहे?

फर्डिनान्ड--हे सूर्यनारायणा! हे धरणी माते! तुह्मी साक्षी आहां—हे माझे शब्द ऐका. मी सत्य सत्य सांगतों; हें माझें भाषण सफळ करा. मी खोटें, पोकळ बोलत नाहीं; बोलत असेन तर माझें अकल्याण होवो. प्रिये मिरांडे! जगांत माझें सारें प्रेम तुजवरच आहे, मी तुलाच थोर मानतों, आणि माझें सर्वस्व तूंच आहेस! अधिक काय सांगूं?

मिरांडा--मला आनंद होत आहे, तरी पण मी रडतें; तेव्हां मी वेडी नव्हेका ?

प्रास्पेरो--वा: ! दोन प्रकारच्या मनोविकारांमध्यें केवढी ही ओढाताण ! ती पाहून खरोखर मोठें कौतुक वाटतें. ह्यांच्या ह्या संबन्धावर, परमेश्वरा ! निरंतर कृपेचें सिंचन कर. एवढेंच तुजपाशीं माझें मागणें आहे.

फर्डिनांड--मग तूं रडतेस कां ?

मिरांडा--मी तुह्माला योग्य नाहीं ह्मणून ! जें प्रेम तुह्माला द्यावेंसें वाटतें तें देतां येत नाहीं ह्मणून; आणि जें प्रेम न मिळालें तर मरण बरें असें वाटतें, तें पुष्कळसें मला घेतां येत नाहीं ह्मणून ! पण जाऊं द्या; हें रिकामकें बोलणें हवें कशाला ? प्रेम ही अशी विलक्षण वस्तु आहे, कीं ती आपली लपवावीशीच वाटते; आणि जों जों लपवावी तों तों तिचें स्तोम मात्र वाढून, अखेरीस ती केवळ अवजड होऊन बसते. यास्तव मन मोकळें करून मी ह्मणतें-कपटी लाजे, चल आपलें गांठोडें गुंडाळ, आणि जा कशी निघून; तुझें येथें काम नाहीं. आणि हे निष्पाप, निर्मळ, पवित्र प्रेमा, या वेळीं मला हात दे. आतां माझा सारा भार तुजवरच आहे. महाराज, माझ्या मनांतून आपली धर्मपत्नी व्हावें असें आहे; आपल्या मनांतून काय आहे ? आपण अंगीकार केलाना ? न केल्यास माझा तर जन्मभर अविवाहित राहण्याचाच संकल्प आहे. आतां हो ह्मणा किंवा नका ह्मणूं; मी तर या चरणाची दासी झालें. यांत ढळायचें नाहीं.

फर्डिनान्ड--बरें तर, तूं माझी धर्मपत्नी,-माझी प्राणवल्लभा-माझ्या जिवाची स्वामिनी; आणि मी तुझा हा दास. (पायां पडूं लागतो)

मिरांडा--काय ?-आपण माझे प्राणनाथ ?

फर्डिनान्ड--तर काय ? कोणी मनुष्य बंधनांतून सुटावा, तसा माझे मनाला या वेळीं मोठा आनंद होत आहे. हा घे माझा हात.

मिरांडा--आणि हा माझा-आणि ह्या बरोबरच माझें हृदय. बरें; पण आतां मला गेलें पाहिजे. आणखी अर्ध्या घटकेनें येईन. घेऊं निरोप ?

फर्डिनान्ड--ठीक आहे.

(फर्डिनान्ड आणि मिरांडा वेगवेगळीं जातात.)

प्रास्पेरो--सर्व गोष्टी ह्यांना नव्याच असल्यामुळें, हीं दोघें भांबावून गेलीं आहेत व यांना मोठा आनंद झालेला दिसत आहे, तसा आह्माला कसला आनंद ? परंतु मला आनंद देणारी आणखी वेगळी गोष्ट कांहीं असेल असेंहि वाटत नाहीं. असो; आह्मी आपले आतां जाऊन वाचीत बसतों. कारण, जेवणाची तयारी होई तोंवर ह्या संबंधें मला पुष्कळ कामें करावयाचीं आहेत.

[जातो.]

प्रवेश २ रा.

स्थळ– बेटावरचें दुसरें एक ठिकाण.

[स्टिफानो व त्रिकालिक येतात, त्यांच्या मागून हातांत नळकांडें घेऊन कालिबन येतो.]

स्टिफानो––छत्, ही गोष्ट काढूं नकोस. अरे, पिंपांत एक थेंब आहे तोंवर तरी पाण्यास शिवायाचें नाहीं; सरल्यावर मग आहेच पाणी. तर हं ठांस, चालूं दे. राक्षसा–अरे ए दासा! पाहतोस काय? चालूं दे, ह्मणतोंना?–एक घोट माझ्या नांवानें.

त्रिकालिक––काय? हा तुझा दास! रे रे! वेडेपणाची कमाल झाली! हा सांगतो तें खरें असलें तर ह्या बेटावर कायतीं पांच माणसें. पैकीं तिघे आपण; आतां त्या दोघांचीं डोकीं आपल्यासारखींच असलीं ह्मणजे आटपलें–आमचे व आमच्या राज्याचे पुरे बारा वाजले! आणखी काय?

स्टिफानो––राक्षसा, तूं काय ह्याचें ऐकतोस? मी सांगतोंना–पी, चापून पी. वा, तुझे डोळेतर काय, गड्या, अगदीं कपाळांत गेले!

त्रिकालिक––ह्मणजे? डोळे कपाळांत नसतात तर कुठेरे असतात? तथापि ते जर ह्याच्या शेंपटीत असते, तर वा! किती नामी हा दिसता ह्मणून सांगूं?

स्टिफानो––वाः! राक्षसानें जीभ खाशी बुडविली दारूंत! आणि दारूनेंहि याची वाचाशक्ती खाशी, बुडवून लयास नेली!–पण आमची स्वारी कोरडी ठंठणीत! समुद्राच्यानें देखील आह्मांला बुडवून आमचा लय करवला नाहीं! काय सांगूं? एक नाहीं, दोन नाहींत–शंभर कोस पाणी

तोंडीत आलों, तेव्हां या किनाऱ्याला पाय लागले ! ठीक आहे—राक्षसा, आतां आमचा दुय्यम सेनापति तूं; अथवा तुला करतों माझा झेंडेवाला.

त्रिकालिक——माझें ऐकशील तर याला झेंडेवाला न करतां, तुझा दुय्यम सेनापतीच कर. कारण हा जरी वानर आहे तरी याच्या शेपडीला झेंडा कुठें आहे ?

स्टिफानो——राक्षसराव ! पण लक्षांत ठेवा, कसाहि प्रसंग आला तरी पळायचें नाहीं बरें.

त्रिकालिक——पळायचें नाहीं तर नाहीं—जागचें हालायचें देखील नाहीं बरें का ! कुत्र्यासारखें लोळत पडायाचें-बोलायचें नाहीं नी चालायाचें नाहीं.

स्टिफानो——जन्मांत नाहीं बोललास तर यावेळीं तरी खरें बोल, आणि सांग—तूं भला राक्षस आहेस कीं दुष्ट ?

कालिबन——ह्मणजे ? हें रे काय तूं विचारतोस? मी तुझे जोडे चाटीन नी राहिन; पण तूं मला सोडूं नको. हा फार वाईट मनुष्य आहे—भागुबाई आहे; मी नाहीं त्याची चाकरी करणार, तुझी आपली करीन.

त्रिकालिक——अहारे खुळ्या राक्षसा, किती खोटें बोलतोस ? वेळ आली तर शिपाई गड्याला देखील दाद देणारा मी नाहीं,—धक्की मारून जाईन निसटून. तोंड काय पहातोस ?—नासका कुसका मासा, कुठला ! आज मी किती दारू प्यालों. एवढी भेकाड भागुबाई पिईल काय ? अरे खोटाऱ्या, बोलून चालून तूं अर्धा मासा आणि अर्धा माणूस, तुलारे कसली खऱ्याखोट्याची चाड ?

कालिबन--पहारे पहारे, हा कसा मला धमकावतो तो. माझ्या देवा, याचे चांगले दांत पाड.

त्रिकालिक—अरे हा बोलला-रे बोलला ! राक्षस असून तुमच्या-आमच्यासारखा हा बोलतो एकण? मोठें आश्चर्य आहे.

कालिबन--पहा पहा, फिरून हा माझी चेष्टा करतो. देवा, याला मरेमरेतों डस-चावून चावून मारून टाक.

स्टिफानो—अरे खबरदार! जीभ संभाळून बोल. फाजील बडबड करशील, तर बंडखोर ठरून फांशीं जावें लागेल. हें पाहिलेंस! समोर झाड तयार आहे फांशी द्यायला. हा बिचारा राक्षस, माझ्या आश्रयाखालीं, माझा प्रजाजन आहे. त्याचा अपमान तो माझा अपमान.—मला नाहीं सहन होणार.

कालिबन--देवा, तूं किती दयाळू ह्मणून ह्मणूं? तुझे उपकार मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. माझ्या विनंतीची आहेका पण आठवण?

स्टिफानो—हो हो, आहेतर-आधीं मजपुढें गुढगे टेक आणि फिरून विनंती कर पाहूं. मी आणि त्रिकालिक दोघेहि उभे राहून ऐकतों.

[एरिल अदृश्य रूपानें प्रवेश करतो.]

कालिबन—तुला सांगितलेंना मी-एका दुष्टाच्या स्वाधीन मी आहें ह्मणून. तो मोठा जादूगार असून, त्यानें हें बेट मजपासून कपटानें बळकावलें आहे.

एरिल—हा गुलाम कसा धडधडीत खोटें बोलत आहे.

कालिबन—(एरिल याचें भाषण त्रिकालिक बोलला असें समजून, त्रिकालिला) कोणरे खोटें बोलतो ? तूंच, माकडा, खोटें बोलतोस. मी नाहीं खोटें बोलत. पहारे देवा, हा खोटें बोलतो. मार, याला मार—चेंदा मेंदा कर.

स्टिफानो—गड्या, त्रिकालिका, त्याला बोलूं दे. तूं कां उगीच त्याला मध्येंच खोळंबवतोस ? असा त्रास देशील तर दांत पाडून हातावर ठेवीन.

त्रिकालिक—वारे वा. मी केव्हां बोललों ?—मीतर अक्षरहि तोंडावाटे काढलें नाहीं, आणि मजवर रागावतोस ?

स्टिफानो—गप्प बैस. [कालिबन यास] हं, चालूं दे.

कालिबन—मघाशीं सांगितलें तेंच,—मंत्रतंत्र करून त्यानें हें सारें बेट बळकावलें; आणखी काय ? हें माझें बेट त्यानें घेतलें. तर तूं माझ्यासाठीं आपला प्रताप गाजवून त्याचा सूड घेशील काय ? तुझ्यांत एवढी शक्ति आहे ह्मणून ह्मणतों. पण हें मनावर घेशील कीं नाहीं, हीच कायती वानवा.

स्टिफानो—हो हो, त्याचा सूड घेईन—खचित घेईन.

कालिबन—घेशीलना ? मग काय ?—तूं या बेटाचा राजा, आणि मी तुझा जन्माचा दास.

स्टिफानो—अरे, पण हें घडेल कसें ? त्या दुष्टाकडे तूं मला नेशील ?—आह्माला तो दाखवशील ?

कालिबन—हो हो, नेईन, नेईन.—खरेंच नेईन. माझ्या देवा, तो निजला असला ह्मणजे मी तुला त्याच्याकडे नेईन. मग तूं त्याला मार.—त्याचें डोकें ठेंच-नखांनीं कुडतुडून कुडतुडून त्याचे तुकडे कर.

एरिल--ही गोष्ट अगदीं असंभाव्य. तुझी काय छाती आहे ?

कालिबन--(एरिलाचें बोलणें त्रिकालिक बोलला असें समजून) तूं कां रे बाळसंतोषा, मध्यें बोलतोस ? देवा, कृपा कर आणि याला दोन ठोसे दे. याच्या हातांतलें हें नळकंडें हिसक वरें अगोदर. मग हा काय पिईल ? मी नाहीं याला गोडे झरे दाखवणार.--पिऊं दे खारें पाणी.

स्टिफानो--त्रिकालिका, आतां विषाची परीक्षा पाहूं नको. एक शब्द अधिक बोल आणि राक्षसाला खोळंबव; ह्मणजे मग पहा, मला मायाममता चटसारी गुंडाळून ठेवून तुला लंबे करावा लागेल.

त्रिकालिक--कां रे बाबा, मीं काय केलें ? मीं काय तुझें घोडें मारलें ? तरी तूं आपला मजवर हात उगारतोस ? बरें तर, मी आपला येथून दोन पावलें दूर जातों कसा ?

स्टिफानो--तूं याला, खोटें बोलतोस ह्मणून, नाहीं ह्मटलेंस ?

एरिल--हें बोलणें तर धडधडीत खोटें.

स्टिफानो--(एरिल याचे शब्द त्रिकालिक बोललासें जाणून) माझें बोलणें धडधडीत खोटें, नव्हेका ? हें घे खरें-घे त्याचें बक्षिस. [त्याला मारतो.] माराचीच हौस असली तर हुं, बोल, फिरून बोल--मी खोटें बोलतों ह्मणून, ह्मणजे आणखी मिळेल.

त्रिकालिक--मी केव्हां बोललों असें ? आग लागोरे तुझ्या अकलेला, आणि तुझ्या तोंडाला. ह्या तुझ्या नळकंड्याच्या फुटून चिंधड्या कां नाहीं झाल्या ? हें सारें त्या दारूचें

फळ बरें; मी समजलों. मरोरे तुझा तो राक्षस. आणि मला मारतांना तुझी बोटें कां नाहीं गळून पडलीं?

कालिबन--हां, हां हां! खामें झालें-मनाजोगें झालें.

स्टिफानो--चालूं दे रे तुझी हकीगत. हं, असा समोर उभा रहा.

कालिबन--मार त्याला चांगून मार. दमखा, मग मीही तुला मारतों.

स्टिफानो--हं, दूर उभा रहा नीट आदबीनें-लगट करूं नको. चालूं दे आतां.

कालिबन--सांगितलेंना?-दुपारीं निजायाची त्याची चाल आहे, तेव्हां तूं चल. आणि त्याचें डोचकें फोड. पण त्याचीं तीं पुस्तकें आधीं हिसकून घे, बरेंका! नाहींतर त्याच्या कपाळांत एक लांकडाचें ओंडकुर घाल-नाहींतर सुऱ्यानें त्याची मानगोटी तोड. पण ध्यानांत धर-त्याचीं तीं पुस्तकें अगोदर हिसकावून घे. तीं त्याच्यापाशीं नसलीं म्हणजे तो आणि मीं दोघेहि सारखेच गाढव. मग त्याच्या हाकेला एक देखील भूत उभें राहणार नाहीं. माझ्या सारखींच सारीं भुतें त्याला त्रासलीं आहेत,-त्याचा अगदीं मनापासून तीं तिटकारा करीत आहेत पण त्याच्या त्या पुस्तकांची मात्र पार जाळून रक्षा कर बरें. तो म्हणतो हीं माझीं हत्यारें आहेत. कुठेंहि गेला तरी हीं त्याच्या मागें तेथें जायाचींच. क्षणभर ही तो ह्यांना विसंबत नाहीं. पण ऐकलेंस देवा, सर्वांत मोठी विचाराची गोष्ट म्हटली म्हणजे त्याची ती सुंदर मुलगी. तो तिला जगन्मोहिनी म्हणून हाका मारीत असतो. तीच ती. स्त्रिया कशा असतात, हें

मला माहीत नाहीं. माझी आई सिकोराक्ष एक व दुसरी ही; यांशिवाय कोणाहि स्त्रीला मीं पाहिलें नाहीं. पण ही किती चांगली! सिकोराक्ष हिच्या पासंगालाहि नाहीं येणार. कोठें थोरला डोंगर, आणि कोठें मातीचें लहानसें ढेंकुळ!

स्टिफानो--काय, त्याची पोरगी एवढी छानदार आहे ह्मणतोस?

कालिबन--तर काय? देवा, तुला बायको पण कशी उत्तम शोभेल! काय सांगूं? तिच्यापासून कशीं सुरेखशीं आणि पुष्कळशीं पोरें मिळतील ह्मणतोस.

स्टिफानो--तर राक्षसा, या मनुष्याला खचीत ठार मारीन. मग आह्मी येथले राजे, आणि त्याची ती मुलगी आमची राणी. वाहवा, खासा जोडा! मग तूं आणि त्रिकालिक--दोघे आमचे सरदार. कसें काय, त्रिकालिक? मी ह्मणतों तें खरेंना?

त्रिकालिक--वाः! सर्वोत्तम!

स्टिफानो--तर मग दे तुझा हात. गड्या, तुला मारलें. याचें मला फार वाईट वाटतें. पण तुला एक सांगून ठेवतों, जिभेला कधीं अशी अवाच्या सवा फिरून भकूं देऊं नकोस बरें.

कालिबन--देवा, आणखी एका घटकेनें बहुत करून तो निजेल. तेव्हां मग त्याला असा चेंचशील कीं ज्याचें नांव तें. रे, पण आयते वेळीं फिरणार नाहींसना?

स्टिफानो--छत्, माझ्या गळयाची शपथ--कधीं फिरणार नाहीं.

एरिल--आपण जाऊन ही हकीगत धन्याला सांगूं या.

कालिबन—मला मोठा आनंद झाला आहे.–मी आनंदांत वाहून चाललों आहे. आपण थोडी मजा करूं या. देवा, तुझें तें गाणें ह्मणशील ?—मघाशीं ह्मटलेंस तें ?

स्टिफानो–ठीक आहे; तुझी मर्जी आहे तर तसें होऊं दे. ये, त्रिकालिका, तूंहि ये. सर्वजण मिळून गाऊं. (गाऊं लागतात.)

(गाणें.)

गेला गद्यानो जावोजी। पर या या तुह्मी भावोजी।
वाहवाजी, भावोजी, जी जी जी. ॥ गेला० ॥

कालिबन--असेंरे काय ? हें नव्हे तें गाणें.

[एरिल तेंच गाणें तालसुरावर गातो.]

स्टिफानो--तर मग कोणतें ?

त्रिकालिक--अहो, हें आमचेंच गाणें कोणी वायुरूप भुत पिशाच्य तालसुरावर गात आहेसें वाटतें.

स्टिफानो--अरे, तूं कोण आहेस ? मनुष्य असशील तर पुढें ये. आणि भूत असशील तर गप्प बैस. आणि आह्मीं गातों तें ऐक.

त्रिकालिक--आई आईग-चुकलों, चुकलों. महाराज, क्षमा करा.

स्टिफानो--अरे, मेला तो सर्व दुःखांतून सुटला. काय करशील ?—मारशील ? मुळींच भीत नाहीं. ये असा—तोंड असेल तर ये पुढें. पण नाहीं रे बुवा !

कालिबन--तूं काय भ्यालास ?

स्टिफानो--नाहीं रे; भ्यालों नाहीं.

कालिबन--यांत काय भ्यायचें ? या बेटावर असे सूर आणि अशा ओरडा ओरडी आणि असे गोंगाट पुष्कळ ऐकूं

येतात. पण त्यापासून कधीं कोणाला अपाय व्हावयाचा नाहीं. असे हजार सूर माझ्या कानांत तुण् तुण् तुण् करूं लागल्याचें कैक वेळां मला आठवतें. आणि केव्हां केव्हां तर ते इतके मधुर लागतात, कीं झोप पुरी होऊन उठलों असलों तरी सुद्धां फिरून झोंप घेत पडावेंसें वाटतें. मग काय काय स्वप्नें पडूं लागतात - आकाशांत ढग काय दिसूं लागतात. आणि त्यांचे दोन भाग होऊन आंतून छानदार वैभव काय दृष्टीस पडतें! तेव्हां असें वाटतें कीं हें सारें आतां आपणाला मिळणार. पण पुढें काय? लगेच जागा होऊन पहावें तों कांहीं नाहीं! मग फिरून तसें स्वप्न पडेल काय ह्मणून वाट पहात सांगावें.

स्टिफानो--एकंदरीनें हें आमचें राज्य मोठ्या मजेंत थाटणार. अहो, एथें गाणें आपलें फुकटांत ऐकावें; त्याला कांहीं खर्च नको किंवा खटपट नको.

कालिबन--हो हो; तुझें राज्य थाटेल, पण प्रास्पेरोला मारशील तेव्हां.

स्टिफानो--होईल होईल; तेंही आस्ते आस्ते होईल. दमखा; ध्यानांत आहे.

त्रिकालिक--अरे पण हें गाणें निघून चाललें. चला, आपण त्याचे मागोमाग ऐकत जाऊं यतां? बाकीचें काम मागाहून करतां येईल. काय चिंता आहे?

स्टिफानो--बरेंतर, आपण याच सुरामागून जाऊं या. राक्षसा, हो पुढें. हा गाणारा माझ्या दृष्टीस पडेल तर बरें होईल. पण, हा गेला. चला आपणही जाऊं. (जातो.)

त्रिकालिक—फिरून येईल कां रे हा ? चला, जिकडे स्टिफानो तिकडे आह्मी. आलों रे गड्या आलों.

[सर्व जातात.]

प्रवेश ३ रा.

स्थळ—बेटावर तिसरें एक ठिकाण.

[अलांझो, सिबास्टिन, अन्टोनियो, गान्झेलो, अड्रीन, फ्रान्सिस्को, आणि इतर मंडळी, प्रवेश करतात.]

गान्झेलो—छे बुवा ! आपल्यालातर आतां एक पाऊलभर देखील चालण्याची शक्ति नाहीं. माझी हीं जर्जर हाडें दुखूं लागलीं. हें चक्कर मारलें यांतच आपण किती तरी वाकणें टाकलीं. महाराज, क्षमा करा. मला अंमळ यथें टेकलेंच पाहिजे.

अलांझो—अहो, यांत तुमचा फारसा दोष नाहीं. माझी काय अवस्था झाली आहे, पहा. थकून गेल्यामुळें माझ्या अवयवांना देखील कोण जडपणा आला आहे. बसा तर; येथेंच अंमळ विश्रांति घेऊं, आणि येथेंच आमच्या आशेलाही विश्रांति देऊं. कारण एखाद्या होयबा-प्रमाणें आशेचें हें लोंढणें पाठीशीं हवें तरी कशाला ? ज्याच्यासाठीं एवढी धांवाधांव आपण करीत आहों. तो तर बिचारा बुडाला पाण्यांत, आणि आह्मी शोधितों त्याला जमिनीवर ! तो कसा बरें हातीं लागावा ? हा आपला वेडेपणा पाहून, हा समुद्रच आपणाला हंसत आहे ! चला, द्या सोडून त्याची आशा !

अन्टोनियो—(स्वतःशीं) ह्याची निराशा झाली हें छान झालें—मला फार बरें वाटतें. (एकीकडे सिबास्टिन याला) गड्या पहिला डाव हुकला ह्मणून निश्चय ढळूं देऊं नको बरें. आपला बेत तडीस नेल्यावांचून सोडावयाचा नाहीं.

सिबास्टिन—(एकीकडे अन्टोनियो याला) छे छे ! पुन्हा संधी सांपडली, कीं करूं तें काम पक्केंच करून टाकूं.

अन्टोनियो—(एकीकडे सिबास्टिन याला) संधी पहात लांबणीवर नाहीं टाकायाचें; ह्याच रात्रीं उरकून टाकूं. कारण आज सारा दिवस हे चालून चालून थकले आहेत. तेव्हां एरव्हींप्रमाणें आज सावध राहणार नाहींत; व त्यांना राहतांहि यावयाचें नाहीं.

सिबास्टिन—(अन्टोनियो यास) होय गड्या होय, ठीक सुचविलेंस. आजच्याच रात्रीं; खरेंच, लांबणीवर कशाला ? पण पुरे आतां, अधिक नको.

(तालसुरावरचें गाणें चालतें.)

अलान्झो—अहो ऐका; हे आलाप किती मधुर आहेत !

गांझेलो—पराकाष्ठेचे मधुर. असें गाणें आपण तर बुवा पृथ्वीवर कधीं नाहीं ऐकिलें.

अलांझो—परमेश्वरा, आमचें रक्षण करणारा आतां तूंच आहेस. पण हा काय प्रकार आहे !

[अदृश्य रूपानें वर आकाशांत प्रास्पेरो दिसूं लागतो, विलक्षण रूपाचीं भूतें हातांत वाढलेलीं पात्रें घेऊन येतात, आणि प्रणतिपूर्वक नाच करतात, आणि राजास व त्याच्या बरोबरच्या मंडळीस, ' या, भोजन करा ' असें ह्मणून निघून जातात.]

सिबास्टीन---हा तर जिवंत चित्रांचा खेळ ह्मणावा; आणखी काय ? कोठेंसे एका शिंगाचेहि प्राणी आहेत, त्यांना गेंडे ह्मणतात, ह्मणून ऐकलें होतें; पण आतां मात्र मी ह्मणेन कीं जगांत गेंडे आहेत खरे. तसेंच, अरबस्थानांत एक झाड आहे. त्यावर वेताळाचा दरबार भरतो, यावर पूर्वीं माझा भरंसा नव्हता; पण आतां आहे. एवढें कशाला ? याच घटकेला एक वेताळ तिकडे राज्य करित आहे ह्मणून जरी कोणी मला सांगितलें, तरी तें सुद्धां मानण्यास मी आतां तयार आहें.

अंटोनियो---मला तर हे दोन्ही प्रकार खरेच वाटतात. याविषयीं जर कोणाला खात्री करून घ्यायची असेल तर मी करून देतों. अहो, एवढया प्रवाशांनीं जें प्रत्यक्ष पाहिलें तें कांहीं खोटें नव्हे. मूर्खांनीं मात्र घरांत बसून खुशाल त्यांना नांवें ठेवावीं. पण खरें तें खरें.

गांझेलो---अहो, उद्यां आपण नेपल्स येथें गेलों आणि लोकांना ह्या गोष्टी सांगू लागलों तर त्या कोणी खऱ्या तरी मानतीलका ? मीं ह्मटलें--असे असे प्राणी आह्मी अमुक बेटावर पाहिले--कारण ह्या बेटावर याच प्राण्यांची सर्वत्र वस्ती दिसते. ह्यांचे आकार पाहावे तर राक्षसांचे; पण वागणूक मात्र अशी ममताळूपणाची कीं आपणा माणसांत देखील तशी फारच थोड्यांची आढळेल.-ही गोष्ट कोणाला खरी वाटेल ?

प्रास्पेरो--हा गृहस्थ किती सज्जन आहे! अरे, तुझें बोलणें अगदीं खरें आहे. कारण तुह्मांमध्येंच सध्यां असे कितीएक जण आहेत कीं त्यांची करणी सैतानालाहि मागें सारिल.

अलान्झो--छे, बुवा! काय ह्यांचीं स्वरूपें रेखल्यासारखीं! काय ह्यांचे हावभाव, आणि काय मधुर आवाज! जों जों विचार करावा तों तों अधिकाधिक आश्चर्य वाटूं लागतें! जिवाला रिकामका शीण मात्र होतो, पण खरा प्रकार कांहीं लक्षांत येत नाहीं. काय असेल तें असो. पहा, या आवाजांत अमुक भाषा ह्मणावी तर कांहीं नाहीं. पण हावभावावरून अर्थबोध स्पष्ट होत आहे! वाः, काय हो मुक्यांचा बाजार हा!

प्रास्पेरो--(आपणाशीं) थांबा. इतक्यानें काय झालें आहे? चमत्कार तो पुढेंच आहे.

[भुतें जातात].

फ्रान्सिस्को--अरे वाः! हीं गेलीं. काय विलक्षण प्रकार ह्मणावा!

सिबास्टिन--कांहीं चिंता नाहीं, गेलीं तर पिडा गेली. पण वाढलेलीं ताटें ठेवून गेलीं हें एक बरें झालें. आमची भूक फारच प्रखर झाली आहे. आह्मी आपले चापून यावर ताव मारणार; आणि महाराज, आपणहि दोन घांस ध्या

अलान्झो--छेः, मला कांहीं नको, बाबा.

गांझेलो--महाराज, यांत शंका घेण्यासारखें कांहीं नाहीं. अहो, पृथ्वीच्या पाठीवर नाना तऱ्हेचीं माणसें आहेत

लहानपणीं आपणाला कोणी सांगितलें असतें कीं बैलाच्या तोंडाचे व मानेखालीं पोळीसारखी लोंबती कातडी असलेले मनुष्य कोठें डोंगरांत आहेत; अथवा उरांत ज्यांचीं शिरें अशींही माणसें कांहीं ठिकाणीं आहेत; तर हें आपणाला खरें वाटलें असतेंका? खचीत, नसतें. पण आतां ऐकावें तों शेंकडों प्रवासी या गोष्टींचा खरेपणा सांगतात; व पैजा मारून, चापून पैसे मिळवितात. तर महाराज, या, नाहीं नका ह्मणूं.

अलान्झो--बोलावतांच तर येतों. खातों थोडेंसें, आणि हा येथें असा उभा रहातों; मेलों तरी हालणार नाहीं. होऊं द्या काय होणार तें. ज्याला जपायचें तो तर हातचा गेला, आतां मी कशासाठीं भिऊं? (सिबास्टिन यास) अरे भाऊ, (अंटोनियो यास) अहो रावसाहेब, या, तुह्मीही आमच्या बरोबरच दोन घास खा.

[इतक्यांत विजांसहित कडकडाट होतो; आणि गिधाडाच्या रूपानें एरिल येऊन, व जमिनीवर पंख फडफड आदळून, मोठ्या शितापीनें तें अन्न खाऊन टाकतो.]

एरिल--रे रे अधाश्यानों! हें अन्न तुह्माला कसें लाधेल? अरे, तुह्मी तिघेहि महान् पातकी आहां. भोगा कृतकर्माचीं फळें. दैवानें भलें तुह्माला शासन केलें. भूलोक ही दैवाची अपराध्यांना शासन करण्याची जागा असून, त्यांतली प्रत्येक वस्तु हें त्याचें शिक्षा करण्याचें हत्यार होय. हाच समुद्र पहाना, ह्याचें हें अपरंपार पोट कशानें भरणार?—अशा ह्या समुद्रांत बळवान् दैवानें, तुह्माला

सर्वांना रगडून गटकळ्या खायाला लावलें, व अखेरीस ह्या निर्जन बेटावर आणून टाकलें. कारण माणसांत राहण्याची तुमची योग्यता नाहीं. मी तर तुह्माला शुद्ध वेडे पिसे करून सोडलें आहे. हे पहा. (सर्वजण आपापल्या तलवारी उसपतात.) वाः! काय यांचें शौर्य ! अशीं माणसें, आपल्या हातें गळफास लावून घेतात, किंवा खोल पाण्यांत जाऊन जीव देतात. यांत काय नवल ? अरे मूर्खानों! अरे शेंदाड शिपायानों ! अरे, आह्मी दैवाचे दूत आहोंत. तुमच्यानें आमचें काय होणार ? तुमच्या हातांतील शस्त्रें था घोंघावणाऱ्या वाऱ्याला एक वेळ जखमा करोत, अथवा तीं घाय करून पाण्याला कदाचित् चीरा पाडोत; पण आमच्या पंखाचा एक परहि त्यांच्यानें तुटणार नाहीं. आमच्या वाटेस कोण जाणार ? आणि गेला तर काय अवस्था होईल, आहे ठाऊक? ह्याच तुमच्या तलवारी कशा अवजड झाल्या आहेत पहा. त्या तुमच्या दुर्बळ हातांना पेलण्याचें तरी सामर्थ्य उरलें आहे काय? पण थांबा, अगोदर तुह्माला तुमच्या कृतकर्माची आठवण देऊं द्या. खरें ह्मटलें, तर माझा मुख्य हेतु हाच आहे. —अरे दुष्टानों ! त्या बिचाऱ्या प्रास्पेरोला कोणी हुसकावून लावलें ? त्याला आणि त्याच्या त्या निष्पाप अनाथ मुलीला समुद्रांत कोणी लोटलें ?—सांगा पाहूं ? हें तुह्मा तिघांचें कृत्य नव्हे काय ? याचेंच प्रायश्चित्त आज तुह्माला मिळत आहे. तुमच्या कृत्याचा आकाशस्थ देवतांना विसर पडला असें तुह्माला वाटलें असेल; नाहीं

बरें ? पण नाहीं, तसें मुळींच नाहीं. विसर कसा पडेल ? त्यांनीं आतांपर्यंत तुमचे घडे भरण्याची वाट पाहिली इतकेंच. पण सध्यां त्यांनीं समुद्राला आणि वाऱ्याला, एवढेंच नव्हे तर समस्त सृष्टीला, खवळून देऊन, आकाशपाताळ एक करून टाकिलें आहे, आणि तुह्माला कोठेंहि थारा ठेवला नाहीं. राजा, आणखी एक. त्यांनींच तुझे पुत्राला तुजपुढून उचलून नेलें आहे, आणि त्याच आतां माझ्या मुखानें तुला हें सारें विदित करीत आहेत. राजा ! वाटेल तिकडे जा; कोठेंही गेलास तरी तुझ्या मागचीं दुर्धर दुःखें सुटत नाहींत; तीं सदोदित उभीं आहेत ह्मणून समज. हाय हाय ! किती दुःसह त्यांच्या वेदना ! अशा दुःखापेक्षां मरण सुद्धां बरें, आणि अशींच दुःखें ह्या शून्य बेटावर तुह्मा सर्वांच्या कपाळीं लिहिलीं असून, तुह्मास येथें तीं भोगावीं लागणार आहेत. त्यांतून तुह्मांस सुटणें असेल तर कृतकर्माचा पश्चात्ताप करून क्षमा मागा; आणि इतःपर सन्मार्गानें वागूं, ह्मणून कबूल करा. हा एकच मार्ग आहे; एरवीं आशा व्यर्थ आहे.

[कडकडाट होऊन एरील अंतर्धान पावतो; नंतर मंजुळ गायन सुरू होतें, इतक्यांत भुतावळ प्रगट होऊन नाचूं लागते, आणि जेवणाचीं ताटें व इतर सामुग्री घेऊन गुप्त होते.]

प्रास्पेरो--गड्या एरिला, गिधाडाचें रूप घेऊन, केलीस ती बतावणी फारच नामी केलीस, यात शंका नाहीं. फार काय सांगूं ? खायाचा तडाका लावलास, त्यांत सुद्धां एक प्रकारची खुबी. एकंदरीनें, काम उत्तम

केलेंस—सांगितल्यापेक्षां कांकणभर अधिकच, पण कमी नाहीं. बाकीच्या यक्ष मंडळीनेंहि आपापल्या परी जपून आणि हुषारीनें कामें केलीं. हें पाहून मला मोठा संतोष झाला आहे. माझ्या जाज्वल्य मंत्रांचा प्रभावहि सांप्रत चांगलाच गाजत असून, हे माझे वैरी हताश होत्साते येथें वेडेपिसे होऊन पडले आहेत. यावेळीं हे माझ्या जाळ्यांत पूर्णपणें सांपडले आहेत. तर, सध्यां यांस येथें ह्याच स्थितींत सोडून, आपण फर्डिनान्ड राजपुत्राची गांठ घेऊं या. बहुधा तो माझ्या लाडकीशीं गोड गोष्टी बोलत बसला असेल.

[आकाशमार्गें प्रास्पेरो निघून जातो.]

गान्झेलो—महाराज, आपण असे वर डोळे लावून, उदास मुद्रेनें, दोन्ही हात जोडून कां बरें उभे राहिलां आहां? आणि कां बरें एवढे सद्गदित झालां आहां?

अलांझो—हर हर! मी किती दुष्ट, आणि मीं केलेलें कृत्यही किती दुष्टपणाचें! अहो, जेव्हां समुद्राच्या लाटा उसळूं लागल्या तेव्हां त्यांना वाचा फुटून त्या मला हीच गोष्ट सांगूं लागल्या! वाऱ्यानेंहि माझ्या कानांत गुणगुणून हेंच ह्मटलें, आणि मेघगर्जना होऊन तिचा जो गंभीर व भयानक शब्द झाला, त्यांतहि 'प्रास्पेरो प्रास्पेरो' हेच शब्द स्पष्टपणें मला ऐकूं आले! अहो! त्याच वेळीं घरघर सुरांत माझ्या सर्व पापाचाहि उच्चार झालेला एकंदरीनें मी स्पष्ट ऐकला! माझ्या कर्मावरून माझ्या पुत्राला जळसमाध

मिळाली, यांत संशय नाहीं. यास्तव, आपणहि आतां, ठाव लागणार नाहीं अशा खोल पाण्यांत उडी घेऊन, लौकरच त्याच्या भेटीसाठीं कोठें चिखलांत पडावें! अशा घोर कर्माला दुसरें तिसरें प्रायश्चित्त नाहीं!

[जातो.]

सिबास्टिन--येऊं द्या. एकेकट्या भुतानें मात्र पुढें यावें-मग त्यांचा तांडाचा तांडा आला तरी मी दाद देणार नाहीं. हा आलों, मी तुमचा समाचार घेण्याला.

अन्टोनियो--भिऊं नको; तुझ्या सोबतीला हा मीही आलों.

[सिबास्टीन आणि अन्टोनियो जातात.]

गान्झेलो--हे तिघेतर अगदीं जिवावर उदार झालेसे दिसतात. बहुत दिवसांनीं उपटणारें विष जसें वेळ आली ह्मणजे प्रभाव दाखवूं लागतें, तसें यांचें पाप आतां यांच्या काळजाला झोंबूं लागलें. नजाणों ह्यांची बेफाम अवस्था ह्यांस कांहीं भलतेंच करावयास लावील. तर राव, तुमच्या पायांत जोर आहे ह्मणून तुह्माला ह्मणतों, तुह्मीतरी त्वरा करून ह्यांच्या पाठीवर जा, आणि त्यांना गांठून शांत करा.

अड्रीन--ठीक आहे. मी होतों पुढें, आणि तुह्मीही मागो-माग याच.

[सर्व जातात.]

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ—प्रास्पेरोच्या गुहेच्या पुढील जागा.

[प्रास्पेरो, फर्डिनान्ड, आणि मिरांडा येतात.]

प्रास्पेरो—हें पहा, राजकुमारा! तुला सांगितलेलें काम अंमळ अवघडच होतें खरें. तरी चिंता नाहीं, त्याचा वचपा मी आतां काढून टाकतों. ही मिरांडा ह्मणजे माझे पंचप्राणच; आणि मी जो जगणार तो तरी कोणासाठीं?—ती ही माझी लाडकी मी तुझ्या पदरांत घालतों. हिचा अंगीकार कर. हा घे, हिचा हात मी तुझ्या हातीं देतों. मी तुला दुःख दिलें तें केवळ तुझी परीक्षा पाहण्यासाठीं—तुझें प्रेम कितपत स्थिर आहे हें समजण्यासाठीं. त्याविषयीं आतां संशय उरला नाहीं. तेव्हां, हा भगवान श्रीसविता साक्ष आहे! ह्याच्या समक्ष ही बहुमोल देणगी मी तुला त्रिवार दिली.—कां बरें? हंसलाससा? तुला हें खोटें वाटतें, होय? मी हिचा बाप, ह्मणून हिला नांवाजतों असेंच केवळ समजूं नकोस. ही खरोखरीच अप्रतिम आहे. हिच्या चांगुलपणाचें वर्णन किती केलें तरी पुरेसें होणार नाहीं. कारण, हिचे गुण त्या वर्णनास खचित मागें सारतील. आणि ही गोष्ट तुझ्याही अनुभवाला लौकरच येईल, हें मी सांगून ठेवतों.

फर्डिनान्ड—हें काय सांगायाला पाहिजे? माझी तर त्याविषयीं खात्रीच आहे.

प्रास्पेरो—तर मग, मी होऊन ही तुला दिली. आणि तूंही आपल्या गुणांनीं हिला आपलीशी केली आहेसच; त्या पक्षीं हिचा अंगीकार केला असें आतां स्पष्टपणें ह्मण ह्मणजे झालें. (फर्डिनांड मान हलवितो) आतां माझें असें ह्मणणें आहे कीं, ही जरी मी तुला दिली तरी इतक्यांतच तुला हिच्या कौमार्याचा भंग करतां कामा नये. नेपल्स येथें गेल्यावर यथाविधि लग्न लागेल आणि तन्निमित्त थाटाचा समारंभ होईल, मग ही तुझीच आहे; तोंवर तुला धीर धरला पाहिजे. ही माझी तुला आज्ञाच आहे. ही मोडूं नकोस. मोडलीस तर त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं. खचित सांगतों, परमेश्वर तुझें कधीं कल्याण करणार नाहीं; आणि आपल्या कृपेचें जल सिंचन करून तुमचा असला हा संबंध वृद्धिंगत होऊं देणार नाहीं. पक्कें लक्षांत ठेव; अशा संबंधाचा शेवट द्वेष, तिरस्कार आणि कलह यांतच अवश्य होईल, आणि अशा संबंधाला जीं फळें येतील त्यांचा ओंगळपणा पाहून तुह्मीच मग नाकें मुरडाल. ह्मणून सांगतों– संभाळ!

फर्डिनान्ड—माझेंही ह्मणणें तेंच. सुखाचे दिवस यावे, चांगली संतति प्राप्त व्हावी, आणि जसें आतां आहे अशा अचल प्रेमानें आह्मी दीर्घकाल नांदावें, हींच माझीही इच्छा असल्यामुळें, आपली आज्ञा मला शिरसा मान्य आहे. फार काय सांगूं? कितीही काळोख असला, केवढाही एकांत असला, आणि कुबुद्धीनें मला कितीही दुष्ट विचार सुचविले तरी मी आपल्या कामवासनेचा जय होऊं देणार नाहीं. कारण तसें झाल्यावर काय अब्रू राहिली? आणि त्यांत

पुढील समारंभाची तरी काय गोडी राहिली? अहो! असा दिवस ह्मणजे केवढ्या उत्कंठेचा! अशा दिवशीं कोणाही तरुणाला असेंच वाटणार कीं, आज काय घोड्यांचे पाय मोडले ह्मणून सूर्य अझून मावळत नाहीं कीं काय? * अथवा रात्रीलाच पातळांत कोणी अडवून शृंखळाबद्ध करून टाकली ह्मणून ती लौकर वर येत नाहीं कीं काय?--इतक्या उत्कंठेचा जो दिवस, त्या

* विचारसादृश्यार्थ, मूळ इंग्रजीशीं महाराष्ट्र कविवर मोरोपंत याचा पुढील उद्गार ताडून पहा.

Ferdinand:—..............................To take away
The edge of that day's celebration
When I shall think or Phœbus' steeds are foundered,
Or Night kept chained below.

तें वाटे त्या हाला—पानाऽऽयतिपातकायना सत्य।
मग मनिं म्हणे पित्याचा पाहतसे हात काय नासत्य॥

विराटपर्व.

भीमाच्या अनुमतानें नृत्यशाळेंत कीचकवधाचा संकेत करविल्यावर सैरंध्रीचें रूप घेतलेल्या द्रौपदीनें, आपण वश झालोंसें दाखवून रात्रीं नृत्यशाळेंत भेटण्याविषयीं सुचविलें असतां, उत्कंठेनें कीचकाची काय अवस्था केली, ती वरील आर्येंत **पंतांनीं** वर्णिली आहे. पंत ह्मणतात;—त्या मद्यपी पातकी कीचकाला तें द्रौपदीचें भाषण खरें वाटलें, व दिवस मावळून रात्र केव्हां येते याची वाट पहात तो बसला. पण दिवस जातां जाईना, तेव्हां तो मनाशीं तर्क करतो कीं, देवांचे वैद्य नासत्य म्ह० अश्विनीकुमार हे आज सूर्याचा हात तर पहात बसले नाहींतना? अर्थात् सूर्य दुखणेकरी असून त्याला चालवत नाहीं ह्मणून तो आज लौकर मावळत नाहीं कीं काय?—पंतांच्या व या आंग्ल कविश्रेष्ठाच्या कल्पनाविशालत्वाची कांहीं कमाल आहे!

दिवशींच्या सुखसोहळ्यावर पाणी सोडण्याला कोण तयार होईल? छत्! माझ्या हातून तर तसें होणार नाहीं!

प्रास्पेरो—वाः, फार चांगलें! इतःपर ही तुझीच झाली, समजलास? आतां, मर्जी असल्यास, तुह्मी पलीकडे जाऊन उभयतां खुशाल गोष्टी बोलत बसा. एरिल! अरे एरील! अंमळ येऊन जा.

[एरिल प्रवेश करतो.]

एरिल—जी महाराज, काय आज्ञा?

प्रास्पेरो—तूं आणि तुझे सोबती या सर्वांनीं मघांशीं सांगितलेली कामगिरी फारच उत्कृष्ट रीतीनें बजावली. पण आतां अशींच आणखी एक खुबीदार कामगिरी तुह्माला सांगायाची आहे. तर जा कसा अगोदर; तुझी सारी मंडळी या ठिकाणीं घेऊन ये. जा जा! मनांत कांहीं दिक्कत आणूं नकोस. अरे, मी असाच मंत्र टाकला आहे कीं, सर्वजण तुझा हुकूम मानतील, कोणी नाहीं ह्मणणार नाहींत. आणखी समजलास? त्यांना चांगला उत्साह आण. ह्मणजे रंगांत येऊन सर्वजण आपआपलीं कामें चांगलीं करतील. जा तर, त्यांना आधीं घेऊन ये कसा. माझ्या विद्येचें थोडेसें कौतुक ह्या नव्या जोडप्यास दाखवावें असें माझ्या मनांतून आहे. हो, बोललों तें मला खरें केलें पाहिजे. कारण, तीं पहा, कशीं उत्कंठेनें वाट पहात बसलीं आहेत.

एरिल—काय? माझ्या सोबत्यांना आतांच घेऊन येऊं ह्मणतां?

प्रास्पेरो—होय आतांच; डोळ्यांचें पातें लवलें न लवलें, तोंच त्यांना इकडे येऊं दे.

एरिल--बरें आहे. त्यांना किती उशीर? जा आणि ये, असें ह्मटलें नाहीं तोंच माझे सोबती येथें हजर! अहो! 'ठीक ठीक' एवढें उच्चारायाला तरी दोनदां श्वास आपण घ्याल, पण त्याच्या आधींच आमची मंडळी आपणापुढें उभी. मग तर झालेंना? ही पहा, पुरा पाय न टेकतां, केवळ चवड्यावर चालत आणि आनंदानें नाना प्रकारच्या चेष्टा करीत, इतक्यांतच आली. आतां तर, महाराज, आपण मजवर खुष व्हालना?

प्रास्पेरो--वाः! आतां काय बोलायाचें आहे?--जा बरें, आणि हाक मारीन तेव्हां चटकन ये.

एरिल--ठीक आहे, महाराज!

[निघून जातो.]

प्रास्पेरो--[फर्डिनान्ड यास] कां राजकुमारा, वचनाची आठवण आहेना? त्याला ढळूं नको बरें! आधीं कामविकारास चांगली घट्ट वेसण घाल--ढिली सोडूं नको. कारण कामाग्नि एकदां भडकला ह्मणजे त्यापुढें निश्चयपूर्वक वाहिलेल्या आणाशपथा सुद्धां जळून खाक होतात. ह्मणून ह्मणतों, मनाचें नीट संयमन कर. नाहीं तर आयते वेळीं वचन लटपटेल!

फर्डिनान्ड--छत्. असें कधीं होणार नाहीं; माझी खात्रीच आहे. माझ्या शरीरांत कामाग्नीनें कितीही बळानें पेट घेतला तरी माझी कौमार्यावस्थेंतली चंद्रकरस्पर्धी बर्फासारखी शुद्ध, शीतल, सात्विक वृत्ति त्याला तत्काळ शांत करील.

प्रास्पेरो--मग ठीक आहे. (एरिलास उद्देशून) आतां, एरिला, तूं पुढें ये पाहूं. आणि येशील तो पुष्कळशीं भूतें घेऊन ये.

चार जास्ती आलीं तरी चिंता नाहीं, पण कमी आहेत असा मात्र बोभाटा होतां कामा नये. आणि समजलास ?– सर्वांनीं यावें तें सर्वोत्कृष्ट पोषाक करून, थाटानें यावें, आणि आह्मा सर्वांनाही दिसावें. यावेळीं माझी अशीच इच्छा आहे. (फर्डिनान्ड व मिरांडा यांस) आतां गप्प बसा बरें, अगदीं बोलूं नका. दिसेल तें तें डोळ्यांनीं नुसतें पहा. वाः! काय नामी गाण्याची तान आली !

[मंजुळ गायनासहित नाच सुरू होतो.]

[प्रथम इंद्रधनुषा नांवाची अप्सरा प्रवेश करते.]

इंद्रधनुषा––सखि क्षेत्रपालिके !

गाणें.

["भज भज भवजलधिमाजि" या चालीवर.]

झडकरि दे भेट सये ! ये ये दयाले ! ॥ ध्रु० ॥

विश्वाची स्वामिण हें । शचि देवी तव पाहे ।
वाट सुमुखि ! लवलाहें । ह्मणुनी सुशीले ॥ झडकरि० ॥ १

तूं तों संपन्न बहुत । नव नव धन देशि नित्य ।
तुजसम जगिं कवण शक्त ? । मति ती न चाले ॥ झडकरि० ॥ २

कोठें तूं असासि दडुन ? । तव वासस्थान गहन ।
पर्वत कीं निर्जन वन । रमणीयलीले ॥ झडकरि० ॥ ३ ॥

हे भूतलस्वामिणि देवि! तूं आहेस कोठें? कांहीं कळत नाहीं ! तुझ्या निवासाच्या व विहाराच्या जागा बहुत आहेत, तेव्हां तुला कोठें शोधूं? असो, कोठेंही असलीस तरी तेथून झटकर येऊन मला शचिकिंकरीला भेट दे ह्मणजे झालें.

[मागील गाणें पुढें चालू.]

सुंदर दरि सतृण शांत । मनोहरण कुरण जेथ ।
मेषयूथ चरति संथ । तेथून वाले ॥ झडकरि० ॥ ४

कीं निर्झर निर्मळजळ । वाहतसे जो झुळझुळ
ऐकुन तो रव मंजुळ । शिर कां न डोले ? ॥ झडकरि० ॥ ५

कीं पवित्र माळभूमि । फुलालि विविध वृक्षकुसुमिं ।
प्रगटि गंधयश तव, मी । सेवून धालें ॥ झडकरि० ॥ ६

कीं पुष्पित वृक्षकुंज । गुंजति वरि भृंगपुंज ॥
रंजविती नयनकंज । तेजाळभाळे ॥ झडकरि० ॥ ७

आणिक तव शतविहार । द्राक्षावन रम्य फार ।
खडकाळहि जलधितीर । त्यजि ये सुवेळे ॥ झडकरि० ॥ ८

अगे! इंद्राणी बाईसाहेब स्वतां ह्या येथें सुंदर मैदानांत आल्या असून तुझी वाट पहात आहेत. पाहिलेंस ?

गाणें.

["नृपममता रामावरती" या चालीवर].

हें समस्त हिरवें चार ।
मैदान न, वाटे थोर । पसरिला ।
गालिच्याच जमिनीवर ।
झुडुपें त्या बुट्टीदार । लागलीं ।
नव शोभति विकासित कुसुमें ।
वरि दीपचि हे विधिनियमें । लटकले ।
गीत गाय खगगण मधुर ।
तांडव करि मोर समोर । कौतुकें ।
(चाल) हे अशी थाटली कशी, नयन दिपविशी मिजलसा मोठी ।
गे केवळ तुजविण खोटी ॥ सुंदरि ! ॥ १ ॥

(क्षेत्रपालिका प्रवेश करिते.)

क्षेत्रपालिकाः— **गाणें.**

["मुक्तिसुवेणी । मज गुंफा गे साजणी" या चालविर]

गे मुख-खाणी ! । वद बाहशि कां साजणी ॥ ध्रु० ॥
अनंतरंगें नटालिस अंगें । हेमकांति नव सारिशि मागें ।
दिव्य स्त्री अशि अन्य सुभाग्यें । देखिलि कोणी ? ॥ वद० ॥ १

अमृतदृष्टि तव पडतां वरतीं । झाडें झुडुपें समस्त वरितीं ।
टवटवीस, हे अभिनव रीती । कोण न वानी ? ॥ वद० ॥ २
कोमल कुसुमांवरुनि चालुनी । जाशी जेव्हां कुंकुमचरणीं ।
छटा विविध त्यां उठती, करणी । अद्भुतवाणी ॥ वद० ॥ ३
शचिप्रिया तूं सद्गुणशाली । नित्य कृपा अशि करशी, केली ।
मजवरि, जाणुनि पुसतें भालीं । जोडुन पाणि ॥ वद० ॥ ४
वद सुख-खाणी ! । अजि बाहशि कां साजणी ॥

इंद्रधनुषा——अगे, आमच्या बाईसाहेब इंद्रवल्लभा स्वतः ह्या बालतृणमय सुंदर मैदानांत उतरून, हिमानें निर्धूत अशा शुद्ध शुभ्र पाषाणखंडावर विराजमान झाल्या आहेत व त्यांच्या आज्ञेवरूनच मीं तुला हाका मारीत आहें. येथें येण्यांत त्यांचा हेतू काय ह्मणून विचारशील तर ऐक.

गाणें.

[" अजि अक्रुर हा नेतो " या चालीवर]

दिन आजि पहा पातला सुवर्णाचा । बहु भाग्यें गमतो साचा ॥ ध्रु० ॥
सखि ! शुद्ध मनें प्रेमबद्ध होवोनी । हृदयैक्यचि केलें ज्यांनीं ॥
स्त्रीपुरुषें हीं देखशील अशि नयनीं । या येथ कौतुकें करुनी ॥
(चाल) हें अपूर्व तुझिये अवनी-।
वरतीं आजि वर्ते ह्मणुनी ।
निजसंगें तुज घेऊनी ।
मम धनिण धरी मनिं लोभ दर्शनाचा ॥ बहु० ॥ १

करुं उत्सव कीं या घडी विवाहाचा । सोहळा थोर थाटाचा ॥
बहु भाग्य बरें गाउं, करूं निजवाचा । सफळ, हेत पुरवूं मनिंचा ॥
(चाल) देउं हित आशीर्वादा ।
होऊ कधिं न दृष्टबाधा ।
घेऊत सुखाच्या स्वादा ।
तव कृपया हा हेतु पुरो धनिणीचा ॥ बहु० ॥ २

क्षेत्रपालिका—पण, बाई इंद्रधनुषे!

गाणें.

[चाल वरील पद्याचीच.]

वद मदन तशी मोहिनी हि तन्माया।
खल कुठें असति या समया ? ॥ ध्रु० ॥
वदुं काय तुला ? कोप येत उभयांचा।
संसर्ग नको गे त्यांचा ॥
वर योजुनि तो दुर्मुख यम नांवाचा।
कर अर्पिति मम कन्येचा ॥
(चाल) कुटिलांचीं कृत्यें काळीं।
फुसलावुनि माझी बाळी।
यमपाशीं दिधली भोळी।
खलगंध नको, शपथ, लागतें पायां ॥ खल० ॥ १

ही अद्वितीय जोडी यावेळीं तुझ्या बाईसाहेबांजवळ तर नाहींना ? असली तर मला आपलें अगोदरच कळूं दे.

इंद्रधनुषा:—

गाणें.

[" उद्धवा शांतवन कर जा " या चालीवर]

दे सोडुनि अवघी शंका, सखये ! तुज भीति न कसली ॥ ध्रु० ॥

केव्हांचि अधःपंथें ती गडबडीनें जातां दिसली।
सकळांस असे जी ठावी धर्माज्ञा स्पष्टचि केली
लग्नविधी होण्यापूर्वी उचित नसे कीं रति केली
नियमा ह्या मोडायातें या स्थलींहि ती ये मेली।
(चाल) परि दैवचि सहाय झालें।
यत्ना यश लेश न आलें।
सोडुनि मग दोन्हीं बालें।
ती हताश होउनि गेली ॥ दे सोडुनि० ॥ १ ॥

क्षेत्रपालिका—मग चिंता नाहीं. अग, ह्या पहा, बाईसाहेबच इकडे आल्या. त्यांच्या पावलांवरून हें मी सांगतें.

[कित्येक सहचारींसहित इंद्राणी प्रवेश करते.]

इंद्राणी--कसें काय ? क्षेत्रपालिके, बरें आहेना ? मजबरोबर अंमळ चल बरें. या नववधूवरांस आशीर्वाद देऊन ह्यांचा जयजयकार करावा असें माझ्या मनांतून आहे. उभयतांनीं दीर्घ काल सुखानें नांदावें आणि ह्यांस उत्तम संतति प्राप्त व्हावी, अशी माझीही इच्छा आहे. यास्तव मी ह्मणतें **(गाणें.)**

[" भूपती खरे ते " या चालीवर]

धनवंत धनदसम, धवल कीर्ति जोडोनी ।
बहु धन्य उभयतां व्हाल खचित या भुवनीं ॥ ध्रु० ॥

क्षेत्रपालिका-- [वरास उद्देशून]

हे वसुंधरा तुज वरिल बहु प्रेमानें ।
जातील मानदा ! दिन तव अति मोदानें ॥
तळपेल जगीं त्वत्प्रतापरवि तेजानें ।
दिपवील सत्य तव मत्त शत्रुचीं नयनें ॥

इंद्राणी-- [वधूला उद्देशून]

(चाल) प्रसवशील अचिर सुतातें । बालिके ! ।
भूषवील मग उभयांतें । रत्न जें ।
मिळवील विजयलक्ष्मीतें । भुजबळें ।

इंद्राणी, क्षेत्रपा०-- [दोघांस उद्देशून]

यापरी जगीं या भववैभव भोगोनी ।
पावाल उच्चपद जें न पावलें कोणीं ॥ धनवंत० ॥ १

फर्डिनांड—वाहवा! हा थाट मोठा नामी आहे! माझे डोळे दिपून गेले! आणि गायन तरी किती मंजुळ, माझें तर मन मोहून गेलें. कायहो, हीं पिशाचें नव्हतका पण? विचारतों याचा राग नका मानूं.

प्रास्पेरो--होय, हीं पिशाचेंच. यांचें नेहमींचें वास्तव्य ह्मटलें ह्मणजे वायुरूपानें असावयाचें. तथापि सध्यां त्यांनीं येथें दृश्य रूप धरून यावें आणि घटकाभर मौज करून दाखवावी असें मला वाटल्यावरून, मीच त्यांना माझ्या मंत्रसामर्थ्यानें येथें आणविलें आहे.

फर्डिनांड—मला तर बुवा, जन्मभर येथेंच रहावेंसें वाटतें! येथला एकेक चमत्कार पाहावा तो अद्भुतच. असे चमत्कार करण्याची ज्याच्या अंगीं शक्ति, त्या पूज्य पुरुषाचा सहवास आणि अशा सुशील व लावण्यसंपन्न स्त्रीचा समागम असल्यावर हें स्थळ मला, खरेंच, प्रति-इंद्रभुवन कां न वाटावें!

[इंद्राणी आणि क्षेत्रपालिका एकमेकींच्या कानाशीं लागतात, आणि लागलींच इंद्रधनुषेला कांहीं काम सांगतात.]

प्रास्पेरो--हाँ! थांबा! अंमळ गडबड बंद! ह्या पहा, इंद्राणी आणि क्षेत्रपालिका एकमेकींशीं हेतुपूर्वक कांहीं बोलत आहेत; आणखी कांहीं तरी मौज दाखविण्याचा त्यांचा विचार दिसतो. यासाठीं आतां गप्प; नाहीं तर पहा बरें, आमचा मंत्र निष्फळ होईल.

इंद्रधनुषा—ठीक आहे, बाईसाहेब; सर्व तयारी आहे.

गाणें.

["भोलानाथ, दिगंबर" या चालीवर]

या या वन्यकुमारींनो ! हे वेळ साधा बरी ॥ ध्रु० ॥
सोडा, सोडा, सुखकर निज घर । प्रियकर वाटे जरी हो ॥ या या० ॥ १
झुळझुळ-वाही निर्झर सोडा । जो झणिं शीण हरी हो ॥ या या० ॥ २
स्मितमुख होउनि, भ्रुकुटिस चढवुनि । नटुनिहि नानापरी हो ॥या या० ॥ ३
पुष्पसुगुंफित वेतस मुकुटां । चढवुनि डोईवरी हो ॥ या या० ॥ ४
पाणि-निपीडनाविधिहित मांडा । उत्सव एकेसरीं हो ॥ या या० ॥ ५
प्रेमळ निर्मळ युवयुवतींचा । योग पहावा तरी हो ॥ या या० ॥ ६
नयनसफळता होइल, वाटुनि । धन्यचि जोडी खरी हो ॥ या या० ॥ ७
माझ्या वदनें, सकळां तुमची । स्वामिण आज्ञा करी हो ॥ या या० ॥ ८

[कित्येक वनदेवता वन्यकन्यांचीं रूपें घेऊन प्रवेश करितात.]

गाणें.

[साक्या.]

भाद्रपदांतिल कष्टें देहीं काळवंडुनी गेलां ।
सौख्य-पिकाचा सुकाळ आला अजि, द्या विश्रांतीला ॥ १
कृषिकांनो या या । करा उत्सवा या समया ॥ ध्रु० ॥

टाका शेतें, सोडा नांगर, सुखें जाउं द्या वृषभां ।
वनास, हर्षें धन्यवाद गा, घोष भिडो आजि नभा ॥ कृषि० ॥ २

उंच सोडगें, विळा वांकडा, जाड कांबळी काळी ।
ठेवा, नागर वेशा घ्या, अजि तुरा रोवुनी भाळीं ॥ कृषि० ॥ ३

कुंदरदा या वन्यसुंदरी मंद रवानें गाती ।
मंजुळ, त्यांतें सहाय व्हा, नव मांडा तांडवरीती ॥ कृषि० ॥ ४

[कित्येक वनदेव शेतकऱ्यांचा वेष घेतलेले प्रवेश करितात.]

(नंतर वनदेव आणि वनदेवता मिळून हातांत हात घालून नाच करतात. नाच चालू असतांच प्रास्पेरो एकाएकीं दचकल्यासारखें करून कांहीं शब्द उच्चारतो. त्याबरोबर हवेंत विलक्षण, पोकळ, भुरभुर असा आवाज होऊन सर्व पिशाचें भराभर अदृश्य होतात.)

प्रास्पेरो--(स्वगत) अरे मला अगदींच कसा विसर पडला! त्या बेट्या पशूनें—कालिबनानें, दोघे जोडीदार मिळवून, माझा जीव घेण्याचा बेत केला आहे, आणि हा बेत आतांच सिद्धीस नेण्याचा त्यांचा विचार आहे, नव्हे का? तर त्यांचा प्रतिकार अगोदर केला पाहिजे. (पिशाचांस उद्देशून) जा. तुमचें काम तुह्मी उत्तम केलें. पुरे आतां. चुप चुप! पुरे!

फर्डिनान्ड—(मिरांडेस) सखे, हा काय चमत्कार ह्मणावा बरें! तुझ्या पित्याचें मन फार खवळलें असून भानावर नाहींसें दिसतें.

मिरांडा--असें खरें. इतके दिवस झाले, पण आजच्या इतका संताप व मनाची एवढी चलबिचल माझ्या कधीं पाहण्यांत नाहीं. मग काय असेल तें असो.

प्रास्पेरो--(भानावर येऊन) कां जांवईबुवा, घाबरलां नाहीं-ना? घाबरूं नका बरें! स्वस्थ मन ठेवा. जी मौज दाखवावयाची ती दाखविली. आतां आमचें हें नाटक संपलें. तुह्माला दिसलीं तीं सारीं पिशाचें होत—आमचीं नाटकपात्रें हींच! मला वाटतें, हें प्रथमच तुह्माला सांगितलें होतें; नव्हेका? पण तीं आतां गेलीं—हवेंत विरलीं—

पार विरून वायुरूप होऊन गेलीं! खरोखर, तुह्मी पाहिला हा सारा चमत्कार दृष्टीचा भ्रम असून केवळ मायामय आहे. आणि अहो! आह्मा मनुष्यांच्या संसाराची तरी काय?--हीच वाट! पहा, तीं मेघाच्छादित उंचउंच गोपुरें आणि बळकट बुरूज, तीं वैभवशाली विशाळ राजमंदिरें आणि मोठमोठीं शोभिवंत देवालयें—फार काय सांगावें?---हा सगळा विस्तीर्ण विश्वकटाह, त्यांतील नानाप्रकारच्या वस्तुजातासहित केवळ नाशिवंत होय.—ह्या क्षणभंगुर अवास्तव चमत्काराप्रमाणेंच त्याचाही लय होऊन पुढें ज्याचा मागमूस देखील राहाणार नाहीं असा आहे! सारांश आह्मी प्राणी हे असे आहों! स्वप्नांतल्या-प्रमाणेंच सारा आमचा बाजार! अगोदर आमचें जीवित अगदीं अल्प; तशांत त्याचें टोंक महानिद्रेंत वळलें असल्यामुळें तें अधिकच अल्प झालें आहे.—शिव शिव! काय आमचें दैन्य! फार वाईट! मला उपरति होते. तथापि, मुलांनो, ह्या माझ्या दुर्बळपणाचा त्रास मानूं नका किंवा त्यापासून भय पावूं नका. माझें ह्यातार्‍याचें मन जगाला विटलें हें ठीकच आहे. तथापि हा माझा निरुत्साह पाहून तुह्मी गडबडूं नये. येथें भय वाटत असलें तर जा, माझ्या आंतल्या दालनांत जाऊन बसा. अंमळ विसांवा घ्या. तोंवर मी हिकडून तिकडे दोन चार फेर्‍या घालतों, आणि माझें उद्विग्न मन थोडेंसें शांत झालें तर पाहतों.

मिरांडा---जेदेवा! परमेश्वरा! कृपा कर. बाबांचें मन लवकरच शांत होऊं दे.

[उभयतां जातात.]

प्रास्पेरो---वाः! आठवण केली नाहीं, तों इतक्यांत तुझी स्वारी हजर! शाबास. गड्या एरिला, ये; असा ये.

[एरिल प्रवेश करतो.]

एरिल---महाराज, मी कांहीं दूर नाहीं. जेथें आपले विचार तेथें मी! आतां आपली काय मर्जी आहे?

प्रास्पेरो---अरे, सोबत्यासह कालिबन इतक्यांत येईल, त्याचा समाचार घेण्याची तयारी आपणास केली पाहिजे

एरिल---होय महाराज. क्षेत्रपालिकेस घेऊन आलों, तेव्हांच ही गोष्ट आपणास सुचविण्याचें माझ्या मनांत आलें होतें. परंतु ह्मटलें, आपणास राग येईल.

प्रास्पेरो---चिंता नाहीं. आतां सांग पाहूं, तूं आलास तेव्हां ते हरामखोर कोठें होते, व काय करीत होते?

एरिल---मघाशीं काय सांगितलें तें आपणास आठवत असेलच. महाराज, त्यावेळीं ते गुलाम सपाटून दारू पिऊन, विस्तवासारखे लाल होऊन पडले होते. त्यांना असा आवेश चढला होता कीं, वाऱ्याची झुळुक त्यांच्या तोंडाला लागे, तिलाच ते चापट्या मारीत होते, व पायांना भुईनें स्पर्श केला ह्मणून, ज्या भुईवर ते उभे होते, त्या भुईलाच तडातड लाथा मारीत होते. इतकें झालें तरी त्यांच्या मनांतून मूळचा बेत कांहीं निघाला नव्हता. मग मी आपली खंजिरी वाजविली; व त्यांना असे लुब्ध करून टाकले कीं, त्या नादाला कोंवळ्या वांसरांप्रमाणें त्यांनीं

कान उभारले, डोळे फाडले, आणि जणों गाण्याचा घास येत आहे अशा प्रकारें हुंगून नाकें चढविलीं! त्यांचे कान इतके भारून टाकल्यावर मग मी चुचकारून वांसरांप्रमाणें त्यांना जवळ बोलाविलें; तसे ते गुलाम, कांटेरीं झुडपें न ह्मणतां, जाळ्या न पाहतां, आणि कांटे भसाभस अंगांत शिरत त्यांना न जुमानतां, माझ्या मागोमाग आले. याप्रमाणें त्यांची ही वरात काढून, मी सध्यां त्यांना, आपल्या गुहेच्या पलीकडल्या आंगाला घाणीनें व चिखलानें भरलेलें डपकण आहेना?—तेथें आणून सोडलें आहे. या ठिकाणीं, चिकट चिखलांत, त्यांचीं पावलें सटासट निसटत असतां, डोकें मात्र वर, बाकी सर्वांग चिखलानें माखलें असून, पुनः उठावें पुनः पडावें असा मोठ्या गमतीचा खेळ त्यांनीं मांडला आहे!

प्रास्पेरो—शाबास! गड्या एरिला, हें काम तर फारच उत्तम केलेंस. पण अझूनही तुझें अदृश्य स्वरूपच तुला ठेविलें पाहिजे. जा, गुहेंत जाऊन माझ्या त्या भिकार वस्तूंतूनच, मनांत भरण्याजोग्या कांहीं चांगल्याशा घेऊन ये पाहूं. ह्या चोरांना पकडण्याकरितां त्या येथें मांडून ठेवूं.

एरिल—ठीक आहे; घेऊन येतों.

[जातो.]

प्रास्पेरो—[समोर कालिबन वगैरे येतांना पाहून] हें पहा सैतान-जातिवंत सैतान! कितीही गोड बोला—कसाही बोध करा; तरी गुलामाच्या मनाला शिवेल तर शपथ. मेहनत घेऊन ममतेनें याला पुष्कळ शिकाविलें, पण व्यर्थ;

काडीचाही उपयोग नाहीं. शरीरानें मात्र भला गलेलठ्ठ होत चालला आहे. आणि जसजसा हा शरीरानें वाढत आहे, तसतसा याचा कुरूपपणा आणि त्याबरोबरच ह्याच्या मनाचा दुष्टपणाही वाढत चालला आहे. त्याच्यामागें हे दोघे त्याचे साथीदार! ह्यांना आतां असा चोप देतों कीं, ज्याचें नांव तें!–गुलाम मोठमोठ्यानें रडत ओरडत बसतील! [झगझगीत वस्त्रप्रावरणें वगैरे वस्तूंचा मोठा बोजा पाठीवर घेऊन एरिल पुनः प्रवेश करतो.] आण; या दोरीवर अशीं पसरून ठेव तीं वस्त्रें.

[प्रास्पेरो आणि एरिल अदृश्य रूपानें तेथेंच राहतात. इतक्यांत कालिबन, स्टिफानो, व त्रिकालिक, ओले चिंब व चिखलानें सर्वांग माखलेले, येतात.]

कालिबन—देवा, हळू हळू पावलें टाक बरें! आंधळ्या चिचुंद्रीला देखील यावेळीं तुझें पाऊल वाजलेलें ऐकूं जातां कामा नये. कारण आपण आतां गुहेच्या अगदीं तोंडाशीं पोचलों आहों.

स्टिफानो—राक्षसा, तूं तर ह्मणत होतास कीं, तुझी ती यक्षिण अगदीं गरीब आहे–बिलकुल त्रास देत नाहीं ह्मणून. पण तिनें तर वेताळाप्रमाणें आमची खूपच त्रेधा उडविली, हें कसें?

त्रिकालिक—राक्षसा, माझ्या सर्वांगाला, बाबा, घोड्याच्या मुताची घाण येऊं लागली आहे. शी–शी–शी! हें रे काय? माझ्या नाकाला तर शिसारी बसली–डोकें उठलें!

स्टिफानो--शी शी! मलाही तसेंच झालें आहे. राक्षसा, याद राख. एकदा रागावलों कीं नाहीं, ह्मणजे पहा काय होईल तें.

त्रिकालिक--व्हावयाचें काय? जाईल पार चिरडून.

कालिबन--देवा, असें करूं नको. तूं माझा मायबाप आहेस. कृपा कर, आणखी थोडा धीर धर. याचा वचपा मी पुढें असा काढून देईन कीं, डोळे मिचकावित तूं ह्मणशील-यंव. पण थांब; अगदीं हळू. पहा, मध्यरात्री-प्रमाणें सध्यां येथें कसें सामसूम आहे!

त्रिकालिक—अरेरे! आपलीं दारूचीं नळकांडीं डबक्यांत गेलीं, त्याची वाट काय?

स्टिफानो--खरेंच; ही मोठी लज्जेची गोष्ट आहे.--छे, त्यांवांचून सध्यांच आमचें अडणार!

त्रिकालिक--अडणार खरेंच. भिजलों तर भिजलों; चिंता नाहीं. पण नळकांडीं गेलीं हें फार वाईट. तरी बरें, ही राक्षसाची गरीबशीच यक्षिण आहे!

स्टिफानो--पण आपण तर आपलें नळकांडें आतां घेऊन येणार; मग भिजलों, नव्हे बुडालों, तरी बेहत्तर!

कालिबन--देवा, हळू-अगदीं हळू! पायां पडतों. रे! हें पाहिलें? हें गुहेचें दार. गलबला न करितां, शीर, आंत शीर. आणि अशी छानदार ठोकाठोक करशील कीं, हें बेट एकदम तुझें होईल. मग हा कालिबन तुझा दास होऊन, जन्मभर तुझ्या पायांची धूळ चाटून राहिल

स्टिफानो——हात पुढें कर. आणि माझा हात धर पाहूं. हे पाहिलेस, माझ्या हृदयांत खुनी विचार येऊं लागले !

त्रिकालिक——अहो स्टिफानो महाराज, अहो सरदार बहादर, अहो रणपटु, अहो हा पोषाक तर पहा अगोदर; तुह्मा राजांना हा फारच उत्तम आहे.

कालिबन——जाऊं दे रे तो भिकार पोषाख! वेडा कुठला! छिः ! त्याला काय पाहायाचें ?

त्रिकालिक——अरे, चल! भिकार जुनीं पानीं वस्त्रें कोणतीं आणि नवीं कोणतीं, हें देखील आह्मास कळत नाहीं वाटतें ?– कायहो स्टिफानो महाराज !

स्टिफानो——त्रिकालिका, पाहतोस काय ? ओढ तो झग खालीं. तो मी असा या हातानें घेईन !

त्रिकालिक——महाराज, हा घ्या. हा आपणासच असावा !

कालिबन——मरो रे हा चांडाळ; पोट फुगून फुगून मरो! अरे, ह्या गोणपटाला घेऊन याची कसली तारीफ करीत बसलास ? आधीं जाऊन त्याचा जीव घे. तो जागा झाला तर आपणा सर्वांला चिमटे काढील, आणि पायाच्या आंगठ्यापासून तों डोक्यावरल्या केंसापर्यंत सर्वांगाचें धिरंडें करून टाकील ! ह्मणून ह्मणतों–आधीं त्या जादुगाराला जाऊन ठार कर !

स्टिफानो——चुप, राक्षसा; गप्प बैस. तुला अधिक बोलायाचें कारण नाहीं.–अग, ए दोरे! बोल. ही दोरीच सांगेल– ही बंडी कोणाची तें?——माझी नाहींका ? हो; ही पहा, आली खालीं; दोरीनेंच दिली ही; त्यापेक्षां ती आमची

झाली. जोंपर्यंत ही बंडी दोरीवर होती, तोंपर्यंत, दोरी केसांची वळली असल्यामुळें, बंडीला केसांचा योग होता. आतां काय? दोरीबरोबरच तो योगही तुटतांच ही बंडी बिचारी केशरहित–बोडकी झाली, नाहीं काय? मग हिला आश्रय देऊन पदरीं घेणें आह्मास भाग आहे!

त्रिकालिक––हो जी हो, खासें बोललां! आपणतरी असे या दोरीच्याच अनुरोधानें शिस्तवार मुंडण करीत जाऊं. कसें काय, सरकार, खरेंना?

स्टिफानो––वाहवा! कोटीतर गड्या फार नामी केलीस. खुष झालों. हा घे पोषाख तुला बक्षीस. या देशाचा जोंपर्यंत मी राजा आहें, तोंपर्यंत गुणी मनुष्यांस मी खचित विन्मुख जाऊं देणार नाहीं. कसें ह्मटलेंस?–असे दोरीला धरूनच सरळ शिस्तवार मुंडण करीत जाऊं? वा:! काय नामी कल्पना! हा घे आणखी पोषाख बक्षीस!

त्रिकालिक––गड्या राक्षसा, ये तुझ्या बोटांना थोडी चिकटी तरी लावूं दे. ह्मणजे ज्या वस्तूवर हात ठेवशील ती तुझ्या हाताला आपोआप चिकटेल. मग मुद्दाम उचलण्याचें श्रम वांचतील. चला, आतां बाकीच्या वस्तु पळवून नेऊं.

कालिबन––छत्! मी एकीला देखील शिवणार नाहीं. अरे! हें काय? किती हा उशीर? ही वेळ गेली ह्मणजे झालें!–मारून तो आपणा सर्वांचे मासे करून टाकील; नाहींतर चपटीं नाकें करून कुरूप माकडें बनवील; मग बस हाका मारीत!

स्टिफानो--चूप बैस, राक्षसा. मी सांगतों तसें कर. लाव, हाताला चिकी लाव. आणि हीं एकून एक वस्त्रें, माझें दारूचें पिंप आहेना, तेथें नेऊन ठेव. चल उचल. हो ना ह्मणशील तर एकदम तुला माझ्या राज्यांतून काढून लावीन; समजलास ?

त्रिकालिक--आणि महाराज, ही-आणि ही ?

स्टिफानो--हो हो, ती सुद्धां-ती-ती-सर्व कांहीं गुंडाळ.

[इतक्यांत पारध्यांची धामधूम ऐकूं येते. अनेक पिशाचें शिकारी कुत्र्यांचीं रूपें घेऊन येतात, आणि या तिघांच्या पाठीस लागतात. प्रास्पेरो आणि एरिल त्या कुत्र्यांस छु करून त्यांच्या आंगावर घालतात.]

प्रास्पेरो--छु, पठाऱ्या छु !

एरिल--रुप्या छु ! ते-ते, छु !

प्रास्पेरो--महांकाळ्या छु ! ते तिकडे, वाघ्या छु ! हे इकडे. छु छु छु !

[कालिबन, त्रिकालिक आणि स्टिफानो या तिघांस मैदानांतून पिशाचे पळवून लावतात.]

प्रास्पेरो--[एरिलास] वा ! ठीक झालें. आतां सर्व पिशाच्चांस जाऊन माझा असा हुकुम सांग कीं, या तिघा गुलामांचे सांधेनी सांधे ठेंचून त्यांस चांगले मऊ करा, आणि सांडशी लावून यांच्या शिरा जागच्या जागीं आंखडून टाका. आणि सर्वांगाला असे चिमटे घ्या कीं, त्या त्या ठिकाणीं गांधी निघून, यांचीं आंगें रानमांजरांसारखीं अथवा चित्त्यांच्यासारखीं सुरेख ठिपकेदार दिसूं लागतील !

एरिल--हे पहा महाराज! केवढ्यानें तरी ओरडूं लागले हे!

प्रास्पेरो--हो हो, ही ओरड त्यांचीच. भली पारध केली.--अहो, काय सांगावें! ह्या घटकेला माझे सर्व वैरी पूर्णपणें माझ्या हातीं लागले असून, माझ्या सर्व श्रमांचा शेवट होण्याची वेळ जवळ आली आहे. आणि गड्या एरिला, तुझी स्वतंत्रता तुला मिळण्याचीही वेळ नजीकच येऊन ठेपली आहे. मग काय पुसावें!--आकाशांत मजेनें संचार करायाला आमचा एरिल मोकळा होईल. पण ये; आणखी एवढें एक काम कर; मग नाहीं तुला भागवीत.

[दोघेही जातात.]

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ--गुहेपुढील जागा.

[जादूचा आंगरखा घालून प्रास्पेरो, व त्याचे मागून एरिल असे येतात]

प्रास्पेरो--अहाहा ! ही वेळ केवढी आनंदाची ह्मणावी ! अहो, या घडीला माझे हेतु बहुतेक तडीस गेले असून, त्यांची घडी बरोबर बसत आली, असें ह्मणावयास चिंता नाहीं. माझे मंत्र कोठेंही न ढळतां यथास्थित सिद्ध होऊं लागले, आणि ज्या भुतांस मी वश करून घेतलें तींही ह्मणूं तसतशीं वागूं लागलीं. एकंदरीनें, सध्यां काळाची गति सरळ असून कोणत्याही गोष्टींत आह्माला प्रतिकूल नाहीं. असो; एरिला, दिवस किती आहे अझून ?

एरील--महाराज, साहा वाजले. या वेळेला सर्व काम संपल ह्मणून आपलें ह्मणणें होतें.

प्रास्पेरो—काय ? असें ह्मटलें होतें ? बरें तर सांग पाहूं, राजाची आणि त्याच्या बरोबरच्या मंडळीची काय स्थिति आहे ती ?

एरिल—महाराज, आपण त्यांना माझ्या हवालीं करून निघून आलां, त्या वेळीं जशी होती तशीच ती याही वेळीं आहे. अधिक मिळून इतकेंच कीं वारा येऊं नये ह्मणून

जी राई गुहेसमोरच्या पटांगणांत लाविली आहे तिच्यांत ते सारे अडकून पडले आहेत. फार काय सांगूं?—त्यांना हातपाय हालविण्याची देखील शक्ति नाहीं. इतक्यांतच आपण त्यांना सोडविलें तर बरी गत आहे; नाहीं तर त्यांचें काय होईल, सांगवत नाहीं. राजा काय, राजाचा भाऊ काय, आणि आपला भाऊ काय—तिघेही शुद्ध वेडे पिसे झाले आहेत, आणि त्यांची ही दशा पाहून, बाकीची मंडळी, भयानें आणि दुःखानें विव्हल होत्साती, त्यांच्या सभोंवती शोक करीत आहे. पण महाराज, आपण 'सज्जन' ह्मणून नेहमी ह्मणतां, तो गांझेलो तर बापडा पराकाष्ठेचा कष्टी झाला असून, एकसारखे अश्रु ढाळीत आहे, आणि त्याचे हे अश्रु त्याच्या दाढीवरून टप टप गळत आहेत—थंडीच्या दिवसांत घरावरल्या बरूच्या केंबळीवरून वळचणीखालीं गळणारे, जणों, दंवाचे बिंदुच हे! आणखी महाराज, आपल्या मंत्रांचा अम्मल सर्वांवर इतका जबरदस्त बसला आहे कीं, त्यांची ती अवस्था पाहून तुमचें देखील मन द्रवेल!

प्रास्पेरो—काय यक्षा? असें तुला वाटतें?

एरिल—खचित. मी जर मनुष्य असतों, तर महाराज, माझें तर मन द्रवलें असतें.

प्रास्परो—तर मग माझेंही द्रवेल. तूं तर बोलून चालून वायुरूपच. असें असून त्यांचा एवढा कळवळा तुला आला; तर मी त्यांच्यासारखाच मनुष्य, त्यांना जे विकार होतात ते मलाहि होतात, त्यांना ज्या गोष्टींनीं दुःख होतें त्यांनीं मलाही होतें—मग त्यांचा कळवळा मला कसा नाहीं येणार?

आतां, त्यांनीं माझ्याशीं कपट केलें व त्यायोगानें माझें मन भडकून गेलें, हें जरी खरें आहे, तरी मी विवेक धरतों, आणि रागाचा हा भडका शांत करतों. अरे, सूड घेणें हें फार सोपें आहे; क्षमा करणें आणि अपकार विसरून उपकार करणें हेंच अवघड; तें मी करतों. तशांत, या मंडळीला जर कृतकर्माचा पश्चात्ताप झाला तर कामच झालें—माझा हेतु तडीस गेला. मग रागाचें कारणच नाहीं. ह्मणून ह्मणतों, एरिला, जा; अगोदर त्यांना मुक्त कर. हा पहा, मी आपला मंत्र काढून घेतों, आणि त्यांना शुद्धीवर आणून, त्यांच्या इंद्रियांची शक्ति त्यांच्या इंद्रियांना पुनः देतों. तर जा, त्यांना इकडे घेऊन ये.

एरिल——ठीक आहे; घेऊन येतों. [जातो.]

प्रास्पेरो——हे डोंगरांतल्या भूतांनो; हे ओढयावरच्या भूतांनो; हे डबक्यांतल्या भूतांनो; हे झाडींतल्या भूतांनो; अहो, वाळूवर पावलें न उमटवितां, ओहोटीबरोबर लाटांमागून आंत जाणाऱ्या व भरतीबरोबर परत येणाऱ्या, समुद्रकांठच्या भूतांनो; शुभ्र चांदण्यांत सपाट जमिनीवर कडू हरळीचीं कुंडलाकृति मंडलें उठतात व ज्यांस शेळया कधीं तोंडही लावीत नाहींत, तीं उत्पन्न करणाऱ्या अर्धवट पिशाचांनो; मध्यरात्रीं शिलींध्रें उत्पन्न करण्याचा खेळ करणाऱ्या आणि अपरात्रीचा डंका ऐकण्याची हौस धरणाऱ्या अन्य पिशाच्चांनो, तुम्ही स्वतां जरी दुर्बळ आहां, तरी तुमच्या साहाय्यानें मी कडकडीत दोनप्रहरचा सूर्य देखील सध्यां झांकून टाकला आहे, आणि जबरदस्त वाऱ्यावर अंमल चालवून, हिरवा समुद्र आणि घुमटाकार निळें आकाश यांमध्यें खूप

धुमश्चक्री उडवून दिली आहे; मोठ्या भयंकर गडगडांत अग्नि उत्पन्न करून, इंद्राचें आयुध जी वीज, तिच्या योगें इंद्राच्याच नंदनवनांतील महान् ओक वृक्षांस चिरून टाकलें आहे; बळकट बुंध्याचे आणि दृढ मूळांनीं जमिनींत खिळलेले सरळ आणि देवदारु वृक्ष मी उलथून पाडले आहेत; गाडलेलीं प्रेतें माझ्या आज्ञेवरून कबरस्थानांत संजीवन झालीं आहेत, आणि थडगीं फोडून बाहेर पडलीं आहेत—एवढें माझ्या मंत्रविद्येचें सामर्थ्य! परंतु, ह्या अप्रशस्त मंत्रविद्येचा आज मी त्याग करतों, आणि आजपासून तिचा उपयोग करणार नाहीं ह्मणून शपथ वाहतों! सध्यां ह्या मंडळीच्या मनावर कांहीं मंत्रप्रयोग करावयाचा आहे, त्यांत स्वर्गीय गायनाचा उपयोग आहे. ह्मणून, तेवढें मात्र अवश्य असल्यावरून, आतां करितों. तें झालें कीं संपलें. मग ही माझी जादूची काठी मोडून, ती मी कित्येक पुरुष खोल भुईंत गाडून टाकतों, आणि माझें जादूविद्येचें पुस्तकही, ठाव न लागे असें, खोल समुद्रांत नेऊन बुडवतों!

[इतक्यांत रागदारीवर गायन सुरू होतें.]

(एरिल पुनः प्रवेश करतो, व त्याच्यामागून गान्झेलो येतो; नंतर सिबास्टीन व अन्टोनियो हेही तशाच चेष्टा करीत येतात. व त्यांच्या बरोबर अलौन व फ्रान्सिस्को हे येतात. ही सर्व मंडळी आल्यावर, प्रास्पेरोनें जें मंडळ रेखलें होतें त्यांत मंत्रबद्ध होत्साते उभे राहतात; त्यांस उद्देशून प्रास्पेरो बोलतो.)

प्रास्पेरो—एकूण, भांबावून गेल्यामुळें अस्वस्थ झालेल्या मनाला ताळ्यावर आणण्याला संगीत हें एक उत्कृष्ट

औषध आहे खरें! असो; आतां ह्या संगीतानें ह्यांचे हें मेंदु शांत होवोत. अहो! सध्यां हे तुमचे मेंदु तुमच्या मस्तकांत दुर्बळ होत्साते निरर्थक सळसळत मात्र आहेत, ते शुद्ध होऊन, त्यांस तेजस्विता प्राप्त होवो–हाँ! थांबा; तुह्मी सर्वजण जेथें आहां, तेथेंच उभे रहा. पुढें येऊं नका. पण तुह्मी कशाचे पुढें येतां? मंत्रप्रयोगानें तुमची गति कुंठित झालेली आहे!–हे पवित्र पुरुषा, सज्जना, गान्झेलो, तुझ्या डोळ्यांस पाणी आलें आहे, तें पाहून मित्रत्वानें माझ्याही डोळ्यांस पाणी येतें—हा पाहिला? मंत्रांचा अंमल भराभर उतरूं लागला. आणि रात्रीच्या अंधकाराचा नाश करून प्रभातवेळा जशी प्राप्त होते, तशी यांची बुद्धि, यांच्या ज्ञानशक्तीस झांकून टाकणाऱ्या संभ्रमाचा निरास करून, पुनः शुद्धीवर येत चालली!* हे भल्या मनुष्या गान्झेलो, मी वांचलों तो तुझ्या मदतीमुळेंच वांचलों, हें मी विसरलों नाहीं. अरे, ज्याचा आश्रित तूं ह्मणवशील

---

* याचें मूळ इंग्रेजी व कालीदास कवीचा पुढील श्लोक, दोन्हीं ताडून पाहण्यासारखीं आहेत :—

——————The charm dissolves apace,
And as the morning steals upon the night,
Melting the darkness, so their rising senses
Begin to chase the ignorant fumes that mantle
Their clearer reason.

राजा । अयि प्रकृतिमापद्यते ते सखी । पश्य

आविर्भूते शशिनि तमसा मुच्यमानेव रात्रिर्
नैशस्यार्चिर्हुतभुज इव छिन्नभूयिष्ठधूमा ।

[पुढें चालू.]

त्याच्याशीं तूं नेहमी एकनिष्ठपणेंच वागशील, हें मला पक्कें ठाऊक आहे; व माझ्याशीं तूं तसाच वागलास. ह्या तुझ्या उपकारांची फेड कायावाचामनानें आज मी करतों पहा. —हे राजा अलान्झो, तूं कां बरें माझ्यावर आणि माझ्या मुलीवर विनाकारण आग पाखडलीस? तूं हें फार वाईट केलेंस. आणि त्या कामांत तुझ्या भावानें तुला भर देऊन, आगींत तेल ओतलें!—हा अरे वेड्या सिबास्टिना, याच दुष्कर्माबद्दल तुझ्या सर्वांगाचे आतां लचके लचके तोडण्यांत आले बरें!—आणि ही मूर्ति कोण? हे आमचे बंधुराज!—पाठीशीं पाठ लावून आलेले प्रत्यक्ष आमचे सख्खे भाऊराव! तूं तर बाबा, कहर करून सोडलास! मला वाटतें, तूं आपल्या हृदयांत नुसता राज्यलोभ मात्र पराकाष्ठेचा सांठवून, दया माया वगैरे स्वाभाविक मनुष्यवृत्तींस त्यांतून पार काढून टाकल्या आहेस! अरे, केवढी तुझी छाती! इतक्यांतल्या इतक्यांतच सिबास्टि-

---

मोहेनान्तर्वरतनुरियं लक्ष्यते मुक्तकल्पा
गङ्गा रोधःपतनकलुषा गृण्हतीव प्रसादम् ॥

विक्रमोर्वशीयम् । १ । ८ ॥

ह्या दोघा कवींच्या वरील उद्गारांत, दृष्टिभिन्नतेमुळें कल्पनांचा प्रवाह वेगवेगळ्या शब्दांत कसा वळला, याकडे लक्ष देण्यासारखें आहे. शेक्स्पियरकवीची दृष्टि मंत्र उतरते वेळच्या व्यापाराकडे फिरली आहे व आपल्या भारतीय शेक्स्पियरची केवळ शृंगारिक दृष्टि, नेहमीप्रमाणें, मोहमुक्त झालेल्या नायिकेच्या सौंदर्याकडे वळली आहे. तथापि एकाहून एक सरस अशा एक, दोन, तीन उपमा देण्याची कालीदासाची हातोटी पाहून त्याच्या कवित्वस्फूर्तीचें मोठें कौतुक वाटतें.

नाशीं मसलत करून ह्या बिचाऱ्या राजाला येथेंच ठार करण्याचा घाट तूं घातलास!—नव्हे काय? याबद्दल सिबास्टिनास तर अंतर्यामीं पराकाष्ठेच्या वेदना होतच आहेत. पण तूं मात्र उलट्या काळजाचा खरा. हा तुझा क्रम जरी सृष्टिनियमाविरुद्ध आहे, तरी आज मी तिकडे डोळेझांक करून तुला क्षमा करतों.—पहा पहा, ह्यांची बुद्धि स्फुरण पावूं लागली. आणि इतक्यांतच आणखी एक ज्ञानलहरी येईल; ती आली कीं, ह्यांचा मेंदु ज्ञानतत्वानें पूर्ण भरून जाऊन त्यांतील भ्रमाची तमोमय दुर्गंधि धुपून जाईल.—--अरे! पण हें काय? हे सर्वजण मजकडे पहातात मात्र, पण मला ओळखतातसें दिसत नाहीं! एरिला, अरे एरिला! गुहेंत जाऊन माझा मुगूट व तलवार तरी इकडे घेऊन ये बरें. मिलान नगरीचा राजा असतांना मी जसा पोशाख करीत असें तसा आतां करितों, मग तरी ओळखतात कीं नाहीं, तें पाहतों. चल, त्वरा कर. एरिला, तुझ्या मुक्ततेची वेळ अगदीं जवळ आली बरें.

एरिल—जी महाराज! मग काय, आमची चैन आहे!

[जाऊन पोशाख घेऊन येतो व एकीकडे तोंडानें गात गात प्रास्पेरोला पोशाख घालूं लागतो.]

[दिंडी.]

मधुर पीऊं मधुबिंदु मधुकरीशीं,
सुखें पहुडूं मृदु कमलगर्भदेशीं।
स्वैर फिरतां अपरात्रि, घूकगीता
परिसुं तोषें, सारीच चैन आतां ॥ १
चैन आतां, मधुकाल सुखद आला,
कुसुमतति हे लदकली सुविटपाला।

तेथ कलिकानलिकांतरंगिं राहूं,
कुररिवरि वा बसुं, फिरूं, मजा पाहूं ! ॥ २

प्रास्परो—वाहवा ! शाबास ! ठीक आहे.—ही तुझी चैनीची इच्छा मला अगदीं पसंत आहे. एरिला, तूं किती तरी गोड आहेसरे ! खचित, तुला सोडल्यावर तुझ्यावांचून मला क्षणोक्षणीं अगदीं चुकल्यासारखें होईल. तरी पण, मी तुला कांहीं अडकवून ठेवणार नाहीं बरें. पण आतां असाच जा, कोणासही दिसूं नकोस, आणि राजाच्या गलबतावर जाळीखालीं खलाशी निजलेले पडले असतील, त्यांत तांडेल व नाखवा हे जागे आहेत, त्यांस तेवढे खेंचून इकडे घेऊन ये. बाबारे, नाहीं ह्मणूं नकोस. इतक्यांतच सर्वांना येथें हजर कर.

एरिल—जशी आपली आज्ञा. हा पहा, मीं झडप घालून ही पुढील सारी हवा पिऊन टाकतों व इष्ट स्थळीं जाऊन, असाच, तुमच्या नाडीचे दोन ठोके पडले नाहींत तों, परत येतों.* (जातो).

---

*अर्थसादृश्यार्थ ह्याचें इंग्रजी मूळ व पुढील भवभूतीचा उद्गार पहाः—

Ariel—I drink the air before me, and return
Or ere your pulse twice beat.

जटायुः । (उत्पत्य, गगनगमनमभिनीय) ।

एषोऽहं प्रलयमरुत्प्रचण्डरंहः-
संक्षिप्तप्रथिम पिबन्निवान्तरिक्षम् ।
क्षेपीयो मलयगिरेर्निवासभूभृत्-
संसक्तक्षितिरुहजालमभ्युपेनः ॥

महावीरचरितम् ५.

गान्झेलो—कायहो! या बेटावर पाहावें तों जिकडे तिकडे दुःख, क्लेश, आश्चर्य, कौतुक, भय यांचाच बाजार असावासें दिसतें—नाहीं बरें? असो; या विलक्षण भयंकर प्रदेशांतून कोण परमेश्वर केव्हां आह्माला मुक्त करील?

प्रास्पेरो—हा तुमचा प्रास्पेरो! ज्याचा तुह्मी अतिशय छळ केला तोच हा—याला नीट ओळखला काय? काय?—एवढयानेंही खात्री नाहीं होत? बरें; तर मी तुह्माला स्पर्श करून प्रत्यक्ष आलिंगन देतों. मग तर, मी भूत नसून जिवंतपणीं तुमच्याशीं बोलत आहें अशी तुमची खात्री होईलना? [आलिंगन देतो.] महाराज, आपण भेटलां आणि ही मंडळी भेटली, यामुळें माझ्या मनाला आज फार आनंद झाला आहे.

अलान्झो—छेहो! काय प्रकार आहे, कांहीं कळत नाहीं. हा कोण प्रास्पेरो? तोच तूं आहेस किंवा एखादें भिकार भूत असून, थोड्या वेळापूर्वीच भूतचेष्टांनीं जशी आमची हाबेलंडी उडाली तशीच फिरून उडवावी ह्मणून कोणी आला आहेस, काय सांगावें? पण तुझी नाडी तर रक्तमांसानें बनलेल्या माणसासारखीच वाहात आहे. आणि कांय असेल तें असो; तुला पाहिल्यापासून माझ्या मेंदूच्या वेदनाही कमी होऊं लागल्या. मला वाटतें, मी एवढा वेळ कांहीं भ्रमांत होतों, व त्याच्याच ह्या वेदना मला होत होत्या. यासाठीं, ही भूतचेष्टा नसून, जर तूं खराच प्रास्पेरो असशील तर मोठा चमत्कार ह्मटला पाहिजे. अरे बाबा, तुझें राज्य

मी तुला सोडलें.–झालें? मला तें नको–अगदीं नको! आणखी माझें असें मागणें आहे कीं, केलेल्या छळाची तूं मला क्षमा कर! पण–पण–प्रास्पेरो जिवंत असेल कुठून? आणि तो येथें येईल तरी कसा?

प्रास्पेरो—मित्रा गान्झेलो, तूं किती दयाळू! प्रथम तुला कडकडून भेटूं दे मला एकदा. काय तुझी निष्ठा! कोठवर आठवूं?

गान्झेलो—हा खराच प्रास्पेरो आहे कीं कोणी भूत आहे, मला तर खात्रीनें कांहीं सांगतां येत नाहीं.

प्रास्पेरो—नाहीं सांगतां येणार. तुमच्या मनावर या बेटावरील चमत्कारांचा जो अंमल बसला आहे तो अझून पुरा गेला नाहीं; ह्मणून खऱ्याचाही तुह्माला विश्वास येत नाहीं. तथापि या, माझ्या मित्रांनो, तुह्मी सगळेजण मला भेटा. [एकीकडे सिबास्टीन व अन्टोनियो यांजकडे पाहून] सरदार बहादुरांची ही जोडी पहा! अहो राजश्री! खरी गोष्ट सांगितली तर तुह्मा दोघांवर महाराजांचा खचित मोठा राग होईल. बोला, असें करूं का? अरे! तुह्मी दोघेही राजद्रोही आहां–नव्हे काय? हवें तर, हें आतांच सिद्ध करून देतों. देऊं कां? बोला. या वेळेस मी पोकळ गप्पा नाहीं मारीत.

सिबास्टीन—[स्वगत] काय, भूतबीत तर नाहींना शरीरांत प्रवेश करून ह्या तोंडानें बोलत?

प्रास्पेरो—छे! खचीत भूत नाहीं बरें, मी जीवंत प्रास्पेरो आहें. अरे दुष्टा, तुला भाऊ ह्मटल्यास तोंडाला विटाळ

मात्र होईल; असें जरी आहे, तरी तुला तुझ्या महान अपराधांची मी यावेळीं क्षमा करतों. आणि एवढेंच ह्मणतों कीं माझें राज्य मला दे. बाकी तें तुला दिलेंच पाहिजे; होय नाहीं करून चालेल असें नाहीं.

अलान्झो--जर तूं खरोखरच प्रास्पेरो आहें ह्मणतोस तर तूं वांचलास कसा, ती सर्व हकीगत आह्माला सांग पाहूं? यांत कांहीं तरी अद्भुत कृति आहे! नाहीं तर आह्मी येथें आलों हें इतक्यांत तुला समजलें कसें? व तूं सांगितल्यासारखा येथें अवचित येऊन आह्माला गांठलेंस कसें? कारण, पुरा प्रहरही झाला नसेल, तेव्हां आमचें जहाज बुडालें-हें या येथें बुडालें. आणि येथेंच आमचें एक रत्न हरपलें. हाय हाय, आठवण झाली ह्मणजे हृदयाला कसा भाला टोंचतो-काय करावें! माझा बाळ फार्डिनान्ड येथें किहो बुडून मेला!

प्रास्पेरो--अरेरे! फार वाईट! मला अतिशय दुःख होतें.

अलान्झो--हा जो घात झाला त्याची जखम आतां कशानेंही बुझावयाची नाहीं-नाहीं-नाहीं. धैर्यानें कितीही मनाचें समाधान केलें तरी येथें त्याचा कांहीं उपाय चालत नाहीं.

प्रास्पेरो--कां बरें? तुह्मी ध्यावें त्या मार्गानें समाधान करून घेतलें नसेल. आणखी काय? अहो, मजवरही असाच प्रसंग आहे. पण समाधानानें मी आपलें मन शांत आणि संतुष्ट ठेवलें आहे.

अलान्झो--काय ह्मणालां, तुह्मावरही असाच प्रसंग आहे? तो कसा काय?

प्रास्पेरो--तुह्मावरला प्रसंग जसा कठिण आहे तसाच मजवरला प्रसंग मला कठिण वाटत आहे. महाराज, तुह्माला इतर पुष्कळ सुखें आहेत; त्यांत तुमचें हें दुःख तुह्मी कसें तरी गिळून बसाल. माझें मात्र तसें नाहीं. मग मी आपलें दुःख कसें सहन करावें? महाराज, माझी मुलगी कींहो आज येथें मला अंतरली!

अलान्झो—काय? तुमची मुलगी? परमेश्वरा! आह्मावर का, तुझा एवढा कोप! हीं दोघें मुलें आज जिवंत असून नेपल्स शहरांत असतीं तर तीं राजाराणी ह्मणून शोभलीं असतीं.—खरेंच राजाराणी शोभलीं असतीं. अहो! ज्या खाजणांत माझा बाळ गडदला असेल तेथें त्याच्या ऐवजीं मी गडदलों असतों तर चाललें नसतें कां?—मला त्याचें कांहीं वाटलें नसतें. पण तुमची ही मुलगी केव्हां नाहींशी झाली?

प्रास्पेरो--ह्या नुकत्याच झालेल्या तुफानाच्या प्रसंगांत!—मला वाटतें, ही सरदार मंडळी मला पाहून फारच चकित होऊन गेली आहे. यांची बुद्धि गुंग झाली असून, ज्या खऱ्या खऱ्या गोष्टी हे डोळ्यांनीं धडधडीत पाहातात त्यांचाही यांस विश्वास पटत नाहीं. आश्चर्यानें हे केवळ स्तब्ध झाले आहेत.—तोंडावाटे श्वास चालला आहे, पण शब्द निघत नाहींत. अहो! तुह्मी सर्वजण गांगरून गेलां आहां व यामुळें मला तुह्मी ओळखीतही नाहीं, हें उघड आहे. तरी निःसंशय, तुमचा प्रास्पेरो तो मीच. ज्याला तुह्मी मिलान शहरांतून काढून लाविलें तो मीच. अझून तरी ओळख पटली कीं नाहीं? तुह्मी काढून लाविल्यावर मी पुढें,

मोठ्या चमत्कारानें, ज्या बेटाच्या किनाऱ्यावर तुमचीं गलबतें फुटलीं त्या ह्या बेटावर येऊन लागलों; व ह्याचा राजा झालों. पण सध्यां ती हकीगत राहूं द्या. ती सांगूं ह्मटलें तर कित्येक दिवस लागतील. तशांत, भेटीचा हा पहिलाच प्रसंग; आणखी सध्यां जेवणाची तयारी झाली आहे, तेव्हां हकीगत सांगत बसण्याची ही वेळ नाहीं. यासाठीं मी मोठ्या प्रेमानें व आदरानें तुह्मा सर्वांचें स्वागत करतों. आणि 'या महाराज या,' असें आदरानें ह्मणतों. हें बेट हें आमचें राज्य; आणि ही गुहा हें आमचें राजमंदीर. आह्मांला आमच्या राज्यांत प्रजाजन कोठेंच नाहींत. थोडेसे सेवक मात्र आहेत. तथापि येथें आपणास कांहीं कमी पडणार नाहीं. तर प्रेमभावानें केलेलें हें स्वागत मान्य करा, आणि वेडा-वांकडा हा पाहुणचार गोड करून घ्या.——या या, कृपा करून असे आंत या. बाहेर उभे कां? येथें संकोच अथवा भय कशाला? आपण माझें राज्य जसें मला परत दिलें, तसा आपणास कांहीं उत्तम लाभ करून द्यावा व आपलें उतराई व्हावें असें माझ्या मनांतून आहे. आतां, मी जो लाभ करून देणार त्याच्या योगानें अधिक नाहीं तरी किमान पक्ष, राज्यप्राप्तीपासून जेवढा आनंद मला, तेवढा तरी तुह्माला खचीत होईल. तर या—असे माझ्या मागून या; व दाखवतों हा चमत्कार पहा!

[प्रास्पेरो कांहीं मंत्र ह्मणतो, त्याबरोबर गुहेचें दार उघडतें, आणि आंत फर्डिनान्ड व मिरांडा उभयतां बुद्धिबळें खेळत बसलेलीं दिसतात.]

मिरांडा—प्राणवल्लभा, मी नाहीं गडे! तुह्मी खेळतांना मला भारीच ठकवितां.

फर्डिनान्ड--सखे, अशी गोष्ट कशी होईल? सगळी पृथ्वी जरी कोणी देऊं केली तरी सुद्धां मी तुझ्याशीं खोटें खेळणार नाहीं.

मिरांडा--चिंता नाहीं. पृथ्वीची गोष्ट कशाला हवी? वीसच राज्यें लावल्याचें आपलें हें भांडण जर मिटत असलें तर तुह्मी खोटें खेळत नाहीं असें, हवें असल्यास, तुमचेसाठीं मी आतां देखील ह्मणतें; मग तर झालेंना?

अलान्झो--ओहो! हें काय? ह्या बेटावर जसे शेंकडों भ्रामक चमत्कार हा वेळपर्यंत पाहिले तसाच हाही एक नाहींना? असेल तर माझा एकच बाळ मला दोन वेळां अंतरला व त्याच्या मरणाचें दुःख मला दुबार भोगावें लागलें असें ह्मणावें लागेल!

सिबास्टीन--हा हो केवढा चमत्कार? अहाहा! धन्य आहे!

फर्डिनांड--खचित! सागरानें मजवर मोठा कहर उसळला असें मी मानीत होतों; पण नाहीं, त्यालाही कांहीं दया माया आहे. त्याला विनाकारण मी शब्द लावीला असें आतां कबूल करणें भाग आहे. एरवीं, बाबांची भेट कशी होती? [बापाच्या पायां पडतो.]

अलान्झो--बाळा, तुझें कल्याण असो! हर्ष पावलेल्या तुझ्या पित्याचा हा आशीर्वाद तुझें सदैव रक्षण करो. ऊठ, बाळा ऊठ. तूं येथें कसा येऊन पोंहचलास, सांग पाहूं आधीं?

मिरांडा--वा! काय बाई हा चमत्कार ह्मणावा? किती हो हे सुंदर प्राणी येथें! वा! एकूण मनुष्यें तेवढीं सारीं सुंदर खरीं! ज्या जगांत अशीं मनुष्यें आहेत तें हें नवें जग खरोखर धन्य आहे बाई!

प्रास्पेरो--बाळे, हें जग तुला मात्र नवें आहे!

अलान्झो--[फर्डिनान्ड यास] जिच्या बरोबर तूं खेळत होतास ती ही कुमारी कोण? तुझी हिची ओळख फार झाली तर प्रहराच्या आंतलीच असली पाहिजे. आपली ताटातूट करून, फिरून आपणास एकत्र आणून सोडणारी ही कोणी देवता तर नव्हेना?

फर्डिनान्ड--नव्हे; ही तर मनुष्यकन्यकाच आहे. परंतु ज्याची कृति अमानुष, अशा परमेश्वराच्या कृपेनें ही माझी झाली आहे. मी हिचा अंगीकार केला, तेव्हां बाबा, आपली आज्ञा मला घेतां आली नाहीं याची मला क्षमा असावी. काय सांगूं बाबा?—आपण जिवंत असाल असें देखील तेव्हां वाटलें नाहीं. महाराज, जो मिलान नगरचा महाविख्यात राजा, तो हा पूज्य पुरुष; आणि त्याची ही कन्या. यांचें नांव पुष्कळ वेळां माझ्या कानावरून गेलें होतें. प्रत्यक्ष भेटीचा मात्र योग कधीं आला नव्हता. यांनीं आज मला नवा जन्म दिला; आणि ह्या सुंदरीचे संबंधानें तर हे माझे खरेच तीर्थरूपही झाले आहेत.

अलान्झो--तर मग, मीही हिला तीर्थरूपच झालों ह्मणायाचा! पण कायहो, आपल्याच मुलीपाशीं आपण क्षमा मागितली तर तें कसेंसेंच दिसेल, नाहीं बरें? एरवीं

हिला दुःख दिल्यावरून मला हिची क्षमाच मागितली पाहिजे.

प्रास्पेरो--महाराज, ती गोष्ट सोडून द्या. तिचें आतां नांव नको. गत गोष्टीची आठवण करून या आनंदाचे प्रसंगीं विनाकारण कां दुःख करतां?

गान्झेलो---केवढा वेळ तरी मी बोलायाला पहात आहें! छे, माझें हृदय भरून येऊन, आंतले आंतच गुदमरून गेल्यामुळें, शब्दही तोंडावाटे निघत नाहींत! पण आतां बोलतों--ते माझे शब्द ऐका. हे जलस्थलचर समस्त देवतांनो, ह्या जोडप्यावर तुह्मी सदोदित कृपादृष्टी ठेवा, आणि ह्यांच्या मस्तकावर मंगल मुकूट आणून घाला! मार्ग दाखवून तुह्मीच आह्माला जसें येथवर, आणलें, तशी एवढी आमची इच्छा पूर्ण करा. तुमची करणी अगाध आहे. तुह्मी काय करणार नाहीं?

अलान्झो--तुझ्या तोंडांत साखर पडो, इतकेंच यावर मी ह्मणतों!

गान्झेलो---अहो, मिलन नगरच्या राजाला मिलन नगरच्या गादीवरून काढून लाविला तो, त्याच्याच अपत्यांनीं नेपल्स नगरांत सिंहासनारूढ व्हावें ह्मणून कीं काय! मला तर हा योग असाच दिसतो! असें असेल तर अहाहा! धन्य आहे दैवयोगाची! आजचा हा आनंद कांहीं सामान्यापैकीं नव्हे. खरोखर, बळकट, फार उंच आणि न भंगतील असे यशस्तंभ उभारून त्यांवर सोन्याच्या अक्षरांनीं आजची हकीगत लिहून ठेवली पाहिजे! पहा, एकाच सफरींत कुमारिका क्लारिबेल हिला ट्यूनिस

येथें पतिप्राप्ति आणि तिचा बंधु फर्डिनान्ड ह्याला वधूप्राप्ति असे एकदम दोन उत्तम लाभ झाले. ही काय लहानसान गोष्ट ह्मणावी? त्यांत आणखी विशेष हा कीं, ज्या ठिकाणीं फर्डिनान्ड राजपुत्र नाहींसा झाला अशी सर्वांची समजूत होती, त्याच ठिकाणीं हा लाभ! त्यापक्षीं तो कांहीं लोकोत्तरच ह्मटला पाहिजे. आतां इकडे आमच्या प्रास्पेरो महाराजांना येथें या बेटावरचे बेटावर राज्यलाभ! आणि आह्मा सर्वांना जीवितलाभ! याठिकाणीं आमच्या जिवाचाच आह्माला कोठें भरंवसा होता? पण त्याच ठिकाणीं आज आह्मी आपल्या जिवानिशीं खुशाल आहों, हें आमचें काय लहान भाग्य ह्मणावें?

अलान्झो—[फर्डिनान्ड आणि मिरांडा यांना] मुलांनो, तुमचे हात करा पुढें पाहूं? [चुंबन घेऊन] जो कोणी तुह्मास अभीष्ट चिंतणार नाहीं त्या पापी चांडाळाला सदैव रौरव दुःख प्राप्त होवो.

गान्झेलो—असेंच होवो, असेंच होवो!

[एरिल पुनः प्रवेश करतो. त्याच्या मागून तांडेल व नाखवा, आश्चर्य चकित होत्साते, येतात.]

गान्झेलो—अहो! ही पहा, ही पहा! आपल्यापैकीं आणखी कांहीं मंडळी आली. मी ह्मटलें नाहीं?—हा नाखवा जमिनीवर फाशीं जायचा—बुडून मरावयाचा नाहीं ह्मणून. कायरे भद्रकपाळ्या, जहाजावर कसें तोऱ्यानें तोंड सोडलें होतेस? तें तोंड आतां कुठें गेलें? जमिनीवर तुला तोंड नाहीं वाटतें? अरे, बोलत कां नाहींस? काय खबर आहे, सांग पाहूं?

नाखवा——खबर विचाराल तर पहिली हीच कीं, आमचे महाराज आणि आपण मंडळी आह्माला जिवानिशीं खुशाल भेटलां ! दुसरी खबर आमच्या गलबताची. सरासरीं एका प्रहरापूर्वीं आमचें गलबत फुटलें. आतां जें फुटलें त्याची कसली आशा ? पण पहातों तों तें या बेटाच्या एका खाच्यांत मोरवा करून पडलें आहे! आणि तें असें बळकट आणि टणटणीत दिसत आहे, आणि त्याचीं अवजारें नवट असून अशीं आंवळ बांधिलीं आहेत कीं जसें कांहीं तें आह्मीं पहिल्यानेंच समुद्रांत लोटण्याकरितां काढलें आहे !

एरिल——[प्रास्पेरो यास एकीकडे] कसें काय, महाराज ? एकंदर कामाची हवाल ही अशी आहे. कशी काय आपल्या पसंतीला येते ?

प्रास्पेरो——[एरिल यास एकीकडे] शाबास ! किती तुझें शहाणपण !

अलान्झो——अहो, ह्या गोष्टी खरोखर अलौकिक होत. जें जें ऐकावें व पहावें तें तें अधिकच. पण तुह्मी येथें आलां कसे, हें आधीं सांगा पाहूं ?

नाखवा——सांगूं काय महाराज ? धड शुद्धीवर असूं तर सांगणारना ? आह्मी नुसते गाढ झोप घेत पडलों होतों–ही झोप कशी आली हें कांहीं कळत, नाहीं. पण मेल्यासारखे जाळीं खालीं पडलों होतों

एवढें खरें! इतक्यांत ओरडाओरड, किंकाळ्या, बोंबा-बोंब, कानीं पडली; त्यांतच बिड्यांचा खणखणाट ऐकूं आला. त्याबरोबर आणखी कांहीं विलक्षण व भयप्रद सूर ऐकूं येऊं लागले. एवढा गोंधळ उडाला तेव्हां आह्मी जागे झालों. आह्माला वाटलें, आह्मी बळकट बंधनांतून मोकळे झालों! पुढें पाहातों तों आमचें झोरक्याचें गलबत आमच्या समोर उभें! आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं तें अगदीं कोरें करकरीत व सर्व सामानासहित सज्ज! त्याकडे हे आमचे तांडेल आनंदानें टकमक पहातात—इतक्यांत, काय सांगूं महाराज, आमची मंडळी गेली कोणीकडे आणि आह्मी राहिलों जागचे जागीं! अशा रीतीनें चुकामुक झाल्यावर, आह्मी, आमची इच्छा नसतां, वेड्यासारखे फिरत फिरत इकडे आलों. आह्माला अझूनही वाटतें—आह्मी स्वप्नांत तर नाहींना!

एरिल—[प्रास्पेरो यास एकीकडे] हें कसें काय आपल्या पसंतीस येतें?

प्रास्पेरो—[एरिल यास एकीकडे] हुशारच तूं! पसंतीला येतें ह्मणून काय विचारतोस? आतां लवकरच तुझी सुटका होईल बरें.

अलान्झो—छे छे! असा विलक्षण घोंटाळा कधीं कोणी पाहिला नसेल! आणि अशा एकेक अलौकिक गोष्टीही पूर्वीं कधीं घडलेल्या कोणी ऐकल्या नसतील. यांचा

उलगडा मनुष्यानें तर होणें नाहीं; परमेश्वरच येऊन करील तर करील!

प्रास्पेरो——महाराज, ह्या गोष्टींचा ध्यास आतां आपण घेऊं नये. कारण त्यायोगें विनाकारण आपल्या मनाला शीण मात्र होईल. सवड पाहून मीच या सगळ्याचा उलगडा करीन. मग, झालें हें नीटच झालें असें आपणच ह्मणाल. तोंपर्यंत सर्व कांहीं यथास्थित आहे, कोणाला नुकसान झालें नाहीं, अशी खात्री समजून आपण आनंदानें असावें. (एरिलच्या कानाशीं लागून) एरिला, असा इकडे ये. जा, मंत्र काढून घे, आणि त्या कालिबनाला व त्याच्या त्या दोघा सोबत्यांना मोकळें कर. (एरिल निघून जातो) कां महाराज? कसें काय? आपल्या मंडळींतून आणखी कोण चुकून राहिले आहेत? आठवण करून पहा बरें. मला वाटतें, अझून दोन तरी विलक्षण मूर्ति असाव्यात, त्यांची आपणाला आठवणच नाहींसें दिसतें.

[इतक्यांत एरिल पुनः येतो. आणि त्याच्या मागून, चोरलेला पोषाख घालून, कालिबन, स्टिफानो, आणि त्रिकालिक हे येतात.]

स्टिफानो——(घाबरल्यासारखें करून) ऐकलें रे बोवांनो? आतां ज्याचा त्यानें आपला रस्ता पाहावा, दुसऱ्याच्या मदतीची आशा करूं नये बरें! कारण सर्वस्वीं घात झाला, त्याला करणार काय? हा सारा नशीबाचा खेळ आहे, झालें! पण लेका राक्षसा, हें सारें तुझें कृत्रिम दिसतें! खरें सांग—बावळ्यासारखा पाहातोस काय तोंडाकडे?

त्रिकालिक--अँ! परमेश्वरानें माझ्या कपाळावर हे दोन डोळे मला ठेवून दिले आहेत, ते जर या वेळीं नीट पहात असतील, तर मला वाटतें, हें प्रकरण कांहीं वाईट दिसत नाहीं!

कालिबन--वारवा! हीं तर बेट्या, नामी नामी भूतें दिसतात. अरे! यांच्यांत माझा धनी पण कसा सूर्य-नारायणावाणी शोभतो आहे! पण नको! आईग! याचें भारी भय वाटतें—हा आतां मला मारील.

सिबास्टिन—ओहो! हें काय समोर येत आहे? ॲन्टोन साहेब, कायहो हें विकत मिळेलका येथें?

ॲन्टोनियो—हो, न मिळायाला काय झालें? हा एकजण तर निव्वळ मासा दिसतो!—नव्हेहो? खचित, बाजारांत मांडला तर छान किंमत येईल!

प्रास्पेरो--ह्यांच्या आंगांतले पोषाक पहा! ह्यावरूनच, हे कितपत सात्र आहेत याची परीक्षा होते. आणि हा पाहि-लाका चोर! कशी वेडीविद्री बावळी मूर्ति आहे! याची आई अस्सल चेटकीण होती बरें! चेटुकविद्येंत काय तिची प्रवीणता! चंद्रावरही ती आपला अंमल चालवी; भरती ओहटी वाटेल तेव्हां उत्पन्न करी; आणि याच्याही पलीकडे अचाट कृत्यें घडवून आणी. त्या बयाचें हें पोर! महाराज, ह्या दोघांनीं चोरी करून मला नागविलें आहे. आणि हा—हा,-हा अधम, नीच, सैतानाची अवलाद,

यानें तर यांच्याशीं मसलत करून माझा जीव घेण्याचीच तयारी केली होती. पैकीं हे दोघे आपले; त्यांस आपण सांभाळावें. ही सैतानाची अवलाद आमच्या ओळखीची; तिचा समाचार आह्मी घेतों.

कालिबन—नायर-नायर! आतां धडगत नायर! चिमटे घे घेऊनरे, आतां याच्या हातून मरायाचें रे!

अलान्झो—कोण?-हा आमचा आचारी स्टिफानो नव्हेका? अरे दारूबाजा!

सिबास्टीन—दारूबाज ह्मणजे? सामान्य नव्हे! हा ह्या क्षणीं देखील दारूच्याच धुंदींत आहे. बेट्याला दारू तरी कोठें मिळाली हो?

अलान्झो—आणि हा त्रिकालिक? हा सुद्धां दारू पिऊन लाल झाला आहे! अहो, यांना रंगवून सोडण्याइतकी ही बयाबाई मिळाली तरी कोठें?—अरे, पण तुझी अशी धनुकली कशानें वळली?

त्रिकालिक—आपली चुकामुक झाल्यापासून महाराज, माझी अशी दशा झाली. मला नाहीं वाटत-माझीं हीं हाडें पुनः कधीं सरळ होतीलशीं! पण हो-एक बरें झालें, मला याउप्पर संधिवातानें पोंक वळण्याचें भय उरलें नाहीं!

सिबास्टिन—(स्टिफानोच्या जवळ जाऊन) कारे लेका, स्टिफानो, कसें काय?

स्टिफानो--हुं-हुं-हुं! दूर! माझ्या आंगाला हात नका लावूं! कसचा स्टिफानो आणि कसचें काय? येथें झालें आहे सर्वांगाचें धिरडें.

प्रास्पेरो--कायरे ए चोरा, तूं या बेटाचा राजा होणार होतासना?

स्टिफानो--आह्मी कसले महाराज राजे!-मरतमढे आह्मी!

अलान्झो--[कालीबनाकडे बोट करून] ही तर कांहीं विलक्षण वस्तु दिसते. आजवर आपल्या कधीं पाहाण्यांत नव्हती आली.

प्रास्पेरो--अहो, ही मूर्ति जशी आकृतीनें वांकडी तशीच मनानें ही वांकडीच बरें!--गुलाम मेला तरी सरळ वागायाचा नाहीं. जारे हरामखोरा, आपल्या गुहेंत जा. या तुझ्या सोबत्यांनाही बरोबर घेऊन जा. आणि गुहा झाडून झुडून, भोजनाची तयारी कर. तुझ्या अपराधांची क्षमा हवी असेल तर एवढें तुला केलें पाहिजे.

कालिबन--ठीक आहे. ह्मणतोस तशी तयारी ठेवतों, मग तर मजवर खुश होशीलना? आतां माझे डोळे उघडले, आजपासून तुझ्या मर्जीबाहेर कधीं वागणार नाहीं. तूं किती चांगला आणि भला!-पण इतका वेळ या मूर्ख छाकट्याला किरे देव ह्मणून मी मानीत होतों! गाढवरे मी गाढव-एक नव्हे सात गाढव!

प्रास्पेरो---चल लेका! येथून चालता हो. फाजील बोलूं नको.

अलान्झो---चले जाव, आणि चोरीचा माल आणला असेल तो जेथचा तेथें नेऊन ठेवा.

सिबास्टिन---छे छे! असें कोठें बोललें आहे? जें हातीं लागेल तें आणखी लांबवा. पाहतां कशाला मागें पुढें?

[कालिबन, स्टिफानो, आणि त्रिकालिक निघून जातात.]

प्रास्पेरो---महाराज, आपणास आतां माझी एक विनंति आहे. ती हीच कीं, स्वतां आपण आणि आपल्या बरोबरची ही मंडळी, या सर्वांनीं आतां आमच्या गरिबशा गुहेंत चलावें, रात्रची रात्र तेथें काढावी आणि स्वस्थपणें विश्रांति घेऊन आपला शीण दूर करावा. करमणुकीसाठीं घटकाभर सवडीप्रमाणें मी आपली हकीगत तुह्माला सांगणार आहें. मी या बेटावर कसा येऊन लागलों, पुढें कोणकोणत्या अडचणी आल्या, कसकसे प्रसंग गुजरले, व त्यांतून निभावून आजचा समय कसा प्राप्त झाला वगैरे ज्या गोष्टींचें आपणास गूढ वाटतें त्यांचा मग आपोआप उलगडा होईल; व मौजेनें ऐकतां ऐकतां वेळ केव्हां निघून जाईल, तो कळणार देखील नाहीं. सकाळीं उठलों ह्मणजे मग तुह्मी आह्मी सर्वजण तुमच्या गलबतावर जाऊं; आणि तेथून तसेच, नांगर उचलून, नेपल्स शहराचा मार्ग धरूं. माझें ह्मणणें

असें आहे; आपलें काय आहे?——नेपल्स शहरीं गेलों कीं, पहिलें काम ह्या माझ्या लाडक्यांचा लग्नसमारंभ! तो मोठ्या दणक्यानें झाला पाहिजे. असा लग्नाचा सोहळा पाहण्याची मला फार हौस आहे. इतकें झाल्यावर मग आमची स्वारी, ऐकलेंकाहो मंडळी, मिलान शहरीं जाणार, आणि सुखानें अंतकाळाची वाट पाहात राहाणार!

अलान्झो——वाहवा! आपली हकीकत खचित मोठी चित्त-वेधक असली पाहिजे. ती केव्हां ऐकूं असें मला झालें आहे.

प्रास्पेरो——ठीक आहे. तर मग ती सर्व आपणास लौकरच सांगतों; भ्रमांत ठेवीत नाहीं बरें! [एरिल याच्या कानाशीं लागून] ऐकलेंसनारे गड्या, मी आतां काय ह्मटलें व काय ह्मणतों तें. त्याप्रमाणें पुढें तुला तर्तूद ठेविली पाहिजे. ही आतां शेवटचीच कामगिरी. एवढी केलीस ह्मणजे आटपलें. मग तूं खुशाल वायुरूप होऊन मजा मार.

(सर्व मंडळीस मोठ्यानें.)

तर कृपा करून सर्व मंडळीनें चलावें आतां. सध्यां अधिक बोलत नाहीं, एवढेंच सांगतों:——

श्लोक (स्रग्धरा).

मंदत्वें वायु वाहो; जलधि न खवळो; सूर्य तापा न देवो;
वृष्टीवांचून तुष्टिप्रद अजि पसरो साउली मेघरावो;।
तैशी वीज स्फुरो ते न; नभिं गडगड ध्वान कोठें न होवो;
धाडें नौका नृपाची परम जलदिनें इष्ट देशास पावो ॥ १ ॥

[उपसंहारात्मक भाषण.]

अभंग.

(हा अभंग प्रास्पेरो यानें बोलावयाचा.)

[" हेंचि दान दे गा देवा " या आर्तीच्या चालीवर

मंत्रशक्ति लया गेली । जन्मसिद्धा ती राहिली ॥ १
नाट्य दाविलें नानाकळा । जनसंतोषाचा मळा ॥ २
हेत मनींचा पुरला । राज्यलाभ पुन्हां झाला ॥ ३
सुहृज्जन भेटले । प्रेम सर्वांगीं दाटलें ॥ ४
ठक शुद्धीला आणिले । क्षमाबळहि दाविलें ॥ ५
पाहुं एकदा नेपल्स । हेचि आतां सारी हौस ॥ ६
परि न तोडवे ओढ । सभाजनांची गाढ ॥ ७
दूर करा हो हा पाश । मुखें बोला जी संतोष ॥ ८
तुह्मा रसिकांचा तोष । तेंचि माझें प्रिय नेपल्स ॥ ९
हंसविवेकें घ्या गुण । घाला दोषां पांघरुण ॥ १०
नातरि जाऊं शरण । धरूं हरीचें चरण ॥ ११
तो न उपेक्षी स्मरतां । सुजनहो ! रजा आतां ! ॥ १२ ॥

समाप्त.

B